# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा इतिवृत्त

### दिनांक ०५-२-२००२ ते २७-०३-२००२

## रजिष्टर क्र. ३

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ५-२-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ५-२-२००२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. लकडे भरत श्रीमती
७) श्री. सावंत मधुकर दामोधर
८) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
९) श्री. शिंदे किशोर रावसाहेब
१०) श्री. शे.इलियास किरमाणी शे.उमर
११) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१२) श्री. ओक जयवंत केशवराव
१३) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१४) डॉ. श्रीमती आशा उत्तम बिनवडे

**विषय क्र.: ७५/१**

सन २००१-२००२ या वित्तीय वर्षाचे माहे डिसेंबर २००१ पर्यंतचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज विचारात घेवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यात आलेल्या सन २००१-२००२ च्या सुधारीत अंदाजपत्रक कलम ९६ नुसार विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**संवाद :**

**मुख्य लेखाधिकारी :** सन २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक प्रशासनातर्फे स्थायी समितीसमोर जमा खर्चाचे विवरण पत्र आज सादर करण्यात येत आहे. गेल्या नऊ महिन्यातील जमा खर्चाचा आढावा घेवून जी तुट निर्माण होत आहे.या संभाव्य तुटीचा विचार करुन खर्चात प्रशासनातर्फे काही प्रमाणात कपात सुचविण्यात आलेली आहे. मार्चमध्ये १३५,५६,४०,०००/ इतक्या रकमेचा अर्थसंकल्प आपण मंजूर केला. त्याची सविस्तर आकडेवारी अंदाजपत्रकीय पुस्तकात सादर केलेली आहे.आज तेच अंदाजपत्रक सुधारीत करुन ९७,०१,३५,०००/- इतक्या रकमेचे सादर केलेले आहे. जी ३८ कोटींची तुट निर्माण झाली यात प्रामुख्याने मुळ अंदाजपत्रक तयार करीत असतांना ज्या जमेच्या बाजू घेतल्या त्यानुसार जकातीचे खाजगीकरण अपेक्षित केलेले होते. गेल्या वेळेस अंदाजपत्रक मंजूर होत असतांना

जानेवारी २००१ मध्ये आपण जकातीच्या खाजगीकरणासंदर्भात निविदा मागविल्या होत्या. निविदा प्रोसेसमध्ये होत्या. त्याचवेळेस अंदाजपत्रक सभागृहापुढे ठेवण्यात आलेले होते. खाजगीकरण करण्याबाबत उद्दिष्ट ठरविण्यासाठी शासनाने काही निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे नैसर्गिक वाढ म्हणून मागील वर्षाचे जे ४८ कोटींचे उद्दिष्ट होते त्यात २०% वाढ करायची व अस्थापनेवरील खर्चाचे जे ५०% खर्च त्यामध्ये समावेश करुन ६१ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट ठेवलेले होते. मालमत्ता कराची थकबाकी ३७ कोटी आहे.जकातीचे संभाव्य खाजगीकरण झाले असते तर तेथील सुमारे १५० कर्मचारी मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी मिळाले असते.सिडकोचे मनपाकडे हस्तांतरण होईल व मालमत्ता कराच्या स्वरुपात ४ कोटी रुपये सिडकोकडून प्राप्त होतील हे अपेक्षीत धरुन उत्पन्न बाजुमध्ये गृहीत धरण्यात आले होते.

पाणीपट्टीची १२ कोटी रु. थकबाकी आहे. मालमत्ता व पाणीपट्टीची अतिरिक्त वसुली जकात विभागातील १५० कर्मचारी देऊन करण्यात येईल हे अपेक्षित धरुन जमेच्या रकमेची तरतुद केलेली आहे.मालमत्तेची चालु मागणी १३ कोटींची आहे. एकूण २४ कोटी वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.७ कोटी थकीत रक्कम वसुल होईल तसेच ४ कोटी सिडको हस्तांतरण होईल त्या अपेक्षित धरुन एकूण २४ कोटींचे उद्दिष्ट होते.पाणीपट्टीची सुध्दा चालू मागणी ११ कोटींची असून मागील थकबाकी धरुन १५ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले होते.तथापि जकातीचे खाजगीकरण काही कारणास्तव झालेले नाही. खाजगीकरण झाल्यानंतर जे कर्मचारी वसुलीसाठी उपलब्ध होणार होते ते आलेले नाही. म्हणून मालमत्ता व पाणीपट्टी वसुली अपेक्षेप्रमाणे झालेली नाही.जकात खाजगीकरण न झाल्याने व कर्मचारी उपलब्ध न झाल्याने ६१ कोटी उद्दिष्ट साध्य झाले नाही.नैसर्गिक वाढ म्हणून मागील वर्षाचे ४८ कोटीचे १०% प्रमाणे सुधारीत ५२.५० कोटीचे उद्दिष्ट या विचारात घेतले आहे.गेल्या ९ महिन्याचा आढावा घेऊन इतर सर्व हेडमध्ये दुरुस्ती केलेली आहे. जकात, मालमत्ता तसेच पाणीपट्टीची उद्दिष्टाप्रमाणे वसुली झाली नाही. तसेच शासनाकडून जे अनुदान यावयाचे ते सुध्दा प्राप्त झालेले नाही. तसेच मागील वेळेस कॅबिनेट मंत्रीमंडळाची बैठक झाली त्यावेळी मनपास दरवर्षी १० कोटी रुपये दिलेले होते. परंतु शासनाने फक्त ५ कोटी रुपये दिलेले आहेत. १० कोटी उत्पन्न गृहीत धरले होते ते प्राप्त झाले नाही.कुटुंब कल्याण नागरी हिवताप योजना यातुन सुध्दा शासनाकडून अनुदान प्राप्त नाही. अग्निशमन विभागात रेस्क्यू व्हॅन घेण्यासाठी वैधानिक विकास महामंडळाकडून २ कोटी रुपये मिळणार होते ते अदयाप मिळालेले नाही. अशी ही १०-१२ कोटी तसेच एकूण ३८ कोटीची तुट निर्माण झाल्यामुळे मोठमोठी कामे करणे शक्य होत नाही. त्यामुळे ९७ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रक सभागृहाच्या मंजुरीस्तव ठेवण्यात आलेले आहे त्यावर विचार विनिमय करुन कृपया मान्यता द्यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सुधारीत अर्थसंकल्प प्रत्येक वेळी ठेवला जातो. प्रत्येक अर्थसंकल्पात इतकी वसुली होईल म्हणून नमुद केलेले असते. आकडे फुगवून दिले जातात नंतर पुन्हा तेवढी वसुली होणार नाही असे दाखविण्यात येते गेल्या ४ वर्षापासून हे चालत आलेले असून बजेटनुसार

तेवढी वसुली होत नाही. हे योग्य नसुन यावर सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय व्हावा.

**मुख्यलेखाधिकारी :** जकात खाजगीकरण होणार म्हणून ६१ कोटीचे उद्दिष्ट होते.खाजगीकरण न झाल्यामुळे उद्दिष्ट पूर्ण होत नाही. जकात विभागातील येणारे कर्मचारीही वसुलीसाठी न मिळाल्यामुळे वसुली झालेली नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मनपाची जबाबदारी पदाधिकारी /अधिकारी यांचेवर आहे. जकात विभागाचे कर्मचारी येणार होते ते न मिळाल्याने इतर वसुली झाली नाही असे म्हणणे चुकीचे ठरेल. एका मुद्दयावर अवलंबुन राहुन वसुली केलेली नाही हे बरोबर नसून मनपाकडे ७०० शिक्षक आहेत. यांना निवडणूक,जनगणना इ. कामासाठी दिले जाते तर वसुली करण्यासाठी पाठविले असते तर वसुली होण्यास मदत झाली असती. पाणीपट्टीची थकीत व चालु वसुली पाहता कमी प्रमाणात वसुली झालेली असुन होणारा खर्च त्यापेक्षा जास्त प्रमाणात झालेला आहे. उत्पन्न कमी, खर्च जास्त ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालली पाहीजे. तसे प्रयत्न व्हावयास पाहीजे. गेल्या वेळेस अर्थसंकल्पात वैशिष्टयामध्ये अभय योजना राबविण्याबाबत नमुद केले होते. त्याची अद्याप कार्यवाही केली नाही.कार्यवाही झाली असती तर वसुलीचे प्रमाणे वाढले असते आता सुधारीत अर्थसंकल्प ठेवला ही माहिती सामान्या जनतेपर्यंत पोहचेल व ९ महिन्यात आकडेवारी काढता एकदम ३८ कोटीची तुट कशी येते यातुन जनता पदाधिकारी, नगरसेवक यांचेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल एवटी मोठी तुट देणे बरोबर नसुन यास प्रशासन जबाबदार आहे. अधिकारी / कर्मचारी यांना वसुलीच्या कामाला लावावे. यावर सविस्तर चर्चा व्हावी. ९७ कासेटी बजेट सादर करुन मंजुरी घेऊन पदाधिकारी / सभागृहावर जबाबदारी टाकणे योग्य होणार नाही.आतापर्यंत रु. ३७ कोटी ८ लक्ष इतकी वसुली झाली. एकूण ५२.५० कोटीचे उद्दिष्ट प्रशासनाने दिले तेवढी वसुली होणार आहे का? याचा खुलासा द्यावा. आता फक्त २ महिने अवधी आहे.

**मा.सभापती :** जकातीचे उद्दिष्ट ६१ कोटीचे ठेवलेले होते. अपेक्षित १३५ कोटी बजेटमध्ये एकूण ठेवण्यात आले.जकातीचे ६१ कोटी ऐवजी आता ५२.५० कोटीचे उद्दिष्ट ठेवले आतापर्यंत ३७.८३ कोटी वसुली झाली. ५२.५० कोटी धरल्यास आणखी १६ कोटी रुपये वसुल करणे गरजेचे आहे. त्यासाठी दररोज १७.४४ लक्ष रुपये जकातीच्या माध्यमातून येतील का, पदाधिकारी यांचेकडे जी दररोजची आकडेवारी येते त्यात १४ लक्ष वर वसुली झालेली दिसत नाही. ५२.५० कोटी वसुली होण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना राबविणार आहे. खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म) :** सुधारीत अर्थसंकल्पात डिसेंबर पर्यंतची वसुली दाखवलेली असून जानेवारी अखेर एकूण ४१.२४ कोटी जकातीचे वसुल झालेले आहेत. आणखी दोन महिने राहीले. दोन महिन्यात दररोज १५ लक्ष वसुली धरता एक महिन्याचे ४.५० कोटी असे एकूण ५०.२४ कोटी होते. जकात चोरीच्या प्रकरणात आतापर्यंत २३.४७ लाख मिळाले. रेडमध्ये १ कोटी मिळेल. ५१.५० कोटीपर्यंत वसुली होऊ शकते.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** जकात खाजगीकरण होणार म्हणून ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवले.आता ५२.५० कोटीचा वसुल होतील असे दाखविण्यात येते. नियम क्र.१०३,१०४

नुसार कार्यवाही झाली का? स्थायी समितीने निर्णय घेतल्यानुसार उद्दिष्ट पुर्ण होत नाही म्हणून तसे सभागृहात लेखी कळविले का? वसुली कशी करणार याबाबत अर्थसंकल्पात काही दिलेले नाही. मागच्या वेळेस उपआयुक्त श्री.कांबळे साहेब यांना ४८ कोटीचे उद्दिष्ट पूर्ण करुन देण्याची ताकीद देणार होते. सभागृहात त्यावेळी मा.आयुक्तांनी निवेदन केले होते. त्यानुसार रकमेत भर पडण्यासाठी ॲडव्हान्समध्ये काही थापा यांच्याकडून चेक घेण्यात आले. तशी परिस्थिती आता होवू नये याची खबरदारी घेतली पाहीजे. पुर्वी प्रमाणेच ॲडव्हान्स चेक घेणार का? त्याचा खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म) :** मागच्या वर्षी चेक घेण्यात आले होते. नंतर वर्षभरात समायोजन करतात.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** नियम क्र.१०३,१०४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली का? खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** आताच मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला. जकातीचे ६१ कोटीचे उद्दिष्ट पूर्ण होवू शकत नाही.

**श्री.नंदकुमार फुलारी :** खाजगीकरण केल्यास ६१ कोटी वसुली होऊ शकते. त्यानुसार मनपा का ६१ कोटी वसुल करु शकत नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जकात,पाणीपट्टी तसेच मालमत्ता वसुलीच्या संदर्भात नेहमीच पदाधिकारी / अधिकारी यांच्यात एकमत होत नाही. अधिकारी / कर्मचारी यांनी जातीने लक्ष देऊन वसुली केली असती तर ६१ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट पूर्ण झाले असते. लोकप्रतिनिधींना जनतेच्या समोर जावे लागते. अधिकारी सभागृहाचे समाधान होण्यासाठी सभागृहात चुकीची माहिती देतात. आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केल्याप्रमाणे आजची वसुली १४ लक्षच्या वर येत नाही. अधिकारी सांगतात १५ लक्ष वसुल करुन दोन महिन्यात ९ कोटी वसुल होती. हे सत्य वाटत नाही.

**श्री.भरत लकडे :** खाजगीकरण केल्यास ६१ कोटीची अपेक्षित धरतो तर मनपाने ६१ कोटी का वसुल केले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** खाजगीकरणा अंतर्गत ६१ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट ठरवितांना शासन निर्देशानुसार मागील तीन वर्षातील ज्या वर्गाची जास्त वसुली झाला त्या वर्षातील एकूण रकमेवर २०% ची वाढ व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १०% वाढ ही बाब लक्षात घेवूनच ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवलेले होते. मनपा जे उद्दिष्ट ठेवले जाते ते दर वर्षी होणारी वसुली प्रत्येक वर्षी वसुलीच्या १०%नी वाढ गृहीत ठेवून उद्दिष्ट ठेवले जाते. मागील वर्षी ४८ कोटी वसुल झाले ती वसुली गृहीत धरुन १०% नी वाढ करुन आता ५२.५० कोटी ठेवले आहे.त्या अगोदर ४४ कोटी वसुल झाले होते. त्यानुसार १०% वाढ गृहीत धरुन गेल्यावर्षी ४८ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले होते. खाजगीकरण करावयाचे असेल तर २०% नी वाढ गृहीत धरुन ठेवले जाते. त्यानंतरच्या वर्षापासुन वसुलीच्या १०% वाढ गृहीत धरुन उद्दिष्ट ठेवण्यात येते.

**मा.सभापती :** मुंबई नागपुर मनपामध्ये उपकर वसुली होते. त्यानुसार याही मनपात केल्यास योग्य होईल का? उपकर वसुली बाबत माहिती द्यावी. नवी मुंबई येथे उपकराची वसुली कशी होते.

**मुख्यलेखाधिकारी :** उपकर बसवण्याबाबत शासनाचे धोरण आहे हे अकाऊन्ट बेस उपकर आहेत.सध्या अमरावती, सोलापुर मनपामध्ये उपकर वसुली होत आहे.

व्यापाऱ्यांनी पुस्तके ठेवावी व त्याचे परतावा (रिटर्न) भरुन कर भरला. यामध्ये ज्यांचे उत्पन्न रु. ५०००/- च्या वर असेल अशा प्रत्येक व्यापाऱ्याला पुस्ते ठेवावे लागतात. उपकराची सविस्तर माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिकेचे अधिनियम १९४९ मध्ये दिले आहे. अमरावती महानगरपालिकेचे पहिलेच वर्षात ३०% उत्पन्न घटले. शासनाने कमीत कमी व जास्तीत जास्त दराचे बंधन घातलेले आहे. विद्यमान दरापेक्षा कमी दर लावले त्यामुळे उत्पन्न घटले आहे. त्यानंतर मात्र त्यांनी सुधारीत दराने वसुल करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविला व आता अपेक्षेप्रमाणे उत्पन्न मिळते.

**श्री.जगदीश सिध्द :** गेल्या वर्षाचे अंदाजपत्रक किती कोटीचे होते.

**श्री.साहेबराव कावडे :** खाजगीकरण केले असते तर ६१ कोटी वसुल झाले असते. या अंदाजपत्रकावरुन १० कोटी कमी येत आहे. आपले कर्मचारी इतर वसुलीसाठी घेतले असते व आणखी जमेच्या बाजुमध्ये भर पडली असती असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु ही परिस्थिती प्रत्येक वेळेस दाखवुन १०-१५ कोटी रुपये कमी येणे बरोबर नाही व यामुळे वार्डातील नागरी सुविधा पुरविल्या जात नसुन जनतेस आम्हाला तोंड द्यावे लागते. मागील दोन वर्षापासून अंदाजपत्रकात जी तरतुद जे निर्णय घेतले जातात त्यात पाणीपट्टी वसुली, करवसुली, जकात वसुली या संदर्भात निर्णय घेतल्यानुसार अंमलबजावणी होत नाही. अंदाजपत्रक सादर होते त्यावेळेसच विचार विनिमय होऊन सादर व्हावे. तरतुद केल्यानुसार वसुली होत नसेल तर ती मनपाची दिवसेंदिवस परिस्थिती कशी होत जाईल. याचा पण विचार व्हावा,वसुलीसाठी इतर सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना लावावे. शिक्षक कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम देवू नये. त्यामुळे मुलांचे नुकसान होवू शकते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** आपण कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू केला. भरपुर पगार दिला जातो. नियमित कामाच्या वेळेव्यतिरिक्त जास्त कामास ओव्हरटाईम दिल्यास वावगे होणार नाही. नसता २ वर्षासाठी ५ वा वेतनआयोग रद्द करावा असे माझे मत आहे. शिक्षकांना कामे देता येतील. २ वर्षात मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**मा.सभापती :** नियमित कामाच्या व्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम दिल्यास त्यांना वेगळा जादा कामाचा मोबदला देता येईल.

**श्री.साहेबराव कावडे :** शिक्षक कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम देऊ नये. विद्यार्थ्यांचे नुकसान होईल असा काही निर्णय घेण्यात येवू नये.

**श्री.जगदीश सिध्द :** मुळ बजेट किती कोटीचे होते?

**मुख्यलेखाधिकारी :** सुधारीत अंदाजपत्रक १६ कोटीने कमी झाले होते. शासन अनुदान ३१-३ पुर्वी मिळाले नाही तर कमी होईल. सुधारीत अंदाजपत्रक आता ९७ कोटीचे ठेवण्यात आलेले असून यात ३ कोटी रु.शासनाकडून अनुदान (ग्रँटस) रोड ग्रँट १ कोटी, कुटुंब कल्याण ग्रँट मिळाले नाही. तर कमी होईल.

**श्री.मधुकर सावंत :** आघाडी सरकारच्या पक्षातील काही जेष्ठ सदस्य मनपामध्ये आहेत. त्यांनी शासनाकडून मनपास १० कोटी अनुदान आणण्यास मदत करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** रस्ते विकास महामंडळास ३ वर्षात ४.५० कोटी द्यायचे असुन सर्वसाधारण सभेत ठराव पास झाल्यानुसार आम्ही पदाधिकाऱ्यांनी

शासनाकडून येणाऱ्या अनुदानासंबंधी रस्ते विकास महामंडळाचे सचिवांची भेट घेतली. तसेच राज्यमंत्र्यांशी चर्चा झाल्यानुसार ३ कोटी अनुदान पोटी १५-२० दिवसात येणार आहेत.

**मुख्यलेखाधिकारी :** मागील वर्षी ५३ कोटी व सुधारीत ५० कोटी व ४७.५ कोटी वसुली झालेली होती. त्याचे १०% नी नैसर्गिक वाढ केल्यास ५२.५० कोटी होतात. त्यानुसार ५२.५० कोटीचे सुधारीत अंदाजपत्रकात उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

**मा.सभापती :** ६१ कोटीचे उद्दिष्ट होते. ५२.५० कोटी आता ठेवण्यात आले. आज रोजी ४१ कोटी वसुल झाले. आणखी ११ कोटी रुपये वसुल व्हावयाचे असुन दररोज यापुढील वसुली १७ ते १८ लक्ष यावयास पाहीजे. तरच उद्दिष्ट पूर्ण होवू शकेल.आमच्याकडे जी आकडेवारी येते ते १४ लक्षच्या वरती नाही. विविध प्रकरणात दंडात्मक कार्यवाही होते ती रक्कम वसुलीच्या रकमेस लावण्यात येवू नये.निव्वळ वसुली दाखवावी १७ ते १८ लक्ष रुपये दरारोजची वसुली येण्यासाठी प्रशासनाने एक प्रशासकीय बैठक ८ दिवसात बोलवावी व योग्य त्या उपाययोजना करुन ५२.५० कोटीचे जकातीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात यावे. यात दिरंगाई होता कामा नये. तरच विकास कामे करण्यास मदत होईल.

**<u>२) मालमत्ता कर</u>**

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मालमत्ता कराचे २४ कोटी उद्दिष्ट ठेवले त्यातून ६.३५ कोटी वसुल झाले ५०% सुध्दा वसुली झालेली नाही. हे योग्य नसुन वसुलीवर भर दिला पाहिजे.२ महिन्यात उर्वरित वसुली होईल का?

**मा.सभापती :** दोन महिन्यात दुप्पट वसुली होऊ शकते का? प्रशासनाने वेगळी काही उपाययोजना केलेली आहे का?.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मालमत्ता कराच्या बाबतीत न्यायालयात बरीच प्रकरणे प्रलंबित असून मनपाचे स्वतंत्र न्यायालय करणार होते. त्याची कार्यवाही कुठपग्रंत आलेली आहे. या न्यायालयात मनपाची सर्वच प्रकरणे आपण निकाली काढणार आहोत. जनता पैसे भरण्यास तयार असून एकाच साईजच्या दोन वेगवेगळया ठिकाणच्या रुमला कमी जास्त कर आकारण्यात येतो. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे होतात. हा आतापर्यंतचा अनुभव आहे.

**श्री.जयवंत ओक :** जी प्रकरणे कर भरण्याबाबत प्रलंबित / न्यायप्रविष्ट आहेत अशा किती लोकांना वाटाघाटीसाठी बोलावून प्रकरणे निकाली काढण्याबाबत कार्यवाही केली व त्यामुळे मनपास किती रक्कम उत्पन्न म्हणून प्राप्त झाली.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** झोन वाईज अशी प्रकरणे निकाली काढण्याबाबत निर्णय झालेला होता. अंमलबजावणी का झाली नाही तसेच टाऊन हॉलच्या जुन्या इमारतीमध्ये न्यायालय उभारणार होते. त्यासंबंधी सुध्दा खुलासा करावा.

**शहर अभियंता :** मागच्या वेळी ठरल्याप्रमाणे न्यायालयासाठी टाऊन हॉलची जुनी इमारत निश्चित केली होती. सदर इमारत कामकाज करण्याच्या दृष्टीने योग्य आहे किंवा कसे यासाठी संबंधित जिल्हा प्रबंधक (रजिस्ट्रार) यांना जागा दाखविली.त्यास प्रबंधकांनी मान्यता दिली परंतु सदर इमारत फक्त एक वर्षासाठी वापरण्यास योग्य असल्याचे मत सार्वजनिक विभागाने व्यक्त केले.सदर इमारतीत न्यायालय चालविण्याकरीता इमारत (बी ॲण्ड सी) सार्वजनिक विभागाकडे अप्रोच करावी लागते व या विभागाचे प्रमाणपत्र

घ्यावे लागते. ही इमारत एक वर्षासाठी बी ॲण्ड सी कडे अप्रोच केली तसे संबंधित रजिस्ट्रार यांना कळविले. ही कार्यवाही चालु असतांनाच मनपाची बाजुलाचा नविन इमारत होत आहे. एक वर्षासाठी जुनी इमारत देण्याऐवजी नविन इमारतीतील जागा देण्याबाबत मागणी झाली. त्यानुसार नविन इमारतीत दुसऱ्या मजल्यावर जो मोठे हॉल आहे तो न्यायालये व इतर कामकाज चालविण्यासाठी ४००० स्क्वे. फुटाचा हॉल तयार केलेला असून सदरचा हॉल जिल्हा प्रबंधक (रजिस्ट्रार) यांनी पाहणी सुध्दा केली त्याचे समवेत मी व पदाधिकारी सुध्दा होते. त्या हॉलचा प्लॅन तयार करुन पुढील कार्यवाहीसाठी उच्च न्यायालयाकडे पाठवावा लागतो. त्यानुसार कार्यवाही झालेली असून सदर प्लॅन उच्च न्यायालयाकडून शासनाकडे मान्यतेसाठी जाईल.शासन मान्यता मिळाल्यानंतर सदर नविन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यवरील हॉलमध्ये न्यायालय सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** न्यायालय तात्काळ सुरु करावे. सर्व केसेस निकाली काढण्यात मनपाचे उत्पन्न वाढेल.विकास कामे करण्यास मदत होईल.

**मा.सभापती :** नविन इमारतीतील न्यायालय चालवण्याकरीता जो हॉल देण्याबाबत मागणी झाली तो हॉल पाहण्यासाठी जिल्हा प्रबंधक यांचे समवेत मी तसेच मा.आयुक्त व संबंधीत अधिकारी उपस्थित होते. सदर हॉल त्यांनी मान्य केला.पुढील कार्यवाही पुर्ण होईल असे वाटते.

**शहर अभियंता :** इमारतीच्या हॉलचा जो प्लॅन काढुन सादर केला त्यास शासन मंजुरी येईल तेव्हा पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती :** शासनाची सदर प्लॅनला केव्हा मंजुरी येईल याबाबत न्यायालयात चौकशी करुन माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**श्री.मीर हिदायत अली :** शहरातील २००० मिळकती सोडून वसुली करण्यात येते. मालमत्ता कराचे थकीत रकमेसह २४ कोटीचे उद्दिष्ट ठेवले. त्यातील चालु आर्थिक वर्षाची वसुली ११.०० कोटी करणार असे दिले. एकूण २४ कोटी रकमेतील फक्त ६.३५ कोटी वसुल केले. यात थकीत किती व चालु आर्थिक वर्षाची वसुली किती केली, याचा खुलासा देण्यात यावा व येत्या तीन महिन्यात उर्वरीत वसुली होईल काय?

**मा.सभापती :** एकूण वसुल झालेल्या रकमेतून मागील थकीत व चालु वसुली किती झाली याचा आकडेवारीसह खुलासा देण्यात यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** चालु वर्षाचे एकूण उद्दिष्ट ११.८९ कोटीचे होते. ८.११ कोटी थकबाकी रक्कम आहे.४ कोटी सिडको हस्तांतरण होईल या अपेक्षेने गृहीत धरुन असे एकूण २४ कोटीचे उद्दिष्ट ठेवले असून आतापर्यंत ३१ डिसेंबर पर्यंत ६.३५ कोटी वसुल झाले.सिडकोचे हस्तांतरण झाले नाही म्हणून ४ कोटी आले नाही. ते ८.०० कोटी थकीत वसुल होणार ते जकात विभागातील कर्मचारी न आल्यामूळे डिसेंबरच्या आकडेवारीचा विचार करता वसुल होऊ शकत नाही. म्हणून आता ११ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** थकबाकीच्या संदर्भात नागरीकांना बोलावून किती प्रकरणे निकाली काढली व त्या माध्यमातून मनपास किती वसुल झाली. १० महिन्यात यंत्रणा नाही. २ महिन्यात किती वसुल करणार. न्यायालयीन किती प्रकरणे आहेत.

**मुख्यलेखाधिकारी :** जानेवारी २००२ पर्यंत मालमत्ता कराची थकीत वसुली ४.२८ कोटी तर चालु डिमांड मधील ३.५६ कोटी वसुल झाले.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** जकात विभागाचे कर्मचारी दिले नाही म्हणून वसुली झाली नाही असे उत्तर देणे बरोबर नसुन इतर कर्मचारी वसुलीसाठी लावुन वसुली करण्याचे आदेश करावे.

**मा.सभापती :** चालु आर्थिक वर्षातील ११.०० कोटीतुन ३.५६ कोटीच वसुल झाले. उर्वरीत रक्कम २ महिन्यात कोणत्या पध्दतीने वसुल करणार.

**श्री.जयवंत ओक :** माझ्याकडे १०-१५ लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत. मालमत्ता कर भरण्यास जनता असतांना आपले अधिकारी /कर्मचारी उडवा उडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करतात. टेबलाखालुन पैसे घेण्यासाठी त्या नागरीकाला चकरा माराव्या लागतील अशा प्रकारची उत्तरे कर्मचाऱ्याकडून मिळतात व त्यामुळे मनपास येणारे उत्पन्न येत नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मी स्वत:अशा प्रकारची ४ ते ५ प्रकरणे दिली. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकेडे चार वेळेस मी स्वत: गेलो असे होत असेल तर प्रकरणे निकाली काढण्यास वेळ लागेल. जे उत्पन्न यायचे ते सुध्दा येणार नाही. सदस्यांना चकरा माराव्या लागतात तर सर्वसामान्य लोकांचे काय हाल होतील.

**मा.सभापती :** ज्या प्रकरणाचा कर भरण्याबाबत वाद आहे तो वाद तडजोड करुन निकाली लागत असेल अशी प्रकरणे एका तासाच्या आत एक प्रकरण निकाली काढण्यासाठी काय उपाययोजना करता येईल का? आतापर्यंत किती प्रकरणे निकाली काढली व मनपास किती उत्पन्न मिळाले.

**श्री.मधुकर सावंत :**अशा केसेसच्या बाबतीत मनपाने न्यायालयात पैसा खर्च केलेला असून खर्चानुसार तेवढी प्रकरणे मनपाकडून निकाली लागून वसुल झाले का? एकूण प्रकरणे किती निकाली निघाली, किती प्रलंबीत याचा खुलासा देण्यात यावा.

**विधी सल्लागार :** न्यायालयात एकूण प्रकरणे १४६३ असुन त्यातील ६३१ प्रकरणे मनपाच्या बाजुने निकाली निघाली तर ४४१ प्रकरणे मनपाच्या विरोधात गेली असुन उर्वरीत ३९१ प्रकरणे प्रलंबीत आहेत.

**श्री जगदीश सिध्द :** गेल्या दोन वर्षात मनपाच्या बाजुने किती प्रकरणे निकाली काढण्यात आली त्याचा खुलासा द्यावा.

**विधी सल्लागार :** तशी माहिती आता लगेच देता येणार नाही एकूण प्रकरणांच्या संदर्भात माहिती मिळालेली आहे.

**मा.सभापती :** ३९१ प्रकरणे न्यायालयात आहेत. मनपाचे वकीलांच्या पॅनलमध्ये बदल करावा,थकबाकीतील ४.२६ कोटी वसुल केले. ७ कोटी शिल्लक येणारे रकमेपैकी ३.५६ कोटी चालु डिमांडमधील वसुल झाले. उर्वरीत ७ कोटी महिन्यात चालू डिमांडमधील वसुल होतील का? झाले नाही तर यास कोण जबाबदार राहील, याचा खुलासा द्यावा.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** ज्यांच्याकडे १ लक्ष किंवा त्यावर रक्कम बाकी असेल अशा कर धारकाकडून झोन वाईज वसुल झालेली माहिती द्यावी. अशा किती लोकांकडून रक्कम वसुल करण्यास प्रशासनाला यश आलेले आहे.

**मा.सभापती :** मालमत्ता धारकांनी त्यांचेकडील थकीत कर भरावा यासाठी वृत्तपत्रात नावे जाहीर करण्यात येवून त्यानुसार मनपाच्या तिजोरीत किती रकमेची भर पडली,किती लोकांना पैसे भरणा केले, खुलासा करावा. जाहीर प्रगटन

दिल्यानुसार वसुली सुध्दा व्हावयास पाहिजे. जाहिरातीसाठी मनपाच्या फंडातून रक्कम खर्च होते. याचा सुध्दा विचार व्हावा.

**श्री.मीर हिदायतअली :** ६३१ प्रकरणे निकाली निघाल्यानंतर त्यानुसार किती रक्कम वसुल झाली याचा सुध्दा खुलासा व्हावा.

**उपआयुक्त (म) :** झोन क्र. १ ते ८ मधील मालमत्ता कराची वसुली खालील प्रमाणे झालेली आहे. सदर वसुली जानेवारी २००२ पर्यंतची आहे. झोन क्र. १ चे चालु उद्दिष्ट १.३० कोटी होते. ७६.८८ लक्ष वसुल एकूण टक्केवारी ५९% येते झोन क्र.२ चे उद्दिष्ट २ कोटीचे होते. जानेवारी अखेर १०२ .४६ लक्ष वसुल झाले. ५१% वसुली झालेली आहे. झोन क्र.३ चे उद्दिष्ट १.०० कोटीचे होते. वसुली ६४.३७ लक्ष असुन ६४% वसुल झालेली आहे.

**मा.सभापती :** उद्दिष्टानुसार टक्केवारीचा खुलासा करावा. यावरुन किती वसुली झाली हे समजुन येईल.

**उपआयुक्त (म) :** झोन क्र. ४ ची टक्केवारी ८२% असुन झोन क्र. ५ ची ८७% वसुली झालेली आहे. तसेच झोन क्र.६ ची ६४% तर झोन क्र. ७ मध्ये मालमत्ता कर वसुलीस नसल्याने तेथे किरकोळ फक्त १.५० लक्ष वसुल झालेले आहे.झोन क्र.८ ची उद्दिष्टानुसार ४५.६० लक्ष इतकी वसुली होऊन ६५% वसुली आहे. वरील वसुलीची आकडेवारी विचारात घेता ७६८.५९लक्ष ७०% वसुली झालेली असून उर्वरीत ३ कोटी वसुल करावयाचे आहे.

**श्री जगदीश सिध्द :** थकबाकीतील रक्कम धरुन ७ कोटी वसुल केल परंतु निव्वळ चालु मागणीतील फक्त ३ कोटी वसुल केले. त्यानुसार आणखी जवळपास ७ कोटी रुपये २ महिन्यात वसुल करायचे असुन एवढीच वसुली करणार आहे का? याचा खुलासा द्यावा.

**उपआयुक्त :** मागील थकीत रकमेतील ४.२८ कोटी वसुल झालेले असून चालु मागणीतील ३ कोटी वसुल झाली आता एकूण उद्दिष्ट ११ कोटीचे आहे.

**श्री जगदीश सिध्द :** वसुल झालेली थकीत रक्कम उद्दिष्टात धरुन तेवढे उद्दिष्ट ठेवणे बरोबर नाही. चालु वर्षाची झालेली वसुली वगळून एकूण ११.०० कोटी वसूल व्हावेत अशी आमची मागणी आहे.

**मा.सभापती :** एकूण २४ कोटीचे उद्दिष्ट होते. ६.३५ कोटी वसुल केले याचा अर्थ २५% उद्दिष्ट पूर्ण झाले. प्रशासनाने वसुलीवर भर द्यावा.

**नंदकुमार फुलारी :** वृत्तपत्रात मालमत्ता धारकांची नांवे प्रसिध्द केल्यानंतर किती लोकांवर कर्जाची कार्यवाही केली, खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म) :** एकूण ८६ लोकांच्या मालमत्तेची जप्तीची कार्यवाही केली. त्यात दोन चाकी वाहने व आवश्यक उपयोगी वस्तु जप्त केलेल्या आहेत.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** ज्यांच्याकडे ५ ते १० लक्ष रुपये कर थकीत आहे. अशा मालमत्ता धारकांवार काय कार्यवाही केली. ज्याची मालमत्ता जप्त केली त्यातुन एकुण कराच्या किती टक्के रक्कम वसुल झाली. याचा सुध्दा खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** १००% वसुली झाली नाही, परंतु ३० ते ४०% वसुली झालेली आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** ज्याची प्रकरणे कार्यालयात नाहीत, अशा मालमत्ता धारकांकडे ५ ते १० लक्ष कर थकलेला आहे तो का वसुल होत नाही.

**मा.सभापती :** वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन मालमत्ता धरकांना कर करण्याबाबत कळवुन सुध्दा १००% वसुली न होता ३० ते ४०% वसुली झाली. १००% वसुली व्हावयास पाहीजे. प्रशासनातील अधिकारी /कर्मचारी यांचा हलगर्जीपणा यात

जाणवतो. सभागृहात या विषयावर सविस्त चर्चा झाली.संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना करण्यात येत आहे. की,जाहीर प्रगटन देण्यात मनपाचा पैसा खर्च झालेला असून या तुलनेत तेवढी वसुली सुध्दा होणे गरजेचे होते. परंतु तसे झालेले नाही. एका जाहीर प्रगटनासाठी जवळपास १० ते १५ हजार रु. खर्च झालेला आहे. त्यामुळे १००% वसुली करण्यात यावी. जी प्रकरणे वादग्रस्त व इतर कारणाने प्रलंबत आहेत अशी प्रकरणे सोडविण्यासाठी प्रशासनामार्फत दर मंगळवारी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत लोकन्यायालय चालू करावे. दर मंगळवारी ११ ते ४ या वेळात किती व कोणत्या केसेस निकाली काढण्यात आल्या व काढणार आहोत यासंदर्भात स्थायी समितीसमोर तसा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा व तसे वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन तात्काळ कार्यवाही व्हावी.

**श्री.नंदकुमार फुलारी :** मालमत्ता कर वसुल करण्यासाठी प्रत्येक घरांना नंबर द्यावेत.जेणे करुन वसुलीत भर पडेल. तसेच कुणाकडे कोणत्या क्रमांकाच्या घराची थकबाकी आहे हे समजुन येईल.

**श्री.मीर हिदायतअली :** लोक न्यायालय चालु करण्यास मा.आयुक्त परवानगी देतील का? पुन्हा संचिकेवर चर्चा करा असे शेरे येतील प्रशासनाने आताच खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म) :** मा.सभापती यांनी सुचना केल्याप्रमाणे दर मंगळवारी लोक न्यायालय धर्तीवर कामे करणे चालु करु. प्रकरणे निकाली काढण्याबाबत कार्यवाही केली जाईल. याबाबत मा.आयुक्तांशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येईल.

**डॉ.आशा बिनवडे :** घरावर क्रमांक देण्याबाबत चर्चा करता निर्णय घेण्यात यावा. जनतेला योग्य प्रकारे सुविधा पुरवायच्या दृष्टीने उत्पन्नाची बाजु मजबुत करणे आवश्यक असुन मालमत्ता कराची २४ कोटीवरुन ११ कोटीचेच उद्दिष्ट करण्यात आले.थकीत व चालु वर्षाचे उद्दिष्टानुसार वसुलीची टक्केवारी पाहता २५% च वसुल झालेले आहेत.किमान ५०% वसुली करणे आवश्यक होते.जे उद्दिष्ट ठेवले होते त्याचे ५० टक्क्याच्या वर जवळपास उद्दिष्ट कमी करुन सादर केले हे योग्य नाही. मालमत्ता वसुलीची जबाबदारी झोन वाईज करावयास पाहीजे.परंतु मनपामध्ये बऱ्याच झोनमध्ये झोन अधिकारी यांचेकडे प्रभारी चार्ज दिलेला असल्याने वसुलीची खरी जबाबदारी कोणाचर आहे हे समजायला मार्ग नाही. यासाठी झोन अधिकारी यांना स्वतंत्र पदभार द्यावा तसा वसुलीत वाढ होऊ शकेल. वसुली झाली नाही तर झोन अधिकाऱ्यांना जबाबदार धरता येईल. कर मुल्यांकन विभागापेक्षा मालमत्ता कराच्या वसुलीसाठी कर्मचारी कमी आहेत. मालमत्तेचा विचार करुन तेवढेच कर्मचारी वसुलीसाठी असावेत आजची परिस्थिती पाहता १० हजार घराचे मालमत्ता कर वसुल करण्यासाठी एकच कर्मचारी येतो. अशी परिस्थिती कायम राहीली तर वसुलीत भर न पडता उलट घर होत जाईल. तसेच बऱ्याच ठिकाणी वसुलीसाठी दैनिक वेतन कर्मचारी दिलेले आहेत.कराच्या पावत्यासुध्दा ते त्यांचे सहीने फाडतात हे प्रशासनाचे धोरण योग्य नसून वसुलीसाठी कायम स्वरुपी कर्मचारीच असावेत अशी माझी मागणी आहे.

**मा.सभापती :** एकूण ८ झोनपैकी किती झोन अधिकाऱ्याकडे इतर विभागाचे अतिरिक्त चार्ज दिलेले आहेत.

**सहाय्यक आयुक्त (-१) :** एकूण ८ झोनपैकी ६ झोन अधिकारी यांचेकडे अतिरिक्त चार्ज आहे. २ झोन अधिकारी यांचेकडेच स्वतंत्र झोन अधिकारी पदाचा चार्ज सद्य:स्थितीत आहे.

**श्री.जयवंत ओक :** जी पदे ज्या संवर्गासाठी रिक्त आहेत जेष्ठतेनुसार त्यांना ती पदे का दिली जात नाहीत. या संदर्भात मागील एक बैठकीत चर्चा होऊन निर्णय सुध्दा झालेला आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. जे पदोन्नतीस पात्र आहेत अशा कर्मचाऱ्यांमधून पदे भरण्याची तात्काळ कार्यवाही व्हावी अशी माझी मागणी आहे.

**मा.सभापती :** या संदर्भात उपआयुक्तांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर पदे भरण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा चालु आहे. अनुसुचित जातीचे एकच झोन अधिकारी पद आपण भरु शकतो. ज्यांना ज्यांना पदभार दिला त्यापैकी एकच अधिकारी भरता येतो. उर्वरीत पदे भरण्यासंदर्भात शासनाचे परवानगीसाठी प्रशासनामार्फत कार्यवाही चालु आहे. बी.सी.सेलकडुन माहिती मागविण्यात आली आहे. बी.सी.सेलकडून माहिती मागविण्यात आली आहे. एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.झोन अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार देण्यात आलेल्या झोन अधिकारी यांना संपूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांना सक्षम करण्यात आले आहे. १००० रु. खर्च करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.शासनाकडे नोकरभरती करण्यासंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला असून पदांना लवकरच मंजुरी येईल अशी अपेक्षा आहे. त्या संदर्भात परवाच आपले मनपाचे पदाधिकारी यांनी सुध्दा मंत्रालयामध्ये या मुख्य सचिवांची भेट घेतली. सुमारे २१९ कर्मचारी कमी आहेत. वसुली करण्यासाठी कायमस्वरुपी कर्मचारीच दिलेले आहेत. मागे २ महिन्यापुर्वी इतर विभागातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त काम म्हणून २०=२० मालमत्तेच्या कर वसुली संदर्भात त्यांना प्रवृत्त करणेसाठी मिळकती / घरे नेमून दिलेले होते.त्यास प्रतिसाद मिळाला. आतासुध्दा वसुलीसाठी यापुढे जो टेक्नीकल स्टाफ आहे. त्यांना सुध्दा दिले जाईल.

**मा.सभापती :** शासनाचे मंजुरी दिल्यानंतर ६ महिन्याच्या आत पद भरावे लागते नसता त्यानंतर पुन्हा शासनाची मंजुरी घ्यावी लागते असा नियम आहे का?

**उपआयुक्त (म) :** नविन पदे ६ महिन्यात भरले नाही तर व्पगत होतात कार्यालयीन अधिक्षक होत नाही जे पदोन्नतीस पात्र आहेत त्यांची चौकशी चालु असून झोन अधिकारी एक पद भरण्याबाबत एक महिन्यात कार्यवाही होईल.पात्र उमेदवारास ३ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारास ६ महिन्याची सुट देय होते.

**श्री.नंदकुमार फुलारी :** मालमत्ता कराचे वसुलीसाठी खाजगीकरण होऊ शकते का?

**उपआयुक्त (म) :** नागपुर मनपामध्ये एका वार्डाची मालमत्ता कर वसुली बँकेमार्फत सुरु केली आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** शासन मंजुरी नसतांना श्री.कंकाळ यांना पद कसे दिले.

**उपआयुक्त (म) :** सहाय्यक प्रशासकीय अधिकारी पद नाही त्यांना प्रशासकीय अधिकारी यांना सहाय्यक म्हणून दिलेले आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** वसुलीसाठी दै.वेतनाच्या कर्मचाऱ्यांना अधिकार देऊ नयेत कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम द्यावे. तसेच स्टाफ वाढवावा लागेल. मुल्य निर्धारणाची कामे मुख्य कार्यालयात होते तर वसुलीचे काम झोन अंतर्गत

चालते.त्यासाठी कर मुल्या निर्धारण त्या त्या झोन कार्यालयातच असावे कार्यालय येथे असल्याने सामान्य नागरीकांना झोन कार्यालय तसेच मुख्य कार्यालय अशा दोन्ही ठिकाणी जावे लागते.

**श्री.जयवंत ओक :** ६३१ मालमत्तेची प्रकरणे निकाली काढली. मनपाच्या तिजोरीत किती रक्कम जमा झाली. ज्यांचेकडे बाकी आहे ती वसुल कशी करणार. २ महिन्यात वसुली कशी होईल. आतापर्यंत २५% वसुली झाल्याचे चित्र आहे.स्लम अघोषित वस्त्या आहेत. शिवाय ११४ अनधिकृत वस्त्या आहेत.त्यांना मालमत्ता कर आकारणी करुन मालमत्ता कर वसुल करावा मनपाच्या तिजोरीत भर पडेल. अनधिकृत वसाहतीत घरांना क्रमांक देण्यात यावेत.

मालमत्ता कर हा विभाग महत्वाचा असुन कराची वसुली करण्यासाठी उपआयुक्त म्हणून विशेषपद या सर्वसाधारण सभेने निर्माण केले.अद्याप कार्यवाही नाही. सदर पद भरण्यात यावे. वसुलीत वाढ होईल कमी जास्त कर लावल्यामुळे तर इतर काही करणास्तव न्यायालयात बरीच प्रकरणे प्रलंबीत आहेत. कुणी तडजोड करुन निकाली काढण्यास तयार असतील अशांना बोलावून कार्यवाही करावी. घरांना क्रमांक दिल्यास कोणत्या घरांना टॅक्स लावला तो वसुल झाला का? याबाबतची तात्काळ माहिती घेण्यास मदत होईल.आजची परिस्थिती पाहता जवळपास ५०% घरांना अद्याप करच लावलेला नाही त्यामुळे येणारे उत्पन्न येत नाही. सभागृहात नुसती चर्चा होते व अंमलबजावणी होत नाही.

**मा.सभापती :** क्रमांक देण्याबाबतची कार्यवाही सुरु केलेली होती. त्याबाबत खुलासा द्यावा.

**कर मुल्यनिर्धारण अधिकारी-२ :** घरांना क्रमांक देण्याबाबत सुरुवात केलेली नाही २००१ जनगणना मध्ये घरगणना केली त्या माहिती आधारे घर क्रमांक देण्याची कार्यवाही करता येईल. जनगणना आकडेवारी घोषीत झालेली नाही.

**मा.सभापती :** सभागृहात चर्चा झाल्यानुसार मालमत्ता कराची वसुली जास्तीत जास्त होण्यासाठी घरांना नंबर देण्याबाबत स.सदस्यांनी सुचना केल्या त्यानुसार संबंधीत अधिकाऱ्यांनी १५ दिवसाच्या आत घरावर क्रमांक टाकण्याची निविदा प्रसिध्द करावी. कर आकारणी विभागाकडून संचिका चालवावी. लेखा विभागाची मंजुरी घेवून १ एप्रिल २००२ पासून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री.जयवंत ओक :** ६३१ प्रकरणे निकाली लागली त्या माध्यमातून मनपाच्या तिजोरीत किती रक्कम भरणा झाली. मनपाचे उत्पन्न वाढले पाहिजे. तरच विकास कामे करता येतील.आपण १०० कोटीचे बजेट ठेवले. १०० वरुन ९७ कोटीवर आणले. वसुलीवर भर देण्यात येत नसल्याने ही परिस्थिती आहे. अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात. बजेट फुगवून दाखविला जातो. सविस्तर खुलासा देण्यात यावा. कराची रक्कम भरण्यासाठी एक व्यक्ती पाच वेळेस कार्यालयात येते. परंतु त्यांचेकडील रक्कम भरुन घेतली जात नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रशासनाने बजेट केलेला नाही. बजेट तयार करण्याची जबाबदारी स्थायी समितीची आहे. कलम ९५ नुसार अर्थसंकल्प तयार करुन प्रशासन सादर करते. त्यास कलम ९६ नुसार स्थायी समिती मंजुरी देते. यात प्रशासन जबाबदार नाही. स्थायी समितीने कलम ९६ नुसार मान्यता दिलेली आहे. जी भुमिका अर्थसंकल्प तयार करण्याबाबत प्रशासनाने घेतली ती

स्थायी समितीने घेतली पाहीजे असे बंधनकारक नाही. कलम ९६ नुसार स्थायी समिती फेरबदल करण्यास सक्षम आहे. त्यामुळे जे बजेट ठेवले गेले त्यास प्रशासन जबाबदार नाही. जी ६३१ प्रकरणे निकाली लागली त्या त्या मालमत्तेच्या कराची किती वसुली झाली याची माहिती घेण्यासाठी प्रत्येक झोनवाईज तपासणी करुन कार्यवाही करावी लागेल. शहरात जवळपास १.५ लक्ष मालमत्ता आहेत. अधिकारी कर्मचारी देण्याबाबतची चर्चा झाली. त्यानुसार उपआयुक्त दर्जाचे एक पद मंजुर केलेले आहे. त्या पदास शासनाने मंजुरी सुध्दा दिली या पदावर शासनाचे अधिकारी येतील. तशी प्रशासकीय मागणी मनपाकडून झालेली असून राज्य शासन स्तरावर मनपाने मा.महापौर, मा.विरोधी पक्षनेता यांनी प्रयत्न केलेले असून एक महिन्यात या पदावर अधिकारी नियुक्त होतील अशी माहिती प्राप्त झालेली आहे. ज्या त्या झोनचे अधिकारी यांना उद्दिष्ट ठरवून दिल्यानुसार एकूण ११ कोटीचे उद्दिष्ट पुर्ण करणार आहोत. मालमत्ता धारकांना कर भरण्याबाबत प्रवृत्त करण्यासाठी झोन वाईज कर्मचारी यांची नियुक्त्या केलेल्या होत्या.

**श्री.जयवंत ओक :** घरांना क्रमांक देण्याबाबत १ महिन्याच्या आत कार्यवाही सुरु होणार काय?

**मुख्यलेखाधिकारी :** स्थायी समितीने निर्णय घेतल्यानुसार घरांना क्रमांक देण्याबाबत निविदा काढण्यात येतील.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** प्रलंबीत ६३१ प्रकरणे निकाली काढली. त्या संदर्भातील रेकॉर्ड विधी सल्लागार यांनी आयुक्तांकडे दिले असतीलच त्यानुसार अशा प्रकरणात किती कर वसुल झाला किंवा व्हावयास पाहिजे यासाठी जागृत असावयास पाहिजे व सर्व माहिती उपआयुक्तांना असणे आवश्यक आहे.

**उपआयुक्त (म) :** न्याय प्रविष्ट असलेल्या प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार वसुली करावी लागणार असुन यासंबंधीची सर्व माहिती मनपाचे जे पॅनलवरील वकील आहेत त्यांचेकडून माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** उपआयुक्त (म) हे पद विभाग प्रमुखाचे असुन त्यांना याबाबत सर्व माहिती असणे आवश्यक आहे.

**उपआयुक्त (म) :** पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल. ही माहिती झोन अधिकारी यांचेकडे उपलब्ध असेल कारण मालमत्ता कराची वसुली झोन अंतर्गत होते.

**डॉ.आशा बिनवडे :** वसुलीवर चर्चा चालु असतांना प्रत्येक झोनचे झोन अधिकारी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. असे असतांना एकही झोन अधिकारी उपस्थित नाही. झोन अधिकारी यांना वसुली संदर्भात सर्व माहिती असु शकते. येथे उत्तरे देवू शकतात.

**मा.सभापती :** मालमत्ता कराचे वसुली संदर्भात २-३ मुद्यांवर चर्चा झाली. त्यानुसार प्रत्येक झोन अधिकाऱ्यांना वसुली करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार देण्यात यावेत. एकूण २४ कोटीपैकी ६.३५ कोटीच वसुल झाले.२५% वसुली झाली चालु वर्षातील फक्त डिसेंबर पर्यंत ४.५६ कोटी वसुल झाले. उर्वरीत वसुली ३ महिन्यात करावयाची असून उद्दिष्ट ११ कोटीचे आहे. तसेच नागपुर मनपामध्ये कर वसुल करण्यासाठी एका वार्डाचे खाजगीकरण करण्यात आले.त्याप्रमाणे या मनपामध्ये चालु करण्याबाबत कार्यवाही करता येईल

का? त्यासाठी तेथील प्रोसीजरची सर्व कागदपत्र संबंधीत अधिकाऱ्यांनी मागवून घ्यावीत व उत्पन्नात वाढ होऊ शकते काय याची पडताळणी करुन कार्यवाही व्हावी. मालमत्ता कर कशा पध्दतीने वसुल केला जातो या संदर्भात माहिती घेण्यासाठी चार सदस्यांना नियुक्त करण्यात येत असून यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. नंदकुमार फुलारी,श्री.मधुकर सावंत,श्री.मीर हिदायत अली तसेच श्री.किशोर तुळशीबागवाले यांचा समावेश करण्यात येतो.त्यांचे समवेत करमुल्य निर्धारण अधिकारी हे सुध्दा राहतील.या कमिटीने पाहणी करुन त्या महापालिकेप्रमाणे येथे वसुली करता येईल काय याची माहिती घ्यावी. ज्यांचेकडे कर वसुलीची रक्कम बाकी आहे अशा लोकांची नांवे वृत्तपत्रात प्रसिध्द करुन ३० ते ४०% कर वसुल करण्यात आला. कोणासही सुट देऊ नये. १००% वसुली करण्यात यावी.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** १४० कोटीचे बजेट केले होते. आता ९७ कोटीचे सादर केले वसुलीवर भर दिला गेला नाही यास कोण जबाबदार आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी सभागृहाला प्रशासन दोषी ठरवित आहे.

**श्री.मधुकर सावंत :** वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे आदेश करावेत.

**मा.सभापती :** सुधारीत अर्थसंकल्प ठेवल्यानुसार वसुल झाले नाही तर संबंधीत अधिकाऱ्यांवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे तसे अधिकारी आहेत का? नियमात बसते का खुलासा द्यावा.

**विधी सल्लागार :** नियम ५६ (२) नुसार मा.आयुक्त हे ठपका ठेवणे, वेतनवाढ किंवा पदोन्नती रोखुन ठेवणे, निलंबन करणे, दंड करणे बाबतची कार्यवाही करु शकतात.

**मा.सभापती :** ५६ (२) मध्ये काय दिले आहे ते नगरसचिवांनी वाचून दाखवावे.

**नगरसचिव :** कलम ५६ (१) नुसार ज्या अधिकारी /कर्मचारी यांनी नियमाचा किंवा शिस्तीचा भंग केल्यास निष्काळजी किंवा कर्तव्यात हयगय केल्यास किंवा अन्य गैरवर्तणुकीबाबत दोषी आहे किंवा अक्षम असल्यास पोट क्र. (२) अन्वये त्या कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवणे किंवा वेतनवाढ व पदोन्नती रोखुन ठेवणे,यात दक्षता रोध ओलांडू न देणे याचा समावेश होतो. खालच्या पदावर किंवा खालच्या समयश्रेणीत आणणे,दंड करणे,मनपाचे आर्थिक नुकसान वेतनातुन वसुल करणे,निलंबीत करणे, सेवेतून काढून टाकणे अशा प्रकरची कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत.

**श्री.मीर हिदायतअली :** मागील वर्षीसुध्दा वसुलीचे उद्दिष्ट गाठलेले नाही अशा अधिकाऱ्यांवर वरील कलमानुसार काय कार्यवाही केली?

**मा.सभापती :** वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्दी देवून कर भरण्याबाबत कार्यवाही केली. जे कर भरणार नाहीत त्यांचेवर कलमाचा वापर करुन कार्यवाही करावी. सुधारीत अर्थ संकल्पानुसार १००% वसुली व्हावयास पाहिजे. वसुलीत वाढ होण्यासाठी घरावर क्रमांक टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच नागपुर मनपात जावून स.सदस्यांनी कराच्या वसुली संदर्भात माहिती आणल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. वसुलीसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग अस्थापना विभागाने द्यावा. दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम देण्यात येऊ नये.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** पान क्र.२ वर "अ" विभागाचे एकत्रीकरणमध्ये नगररचना विभागाचे बांधकाम अनामत ३०.९८ लक्ष रुपये दाखवण्यात येते. परंतु या विभागात

बऱ्याच बांधकाम परवानगी संचिका प्रलंबित आहेत. मेगा प्रोजेक्ट मध्ये अनामत रक्कम घेतलेल्या नाहीत.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** नगररचना विभागात सर्वसामान्य बांधकाम परवानगी व इतर परवाना या वेळेवर मिळत नाही. मोठमोठया बिल्डरांच्या बांधकामांना ताबडतोब परवानगी दिली जाते.

**मा.सभापती :** याविभागात किती बांधकाम संचिका प्रलंबित आहेत, किती लोकांना परवानगी दिली.

**प्र.नगररचनाकार :** आतापर्यंत एकूण बांधकाम परवानगीचे ६९५ प्रकरणे होती, त्यापैकी ५४२ बांधकाम परवानगी दिलेल्या आहेत. उर्वरीत १४० प्रकरणे कागदपत्रांची पुर्तता नसल्याकारणाने प्रलंबित आहेत.

**मा.सभापती :** जी प्रकरणे नगररचना विभागात प्रलंबीत आहेत. ती निकाली काढण्याबाबत कार्यवाही व्हावी व यापुढे बांधकाम परवानगी व इतर परवानग्या देतांना ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ती कागदपत्रे संबंधीत परवानगी घेणाऱ्याने सादर केल्यासच संचिका स्विकारुन पुढील कार्यवाही व्हावी. नसता अर्धवट कागदपत्रे घेवून सर्वसामान्य नागरीकांना फेऱ्या माराव्या लागतील अशी उत्तरे देवून दिशाभुल होते. असे यापुढे करु नये खुल्या भुखंडाचे मालमत्ता कर,नकाशा नाही अशी प्रकरणे का घेता? अशा काही केसेस माझ्यापर्यं आलेल्या आहेत.चलन नाही, मॅपमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे आहे अशा संचिका करण्यास हरकत नाही तसेच ज्यांची कागदपत्रे उपलब्ध नाहीत अशांना नोटीस देऊन कळवितो. परंतु सदर नोटीस पाठवितांना संबंधित आर्किटेक्टच्या नावाने जाते. ज्याला परवानगी घ्यायची त्यांना काहीच माहिती होत नाही. संबंधित आर्किटेक्ट उशिरा माहिती देतात. त्यानंतर संबंधीत व्यक्ती कागदपत्रे जमा करण्यास लागतात तोपर्यंत नियमाने मुदत संपते.असे प्रकार घडतात. त्यासाठी नोटीस पाठवितांना संबंधितांना सुध्दा एक प्रत देऊन यापुढे कळविण्यात यावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मेगा सिटी प्रोजेक्टला बँक गॅरंटी घेवून परवानगी दिली. इतर सर्वसामान्यांकडून बँक गॅरंटी न घेता कॅश रक्कम घेतली जाते. त्याप्रमाणे सर्वसामान्यांना परवानगी साठी बँक गॅरंटीची सवलत दिली तर योग्य होईल.एकाला द्यायची एकाला नाही हे धोरण बरोबर नाही.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** सर्वसाधारण जनतेकडून कॅश रक्कम घेऊन परवानगी दिली जाते. काही कडुन बँक गॅरंटी घेतली जाते हे बरोबर नाही सर्वांसाठी सारखेच नियम ठेवावेत. किती लोकांना बैठक गॅरंटी घेऊन परवानग्या दिल्या?

**प्र.नगररचना :** तुर्त माहिती उपलब्ध नाही.

**मा.सभापती :** किती लोकांना बँक गॅरंटी घेऊन बांधकाम परवानगी दिलेली आहे याची माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात यावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** या विभागात इतर अल्प संख्यांक, दलीत प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना चा विभागात प्रवेश नाही. सार्वत्रिक बदल्या होतात व त्यानंतर २-३ महिन्यांनी पुन्हा त्याच विभागात परत येतात. त्यासाठी ज्यांना तीन वर्ष झाले असतील अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या या विभागातुन बदल्या कराव्यात व जे बदलुन गेले त्यांना तीन वर्षाच्या आत पुन्हा या विभागात घेण्यात येऊ नये. इतर वर्गवारीतील कर्मचाऱ्यांना या विभागात सेवा करण्याची संधी द्यावी.

**मा.सभापती :** नगररचना व जकात विभागात काही कर्मचारी त्याच विभागात परत येतात व त्यांची त्याच विभागात पदस्थापना होते असे कर्मचारी असतील तर त्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. २५% कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या.२५% बदल्या करण्यात येतील असे प्रशासन अश्वासन देत आहे.वसुली कमी येत असेल, कर्मचारी कामात दिरंगाई करीत असतील तर त्यांच्या त्वरीत बदल्या करण्याबाबत प्रशासनाने पावले उचलावीत पान नं.६ वर मलेरीया विभागाचे अनुदान येणे बाकी आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** शासनाने अनुदान सर्व मालाचा ऑडीट रिपोर्ट मागविला होता. तो देण्यात न आल्यामुळे येणारे अनुदान थांबवून ठेवले अशी माहिती मिळाली आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** खर्च झाल्याबाबत रिपोर्ट मुख्यलेखापरिक्षक यांचे सहीचे तसे प्रमाणपत्र शासनाकडे पाठवलेले आहे. औरंगाबाद मनपाचेच नाही तर इतर मनपाचे सुध्दा अनुदान दिलेले नाही. या संदर्भात अनुदान मागविण्यासाठी मा.आयुक्त यांचे सहीने संबंधीत मंत्रालयास दोन वेळेस पत्रव्यवहार केलेला आहे.

**मा.सभापती :** पान क्र.७ वर अग्निशमन विभागाचे सुध्दा अनुदान आलेले नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** एका केंद्रासाठी शासन १२ लक्ष देणार आपला खर्च १५ लक्ष सध्या होत आहे.१५ दिवसांपुर्वी त्याचे एम.डी.तयार झाले. उर्वरीत रक्कम सुध्दा शासन देणार आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** पान क्र. ३ वर आठवडी बाजाराचे उत्पन्न या संदर्भात आहे.माझ्या वार्डात चार वर्षापासून भाजी मंडई बांधून गाळे रिकामेच आहेत.महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. रस्त्यावर गाडयावाले उभे राहतात. आतमध्ये कोण जाणार.

**मा.सभापती :** याला जबाबदार कोण. १८ लक्ष ठेवले यात सुट देण्याची आवश्यकता पडत नाही. पुर्ण १००% वसुल का होत नाही. आतापर्यंत ९.३९ लक्ष वसुली झाली.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधीत जागेवरील दुकाने देण्यासंदर्भात ४ वेळेस टेंडर काढले. परंतु कुणी घेण्यास तयार नाही. आठवडी बाजार / भाजी मंडईची उर्वरीत वसुलीह २ महिन्यामध्ये करण्यात येईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मागील वर्षी उद्दिष्ट २०.८७ लक्ष ठेवले होते. यावर्षी १८ लक्षच का ठेवण्यात आले.

**डॉ.आशा बिनवडे :** गाडयावाले दुकानासमोरील ओटयासमोर गाडया लावुन विक्री करतात त्यामुळे भाडयाने घेण्यास कुणी तयार होत नाही. गाडयावाल्यांना बाहेरच्या ओटयाजवळ उभे राहु देऊ नये. तरच दुकाने देऊन भाडे वसुल होईल.

**मा.सभापती :** दुकानासमोर गाडया उभ्या करुन देऊ नये.

**डॉ.आशा बिनवडे :** अनामत रक्कम घेऊन फिक्स भाडयावर द्यावे वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देण्यात यावे.

**मा.सभापती :** या जागेवरील दुकाने कुणी घेत नाही. म्हणून तसा मुद्दा भाडेसमितीसमोर मांडावा त्यानुसार भाडे समिती योग्य निर्णय घेईल. संबंधीत अधिकाऱ्यांनी सदर जागेवरील दुकानासाठी डिपॉझिट भरण्यास कुणीही तयार नाही हा मुद्दा कमिटीसमोर ठेवावा. अनामत रक्कम कमी करता येईल का ते ही तपासावे. स.सदस्य श्री.जबिंदा यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा खुलासा संबंधीत अधिकाऱ्यांनी द्यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** डेड इन्वेसमेंट त्यातुन आऊटपुट काहीही नाही तर असे करता येईल.

**मा.सभापती :** भाजी मंडई /आठवडी बाजाराची उर्वरीत ५०? वसुली दोन महिन्यात करण्यात यावी.

**डॉ.आशा बिनवडे :** शहरातील जो कचरा साठवला जातो, खत निर्मिती होते. त्याचे येणारे उत्पन्न या अर्थ संकल्पात कोणत्या लेखाशिर्षामध्ये आहे?

**मुख्यलेखाधिकारी :** कचऱ्यापासुन खत निर्मिती करण्यासाठी सत्यम फर्टिलायझर्स एजन्सीला काम दिलेले आहे. अदयाप पर्यंत कोणते उत्पन्न त्यापासून मिळालेले नाही.रॉयल्टीसह वसुल करणार आहे. मध्यंतरी या कारखान्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या सभागृहात सुध्दा याबाबत चर्चा झाली. याबाबत चौकशी समिती सुध्दा नेमण्यात येऊन चौकशी समितीने अहवाल सादर केलेला आहे. त्यावर अद्याप सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला नाही.

**डॉ.आशा बिनवडे :** ॲग्रीमेंट केले त्यानुसार कार्यवाही करावी व नवीन एजन्सीजला काम देण्यात यावे. तसा कमिटीने अहवाल दिलेला आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** संबंधीत एजन्सीजने एक पत्र दिले. आता २४ तास उत्पादन काढण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. मनपास कोणतेही उत्पन्न येत नसेल तर संबंधीत कारखान्याचे शासनाकडून येणारे ग्रँट थांबवून ठेवणार आहे. ५० लक्ष रुपये अनुदान मिळणार आहे. सदर एजन्सीला मनपाने एन.ओ.सी. दिल्याशिवाय अनुदान मिळणार नाही.

**श्री.रावसाहेब औताडे :** सत्यम वाल्यांनी कचरा विकला आहे.रु.२४०/- प्रती ट्रॅक्टर प्रमाणे कचरा विकलेला आहे.

**मा.सभापती :** सत्यम फर्टिलायझरचे मालक २४०/-रु.ट्रॅक्टर प्रमाणे खत विक्रीचे काम करीत आहे अशी माहिती मिळाली. यासाठी जबाबदार अधिकारी कोण आहे.त्याचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी. विना परवानगी खत म्हणून कचरा विकु शकत नाही. तेथुन खत विकत घेतले जाते. अशी मला माहिती मिळाली आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** कालच्या ४ तारखेला आरोग्य विभागाच्या संदर्भात बैठक आयोजित करणार होते ती का आयोजित केली नाही.?

**मा.सभापती :** लेखा परिक्षणाचे काम न झाल्यामुळे सभा आयोजित केलेली नाही.

**मुख्यलेखापरिक्षक :** आरोग्य विभागाच्या चालु वर्षाचे औषधी /साहित्य खरेदीच्या संचिकेचे लेखा परिक्षण करण्याचा अगोदर निर्णय झाला होता. त्यानंतर शेवटी मा.सभापती यांनी सन ९६-९७ पासुनचे लेखा परिक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे एकूण ५ वर्षाचे लेखा परिक्षण करावयाचे आहे. त्यास वेळ लागेल काम चालू केलेले असून आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे रजेवर होते. ते ३१ तारखेला आले. ३१ तारखेला या विभागास संचिका दिल्या काम सुरु केले असुन १ आठवडयात म्हणजेच येत्या सोमवारी रिपोर्ट सादर करण्यात येईल.

**मा.सभापती :** सध्या मनपात आयुक्त पदावर प्र.आयुक्त म्हणून व्ही.रमणी साहेब आहेत. मी त्यांचेशी या संदर्भात चर्चा केली. ही बैठक आयुक्त आल्यानंतर लावावी असे त्यांनी सुचित केले. ११ तारखेला आयुक्त येणार आहेत. त्यांचेशी चर्चा करुन येत्या १५ तारखेला या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येईल.

**श्री.मीर हिदायतअली :** कचऱ्यापासून खत निर्मिती करणाऱ्या सत्यम फर्टिलायझरच्या कारखान्याबाबत बऱ्याच तक्रारी आहेत. या अगोदर स.सदस्य श्री. रगडे यांनी बऱ्याच वेळा सभागृहात वेगवेगळे प्रश्न उपस्थित केलेले होते.महानगरपालिकेच्या मालमत्तेचे तसेच येणाऱ्या उत्पन्नाकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले असुन सध्या या कारखान्यातुन जो कचरा शहरातुन घेऊन जातात तोच कचरा २४०/- रु.ट्रॅक्टर प्रमाणे सर्रास विक्री कारखान्याचे मालक करीत आहेत. महानगरपालिकेच्या नगरसेवकांना सत्यमचे मालक यांनी २४०/- रु. प्रमाणे कचऱ्याचे ट्रॅक्टर विक्री केले. यास कोण जबाबदार आहे. जमा होत असलेल्या कचऱ्याची विक्री करता विल्हेवाट लावत आहे.मनपास काही उत्पन्न येत नाही असे प्रत्येक उत्पन्नाची साधने बंद पडल्यास मनपाला विकास कामे करणे अवघड होईल. जकात,मालमत्ता, पाणीपट्टी, ही तीन उत्पन्नाची साधने आहेत. सत्यम फर्टिलायझरचे मालकावर नियमाने कार्यवाही करण्यात यावी. आयुक्तांच्या निदर्शनास ही बाब आणुन द्यावी.

**मा.सभापती :** सत्यम फर्टिलायझरच्या बाबतीत चौकशी समिती नियुक्त केली होती. समितीने अहवाल सुध्दा दिलेला आहे. त्यानुसार प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जो अहवाल सादर झाला त्यानुसार संबंधिताला नोटीस देऊन कळविलेले आहे. प्रत्यक्ष पाहणी केली असता बराच कचरा साठवुन ठेवला आहे.खत निर्मिती केली नाही असे चित्र आहे. संबंधित कारखान्यास शासनाचे जे अनुदान येणार आहे ते मनपाने एन ओ सी दिल्याशिवाय मिळणार नाही.नियमाने कार्यवाही न केल्यास आलेले अनुदान थांबवून ठेवले जाईल.खताची विक्री करतात अशा तक्रारी आहेत.त्याबाबत सुध्दा कार्यवाही होईल.महानगरपालिकेतर्फे २५ हजार टन खत विकायचे असे आपण टेंडर काढले आहे. खत विक्री बाबत ज्या तक्रारी आहेत त्यांना जे खत विकले याची माहिती मनपाचे स्वच्छता निरीक्षकांकडून घेऊन ती रक्कम वसुल करण्यात येईल.

**डॉ.आशा बिनवडे :** जे स्वच्छता निरीक्षक आहेत त्यांची तेथुन बदली करावी. त्यांना नोटीस देवून याबाबत माहिती घ्यावी.

**मा.सभापती :** माहिती घेऊन नियमाने कार्यवाही करावी. पान क्र.१३ वर पाणी पट्टीच्या वसुली संदर्भात चर्चा करावी.११ कोटीचे उद्दिष्ट होते. ८ कोटी ठेवले ९ महिन्यात वसुली फक्त ४.२० कोटी वसुल होणार का? पाण्यावर मनपाचा जास्त खर्च होतो.याचा विचार होता वसुली जास्त यावयास पाहिजे. नागपुर मनपाने अभय योजना राबविली तर २१ कोटीचा फायदा झाला अशी माहिती आहे. या मनपामध्ये सुध्दा अभय योजना राबविण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी. मनपाचे उत्पन्न वाढेल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** पाणी पट्टीची वसुली किती झाली, किती बाकी आहे. याचे उत्तर देण्यासाठी झोन अधिकारीच येथे नाही.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा, श्री.नंदकुमार फुलारी, श्री.मधुकर सावंत, श्री.जगदीश सिध्द :** झोन अधिकारी यांना बैठकीस बोलवावे, तोपर्यंत ३० मिनिटे सभा तहकुब करावी.

**उपआयुक्त (म) :** ५ कोटी १२ लक्ष वसुल झाले आहेत. आता फक्त २.८८ कोटी वसुल करायचे आहेत. विशेष मोहीम घेवू.मार्च अखेरपर्यंत वसुल होतील.

**श्री.जगदीश सिध्द :** ३१ मार्च पर्यंत चालू आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट किती व त्यातून किती वसुली झाली याचा खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** १० कोटीचे उद्दिष्ट चालु वर्षाचे होते. त्यातुन फक्त १.७४ कोटी वसुल झाले. थकीत रकमेतील ३.३८ कोटी वसुल झाले.

**श्री.नंदकुमार फुलारी :** चालु वसुली फक्त १० कोटीतून १.७४ कोटीच झालेली आहे. यावरुन वसुलीवर किती दुर्लक्ष होते हे दिसुन येते. कष्ट न घेता अधिकारी /कर्मचारी यांना पगार दिले जातात.

**मा.सभापती :** घरांना मार्कींग देण्याबाबत व त्याचबरोबर नळाचे टेंडर काढणार होतो. त्या घरांना घरांना क्रमांक निशाणी असावी. अशा प्रकारची कार्यवाही करणार होतो.त्याबाबत काय झाले. जेणे करुन कोणत्या क्रमांकाचे घराची नळपट्टी बाकी आहे हे दिसुन येईल तात्काळ माहिती उपलब्ध होऊ शकते.

**प्र.कार्यकारी अभियंता (पा.पु व ज .नि) :** मागील बैठकीत हा विषय होता. त्यानुसार कार्यवाही चालु आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :**वसुली का होत नाही अधिकारी /कर्मचारी काय करतात कुणाला कुणाचा धाक नाही असे वाटते.

**श्री.जगदीश सिध्द :** जे अधिकारी /कर्मचारी व्यवस्थित कामे हाताळत नसतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. तसा निर्णय आताच सभागृहाने घ्यावा.या सभागृहाला अधिकार आहे.

**श्री.मधुकर सावंत,श्री. भरत लकडे :** वसुली होत नाही म्हणून प्रशासनाचा निषेध करावा यात सर्वानी सहभागी व्हावे. निषेधाची नोंद व्हावी. सभा तहकुब करावी.पुढील बैठकीत झोन अधिकाऱ्यांना बोलवावे. (याचवेळी सभागृहात सर्वच सभास निषेध करण्यात येतो असे मोठमोठयाने बोलतात.)

**श्री.जगदीश सिध्द :** पाणी पट्टीची वसुली किती याबाबत कुणी सक्षम अधिकारी उत्तरे देण्यास तयार नाही. पुढील बैठकीत झोन अधिकाऱ्यांना बोलवावे. ही सभा तहकुब करावी.

**डॉ.आशा बिनवडे :** पाणी पुरवठा ही योजना अगोदरच तोटयात चालते. जे उद्दिष्ट ठेवले ते वसुली न होणे बरोबर नाही. पाणी पट्टीची संपूर्ण वसुली झालीच पाहिजे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** १३५ कोटींचे बजेट बरोबर होते ते कमी करुन ९७ कोटी करण्याचा अधिकाऱ्यांचा कट आहे. जे उद्दिष्ट ठेवले तेवढी वसुली व्हावयास पाहीजे.

**मा.सभापती :** चालु वर्षाचे १०.३६ कोटीचे पाणी पट्टीचे उद्दिष्ट होते. त्यातुन फक्त १.७४ कोटी वसुली झाली. झोनवाईज वसुली किती झाली याची आकडेवारी देण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** चालु आर्थिक वर्षाचे १० कोटीचे उद्दिष्ट होते. त्यामध्ये झोन वाईज माहिती खालील प्रमाणे आहे.

| झोन क्रमांक | उद्दिष्टाची रक्कम | डिसें.२००२ पर्यंत वसुल झालेली रक्कम |
|---|---|---|
| १) | ६५ लक्ष | ४.०१ लक्ष |
| २) | २०५ लक्ष | १३.०० लक्ष |
| ३) | ६० लक्ष | ११.०० लक्ष |
| ४) | २२५ लक्ष | ५९.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ५) | ३५ लक्ष | ४.०० लक्ष |
| ६) | ७० लक्ष | १७.०० लक्ष |
| ७) | २९० लक्ष | ४८.०० लक्ष |
| ८) | ७५ लक्ष | ८.०० लक्ष |
| | एकूण | १७४.०० लक्ष वसुल झाले. |

उर्वरीत थकबाकीसुध्दा वसुल करण्यात येईल मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार वसुलीसाठी २०० कर्मचारी आवश्यक आहेत.

**मा.सभापती :** चालु आर्थिक बजेट मधील १.७४ कोटीच वसुल झाले याचा अर्थ १०% वसुली झाली. जे अधिकारी दोषी असतील त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** लोकांच्या घरी डिमांड नोटीस दिल्या जात नाही का? पाणी पट्टीची वसुली कमी होते.

**मुख्यलेखाधिकारी :** ६ महिन्यात १ वेळा असे वर्षातून दोन वेळेस दिल्या जातात.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** एम.एस.ई.बी.ची धडक मोहीम हाती घेतली जाते. त्याप्रमाणे पाणीपट्टीची वसुली व्हावयास पाहिजे.

**श्री. भरत लकडे :** काही लोकांना डिमांड नोटीस मिळालेल्या नाहीत त्यामुळे किती रक्कम भरावी हे स्पष्ट माहित नसते त्यामुळे पाणीपट्टी रक्कम भरण्यास नागरीक पुढे येत नाहीत.

**श्री.मधुकर सावंत :** वसुलीसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. शासन मंजुरी देत नाही तर कर्मचाऱ्यांची भरती करणार नाही का? वसुली होणार आहे किंवा काय?

**श्री.मीर हिदायतअली :** दोन महिन्यापुर्वी कनिष्ठ लिपीकांना २०-२० घरांची वसुली करण्यासंदर्भात आदेश काढले होते त्यानुसार किती वसुली झाली. त्यांनी घरोघर जाऊन काय केले.

**मा.सभापती :** सदर कर्मचारी हे मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यासाइी नियुक्त केलेले होते. जे नियमित काम करतात. त्यांनाच ती कामे दिलेली होती.

**डॉ.आशा बिनवडे :** झोन अधिकारी यांना ॲडीशनल चार्ज दिलेला असल्याने वसुलीवर परिणाम होतो. काम करण्यास वेळ कमी मिळतो.

**उपआयुक्त (म) :** जानेवारी पर्यंत ५ कोटी १२ लक्ष वसुल केलेले असून उर्वरीत थकबाकी दोन महिन्यात वसुल करण्यात येईल.

**मा.सभापती :** दरवर्षी वसुली कमी होते. अर्थ संकल्पाच्या वेळी प्रशासनाला वेळीच वसुली बाबत तशा सुचना केल्या जातात. परंतु त्यानुसार कार्यवाही होत नाही.चालु वर्षाची पाणीपट्टीची जी वसुली झाली ती उद्दिष्टांच्या १०% येत आहे.यासाठी प्रशासनाने कटाक्षाने पावले उचलावीत २ महिन्यात उर्वरीत वसुली करण्यास प्रशासनास काय अडचण आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** या अर्थ संकल्पास मंजुरी देऊ नये. मंजुरी दिल्यास या उद्दिष्टांच्या खाली आणखी कमी वसुली होईल. त्यासाठी पहिल्या उद्दिष्टाप्रमाणेच वसुली करण्याचे आदेश द्यावेत असे माझे मत आहे. अर्थ संकल्प आपण मंजुर केल्यास ही जबाबदारी सभागृहावरच येईल.

प्रशासनावर जबाबदारी राहणार नाही. या अर्थसंकल्पास मंजुरी दिलीच पाहिजे असे काही नाही. वसुली चालू ठेवावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** उद्दिष्ट पूर्ण करण्याचे काम प्रकशासनाचे आहे. त्याप्रमाणे वसुली करुन दाखववावी.

**श्री.नंदकुमार फुलारी :** हा अर्थसंकल्प मंजुर करुन सभागृह बदनाम होणार नाही या दृष्टीने योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** सभेला आयुक्त नाहीत. वसुली कमी झाली. उत्तरे देण्यास सक्षम अधिकारी नाही. वसुली करण्याचे काम प्रशासनाचे आहे. उद्दिष्ट कमी करुन मंजुरी देणे बरोबर होणार नाही. हा अर्थसंकल्प मंजुर करु नये.

**श्री.किशोर तुळशीबागवाले, श्री.मधुकर सावंत :** आयुक्त रजेवरुन येतील. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात बैठक आयोजित करावी. त्यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

**मा.सभापती :** वसुली होत नाही. यावर अधिकारी /कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्यास मा.आयुक्त सक्षम आहेत. जे उद्दिष्ट ठेवेलेले होते ते पुर्ण करण्याचे प्रशासनाने प्रयत्न करावेत. मा.आयुक्त रजेवरुन येतील ते आल्यानंतर सभा बोलावण्यात येईल. तोपर्यंत ही सभा तहकुब करण्यात येत आहे.

याच बरोबर आजच्या सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २०-२-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.(का.प.१४)**

**बुधवार दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस मनपा मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७) श्री. लकडे भरत श्रीपती
८) श्री. सावंत मधुकर दामोधर
९) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
१०) श्री. औताडे रावसाहेब ममतू
११) श्री. ओक जयवंत केशवराव
१२) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१३) डॉ. श्रीमती आशा उत्तम बिनवडे

**संवाद :**

**नगरसचिव :** मुख्य लेखा परिक्षक यांचेकडून स्थायी समितीस आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे औषधी खरेदी प्रकरणातील चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

**श्री.जयवंत ओक :** सभागृहात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे चौकशी प्रकरणी गोपनीय अहवाल सादर केलेला आहे. परंतु तत्पुर्वी सन १९९६-९७,९७-९८ व ९८-९९ ते ९९-२००० या वर्षाचे आरोग्य विभागातील कामाचे व खर्चाचे ऑडीट झालेले आहेत का? व त्यातील त्रुटया काय आहेत या संदर्भाने संबंधी अधिकाऱ्यांना विचारणा केली नाही काय? ज्या त्रुटया त्या त्या वर्षातील खर्चाचे संदर्भात असतील त्या त्या वेळी संबंधीत अधिकाऱ्यांकडून विचारणा केली जाते. तशा प्रकारची विचारणा व काय मत आहे ते का नाही विचारले. याची माहिती द्यावी. संबंधीत अधिकाऱ्यांचे मत घेतल्यानंतरच वाचन करावे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** यापुर्वी अनेक अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहार व चौकशी प्रकरणी समित्या स्थायी समितीने नेमलेल्या होत्या. त्यातील आजपर्यंत किती चौकशीचे अहवाल स्थायी समितीस प्राप्त झाले याची माहिती द्यावी. कारण विविध कामाचे कोटेशन व डी.एस.आर.दर व रोलींग बाबत चौकशी समिती नेमण्यात आलेली होती. त्या सर्व प्रकरणांचे अहवाल कुठे आहेत.प्रशासन गांभीर्यपुर्वक अहवाल सादर करावयास पाहिजे होते ते करीत नाही याचे कारण स्पष्ट व्हावे.

**श्री.जयवंत ओक :** सन २००१-२००२ च्या आरोग्य विभागातील ऑडीटमध्ये काही त्रुटया आढळुन आलेल्या आहेत काय? याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री. जयवंत ओक यांचे म्हणणे असे आहे की, चौकशी अहवाल पुर्ण करणेपुर्वी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मत का घेण्यात आलेले नाही याची माहिती घ्यावी.

**मुख्यलेखापरिक्षक :** कोणत्याही विभागाचे लेखा परिक्षण हे दर वर्षाला करणे आवश्यक असते.आरोग्य विभागाचे एका फाईलचे सन १९९७-९८ चे लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. त्यानंतर सन २००१-२००२ पर्यंतचे लेखा परिक्षण अदयापही केलेले नाही. हे पद रिक्त होते.फक्त लेखा परिक्षण विभागाद्वारे विविध विभाग निहाय हे ऑडीट करणेसाठी प्रोग्राम आखला जातो. त्यानुसार आरोग्य विभागा अंतर्गत विविध दवाखाने व तेथील डिन्स्पेन्सरी इत्यादी बाबत लेखा परिक्षण केल्या जाते. आता सध्या २००१-२००२ या वर्षाचे ऑडीट झालेले नसुन स्थायी समितीने सुचना केल्याप्रमाणे चौकशी केली आहे व तो चौकशी अहवाल अंतीम नाही. लेखा परिक्षण नाही. चौकशी अहवाल आहे. २०००-२००२ या दोन वर्षाचे लेखा परिक्षण झाले नाही. वेळ कमी असल्याने हाफ मार्जीन दिले नाही. याची प्रत प्रशासनाला दिली. संबंधीत विभाग प्रमुखांना देवून त्यांचे म्हणणे ऐकूण घेता येईल हा अंतरम चौकशी अहवाल आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** गेली ३-४ महिन्यापासुन आरोग्य विभागातील औषधी खरेदी प्रकरणी स्थायी समितीमध्ये सारखी चर्चा होत आहे व स्थायी समिती सभेच्या वेळी डॉ.देशपांडे, आ.वॅ.अधिकारी हे नेमके गैरहजर राहतात व स्थायी समिती सभेमध्ये आपण फक्त चर्चा करतो व निघुन जातो. मात्र गेल्या तीन-चार सभेतील असा अनुभव आहे की आरोग्य वैद्यकीय अधिकारी वेळेवर सेटी घेऊन गैरहजर राहतात. ही बाब प्रशासकीय दृष्टया योग्य नाही म्हणून स्थायी समितीने असा निर्णय घेतला की, जर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे सभागृहाला माहिती देत नसतील, नेमके टाळाटाळ करीत असल्यास त्यांचे बाबतीत निर्णय घेणे ठिक राहील म्हणून चौकशी करण्याचे स्थायी समितीने ठरविले आहे व चौकशी करण्यासाठी मुख्य लेखा परिक्षक यांना फक्त सन २००१-२००२ या वर्षातील औषधी खरेदी प्रकरणाचे चौकशीसाठी आदेशित केलेले आहे. आणि सदरील चौकशी ही प्राथमिक स्वरुपाची असुन स्थायी समितीस सादर झालेला चौकशी अहवाल हा गोपनीय आहे का? त्यामुळे वाचुन चर्चा करणेस हरकत नाही. याबाबत आणखी जास्त न बोलता नगरसचिव किंवा विधी विभाग यांचेकडून नियमाप्रमाणे अहवालावर वाचन करता येते किंवा नाही खुलासा मागवुन अहवाल वाचुन दाखवावा.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** यापुर्वी आम्ही सुचना केल्याप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मत चौकशीपुर्वी घेतलेले आहे काय? याची माहिती द्यावी.

**श्री.जयवंत ओक :**सन १९९६ ते २००१ पर्यंतचे आरोग्य विभागाचे लेखा परिक्षण केलेले आहे काय? जो अहवाल प्राप्त झालेला आहे तो वाचुन न दाखविता तत्पुर्वी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे काय मत आहे ते घ्यावे.

**मुख्यलेखापरिक्षक :** आरोग्य विभागाचे सन २०००-२००१ पर्यंतचे लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही. मला ज्याबाबत चौकशी करण्याचे स्थायी समितीने सुचना केली ती सन २००१ या वर्षातील आरोग्य विभागातील विविध औषधी

खरेदीच्या संदर्भातील असुन फक्त या बाबतचाच चौकशी अहवाल मी तयार करुन नियमाप्रमाणे नगरसचिव यांचेकडे दाखल केलेला आहे. सदरील अहवाल हा अंतीम नसुन तो चौकशी अहवाल आहे. लेखा परिक्षण नाही.या वर्षाचे लेखा परिक्षण झालेले नाही आणि या चौकशीची एक प्रत मा.आयुक्त यांचेकडे सुध्दा सादर करण्यात आलेली आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** गेल्या ४ बैठकापासुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे सतत अनुपस्थित राहत होते. गेल्या ३-४ बैठकापासुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना माहिती देणेची संधी देण्यात आलेली होती. ती संधी व त्यांना त्यांचे मत मांडण्यास पुरेसा वेळ होता. तो आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी घालविला. तेव्हा आता पुन्हा वेळ किंमत मत मागविण्याचा या ठिकाणी सन्माननीय सदस्य बोलत आहेत ते कशासाठी? त्यांना पुरेशी संधी मिळाली आहे. त्यावेळी गैरहजर राहून औषधी खरेदीची माहिती मी विचारणा केल्यानुसार सभागृहात दिलेली नाही. जाहिरात देवूनही नेमक्या एजन्सीज कडुनच जादा दराने विविध पगकारचे औषधी खरेदी करुन घेतली. ती मा.आयुक्त यांना अंधारात ठेवून त्यांनी प्रशासनाची दिशाभुल करुन फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे.तेव्हा पुन्हा संधी देण्याची ओरड करणे योग्य वाटत नाही.स.सदस्य गेल्या ३-४ बैठकांपासुन का बोलत नव्हते आणि चौकशी अहवाल प्राप्त झाल्याबरोबर बोलत आहेत ते चुकीचे आहे.

**श्री.जयवंत ओक :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी औषधी खरेदी करण्यापुर्वी मा.आयुक्त यांच्या परवानगीनेच कार्यवाही केलेली आहे तेव्हा त्यांचेवर आरोप घेवून बोलणे बरोबर नाही. चौकशी गोपनीय असते. भावनेशी खेळू नका अशा सर्व प्रकरणात का चौकशी झाली नाही. सर्वांची चौकशी करावी.

**श्री.सलीम पटेल,श्री.किशोर तुळशीबागवाले :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीत जी चौकशी अहवाल प्राप्त झाला त्याच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना द्याव्यात.

**मा.सभापती :** गेली ७-८ स्थायी समिती बैठकांपासुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे औषधी खरेदी प्रकरणात स्थायी समिती मध्ये सतत स.सदस्य डॉ.बिनवडे या चर्चा करीत आहेत. आरोग्य विभागातील औषधी खरेदी प्रकरणात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना माहिती विचारण्यात आली ती संबंधीत अधिकारी यांनी पुरविलेली नाही. याशिवाय काही न सांगता स्थायी समितीमध्ये अनुपस्थित राहत आहेत. त्यामुळे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेबाबत संशय व्यक्त होत आहे. याचसाठी मुख्य लेखा परिक्षक यांना या औषधी खरेदी प्रकरणासाठी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे सर्व स.सदस्यांच्या चर्चेवरुनच सुचना दिलेल्या आहेत व तो अहवाल प्राप्त झाला.आता स.सदस्यांचे असे मत आहे की, अहवालाच्या झेरॉक्स प्रती करुन स्थायी समितीतील १६ सदस्यांना द्याव्यात. त्याबाबत मी नगरसचिव यांना सुचित करतो की, सर्व १६ सदस्यांना चौकशी बाबत आपले मत काय आहे ते मागवुन नंतरच अंतिम अहवाल सभागृहापुढे सादर करावा.

**मुख्यलेखापरिक्षक :** स्थायी समितीने मागील सभेमध्ये आरोग्य विभागातील औषधी खरेदी बाबत गेल्या ४ वर्षापासूनची सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याची सुचना स.सदस्य डॉ.बिनवडे यांनी केलेली होती. तथापि दोन वर्षाचा चौकशी अहवाल हा अंतरिम अहवाल असुन यामध्ये स.सदस्या

डॉ.बिनवडे यंनी सभागृहात उपस्थित केलेल्या तांत्रिक मुद्यांचा चौकशी अहवाल आहे. या चौकशी बाबत पुन्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडून मत मागवून अहवाल सादर करावयाचा झाल्यास आणखी १५ दिवस लागतील. तेव्हा १५ दिवासांचा अवधी वाढवुन द्यावा.

**मा.सभापती :** **१)** ९ मार्च २००२ पर्यंत मुख्य लेखा परिक्षक यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.देशपांडे यांचे औषधी खरेदी प्रकरणी मत मागवून नंतरच चौकशी अहवाल अंतीमरित्या स्थायी समितीसमोर सादर करावा.

**२)** प्रशासनाच्या नविन इमारतीबाबत चौकशी समिती नेमलेली होती.त्याचे काय झाले याची माहिती द्यावी.

**श्री.मधुकर सावंत :** नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी करणेसाठी व बांधकामाचा दर्जा व त्यासाठी वापरण्यात आलेले बांधकाम साहित्याचा दर्जा इ.साठी स.सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली होती.त्या समितीमध्ये मी स्वतः असुन अद्याप पावेतो मला विचारणाही केलेली नाही. म्हणजे या समितीने निर्णय घेतलेला आहे काय? याची माहिती द्यावी.

**अति.शहर अभियंता :** नवीन इमारतीच्या संदर्भात स.सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. समितीने तारीख व वेळ ठरवुनही कुणीही स.सदस्य उपस्थित नव्हते.

**श्री.मधुकर सावंत,श्री.भरत लकडे :** बैठकीचे पत्रच मला मिळालेले नाही.

**मा.सभापती :** अति.शहर अभियंता यांना सुचित करण्यात येते की, या चौकशी समितीतील स.सदस्यांना सोमवारला भेटून एकत्रितरित्या त्यांचे काही सुचना असतील त्या द्याव्या व समितीच्या बैठकीतील अहवाल सादर करावा.

**श्री.मीर हिदायत अली :** शहरातील मनपाचे विविध कामे चालु आहेत. त्या सर्व कामाचे बाबतीत स्थायी समितीच सर्व स.सदस्यांनी प्रत्यक्षात भेट देवून पाहणी करावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे विविध कामांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करण्यात हरकत नाही. त्याचे प्रयोग मुख्यलेखा परिक्षक यांनी आज दाखल केलेला आरोग्य विभागातील चौकशी अहवालाची प्रत सर्व १६ स.सदस्यांना सभागृहात वाटप करावे. कार्यक्रम पत्रिका क्र. १४ चे इतर विषयांवर पुढील तारीख ठरवुन सभा बोलावण्यात येईल.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २०-२-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दुपारी २.०० वाजता (सन २००१-२००२ च्या सुधारीत अर्थसंकल्पावर विचार विनिमय करण्यासाठी) मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली मनपा मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री.कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७) श्री. लकडे भरत श्रीपती
८) श्री. सावंत मधुकर दामोधर
९) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
१०) श्री. औताडे रावसाहेब ममतू
११) श्री. ओक जयवंत केशवराव
१२) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१३) डॉ. आशा उत्तम बिनवडे

**संवाद :**

**श्री.जगदीश सिध्द, श्री.नंदकुमार फुलारी, श्री.किशोर तुळशीबागवाले :** शिवसेना नेते दत्ताजी साळवी,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अरुण मेहता, माजी नगराध्यक्ष बाबुलाल पराती व सन्माननीय सदस्य श्री. राधाकिसन गायकवाड यांचे वडिलांचे निधन झालेले आहे. त्या सर्वांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा.सभपती :** ठिक आहे.श्रध्दांजली वाहण्यात यावी.
(१.० मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

**श्री.जयवंत ओक :** दै.सामना या वृत्तपत्रामध्ये महानगरपालिकेचे शहरातील ९.०० मीटर रुंद रस्त्यांसंदर्भातील जाहीर प्रगटन आलेले आहे. याबाबत प्रशासन कोणती कार्यवाही करणार याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मा.न्यायालयाने निर्देश दिल्यानुसार रेल्वेस्टेशन ते मिलकॉर्नर प्रकरणात शहरातील ९.०० मीटर ते ४५.०० मीटर रुंद रस्त्यात बाधीत होणारी घरे, अतिक्रमणे असतील ती सर्व अतिक्रमणे काढून टाकुन न्यायालयास अहवाल सादर करण्याचे सुचविले असल्याने येथील दै.सामना,तरुण भारत,लोकमत व उर्दु दैनिकात जाहीर प्रगटन प्रसिध्दीस दिलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** अस्तित्वातील रस्त्यातील अतिक्रमणे किंवा विकास योजनेच्या नियोजित रस्त्याने बाधीत होणारी जागा कृपया याचा खुलासा व्हावा.

**उपआयुक्त (प्र.) :** नियोजित रस्त्याचे भुसंपादन केल्याशिवाय ताबा घेता येणार नाही. विद्यमान रस्त्यात असलेली अतिक्रमणे काढण्यात येतील. जोपर्यंत भुसंपादन होणार नाही तोपर्यंत पाडणार नाही.

**श्री.जयवंत ओक :** शहरातील अनधिकृत घरे जे ९.०० मीटर किंवा ४५.०० मीटर रस्त्याच्या कक्षेत येतील ते हटविण्यास प्रशासन कार्यवाही करेल परंतु जी घरे गेली २०-२५ वर्षापासुन बनवलेली आहेत त्यांना सर्व सुविधा मनपाच्या मिळतात त्यांचे बाबतीत कोणती व्यवस्था होणार आहे. उदा.मनपा ते अंजली टॉकीजपर्यंतच्या मोहल्ला नारळीबाग मार्ग सदरील रस्ता मनपाने अद्यापपर्यंत ताब्यात घेतला आहे काय? आणि ताब्यात घेतलेला नसल्यास याचे नेमके करण स्पष्ट व्हावे. जाहीरातीत दुरुस्ती करावी म्हणजे जनतेत संभ्रम होणार नाही.

**श्री. भरत लकडे :** रामविहार गृहनिर्माण संस्थेच्या खुल्या जागेवरील अतिक्रमणाबाबत कोर्टात चालु असलेल्या प्रकरणात काय निकाल लागला?

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.ओक यांचे सुचनेनुसार जाहीर प्रगटनाबाबत प्रशासनाने दुरुस्ती करुन प्रगटन द्यावे. अन्यथा नागरीकांमध्ये गैरसमज निर्माण होईल व प्रशासनाकडे मोर्चाद्वारे विचारणा होईल. त्याचप्रमाणे रामविहार हौसिंग सोसायटीबाबत न्यायालयीन प्रकरण काय झाले याची माहिती द्यावी.

**विधी सहाय्यक :** रामविहार हौसिंग सोसायटी बद्दल दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात खालच्या कोर्टाने वादीचा मनाई अर्ज फेटळला आहे. तसेच संबंधिताचे त्या आदेशाविरुध्द केलेल्या अपिलाचा निकाल सुध्दा मनपाच्या बाजुने लागलेला आहे.परंतु संबंधिताने उच्च न्यायालयात अपील करेपर्यंत कालावधीसाठी मा.न्यायालयास त्यांनी जैसे थे ची परिस्थिती ठेवणेबाबत विनंती केल्याने कोर्टाने २२-२-२००२ पर्यंत जैसे थे चा आदेश दिलेला आहे. या प्रकरणी मनपातर्फे उच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केलेले आहे. या प्रकरणी न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार कार्यवाही करणेत येईल.

**मा.सभापती :** ठिक आहे.मागील बैठकीत वसुलीच्या संदर्भाने प्रशासनाने वसुलीबाबत असहमत असल्याने सभागृहात स.सदस्यांनी नाराजी व्यक्त केलेली होती.याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** मागील तहकुब झालेल्या स्थायी समिती सभेतील स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत व वसुली संदर्भाने मा.आयुक्तांना अवगत करण्यात आले व सर्व झोननिहाय वसुली संदर्भात बैठक घेतली. प्रशासनाने उद्दिष्ट दिलेले आहे.ते पूण्र करणेबाबत सुचना दिल्या. दिलेल्या उद्दिष्टानुसार वसुली कमी असल्यास प्रशासनामार्फत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना कळविले आहे की, आपल्या विभागातील वसुली ही दिलेल्या उद्दिष्टापेक्षा कमी असल्यास आपली गोपनीय अहवालात नोंद केली जाईल व आपल्यावर दंडनीय कार्यवाही करणेत येईल अशा प्रकारचे आदेश यापुर्वीच प्रशासनाने काढलेले आहेत.

२) प्रत्येक कर्मचाऱ्यांना मासिक व आठवडयाचे वसुलीसाठीचे उद्दिष्ट ठरवुन देण्यात आलेले आहे व त्यांचे कडून दैनंदिन अहवाल झोन निहाय मागविण्यात येते.

३) दर सोमवारला मा.आयुक्त यांचेकडे झोनच्या वसुली संबंधी आढावा बैठक घेण्यात येते व त्यांना वसुली जास्त प्रमाणात होणेसाठी निर्देश दिले जातात व दैनंदिन अहवाल घेण्यात येतो.

४) सध्या झोन निहाय आकडेवारी लक्षात घेता दिलेल्या उद्दिष्टापेक्षा ७५% उद्दिष्ट हे झाल्याचे आकडेवारीवरुन दिसुन येते. आणखी एक महिना शिल्लक असुन मार्च अखेर उद्दिष्ट पुर्ततेसाठी प्रशासन योग्यरित्या कार्यवाही करेल.

**मा.सभापती :** जकात बाबत ५२.०० कोटीचे उद्दिष्ट ठरवुन दिलेले आहे. त्यानुसार प्रत्येक दिवसासाठी जकातीची आकडेवारी किती येते.

**प्र.जकात अधिक्षक :** जकातीचे उद्दिष्ट वर्षभराचे ६१.०० कोटीचे सर्वसाधारण सभेने दिलेले होते. मात्र प्रशासनाने रु. ५२.०० कोटीचे सुधारीत अंदाजपत्रकात उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानुसार रु. १७.५० लाख प्रतिटन जकात मिळणे आवश्यक आहे. परंतु सध्या रु. १३.०० ते १४.०० लाख प्रतिदिन जकात वसुली चालु आहे. रु.५२ कोटीचे उद्दिष्ट प्राप्तीसाठी जवळपास रुपये २१.३२ लाख प्रतिदिन जकात मिळणे सरासरी आवश्यक आहे.

**मा.सभापती :** या वर्षाचे उद्दिष्ट रु. ६१.०० कोटीचे दिलेले होते व सध्या वसुलीचे जकातीचे प्रमाणे फारच कमी असुन जकात वसुली उद्दिष्टानुसार मिळत नसल्यास स्थायी समितीसमोर प्रस्ताव आणण्याचे कारणच काय? याचा खुलासा व्हावा.

**उपआयुक्त (प्र.) :** जकात अधिक्षक यांचेशी विचारणा करुनच प्रशासनाने उद्दिष्ट दिलेले आहे.

**प्र.जकात अधिक्षक :** मी प्रशासनाकडे पत्र देवून कळविलेले आहे की, यावर्षी जकात उद्दिष्ट पुर्ण होणार नाही.जवळपास रु. ५१.०० कोटी पर्यंत उद्दिष्ट होईल व पुढील वर्षी मात्र रु. ६१.०० कोटी उद्दिष्ट जकातीसाठी ठेवावे असे कळविलेले आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** सुधारीत अंदाजपत्रकामध्ये विविध विभाग निहाय व हेडवाईज अंदाजपत्रक तयार करण्यात येते. त्यानुसार मा.आयुक्त यांचेकडे सर्व विभाग प्रमुखांना विचारात घेवूनच अंदाजपत्रक तयार केले जाते. त्यानुसार प्र.जकात अधिक्षक यांना विचारणा केलेली आहे. त्यांना जकातीचे उद्दिष्ट रु. ५३.०० कोटी दिलेले होते मात्र मा.आयुक्त यांनी रु. ५२.५० कोटी जकातीचे उद्दिष्ट पुर्ण करणेसाठी सक्त ताकीद दिलेली आहे. मागील वर्षी रु. ४७.०० कोटी उद्दिष्ट झालेले आहे. त्या प्रमाणात दर वर्षाला मागील उद्दिष्टाच्या १०% वाढीव करुनच उद्दिष्ट ठरविले जाते. त्यानुसार या सुधारीत अंदाजपत्रकात रु. ५२.५० कोटी जकात वसुली होणेसाठी प्रयत्न होण गरजेचे आहे. आणि त्यानुसारच सदरील जकात बाबतचे सुधारीत अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यासाठी प्र.जकात अधिक्षकांना प्रशासनातर्फे मोबाईल व वाहन त्यांना अपेक्षित असणारा कर्मचारी वर्ग इ.सुविधा पुर्णपणे दिलेल्या आहेत. तेव्हा त्यानुसार जकातीचे वसुलीचे सुधारीत उद्दिष्ट रु.५२.५० कोटी पुर्ण होणे गरजेचे आहे.

**प्र.जकात अधिक्षक :** मी प्रशासनाला लेखी कळविलेले आहे की, जकातीचे रु. ५१.०० कोटी पर्यंत वसुली होईल.

**श्री. भरत लकडे :** प्रशासनातर्फे खुलासा मुख्य लेखाधिकारी व उपआयुक्त (प्र) यांनी केलेला आहे व त्या उपरोधीक विधान प्र.जकात अधिक्षक यांनी करणे म्हणजे सभागृहात दिशाभुल करणे होय. या ठिकाणी अर्थसंकल्पाची प्रशासन मजाक करीत आहे काय? अशा प्रकारे विधात सभागृहात करून प्रशासनात एकमत नाही असे दिसुन येते.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा, श्री.मधुकर सावंत :** प्रशासन प्र.जकात अधिक्षक या दोहोत एकवाक्यता दिसुन येत नाही व जकात अधिक्षक हे खरी माहिती देतात.

**मा.सभापती :** सुधारीत अंदाजपत्रकात प्रशासनाने रू. ५२.५० कोटीचे जकातीचे उद्दिष्ट ठरवुन दिलेले आहे. मात्र प्र.जकात अधिक्षक यांनी रु. ५१.०० कोटीचे जकात वसुली होईल असे कळविलेले आहे व सभागृहात बोलत आहेत.त्यामुळे ताळमेळ असल्याचे दिसुन येत नाही.तेव्हा मी प्रशासनास सांगू इच्छितो की,या ठिकाणी उपस्थित उपआयुक्त (प्र) व प्र.जकात अधिक्षक यंनी मा.आयुक्त यांचेशी चर्चा करुन सभागृहाला खरी माहिती द्यावी. तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते.

(वेळ **२.**५५ वा.) (सभेला सुरुवात ३.३५)

**मा.सभापती :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी आलेले आहेत. त्यांचेसोबत बैठक चालु आहे. त्यामुळे ४.३० पर्यत बैठक चालेल.

**उपआयुक्त (प्र.) :** मा.आयुक्त यांचे बरोबर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. सुधारीत अंदाजपत्रकात जे उद्दिष्ट ठरवुन दिलेले आहे ते उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल.

**श्री.मीर हिदायत अली :** सिमेंटचे भाव सध्या १२५/ रुपये आहे. मागे याचा भाव रु. १६५/प्रती गोणी एवढा होता. त्यामुळे व्यापारी वर्ग सिमेंटचे भांडारात (गोदामात) लावुन ठेवतात त्यामुळे जकातीवर परिणाम होत असतांना दिसुन येतो.

**मुख्यलेखाधिकारी :** जकातीचे उद्दिष्ट जे मुळ अंदाजपत्रकात दर्शविल्या जाते ते अंदाज असतात.प्रशासनामार्फत संबंधीत विभागास उद्दिष्ट ठरवुन देते व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन कामाला लावते.परंतु उद्दिष्ट पुर्ततेसाठी प्रशासनास कसोशीने प्रयत्नही करणे भाग असते.काही वेळेस तांत्रिक अडचणी निमा्रण होतात.उदा.संप / बंद इ.ऐनवेळेस झाल्यास तशा परिस्थितीत काहीही सांगता येत नसते.

**मा.सभापती :** विरोधी पक्षनेता यांनी आपले मत या सभागृहात मांडावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सध्या सन २००२-२००३ चे अंदाजपत्रक येत आहे आणि सन २००१-२००२ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील मार्च अखेर पर्यंत प्रशासनाने दिलेले उद्दिष्ट अद्यापही पूर्ण करीत असल्याचे दिसुन येत नाही तेव्हा उद्दिष्ट पूर्ण करणार आहोत काय? जर प्रशासनाची भुमिका उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या बाबतीत कार्यवाही करेल व ज्या ज्या विभागांना वसुलीची सक्ती दिलेली आहे.त्यांना सक्त ताकीद देऊन समज द्यावी. खरे पाहिले तर सुधारीत अंदाजपत्रक हे माहे डिसेंबर २००१ मध्येच आणणे आवश्यक होते. त्याबाबत प्रशासन गाफील राहीले. सुधारीत अर्थसंकल्प प्रशासनास ताकीद देऊन मंजुर करावा.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** महानगरपालिका नियम १०३ / १८४ प्रमाणे काय करावयास पाहीजे याची शहानिशा करावी.

**मा.सभापती :** बैठक तहकुब करण्याचा एकच उद्देश आहे की, झोन निहाय वसुली व जकातीसाठी दिलेली उद्दिष्टांची वसुली याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही पुर्णपणे केलेली नाही. त्यामुळे शहरातील विकास कामावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी प्रशासनाने संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना वसुली संदर्भाने सक्त ताकीद देऊन जर वसुली दिलेल्या उद्दिष्टांपेक्षाही कमी झाल्यास आपणाविरुध्द प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येईल. असे स्पष्टपणे सांगावयास पाहिजे.

याच प्रमाणे मागील बैठकही प्रशासनाने तहकुब केलेली होती ती कशासाठी हे प्रशासनाने जाणीवपुर्वक प्रयत्न करीत नाही असे यावरुन दिसुन येते.सुधारीत अर्थसंकल्प तयार करुन डिसेंबर महिन्यापर्यं दाखल करावयास पाहिजे होते.ते दाखल केल्याने आता मुळ अर्थसंकल्प दाखल करण्याची वेळ आली असून सुधारीत अर्थसंकल्पास मंजुरी द्यावयास स्थायी समितीपुढे विचार करावा लागत आहे.कारण मुळ अंदाजपत्रकातील दिलेल्या उद्दिष्टानुसार प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक होते ते अद्यापही केलेले नाही.१) यासाठी प्रशासनास सुचना देण्यात येताते की वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण करणेसाठी कठोर उपाययोजना केल्याशिवाय पर्याय नाही.अन्यथा कर्मचाऱ्यांना द्यावयाचे ५ व्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम अदा करता येणार नाही. ती थांबविण्यात येईल. २) अधिकारी व कर्मचारी यांनी वसुलीसाठी चोखपणे आपले कर्तव्य बजावून दिलेल्या उद्दिष्टांची परिपुर्ती केलेली नसल्यास त्याबाबत स्थायी समिती कठोरपणे निर्णय घेईल. ३) त्याचप्रमाणे ५व्या वेतन आयोगाची थकबाकी जी कर्मचाऱ्यांना द्यावयाची आहे.त्यासाठी वसुलची आकडेवारी पाहता ती कमी प्रमाणात असल्याने ती थांबवून देता येईल किंवा नाही याची नियमाप्रमाणे विधी विभागाने माहिती द्यावी.

**प्र.विधी सल्लागार :** शासनाचे परिपत्रक व सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार माहिती घेऊन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**मा.सभापती :** पाचव्या वेतन आयोगाची रक्कम कर्मचाऱ्यांना देण्याबाबत विधी विभागास पत्राद्वारे माहिती विचारणा केलेली होती. तथापि गेल्या महिन्याभरापासुन उत्तर प्राप्त झालेले नाही.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मुळ अंदाजपत्रकातील तरतुदी निहाय उद्दिष्ट पुर्ण करण्यास प्रशासन जबाबदार आहे. या साठी प्रशासनाने कठोर निर्णय घ्यावा नाही तर तसे शासनास कळवावे.

**श्री.मधुकर सावंत :** शहरातील विकास कामे करण्यासाठी आर्थिक परिस्थिती मनपाची बरी असणे आवश्यक आहे आणि यासाठी अंदाजपत्रकाचे जे उद्दिष्ट ठरविल्या जाते त्युनसार प्रशासन भरीव अशी कामगिरी करुन मनपाची बाजु बळकट करते, परंतु दिलेल्या वसुलीच्या उद्दिष्टानुसार जे अधिकारी व कर्मचारी कामात अकार्यक्षम असतील त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे प्रशासनाला आदेश व्हावेत.

**श्री.मीर हिदायत अली :** दिलेल्या उद्दिष्टांची वसुली संदर्भाने कर्मचारी परिपुर्ती करीत नसतील तर अशा कर्मचाऱ्यांच्या बाबत प्रशासनानेच कार्यवाही करणेबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

**मा.सभापती :** पाचव्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम कर्मचाऱ्यांना अदा करावयाची झाल्यास किती रक्कमेचा बोजा पडेल याची माहिती द्यावी आणि ती खुद्द मनपाची आर्थिक परिस्थिती ठिक नसतांना थांबविता येऊ शकते काय? याची माहिती द्यावी. सन २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रकात जी तरतुद व उद्दिष्टेच ठरविण्यात आलेले होते. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. नंतर सुधारीत अंदाजपत्रक स्थायी समिती समोर मांडावयाचे होते.आता स्थायी समितीसमोर प्रस्ताव मांडुन मंजुर करवुन घ्यावयाचा मात्र वसुलीबाबत प्रशासनाने कठोर भुमिका घेऊन वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणेसाठी अधिकारी व कर्मचारी यांना कार्यक्षम करावे याबाबत सुधारीत अंदाजपत्रक मंजुर करुन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या वित्तीय वर्षाचे माहे डिसेंबर २००१ पर्यंतचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक विचारात घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यात आलेल्या सन २००१-२००२ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील तरतुदी अन्वये सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सर्वसाधारण सभेकडे सदरील प्रस्तावाची शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २७-२-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक २७-२-२००२ रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष स्थायी समितीची (अर्थसंकल्पीय) सभा मनपा मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. सावंत मधुकर दामोधर
७) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
८) श्री. किशोर शिंदे
९) श्री. ओक जयवंत केशवराव
१०) डॉ. आशा उत्तम बिनवडे.

**संवाद :**

**मुख्यलेखाधिकारी :** महानगरपालिकेचा सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे. कलम ९५ नुसार मा.आयुक्त हा अर्थसंकल्प मा.सभापती यांचेकडे करणार आहेत. तरी मा.आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे अर्थसंकल्प सादर करावा. तत्पुर्वी मा.आयुक्त यांचे तसेच सभागृहातील सर्व सदस्यांचे लेखा विभागामार्फत पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येते. (यावेळी मा.सभापती,स्थायी समिती व सर्व स.सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येते.)

जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले ते मा.आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेले आहे व त्यांचे मोलाचे सहकार्य हा अर्थसंकल्प तयार करतांना लाभलेले आहे.त्यामुळे लेखा विभागातर्फे मा.आयुक्तांचे सुध्दा स्वागत करण्यात येते.(आयुक्तांचे स्वागत मुख्य लेखाधिकारी करतात.) मा.आयुक्त यांनी अर्थसंकल्प मा.सभापतींकडे सादर करावा.(त्याचवेळी मा.आयुक्त अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सादर करतात.)

**मा.आयुक्त :** सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे सादर करण्यात येत आहे. मा.सभापती, सन्माननीय सदस्य स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद. सन २००२-२००३ या वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीसमोर सादर करतांना मला आनंद होत आहे. सर्व प्रथम मी सर्व सदस्यांचे प्रशासनातर्फे स्वागत करतो.

महानगरपालिकेच्या इतिहासातील हा २० वा अर्थसंकल्प आहे. सन २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक यापुर्वी मा.स्थायी समितीत दिनांक ५-२-२००२ रोजी सादर करण्यात आलेले असून सन २००१-२००२ च्या मुळ अंदाजपत्रकात आलेल्या त्रुटीबाबत सुधारीत अंदाजपत्रकीय बैठकीत सविस्तर विश्लेषण करण्यात आलेले आहे.

सन २००२-२००३ या वित्तीय वर्षामध्ये प्रशासनातर्फे काही विशेष योजना राबविण्याचा मानस आहे त्यात प्रामुख्याने या शहराच्या ऐतिहासिक वारसा असलेले दरवाज्यांचे जतन,संवर्धन व सुशोभिकरण करणे, शहरामध्ये हर्सुल स्मृतीवन येथे बोट (बी.ओ.टी.) पध्दतीने मनोरंजन केंद्र (ॲम्युसमेंट पार्क) विकसित करणे, शहरात कचरा एकत्र साचवुन उचलणेसाठी १० कन्टेनर व कन्टेनर वाहन हैड्रोलीक खरेदी करणे, त्याचप्रमाणे सध्याच्या आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात महानगरपालिका सारखी लोकाभिमुख संस्थेचा कारभार ही तत्परतेने व योग्यरित्या व्हावा या उद्देशाने महानगरपालिका मधील कार्यरत वर्ग-३ कर्मचारी व अधिकारी यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्याचा प्रशासनाचा मानस आहे. तसेच महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनाही संगणकीय ज्ञान देण्याची योजना आहे व महानगरपालिकेच्या ज्या मोकळया जागा आहेत त्या बोट (बी.ओ.टी.) पध्दतीने विकसीत करण्यात येणार आहे.

उत्पन्न वाढीच्या दृष्टीने या वर्षापासुन नवीन जाहिरात पॉलीसी निश्चित करण्यात येत आहे. त्यापासुन शहराच्या सुशोभिकरणाबरोबर रु. ५०.०० लाखाचे उत्पन्न प्राप्त होऊ शकेल. तसेच ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही अशा मालमत्ता शोधुन त्यांची कर आकारणी करण्यात येईल. तसेच सध्या जे व्यावसायिक नळ कनेक्शन आहेत, त्या सर्वांना मीटर पध्दतीने दर आकारण्यात येईल. महानगरपालिकेस त्यातुन भरीव उत्पन्न विकले.

सन २००२-२००३ या वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प सादर करीत असतांना प्रशासनाने वास्तववादी भुमिकेचा अवलंब करुन व कर्मचाऱ्यांच्या असलेल्या क्षमतेचा विचार करुन जितके उत्पन्न प्राप्त होवू शकते त्या अनुषंगाने वसुलीचे उद्दिष्ट निश्चित केलेली आहेत. यामागे प्रशासनाची भुमिका ही आहे की ठरवुन दिलेल्या अर्थ संकल्पीय तरतुदी प्रमाणे जमा व खर्चाचे योग्य प्रकारे नियोजन व्हावे.

चालु आर्थिक वर्षापासुन प्रशासनाने भांडवली व महसुली कामाचे काम निहाय आर्थिक तरतुदी उपलब्ध करुन देवून नियोजन बध्द रितीने अर्थसंकल्पीय तरतुदी अनुरुप विकास कामे करण्याचे प्रस्तावित केलेले असून त्यामुळे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासुनच विकाम कामे करण्यास सुरुवात होईल व ज्यामुळे कामाच्या नियोजित मुदतीप्रमाणे कामे पुर्ण करता येतील व या  माध्यमातून आर्थिक संतुलन राखणे शक्य होईल, तसेच स्पील ओव्हर कामाचे प्रमाण कमी करण्यासही मदत होईल व येत्या आर्थिक वर्षात विकास कामे करण्यासाठी मुबलक प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकेल.

सन २००२-२००३ या वित्तीय वर्षामध्ये प्रभाग समितीस स्वतंत्रपणे प्रत्येकी रु. २५.०० लाख प्रमाणे रु. १.०० कोटी निधी उपलब्ध केलेला आहे. सदरील निधी हा परिशिष्ट जोडणेच्या कामाव्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या

कालावधीत ठेवण्यात आलेला आहे.तसेच प्रत्येक विभागाच्या तरतुदीपेक्षा २५% कामे जास्त प्रस्तावित केलेली आहेत. याशिवाय एक्सप्रेस जलवाहिन्यासाठी रु. ५.०० कोटीची स्वतंत्र तरतुद केलेली आहे.

एकंदर सर्व प्रकारचे उत्पन्न व खर्चाच्या बाबींचा समावेश करुन ११७.५७ कोटी जमा व रु. ११७.३७ कोटी खर्च विचारात घेवून रु.१९.८५ लाखाचे शिलकी अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

सन २००२-२००३ या आर्थिक वर्षामध्ये जुलै २००१ ला आयुक्त पदाची मी सुत्रे स्विकारल्यानंतर तत्कालीन महापौर डॉ.भागवत कराड तसेच विद्यमान महापौर विकास जैन व इतर सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हे अंदाजपत्रक सादर करतांना सर्व संबंधीत अधिकारी कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले या बद्दल मी त्यांचा आवर्जुन उल्लेख करु इच्छितो.या शहरातील सर्व पत्रकार बंधु,ए सी एन चॅनल, आकाशवाणी यांनीही वेळोवेळी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

धन्यवाद.

या अर्थसंकल्पात ज्या ज्या बाबी नमुद करण्यात आल्या त्याबद्दल थोडक्यात विश्लेषण करण्यात येत आहे. वार्ड कमिटीसाठी २५ लक्ष रुपयांची विशेष तरतुद करण्यात आलेली असून ५ लक्ष रुपये पर्यंतची प्रशासकीय मान्यतेचा ठराव सुध्दा यापुर्वी स्थायी समितीने मंजुर केलेला आहे.जकातीमध्ये यावर्षी होणाऱ्या उत्पन्नाच्या १५% नी वाढ सुचविलेली असुन दरवर्षी फक्त ९ ते १०% नी वाढ सुचविण्यात येत असे.मालमत्तांचे १५ कोटीचे उद्दिष्ट ठेवले व जी थकबाकी आहे यावर १५% प्रमाणे व्याज लावणार अशी तरतुद सुध्दा करण्यात आली व ज्यामुळे लोक मालमत्ता कर भरण्यास पुढे येतील. मनपास विद्युत बिलापोटी महाराष्ट्र विद्युत मंडळास १८% व्याज द्यावा लागतो व सरचार्ज सुध्दा द्यावा लागतो. त्यामुळे जे कर भरणार नाही अशा मालमत्ता धारकांवर असलेली थकबाकी रकमेवर १५% व्याज आकारणी करण्याचे सुचविले आहे. मनपा मालमत्ता कर ॲडव्हॉन्स मध्ये घेतो.परंतु प्रवृत्ती अशी झाली की, मार्च  पर्यंत तरी कर भरावयास पाहिजे. कायदयाचे तरतुदी नुसार ६ महिन्याचा टॅक्स एप्रिलमध्ये भरावा व उर्वरीत ६ महिन्याचा कर ऑक्टोबर मध्ये भरला पाहिजे. या वर्षापासून जो व्यक्ती एप्रिल महिन्यात टॅक्स भरेल अशांना चालु मागणीवर ५% सवलत देण्यात येणार आहे. शासनाने विचारणा केली की, पाण्यावर मनपाचा जेवढा खर्च होतो तेव्हढी वसुली होते का?ना नफा ना तोटा या तत्वावर पाणी पुरवठा योजना चालवावी असे निर्देश आहे. या शहराला येणारे पाणी ग्रायव्हीटीने येत नाही. विज बील वाढते. पाणी आणण्यासाठी जास्त प्रमाणात खर्च होतो व त्यामुळे पाणीपट्टी करात वाढ सुचविलेली आहे व शासनाने असे सुचविले आहे की, पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविली नाही तर शिक्षण विभागासाठी जे ४.५ ते ५ कोटी अनुदान येते ते देण्याचे शासन बंद करणार. २-३ स्मरणपत्रेही आले आहेत. त्यासाठी ना नफा ना तोटा या तत्वावर पाणी पुरवठा योजना राबवायची आहे. उत्पन्न वाढले पाहिजे या दृष्टीने या सभागृहात सखोल चर्चा होवून योग्य तो निर्णय

घ्यावा. पाणी पुरवठयाचे उद्दिष्ट यावर्षी १३ कोटीचे ठेवण्यात आलेले आहे.वाचनालय प्रवेश फी व मासिक वर्गणी यामध्ये थोडयाफार प्रमाणात वाढ केलेली असून १ ते १.५० लक्ष रुपये अपेक्षित आहे. फार काही मोठी रक्कम येणार नाही. १५-२० वर्षात वाढ नाही. शहरात व्यावसायिक वापरासाठी ६ हजार व्यावसायिक नळ कनेक्शन असु शकतात. त्याचा शोध घेणे गरजेचे आहे व त्यासाठी वाणिज्य वापरात असलेल्या नळांना मीटर पध्दत अवलंबिणे बाबत सुचविलेलीच रक्कम भरणा करणार आहे. पाणी वापरण्यावर थोडया प्रमाणात प्रतिबंध होईल व ते पाणी इतर ठिकाणी देण्यास मदत होईल व मनपाचे उत्पन्न वाढवायचे असेल तर टप्प्याटप्प्याने अगोदर वाणिज्य वापरात असलेल्या नळांना मीटर पध्दत अवलंबावी लागेल.त्यापासुन मनपाचा फार मोठया प्रमाणात फायदा होईल. ५ कोटी रुपये विशेष अनुदान म्हणून गृहीत धरण्यात आलेले आहे. रस्त्यासाठी १ कोटी गृहीत धरण्यात आलेले आहे व वित्त आयोगाकडून ५ कोटी गृहीत धरलेले आहे. अस्थापनेवरील एकूण खर्च ३८.७० कोटीचा होतो. त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच इतर खर्च होतो. पाणी पुरवठा खर्चापेक्षा लावलेला दर व वसुली कमी आहे. ३० कोटी रुपये खर्च होतात व १२-१३ कोटी रुपये पाणी पट्टीच्या माध्यमातून वसुल होते.व उर्वरित १७ कोटी खर्च इतर उत्पन्नातून पाणी पुरवठयासाठी करावा लागतो. पाणी पट्टीत सुचविलेली वाढ मंजूर केली तर येणारा पैसा विकास कामावर खर्च करता येईल. झाल्टा ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी ५० लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच ५% कमकुवत घटक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ३.८० कोटीची तरतुद केलेली आहे. वर्क वाईज बजेट आपल्यासमोर ठेवलेले आहे.

या बाबतीत शासनाचे नियोजन विभागामार्फत माहिती घेतली जाते.या दोन तीन बाबी आहे. वर्क वाईज बजेटमध्ये काम करतांना पहिल्यांदा जी स्पील ओव्हर कामे आहे ती करावी लागतात, त्यानंतर ज्या भागात १००% वोटरमेंट चार्जेस,१००% कर भरल्या जातो त्याप्रमाणे दुसऱ्या क्रमांकावर ती कामे करावी लागतात. तिसरा टप्पा ज्या भागात ५०% वसुली होते. त्या त्या भागात विकास कामे करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जी कामे करणे प्रशासनास आवश्यक वाटते अशी सर्व कामे यात नमुद केलेली आहे. कोणकोणती कामे करावयाची हा निर्णय सभागृहाचा आहे.योग्य तो निर्णय घ्यावा. स्पील ओव्हरची एकूण २१४ कामे आहे.व ९-१० कोटीची स्पील ओव्हरची कामे पुढील वर्षात जाणार आहे. अतिरिक्त शहर अभियंता विभागातील १०२ कामे पाणी पुरवठा विभागाची २९ कामे तर पाणी पुरवठा व जलनि:सारण विभागाची २६ कामे आहे. तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागातील सुध्दा स्पील ओव्हरची कामे होणार आहे.नवीन ४१६ कामे करण्यात येणार असून त्यासाठी २०-२२ कोटी तरतुद ठेवण्यात यावयास पाहिजे परंतु आपण २५% जास्त कामे सुचविलेली आहेत. जे की पाणपट्टीत जी वाढ केलेली आहे. त्याप्रमाणे वसुली झाल्यास येणारा पैसा वाढीव सुचविलेल्या कामासाठी वापरता येईल. आज रोजी स्थायी समिती किंवा त्यानंतर सर्वसाधारण सभा पाणीपट्टीत किती वाढ सुचवेल हे सांगता येणार नाही. परंतु जी वाढ सुचविली ती ४१६ नवीन कामे होण्याच्या दृष्टीने सुचविली आहे. त्यात शहर अभियंता या विभागातील

१३३,अति.शहर अभियंता ९७ तर पाणी पुरवठा विभाग ७३ व जलनि:सारण व विद्युत विभागाची ११३ कामे समाविष्ट केली आहेत. सभागृहाला जो निर्णय होईल. त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. एप्रिल,मे,जुन मध्ये सर्व अंदाजपत्रकांना मंजुरी मिळेल. जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर मध्ये सर्व टेंडर निघतील.ॲग्रीमेंट होतील.ऑक्टोबर पासुन मार्च पर्यंत कामे करण्यात येतील.सध्या परिस्थिती अशी आहे की, ज्या कामासाठी पाठपुरावा झाला तर ते काम तात्काळ होते. काही कामांना मंजुरी घेण्यासाठी फेब्रुवारी मध्ये संचिका येतात.अशी सर्व कामे स्पील ओव्हरमध्ये जाते. आता वर्कवाईज कामे असल्यामुळे तात्काळ कामे होतील यात शंका नाही व पुढील वर्षात स्पील ओव्हरची कामे राहणार नाही व नवीन कामे करण्यास जास्त पैसा उपलब्ध राहील उत्पन्न कसे येणार, खर्च कसे होणार याबाबत सविस्तर तक्ता दिलेला आहे.यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घ्यावा. वर्कवाईज कामे करण्यासाठी प्रशासनासमोर स्पष्ट आराखडा राहील.एप्रिल महिन्यापासून कामास सुरूवात होईल.त्यादृष्टीने प्रशासन कार्यवाही करेल. या सभागृहाला प्रशासनातर्फे विनंती की हा अर्थसंकल्प मंजुर करुन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प सादर केला. यापुर्वी हेड वाईज बजेट होते. आता वर्कवाईज ठेवलेले असल्याने या बजेटवर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा आताच्या आताच कळणार नाही कृपया वेळ वाढवून देण्यात यावा.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** काही ठराविक कामाचाच समावेश दिसतो. काही वार्डातील कामेच घेतलेली नाही ज्याच्या वार्डातील कामे घेतली नाही व ते सदस्य नाराज होतील. शहर अभियंता यांनी जी कामे सादर केली त्या प्रमाणे सर्वांच्या वार्डात कामे होत नाही. स.सदस्यांचे पत्र घ्या. त्यांचेकडून माहिती घ्यावी. त्याप्रमाणे या बजेटमध्ये कामाचा समावेश करावा.

**श्री.जयवंत ओक :** आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला, जेथे १००% कर भरला तेथे प्राधान्य देण्यात येईल. तेथेच कामे करता येतील परंतु अनधिकृत वस्त्यातील लोक १००% कर भरण्यास तयार आहे. अशा वस्त्यांमध्ये अगोदर विकास कामे करण्यात आली. या भागात गरीब जनता राहते. ड्रेनेज नाही,पाणी नाही,इतर सुविधा आता बंद केल्या. या यादीनुसार २५% वार्डातील कामे होणार नाही. यासाठी सर्वच वार्डात कामे होतील त्याप्रमाणे यादी तयार करावी. विभाग प्रमुखाकडून लिस्ट मागवावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** प्रत्येक नगरसेवकाचे मत जाणून घ्यावे. त्यानंतर या अर्थ संकल्पावर निर्णय घेण्यात यावा.

**श्री.जयवंत ओक :** सर्व वार्डात कामे झाली पाहिजे. त्यासाठी वार्डवाईज बजेटची तरतुद करण्याची आमची मागणी होती. रस्ते,लाईट,पाणी देता येईल अशी कामे करण्यात यावी. कोणती कामे करणे गरजेचे आहे. ५४ झोपडपट्टया आहेत.१-२ मध्येच कामे होतील. बाकीच्या वसाहतीत कामे होणार नाही.

**श्री.साहेबराव कावडे :** १८ खेडी विकासासाठी जास्तीत जास्त बजेट ठेवण्यात यावे. या भागात विकास कामे म्हणावी तशी झालेली नाहीत.

**मा.सभापती :** सन २००२-२००३ चे अर्थसंकल्प मा आयुक्तांनी सादर केलेले असून त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करता सविस्तर माहिती सभागृहाला दिली. यापुर्वी

हेडवाईज बजेट होते. या वर्षी वर्कवाईज ठेवण्यात आलेले आहे. या अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी व त्या त्या विभाग प्रमुखांशी चर्चा करण्यासाठी सदस्यांना वेळ देणे गरजेचे आहे. त्यासाठी दि. ५-२-२००२ रोजी या अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात येईल. आजची सभा तहकुब करण्यात येते.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ५-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक २७-२-२००२ रोजी तहकुब झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समितीची सभा दिनांक ५-३-२००२ रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली मनपा मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. लकडे भरत श्रीपती
७) श्री.सलीम पटेल समशेर पटेल
८) श्री.सावंत मधुकर दामोधर
९) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
१०) श्री. शिंदे किशोर रावसाहेब
११) श्री. शे.इलियास किरमानी शे उमर
१२) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१३) श्री. ओक जयवंत केशवराव
१४) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१५) डॉ. आशा उत्तम बिनवडे

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक :** लोक सभेचे अध्यक्ष स्व.जी.एम.सी.बालयोगी यांचे नुकतेच विमान अपघातात निधन झाले. त्यांना सभागृहापतर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.तसेच संपूर्ण देशात २ दिवस दुखवटा पाळला जात असून आजची सभा तहकुब करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठीक आहे.लोकसभा अध्यक्ष जी एम.सी.बालयोगी यांचे विमान अपघातात निधन झालेले असल्याने सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. सर्वानी उभे रहावे.

(यावेळी स्व.जी.एम.सी.बालयोगी यांचे निधनानिमित्त सभागृहातर्फे ०२ मि.श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.)

लोकसभा अध्यक्ष यांचे अपघाती निधन झाल्याने दोन दिवस संपूर्ण देशात दुखवटा पाळला जात असल्याने आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. हे सभागृह त्यांचे परिवाराच्या दु:खात सहभागी आहे.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ११-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक ५-३-२००२ रोजी तहकुब झालेल्या अर्थसंकल्पीय सभा सोमवार दिनांक ११-३-२००२ रोजी मा.सभापती यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची (अर्थ संकल्पीय) सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.१५ वाजता सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. अशरफ युनुस मोतीवाला
२) स.स. श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) स.स. श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
५) स.स. श्री. लकडे भरत श्रीपती
६) स.स. श्री. सावंत मधुकर दामोधर
७) स.स. श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
८) स.स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब
९) स.स. श्री. शे.इलियास किरमानी शे उमर
१०) स.स. श्री. औताडे रावसाहेब ममतू
११) स.स. श्री. ओक जयवंत केशवराव
१२) स.स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१३) स.स. श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग
१४) श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक :** मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली. मा.उच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांनी तोडून टाकली. पुर्णच काढावे असे आदेश न्यायालयाचे आहे का? ४० वर्षापुर्वीचे बांधकाम पाडण्यात आले याबाबत खुलासा करावा, शहरात तणावग्रस्त परिस्थिती निर्माण होता कामा नये. अतिक्रमणात येत असेल तर आवश्य काढावे यास आमची हरकत नाही.

**श्री.नंदकुमार फुलारी :** ५ दुकाने पुर्णतः काढून टाकली २५ वर्षापासुन दुकाने होती. आता नुकसान भरपाई कोण देणार? संबंधितास नियमाप्रमाणे नोटीस दिली होती.

**मा.सभापती :** आजची सभा अर्थसंकल्पावर चर्चेसाठी लावण्यात आलेली आहे. दुस-या विषयावर चर्चा करणे योग्य होणार नाही.

**मा. उपआयुक्त (प्रशासन ) :** ९ मीटर ते ४५ मीटरच्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत उच्च न्यायालयाने निर्देश दिल्याने अशा रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे काम चालु असून आताच स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे सदरील बांधकाम महानगरपालिकेच्या जागेत बाधीत आहे किंवा काय याबाबतीत चौकशीचे आदेश मा.आयुक्तांनी दिलेले आहे. चौकशी अंती पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री.जयवंत ओक :** सर्वच अतिक्रमाणात येत नव्हते. जाणुन बुजून पाडण्यात आले अशी ताठर भुमिका प्रशासनाने घेणे बरोबर नाही, जनता प्रशासनास सहकार्य करण्यास तयार आहे. अशा प्रकारामुळे जनता पेटून उठेल प्रशासनास काम करण्यास अडचणी येईल.

**मा.सभापती :** रस्त्यावरील आहे का? कोणत्या आधारावर कार्यवाही केली खुलासा करावा.

**मा. उपआयुक्त (प्रशासन ) :** सदर दुकाने अतिक्रमणामध्ये होती का? याची चौकशी करुनच सांगता येईल.

**श्री.जगदीश सिध्द :** ५ कोटीचा दावा करणार आहे. गोर गरीबांची घरे पाडली तर काय करणार नोटीस दिली होती का पाडण्याचा काय उद्देश आहे.

**मा. उपआयुक्त (महसुल ) :** या प्रकरणाच्या अुनषंगाने मा.उच्च न्यायालयाने ऑक्टोबर २००१ मध्ये जे ९ मीटर ते ४५ मीटर रस्त्यावर अतिक्रमण झाली असतील अशी सर्व अतिक्रमाण काढावी असे आदेश केलेले आहे. "वेलवर्थ" मालकांना दिनांक २३-१०-१९८९ मध्ये सदर जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे असे पत्र देवून कळविले होते व ती जागा रिकामी करुन दयावी म्हणून सुचनाही वेळोवेळी केलेल्या आहे. १९९२ ला करारनामा झाला आहे. १०-४-९२ ला ताब्यात घेतली आहे. चौकशी करुन संचिका तपासली असता ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे, असे निदर्शनास आले.मुळ मालक यांनी ती जागा भाडेपट्टयाने दिली. आज तारखेपर्यंत ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. प्रत्यक्ष दोन वेळा संबंधीत मालकाची भेट घेतली व अतिक्रमण काढण्याबाबत सुचना केल्या तसेच वृत्तपत्रात न्यायालयाने निर्देशानुसार शहरातील नागरिकांनी त्यांनी केलेली सर्व अतिक्रमणे काढुन घ्यावी असे जाहीर प्रगटन दिले, कोणी काढले नाही तर महानगरपालिका अशी अतिक्रमणे जे सी बी  मशीनने काढून घेईल असे जाहीर केलेले होते. कुणावर अन्याय होणार नाही. याची काळजी घेतली जात असून अतिक्रमण मोहीम राबवितांना संबंधित विभागाचे अधिकारी,उपआयुक्त (प्र.) तसेच इतर कर्मचारी यांचे मार्फत ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्यक्ष कागदपत्राची तपासणी करुनच कार्यवाही केलेली आहे.अतिक्रमण पाडतांना व्हिडीओ शुटींग करुन घेतलेली आहे.त्याची कॅसेट माझेकडे सील करुन ठेवली असून रात्री ९.१० पर्यंत हे काम सतत चालत होते. आपले अधिकारी / कर्मचारी काम करीत असतांना ज्यांचा तेथे काही संबंधी नाही अशाही लोकांचे चेहरे व्हिडीओ शुटींगमध्ये आलेली आहे. अतिक्रमण पाडतांना फार मोठया प्रमाणात जमाव होत होता. अतिक्रमण काढल्या बाबतची कार्यवाही करुन प्रत्येक आठवडयाचा अहवाल न्यायालयास सादर करायचा आहे. तेथील परिस्थिती पाहता मोबाईल वगैरे बंद करण्यात आले होते.जेव्हढे अतिक्रमण पुढे येत होते हे पाडण्याची कार्यवाही नियमाने केलेली आहे.

**श्री.जयवंत ओक :** २५-३० वर्षापासून भाडेकरु राहतात. महानगरपालिकेच्या मालकीची जागा होती तर यापुर्वीच का कार्यवाही केली नाही. न्यायालय आदेश देईल तेव्हाच अशी कार्यवाही करणार का? अशा प्रकारचे किती महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेली असतील मग ती सर्व अतिक्रमणे काढुन जागा रिकाम्या करुन घेणार का? याचा खुलासा व्हावा. घरमालक व भाडेकरु यांचेत न्यायालयात वाद असेल तर त्याचा निकाल लागेपर्यंत कार्यवाही

करता येत नाही. या दुकानाच्या संदर्भात न्यायालयात वाद होतात अशी माहिती आहे.

**मा.सभापती :** परवा जी अतिक्रमणे पाडण्यात आली, आताच गुट्टे साहेबांनी माहिती दिली परंतु ती स्वत: तेथील परिस्थिती बघितली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण पाडण्याचा ठेका घेतला अशा पध्दतीने कार्यवाही होत आहे. ज्याचे अतिक्रमणात येत नाही त्यांचे दुकाने,घरे पाडण्याचा प्रयत्न होत आहे.यास जनता साक्षी आहे. मा.आयुक्तांना विनंती करतो की, दोन अधिकाऱ्यांची सदस्य समिती नेमुन योग्य ती कागदपत्राची तपासणी करुन ही मोहीम राबविण्यातबाबत कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त :** कोणी अधिकाऱ्यांनी ठेका वगैरे घेतला असे करणे बरोबर नाही. ज्या इमारती,बांधकाम तोडायचे त्यासंबंधी अगोदर सर्व तपासणी करुनच कार्यवाही होत आहे.जे अधिकारी / कर्मचारी या मोहीमेत दोषी ठरतील त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल यात शंका नाही. ज्यांचे मालमत्तेचे नुकसान झाले त्याचे बाबतीत सुध्दा नियमाने विचार होईल.चौकशी मध्ये काय निकाल लागेल ते आताच सांगता येणार नाही चौकशी करते वेळेस संबंधित व्यक्तिला चर्चेसाठी बोलाविण्यात येईल.पदाधिकाऱ्यांना सुध्दा चर्चेच्या वेळी बोलाविण्यात येईल. ही मोहीम राबविण्याअगोदर ज्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केलेली आहे ती पाडण्या संदर्भात वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिलेले होते. २-३ वेळेस प्रत्यक्ष सुचना केल्या.वेळेच्या आत पाडले नाही म्हणून ही कार्यवाही करावी लागली.

**श्री.जयवंत ओक :** क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे काम चालु आहे.यानंतर रेल्वेस्टेशन ते मिलकॉर्नर दिल्लीगेट पर्यंत अतिक्रमण काढणार का? कुणालाही नोटीस दिलेल्या नाही. लोकांना माहित नाही किती जागेचे अतिक्रमण तोडणार,त्यासाठी वृत्तपत्रात पुन्हा जाहीर प्रगटन देऊन जनतेच्या निदर्शनास ही बाब आणुन द्यावी. त्यानंतर ३ दिवसाची मुदत देऊन पुढील कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांना सभागृहातर्फे सुचविण्यात येते की, पुन्हा जाहीर निवेदने वृत्तपत्रात प्रसिध्द करुन २-५ दिवसांची जनतेला मुदत देऊन झालेले अतिक्रमण काढण्याबाबत सवलत द्यावी व त्या वेळात त्यांनी अतिक्रमण काढले नाही तर नियमाने कार्यवाही करावी आता अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

**मा.सभापती :** अगोदर जमा बाजुवर चर्चा करावी जकात विषयावर चर्चा करावी.

१) **<u>जकात :</u>**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** प्रत्येक वर्ष अर्थसंकल्पावर बैठक आयोजित करण्याअगोदर सर्व स.सदस्यांचे मत जाणून घेण्यासाठी प्रिमिटींग बोलावली जात असे. यावेळेस का बोलावली नाही, उलट यावेळेस वर्कवाईज बजेट केलेले असून सदस्यांचे मत जाणून घेणे आवश्यक होते. काही सदस्यांच्या वार्डातील कामे आलेलीच नाही. त्यामुळे पुढील वर्षी वार्डातील कामे होतील किंवा नाही याबाबत स.सदस्यांच्या मनात शंका निर्माण झाली आहे.

**श्री.जयवंत ओक :** अर्थसंकल्पामध्ये या वर्षापासून वर्कवाईज बजेट केलेले आहे. पुर्व नियोजित बैठक सर्व सदस्यांचे मत जाणून घेण्यासाठी प्रत्येक वेळेस बोलावली जात होती. ती का बोलावली नाही तसेच बऱ्याच स.सदस्यांच्या

वार्डातील कामे यात समावेश झाली नाही. उदा.माझ्या वार्डातील नुर भागातील एकही काम घेतले नाही. अशा भागात महानगरपालिका भागात महानगरपालिका फंडातुन कामे होणार आहे का? नसता वार्डवाईज बजेट ठेवावे अशी माझी सुचना आहे.

**मा.सभापती :** पुर्व नियोजित बैठक का बोलाविण्यता आली नाही याचा खुलासा अधिकाऱ्यांनी करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** बजेट तयार करण्यापुर्वी अधिनियमात ज्या तरतुदी निर्देशित केलेल्या त्या तरतुदी नुसारच हे बजेट तयार केले. स.सदस्यांचे मत जाणून घेणेसाठी जी बैठक बोलवावी अशी कायद्यात तरतुद नाही. कारण ९५ नुसार मा.आयुक्त जमा आणि खर्चाचे विवरण पत्र स्थायी समिती समोर सादर करीत असतात. कलम ९६ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यास स्थायी समितीचा अधिकारी आहे.सभापती स.सदरचा समवेत प्री बैठक बोलावू शकतात.परंतु आयुक्त स्तरावर जी बैठक बोलाविणे नियमात नाही जी कामे प्रस्तावित केली.जे अंदाजपत्रक तयार केले त्यात फेरबदल करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. त्यानुसार योग्य तो निर्णय सभागृह घेऊ शकते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** प्रत्येक वेळेस नियम दाखविले जातात. प्रशासन नियम तोडून कामे करते तेव्हा त्यास कोण जबाबदार आहे.त्यावेळी

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** त्यावेळी पाहिले जात नाही का? यापुर्वी नियमानुसार का कार्यवाही केली नाही. प्री बैठक यापुर्वी बोलाविण्यात येत होती का ते अशिक्षित होते.

**श्री.जयवंत ओक :** ११ वर्षापासून सदस्य आहे. प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प सादर होण्यापुर्वी स.सदस्यांचे मत जाणून घेण्यासाठी आयुक्त स्तरावर बैठक बोलाविण्यात येत होती. कोणती कामे करायची, करणे गरजेचे आहे. सविस्तर चर्चा होत असे. यावेळेस का बैठक बोलावली नाही

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** वर्कवाईज बजेट ठेवले सर्व स.सदस्यांचे मत जाणून घ्यावयास पाहिजे होते. एकाच वार्डातील ४-४ कामाचा समावेश दिसतो. जनता आम्हाला जाब विचारेल. हे बजेट असेच मंजूर केले तर सर्वसाधारण सभेत स्थायी समितीस जबाबदार धरले जाईल याचा विचार व्हावा.

**श्री.मीर हिदायत अली :** एका वार्डात ७०-७५ लक्ष रुपयाचे काम होणार असे दाखविले. परंतु काही वार्डाचा यात उल्लेखच नाही. सर्वच वार्डात कामे व्हावीत सर्वच सदस्यांना कामे होण्याबाबत अपेक्षा आहे. याचा विचार व्हावा.

**मा.सभापती :** इतर चर्चा न करता उत्पन्न बाजुवर चर्चा व्हावी.

**श्री.जगदीश सिध्द :** महानगरपालिकेचे सर्वात जास्त उत्पन्न जकाती पासुन येते. उदा.एक ट्रक सिमेंटचा भरुन आला किती सिमेंट होते किती जकात घ्यावी याचा काही ताळमेळ नाही. अंदाजित संख्या धरुन जकात पावती दिली जाते व त्यामुळे किती माल येतो. याचा हिशोब लागत नाही त्यासाठी नियमित दररोज शहरात येणार साहित्य साखर,सिमेंट,लोखंड किती येते व या पासुन एका महिन्यात प्रत्येक वस्तुवर किती जकात येतो याची नोंद असावयास पाहिजे.यावरुन किती चोरी होते हे दिसून येईल. या शहरात मतदार व्यतिरिक्त जी लोकसंख्या आहे ती सोडून मतदार यादीनुसार १० लक्ष लोकसंख्या आहे. प्रत्येक व्यक्तिला १ महिन्याला १ साबण गृहीत धरण्यास वर्षाच्या १२ साबणी होतात. १० लक्ष लोकांची बेरीज केल्यास या शहरात

किमान वर्षाला १.२० कोटी साबण येतात. प्रत्येक साबण किंमत १०/- रुपये धरल्यास १२ कोटी रुपयाच्या साबण या शहरात येतो. त्याचप्रमाणे सर्वात कमी किंमत असलेली व्हील कपडयाची साबण एका व्यक्तिस महिन्यासाठी एक धरल्यास वर्षाला १.२० कोटी साबणाची संख्या होते. एका साबणीची किंमत रु.५.५० आहे. सर्वात कमी किमतीची साबणाचा विचार आपण केलेला आहे. तरी सुध्दा रु. ५.५० प्रमाणे एका वर्षात लागणाऱ्या कपडयाच्या साबणाची एकूण रक्कम किमान ६.५० कोटी होते तर अंगाच्या साबणाची किंमत १२ कोटी होते तर अंगाच्या साबणाच्या रक्कमेवर २ १/२ % प्रमाणे जकात आकारणी होते. त्यानुसार ३० लक्ष रुपये दर वर्षाला अंगाच्या साबण पासुन येवू शकते तर त्याचप्रमाणे कपडयाच्या साबणावर २% प्रमाणे १३ लक्ष २० हजार रुपये येऊ शकतात. परंतु आजची जी वसुली दाखविली गेली ती कमी प्रमाणात दाखविण्यात येते. त्यासाठी शहरात येणाऱ्या प्रत्येक मालाची संख्या व त्यानुसार आकारणी करण्यात आलेली रक्कम याची स्वतंत्र नोंद अजावी त्यामुळे शहारात किती माल येतो. वसुली किती होते हे समजुन येईल. शहरात बांधकामे मोठया प्रमाणात चालु असून लोखंड सिमेंटची आवक सुध्दा जास्त असतांना कमी दाखविण्यात येते.साबणावर येणारा जकात हे माहितीसाठी उदाहरण दिले परंतु अशा प्रत्येक वस्तुची नोंद ठेवल्यास या महानगरपालिकेस महिन्याला १ ते १ १/२ कोटी रुपये जास्त मिळु शकतील. हीच परिस्थिती दारुच्या बाबतीत आहे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** लासुर स्टेशन येथे साबण येतो. त्यानंतर लहान-लहान गाडया (मारोती व्हॅन) मध्ये २०-२० बॉक्स करुन साबण शहरात आणला जातो. या बाबतीत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

**श्री.इलियास किरमाणी :** वसुलीच्या बाबतीत चर्चा करुन फायदा नाही. जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

**मा.आयुक्त :** सर्वसाधारण सभेत बजेट मंजूर करतांना खाजगी करणाबाबत तसा ठराव ठेवता येईल. स्थायी समितीने आता त्यास मंजूरी द्यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** खाजगीकरणाची प्रक्रिया मागच्या वेळेस पूर्ण होत होती. टेंडर काढले संबंधीत व्यक्तिने ५८ कोटीचे टेंडर भरले होते. पुन्हा ही कार्यवाही झालेली नाही. आजची जकात वसुली बघितली असता उद्दिष्ट ५० कोटी पर्यंतच जाईल याचाच अर्थ चालु आर्थिक वर्षात महानगरपालिकेस ७.५० कोटीचा तोटा जकात माध्यमातून सहन करावा लागत आहे. यास कोण जबाबदार त्यासाठी पुन्हा ठराव घेऊन मा.आयुक्तांनी जकातीचे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरु करावी.

**श्री.जयवंत ओक :** खाजगीकरण जनतेचे हाल होऊ नये याची काळजी घ्यावी.

**डॉ.आशा बिनवडे :** यावर्षी ६१ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. गेल्या वर्षी सुध्दा जे उद्दिष्ट ठेवले ते पुर्ण होत नाही म्हणून सुधारीत अर्थसंकल्प तयार करण्यात आला. ६१ कोटीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासन काय उपाय योजना करणार आहे. पुन्हा सुधारीत अंदाजपत्रक येण्याची वेळ येऊ नये.

**मा.आयुक्त :** बजेटला मान्यता देण्याबाबत सभागृहाला निर्णय घ्यावा लागतो. प्रशासन विचार करेल. त्याला अर्थ नाही. हे सभागृहाला ठरवायचे आहे. प्रशासन फक्त अंदाज देईल. सभागृहाला वाटत असेल ५० कोटी ठेवायचे किंवा ६५ कोटी ठेवायचे तसा निर्णय घेऊ शकते. हे अंदाजपत्रक ठेवले आहे. चालु

परिस्थितीनुसार किती वसुली होते हे सांगता येणार नाही. प्रत्येक अंदाजपत्रकात सुधारीत येते. केंद्र शासनापासुन तर ग्रामपंचायत पर्यंत सुधारीत अंदाजपत्रक सादर केले जातात.

**मा.सभापती :** जकात विषयावर चर्चा होत असतांना जकात खाजगीकरणाचा मुद्दा उपस्थित झाला.मा.आयुक्तांनी आताच खुलासा केला की, स्थायी समितीने तसा ठराव करुन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करावी. ज्यावेळेस बजेट बुक सादर झाले. त्यावेळेसच खाजगीकरण करणे प्रशासनाला योग्य वाटले असते तर तसा प्रस्ताव प्रशासनाने बजेट बुकमध्ये सादर केला असता वेळोवेळी मा.आयुक्त यांचे समवेत ज्या ज्यावेळी चर्चा झाली. त्यावेळी प्रशासनातर्फे सांगण्यात येत असे की, ठराव घेण्याची गरज नाही. अगोदरच्या ठरावानुसार प्रशासन अंमलबजावणी करण्यास सक्षम आहे आणि त्यामुळे प्रशासनाने बजेट बुकमध्ये तसे नमुद केलेले दिसत नाही. अगोदरच्या ठरावानुसार खाजगीकरणाचा प्रशासनाने निर्णय घ्यावा व मा.आयुक्त त्यासाठी सक्षम आहे.६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवले ते पुर्ण करण्याबाबत व कमी जास्त करण्याबाबत हे सभागृह सक्षम आहे असे आताच आयुक्तांनी खुलासा दिला.आताच स.सदस्य श्री.सिध्द यांनी वस्तुवाईज किती जकात वसुली होते याची माहिती ठेवण्याबाबत प्रश्न उपस्थित केला त्यासाठी अडचण येत असेल तर जकातीचे संपूर्णतः संगणकीकरण होणे गरजेचे आहे, त्यामुळे दर महिन्यात प्रत्येक वस्तुवर किती जकात वसुल झाली हे समजुन येईल. त्यासाठी चालु वर्षापासुन जकातीचे संगणकीकरण करण्याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** प्रत्येक वर्षी जकातीचे उद्दिष्ट पूर्ण होत नाही, संप होतात, भुकंप होतात, मंदी येते. प्रत्येक वेळेस प्रशासन वेगवेगळी कारणे दाखवतात. खाजगी करणाचे टेंडर झालेले होते. रु. ५८.५० कोटींचे टेंडर आलेले होते. आजची वसुली पाहता ५० कोटी रुपये येतील याचा अर्थ चालु आर्थिक वर्षात ८ कोटी रुपये कमी आलेले आहे. महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे.खाजगीकरणाचा निर्णय घ्यावा तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत पाठवावा. खाजगी करणास व्यापारी विरोध करणार आहे. त्यांच्या फायदयासाठी खाजगीकरणास ते विरोध करतात.

**श्री.भरत लकडे :** जकातीचे टारगेट पुर्ण होत नसेल तर खाजगीकरण करणे योग्य होईल. महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल खाजगीकरण वसुल झाले नाही तर पुन्हा महानगरपालिके मार्फत वसुली करावी.

**श्री.जयवंत ओक :** खाजगीकरण न केल्यास महानगरपालिका काय यंत्रणा राबविणार असुन खाजगीकरणामुळे सर्व सामान्य नागरिकांना त्रास होता कामा नये तरच खाजगीकरण व्हावे. आजच्या तारखेपर्यंत किती वसुली झाली आणखी किती वसुली होण्याची अपेक्षा आहे. खुलासा द्यावा.

**मा.सभापती :** खाजगीकरण झाले नाही तर ६१ कोटीचे टारगेट पुर्ण करण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार तसेच आजच्या तारखेपर्यंत जकात वसुली किती झाली खुलासा द्यावा.

**श्री.मधुकर सावंत, डॉ.आशा बिनवडे :** अधिकाऱ्यांना माईकमध्ये खुलासा करण्यासाठी कायमची व्यवस्था व्हावी. याबाबतीत प्रत्येक वेळेस सभागृहात चर्चा करावी लागते. हे प्रशासनाचे धोरण बरोबर नाही.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर अधिकाऱ्यांना खुलासा करण्यासाठी माईकची कायम स्वरुपी व्यवस्था करावी. याबाबत संबंधित अधिकारी यांना सुचना देण्यात येत आहे. जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**प्र.जकात अधिक्षक :** प्रशासनातर्फे ५२-५० कोटीचे उद्दिष्ट जकातीचे देण्यात आलेले होते.दिनांक १०-३-२००२ पर्यंत ४६.६२ कोटी रुपये वसुल झालेले असून २१ दिवस बाकी आहे. ५.८८ कोटी उद्दिष्ट पुर्तीसाठी वसुली करायची आहे.त्यासाठी प्रत्येक दिवशी २८ लक्ष वसुली होणे गरजेचे असून सध्या प्रत्येक दिवशी सरासरी १५.२५ लक्ष वसुली होत आहे. कंपनी तपासणी करुन शहरातील व्यापाऱ्यांच्या दुकानाची तपासणी करुन ४० लोकांना नोटीसेस दिलेल्या आहे.त्यानुसार महानगरपालिकेस चांगल्याप्रकारे वसुली होऊ शकेल. जे टारगेट दिले ते पुर्ण करण्याचा प्रयत्न चालु आहे. १५ ऑगस्ट २००१ पर्यंत जकात चुकविणाऱ्या कडून दंडापोटी २७.४४ लक्ष रु. वसुल करण्यात आलेले असून गेल्या फेब्रुवारी महिन्यात ३.४२ कोटी वसुल झाले होते. चालु वर्षातील फेब्रुवारी महिन्यात ४ कोटी ८९ हजार रुपये वसुल झाले तर महानगरपालिकेच्या तुलनेत फेब्रुवारी महिन्यात १७% ने वाढ झालेली असून इतर महानगरपालिकेत आर्थिक मंदी व जागतिक मंदी मुळे ८ ते १० % वसुली कमी झालेली आहे.

**मा.आयुक्त :** जकात वसुलींच्या बाबतीत माझ्या मते संबंधित अधिकारी चांगले काम करीत आहे.महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेची परिस्थिती पाहता फेब्रुवारीमध्ये १७% वसुली जास्त झालेली आहे. इतर महानगरपालिकेत प्रमाणकानुसार कमी प्रमाणात वसुली झालेली आहे. फेब्रुवारी २००१ व फेब्रुवारी २००२ या दोन्ही महिन्यात वसुली झालेल्याची इतर महानगरपालिकेची माहिती आपल्याकडे आलेली आहे. सर्वात जास्त वसुली या महिन्यात या महानगरपालिकेची झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेचे उत्पन्न सुध्दा कमी झाले आणि यावर्षी जवळपास ३०० केसेस जकात चोरीच्या पकडण्यात आलेल्या आहे.आजपर्यंत नव्हते. एकवेळेस खाजगीकरण करुन कार्यवाही करण्यास हरकत नसावी असे माझे स्वत:चे मत आहे. मा.महापौर साहेबांचे स्टेटमेंट वृत्तपत्रात आलेले आहे. खाजगीकरणाचा निर्णय अद्यापर्यंत महानगरपालिकेने घेतलेला नाही. खाजगीकरण करायचे किंवा काय? याबाबतचा निर्णय सभागृहाला घ्यावा लागणार आहे. त्यानंतरच प्रशासन कार्यवाही करेल नसता ज्याप्रमाणे वसुलीचे काम चालु आहे, त्याप्रमाणे चालेल. कामाचा व्याप लक्षात घेऊन एक सहाय्यक अधिक्षक तसेच इतर कर्मचारी वर्ग देता येईल इतपत प्रशासन कार्यवाही करु शकेल.

**श्री.इलियास किरमाणी :** खाजगीकरणाबाबत रुलींग द्यावे. काही अडचण येणार नाही.

**मा.सभापती :** जकात विषयावर सविस्तर चर्चा झाली. मागील वर्षी जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजूर केलेला होता त्यानुसार मागील वर्षी खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु केली होती. ५८.५० कोटीची निविदासुध्दा भरुन आली होती. मागील वर्षी निविदा भरुन आले याचा अर्थ तेवढी वसुली जकातीत होणार होती त्याचा १०% प्रमाणे वाढीबाबत विचार केल्यास ६४ कोटीचे उद्दिष्ट प्रशासनामार्फत यावयास पाहिजे होते. परंतु ते फक्त ६१ कोटीच का ठेवण्यात आले असा प्रश्न येतो. ६१ कोटी ऐवजी ६२ कोटी उद्दिष्ट जकातीचे

करण्यात येते. खाजगीकरणाबाबत प्रशासनाने मागील ठरावानुसार कार्यवाही करावी.

**श्री.कावडे साहेबराव,श्री.भरत लकडे :** खाजगीकरण करायचे असेल तर सर्वच सदस्यांना तशी भुमिका घ्यावी लागेल तसा ठराव मंजुर करुन सर्वसाधारण सभेकडे पाठवावा. खाजगीकरणाचा निर्णय घ्यावा तसे रुलींग देण्यात यावे.

**मा.सभापती :** यापुर्वी ठराव पास केलेला आहे, त्यानुसार अंमलबजावणी करायची किंवा काय याबाबत मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :** स्थायी समितीला निर्णय घ्यावा लागेल व त्यानंतर सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती :** अर्थसंकल्प ठेवला त्यात जकातीचे खाजगीकरण करण्याबाबत शिफारस करावयास पाहिजे होती.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** खाजगीकरणाचा मुद्दा मा.मुख्यमंत्र्यापर्यंत गेलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा फायदा होत असेल तर खाजगीकरण करण्यास हरकत नसावी असे स्वतः मा.मुख्यमंत्र्याचे स्टेटमेंट आहे.

**मा.सभापती :** खाजगीकरण करण्याबाबत या अगोदर ठराव पास केलेला, त्यानुसार प्रशासनाने निर्णय घ्यावा. त्यावर निर्णय घेण्यासंदर्भात आज मला गरज वाटत नाही.

(याचवेळी मा.आयुक्त सभागृहा बाहेर जातात.)

**श्री.इलियास किरमाणी :** सभापती खाजगीकरण करण्यावर निर्णय घेत नाही याचा व्यापारी महासंघाच्या लोकांशी आपले संगनमत झालेले आहे. त्याबद्दल मी निषेध करतो. (याच वेळी स.सदस्य सभागृहाबाहेर जातात.)

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी अर्थसंकल्पात खाजगीकरण करण्याबाबत कुठेही शिफारस केलेली नाही या अगोदर खाजगीकरण करण्याचा ठराव पास केलेला तसेच मालमत्ता कर वसुली स्टेटमेंट दिलेले आहे की, गेल्या वेळेस जकातीचे खाजगीकरण झाले असते तर २०० कर्मचारी मालमत्ता वसुलीसाठी उपलब्ध झाले असते.याचा अर्थ मा.आयुक्त यांना सर्व जाणीव असतांना त्यांनी जाणून बुजून खाजगीकरण करण्याबाबत नमुद केले नाही व महानगरपालिकेचे हित जोपासण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही. काल मा.महापौर यांचे समवेत जी बैठक घेण्यात आली त्यावेळी आयुक्तांनी असे सांगितले की, आता ठराव घेण्याची आवश्यकता नाही. टेंडर काढण्याबाबत कार्यवाही चालू करण्यात येईल.टेंडर काढता येते किंवा काय याबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** एका वेळेस सर्वसाधारण सभेने जकात खाजगीकरण करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तो ठराव रद्द होईपर्यंत अस्तित्वात आहे असे म्हणता येईल. त्यानुसार प्रक्रिया चालु करता येईल परंतु खाजगीकरण केव्हापासून करायचे त्याचा कालावधी निश्चित करावा लागेल. आता सध्या मार्च महिना चालु असून या प्रोसेससाठी २ ते ३ महिन्याचा कालावधी लागेल. टारगेट रिवाईज करावे लागणार असून शासनाचे काही नॉर्मस आहेत. खाजगीकरण करतांना मागील ३ वर्षातील ज्या वर्षात जास्त उत्पन्न झाले त्यावर २०% वाढ करुन तसेच जकात विभागातील खर्चाचा तपशील घेऊन होणाऱ्या खर्चावर ५०% खर्च गृहीत धरुन टारगेट निश्चित करावे लागते. या बाबीवर निर्णय घ्यावा लागणार आहे. सर्व साधारण सभेने नुसते

धोरण ठरवून दिले आहे. कालावधी निश्चित केलेला नाही.आर्थिक बाबीमध्ये स्थायी समिती सक्षम असल्याने या सभागृहाने यावर निर्णय घेतल्यास तात्काळ अंमलबजावणी करता येईल. कालावधी तसेच टारगेट निश्चित करण्यासाठी स्थायी समितीची सम्मती आवश्यक आहे.

**मा.सभापती :** जकातीचे ६२ कोटीचे टारगेट निश्चित करण्यात येत आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** मागील बजेट ५२.५० कोटीचे सुधारीत सादर केलेले आहे. शासन नॉर्मसनुसार १०% वाढ धरल्यास जे टारगेट निश्चित करायचे ते ५७ ते ५८ कोटीच होतात.तरी सुध्दा प्रशासनातर्फे वाढीव टारगेट निश्चित करण्यात आले.त्यात बदल करुन आणखी वाढीव केल्यास विकास कामावर परिणाम होईल. त्याकरीता यापेक्षा जास्त टारगेट निश्चित करु नये.

**मा.सभापती :** ६१ कोटी ऐवजी ६२ कोटी जकातीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. १ कोटीची फक्त वाढ केली आता मालमत्ता करासंबंधी चर्चा करावी.

**<u>२) मालमत्ता कर वसुली :</u>**

**श्री.नंदकुमार फुलारी :** मालमत्ता कर वसुलीचे सुध्दा खाजगीकरण करण्यात यावे अशी माझी सुचना आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** शहरात एकूण मालमत्ता किती? किती मालमत्तांना कर लावण्यात येत नाही.किती मालमत्ता कर भरण्याच्या संदर्भात वाद चालु आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी-१ :** शहरात एकूण ३१-१२-२००१ पर्यंत १,१६,४०० इतक्या मालमत्ता आहेत.यावर्षी जे की १-४-२००१ ते ३-३-२००२ पर्यंत १०,३६५ मालमत्ता वाढलेल्या आहेत. एकूण १,२६,७६२ इतक्या होतात.

**श्री.भरत लकडे :** काही लोक मालमत्ता कर लावण्यासाठी येतात. परंतु कर लावल्या जात नाही. तसेच कमी जास्त कर लागल्याने लोक कर भरण्यास तयार होत नाही.

**मा.सभापती :** दर चार वर्षानी सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. आतापर्यंत किती वेळा सर्वेक्षण करण्यात आले?

**करमुल्य निर्धारण अधिकारी-१ :** दर चार वर्षानी सर्वेक्षण करावे लागते, १९७९ पासुन सर्वेक्षण केलेले नाही.

**श्री.मीर हिदायत अली :** मागील एका बैठकीत मालमत्ता कराच्या संदर्भात सविस्तर चर्चा होऊन दर मंगळवारी न्यायालय भरवुन वादग्रस्त केसेस निकाली काढण्यात यावेत असे रुलींग दिले होते. आतापर्यत किती केसेस निकाली काढल्या याबाबत खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** सन १९८९ ला मालमत्तेचे रिव्हिजन केले. त्यानंतर केलेले नाही दर चार वर्षानी करावयास पाहिजे असे बंधनकारक असतांना झालेले नाही. यास कोण जबाबदार असा प्रश्न येतो. यात मनपाचे दरवर्षी २५ ते ५० लक्ष रुपयांचे नुकसान झालेले आहे.

**उपआयुक्त (म) :** नियमानुसार दर चार वर्षाला मालमत्तेचे रिव्हीजन व्हावयास पाहीजे ते झालेले नसून मागील वर्षी जे दर होते ते पुर्वीपेक्षा दुप्पट करुन दिलेले आहे.मुळ रिव्हीजन हे वेळोवेळी व्हावयास पाहिजे होते ते झालेले नाही.

**श्री.मधुकर सावंत :** १३ वर्षापासून मालमत्ता कराचे रिव्हीजन केलेले नाही यास जबाबदार असणारे अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी. मनपाचे यात नुकसान झालेले आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** ऑडीट रिपोर्टमध्ये का तशी दुरुस्ती करण्याचे सुचविण्यात आलेले नाही.

**उपआयुक्त (म) :** मागे जावून असेसमेंट करुन कार्यवाही करणे बरोबर होणार नाही. ठराव पास झाल्यानंतर त्यापुढे कार्यवाही होऊ शकेल. दर चार वर्षानी रिव्हीजन व्हावयास पाहिजे होते. ज्या ज्या वेळी जे जे कर मुल्य निर्धारण अधिकारी होते ते त्यास जबाबदार होऊ शकतात.

**मुख्यलेखाधिकारी :** रिव्हीजन केले नाही ही प्रशासनाकडील बाब आहे. कायद्यात जी तरतुद केली त्यानुसार पोस्ट ऑडीट किंवा प्री ऑडीट याचा प्रश्न येत नाही. कायद्यात ज्या तरतुदी आहेत. त्या अशा करधान नियम २१ नुसार प्रत्येक सरकारी वर्षात नविन कर आकरणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता असणार नाही. (१) प्रत्येक सरकारी वर्षात नविन कर आकरणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता नाही. पोटकलम २ च्या अधिन राहुन आयुक्तांस निकट पुर्वीच्या वर्षाच्या पुस्तकातील नोंदी या त्यात त्यास योग्य वाटतील असे फेरफार करुन प्रत्येक नविन वर्षाच्या नोंदी म्हणून स्विकारता येतील. याचा अर्थ मागील वर्षाच्या ज्या नोंदी आहेत त्यात फेरबदल करुन स्विकारता येवु शकतात. परंतु नियम १३ आणि १५ नुसार जाहीर नोटीस देण्यात आली पाहिजे,उक्त नियमाच्या १६ ते २० दोन्ही धरुन याच्या तरतुदी प्रत्येक वर्षी लागू होतील, (२) दर चार वर्षातून निदान एकदा तरी कर आकारणीचे पुस्तक तयार केले पाहिजे.नियम १३ मध्ये मुल्य निर्धारण संबंधी तक्रारी सादर करण्यासाठी वेळ जाहीर करणे असे दिले आहे. या दोन्ही प्रोसेस पूर्ण करुन कर आकारणी पुस्तक तयार करावे लागते ही संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे. यात पोस्ट ऑडीट किंवा प्री ऑडीटचा प्रश्न येत नाही.

**डॉ.आशा बिनवडे :** सन २००२ -०३ चा अर्थसंकल्प सादर झाला. शहरातील १० लक्ष लोकसंख्येचे प्रतिनिधित्व हे सभागृह करीत आहे.परंतु जनतेला ज्या सुविधा द्यावयास पाहिजे त्या दिल्या जात नाही. हे योग्य नाही.मनपाची आर्थिक परिस्थिती खराब आहे. कर्जाचा बोजा आहे.म्हणून कामे करण्यास अडचण येते. हा भाग वेगळा होतो परंतु जनतेने ज्या विश्वासाने लोकप्रतिनिधिंना निवडून दिले व खऱ्या अर्थाने सेवा करायची असेल तर जनतेच्या विश्वासाला तडा जाता कामा नये याची सुध्दा तितकीच काळजी घेणे आवश्यक आहे. ती सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. जमा बाजुवर चर्चा होते जो निर्णय चर्चा होऊन घेतला जातो. त्याची अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त प्रमाणात महानगरपाजिकेची आर्थिक बाजु बळकट करण्याचा प्रयत्न प्रशासनाचा असावा.महानगरपालिकेत जकात, मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुली ही तीन माध्यमातून महानगरपालिकेस जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होते. सन ९९-२००० मध्ये मालमत्ता कराचे १५ कोटीचे उद्दिष्ट होते.प्रत्यक्षात ७.६० कोटीत वसुल झाले. सन २०००-२००१ चे सुध्दा मालमत्ता कराचे उद्दिष्ट १५ कोटीच ठेवलेले होते.सिडको व इतर थकबाकीसह १८.६३ कोटी होते. सन २००१-२००२ मध्ये सुध्दा २४ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.परंतु जकात विभागातील कर्मचारी खाजगीकरण न झाल्यामुळे उपलब्ध होऊ शकले नाही म्हणून सुधारीत उद्दिष्ट ११ कोटीचे निश्चित करण्यात आले. सिडकोचे हस्तांतरण झाले नाही व कर्मचारी वर्ग मिळाला नाही म्हणून २४ कोटीचे उद्दिष्ट ११ कोटीवर आणले याचा अर्थ ५०% सुध्दा वसुली नाही. सन २००१-२००२ मध्ये वसुलीचे प्रमाण वाढलेले

नाही. शहरात दरवर्षी मालमत्ता वाढत असतांना सतत तीन वर्षापासून मालमत्ता कराचे उद्दिष्ट १५ कोटीचे निश्चित करणे कितपत योग्य आहे. जकातीचे उद्दिष्ट कमी जास्त होवू शकते. माल शहरात येईल किंवा कमी प्रमाणात येऊ शकेल त्यामुळे जकात कमी येऊ शकते. परंतु मालमत्ता मध्ये काही बदल होत नाही.उलट करात वाढ होत असतांना उद्दिष्ट कमी का ठेवण्यात आले. सतत मालमत्तेत वाढ होत असतांना दरवर्षी सारख्याच प्रमाणात उद्दिष्ट का ठेवण्यात येत आहे. याचा खुलासा द्यावा. सन २००१-२००२ पर्यंतच्या मागणीचा विचार केल्यास पान क्र.४ वर दर्शविल्याप्रमाणेच झोन वाईज वसुली पाहिली असता कुठे जास्त वसुली झालेली दिसुन येत नाही. उद्दिष्ट का कमी झाले, मालमत्ता वाढत असतांना ४ वर्षापासून उद्दिष्ट तेव्हढेच ठेवण्यात येते. उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न नाही हे दिसुन येते.कोणत्याही नविन मालमत्तेचे रेकॉर्ड दिसत नाही. १९८९ पासून रिव्हीजन झालेले नाही. यात महानगरपालिकेचे खुद्द प्रशासनानेच नुकसान केले.शहरात किती मालमत्ता आहे याची माहिती सीटीसर्व्हे ऑफीसमध्ये व नोंदणी कार्यालयात मिळु शकते सेवाभावी संस्थेकडून शहरात किती मालमत्ता आहेत याचा सर्व्हे करुन घेता येईल. न्यायालयात जी प्रकरणे चालु आहे.त्या मालमत्तेचा कर वसुल झालेला नाही. तो वसुल करावयास पाहिजे. न्यायालयाचा निर्णय येईल त्यांचेकडून अंडर प्रोटेस्ट टॅक्स घ्यावा. बऱ्याच नविन मालमत्ता झाल्या त्यांना प्रॉपर्टी टॅक्स लागलेला नाही. तो आज आकारु शकतो.नियमाने कार्यवाही करण्याचे सोडून उद्दिष्ट कमी करणे योग्य नाही.संबंधीत झोन अधिकारी,उपआयुक्त तसेच संबंधीत कर्मचारी यांना वसुलीचे टारगेट ठरवुन दिले पाहिजे. जर त्या अधिकारी / कर्मचारी आपआपली जबाबदारी पार पाडली नाही तर कठोर कार्यवाही करण्याचा निर्णय या सभागृहाने आज घ्यावा तरच जास्तीत जास्त वसुली होण्यास मदत होईल.

**श्री.भरत लकडे :** प्रत्येक वर्षी कराच्या पावत्या दिल्या गेल्या पाहीजे. दोन-तीन वर्षाला डिमांड नोटीस जाते. मालमत्ता धारकांना मागणीपत्र मिळत नाही. एकत्र मागणीपत्र दिल्यास कुणीही कर भरत नाही.

**मा.सभापती :** झोन वाईज कर धारकांना डिमांड दिली जाते, सध्या दिल्या जातात का याचा खुलासा द्यावा.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** आजची बैठक महत्वाची आहे, जो निर्णय होईल त्यावर अंमलबजावणे करण्यासाठी मा.आयुक्त सभेस नाही. मा.आयुक्तांना बैठकीस बोलवावे.

**मा.सभापती :** चर्चा करावी जो निर्णय सभागृहाल घेता येईल तो घेऊ त्याप्रमाणे मा.आयुक्त कार्यवाही करतील.

**श्री.जयवंत ओक :** मालमत्ता कर वसुलीसाठी काय उपाययोजना कराव्या या बाबतीत स.सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले आहे. मागील एका बैठकीत चर्चा झाली होती, त्यानुसार संगणकीकरण करण्याचा निर्णय आपण घेतला होता शहरात ५२ झोपडपट्टया,स्लम,११४ अनधिकृत तसेच अधिकृत मालमत्ता व त्यानंतर महानगरपालिकेच्या मालकीच्या अशा किती मालमत्ता आहे. चर्चा झाल्यानुसार उपाययोजना होत असेल तर किती मालमत्ता कर येणार आहे. आताच खुलासा केल्याप्रमाणे १.१६लक्ष मालमत्ता आहे.यात बरीच काही वाढ

होवू शकेल. ५२ झोपडप्ट्टी, स्लमचा ज्याप्रमाणे प्रकल्प विभागामार्फत सर्व्हे केला त्याप्रमाणे इतर विभागाने अधिकारी नियुक्त करुन ११४ अनधिकृत वस्त्या अधिकृत मालमत्ता तसेच महानगरपालिकेच्या मालमत्तेचा सर्व्हे करुन त्याचे संगणकीकरण व्हावे.तसेच कर वसुली होण्यासाठी उपआयुक्त दर्जाचे अधिकारी नियुक्त करावे असे आपण मागील एका बैठकीत रुलींग दिले. जे अधिकारी पदोन्नतीस असतील त्यांची नियुक्ती करावी.जकातीचे खाजगीकरण करण्याचा प्रश्न उपस्थित झाला. त्याप्रमाणे मालमत्ता कराचे खाजगीकरण करावे. केल्यास अडचण येणार नाही. सर्व मालमत्तेचा अगोदर सर्व्हे व्हावा. त्याचे संगणकीकरण करुन त्या मालमत्तेची वसुली करण्यास अडचण येणार नाही. जे कर भरणार नाही,तात्काळ निदर्शनास येईल असे माझे मत आहे.माझ्या मते १५ कोटीचे उद्दिष्ट २० कोटीवर जाऊ शकेल.त्यासाठी संगणीकीकरण करण्यात यावे व एक महिन्याच्या आत कर आकारणी विभागासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावे जे पदोन्नतीस पात्र असतील त्यांना द्यावे, नसता तात्परती ६ महिन्यासाठी जे सक्षम असतील त्यांची नियुक्ती करावी.

**श्री.नंदकुमार फुलारी :** सेवानिवृत्त झालेले परंतु निवासस्थानात राहत असलेले कर्मचाऱ्यांची माझ्याकडे यादी आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | शे.हनीफ शे.हमीद | माळी | सेवानिवृत्त | ३१-१२-९७ |
| २) | श्री.विश्वनाथ तुपे | शिपाई | सेवानिवृत्त | ३०-४-९८ |
| ३) | श्री.अब्दुलहमीद अ.गफ्फार | लाईनमन | सेवानिृत्त | ३०-६-९७ |
| ४) | श्री.भाऊराव जाधव | लिपीक | सेवानिवृत्त | ३१-५-९६ |

निधन झालेले परंतु त्यांचे वारसदार निवास स्थानात राहत असलेल्यांची नांवे.

१) श्री.हक्क २) शे.रहमान शे.शिपाई ३) गुलाबसिंग शर्मा वाहन चालक ४) श्री.तंडवी ट्रेसर तसेच अनधिकृतपणे निवासस्थानात राहत असलेले कर्मचारी १) श्री.स्वामी लाईनमन,दिल्ली गेट २) श्री.नगरकर आर.एस. ज्युबली पार्क ३) सौ.सुरडकर,बायजीपुरा ४) श्री.समदभाई वॉचमन बायजीपुरा ५) श्री.मोरे कल्याण,बायजीपुरा,श्री.पांडुरंगम्हस्के,कांचनवाडी,श्री.पगारे अशोक,कांचनवाडी,श्री.मिसाळ,श्री.छबुलाल शेटी,कांचनवाडी, रामनाथ सोनी मजुर,श्री.ठोमाने हेल्पर,कांचनवाडी,श्री.इसाफखान,श्री.तायडे,रेल्वेस्टेशन,श्री.खिल्लारे,सौ. निकम, श्री.कैलास पवार,श्री.आहरेकर,श्री.कैलास सुरक्षा रक्षक बनेवाडी,श्री.दांडगे विद्यापीठगेट इ.कर्मचारी हे निवास स्थानाचा वापर करीत आहे.या लोकांवर काय कार्यवाही करणार आहे. या निवासस्थानाच्या माध्यमातून ५ लक्ष रु. उत्पन्न येऊ शकते.

**मा.सभापती :** मागील एका बैठकीत निवासस्थानाबाबत चर्चा झालेली होती, त्यावेळी संबंधीत अधिकारी यांनी असा खुलासा केला की, निवासस्थानामध्ये कुणीही कर्मचारी अनधिकृत किंवा सेवा निवृत्त झालेले राहत नाही, याचा अर्थ चुकीची माहिती दिली. इतिवृत्तात सुध्दा तशी नोंद झालेली आहे.

**श्री.भरत लकडे :** काही कर्मचाऱ्यांकडून २-३ महिन्यापुर्वी पासुनचीच वसुली होत आहे. जेव्हा पासुन राहतात तेव्हा पासुनची वसुली व्हावयास पाहिजे.

**श्री.मधुकर सावंत :** मालमत्ता अधिकारी यांनी चुकीची माहिति सभागृहास दिली त्यांचेवर कडक योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**मा.सभापती :** मागील बैठकीत चर्चा झाली त्यावेळी एक कर्मचारी अनधिकृतपणे निवास स्थानात राहत नाही असे उत्तर मालमत्ता अधिकारी यांनी दिले होते. परंतु आताच स.सदस्यांनी अनधिकृत तसेच सेवानिवृत्त तसेच मयत झालेले असे एकूण १८ कर्मचारी आज निवासस्थानात राहतात. असे सिध्द झाले व अधिकारी यांनी सभागृहाला चुकीची माहिती दिली त्याबद्दल उपआयुक्त (म.) यांनी त्यांचेवर नियमाने कार्यवाही करावी.

**उपआयुक्त (म.):** मालमत्ता कराच्या बाबतीत स.सदस्यांनी चर्चा केलेली आहे. थोडक्यात खुलासा करु इच्छितो की, शहरात ३१ डिसेंबर २००२ अखेर १.१६ लक्ष मालमत्ता आहे.आजच्या नियमाने या मालत्तेचे दर चार वर्षात रिव्हीजन व्हावयास पाहिजे ते झालेले नाही कर वसुली होत असतांना तीन टप्प्यांनी काम करावे लागते. १) दर चार वर्षांनी रिव्हीजन करणे. २) नीवन मालमत्ता शोधून काढणे ३) ज्या मालमत्तेचा कर लागलेला आहे ती वसुल करणे ही तिन्ही कामे ३ वेगवेगळया विभागामार्फत होते. कर विभागात कर आकारणी काम केले जाते. मी रुजु झाल्यापासून कर मुल्यांकन दोन्ही विभागामध्ये प्रत्येकांना टारगेट ठरवून दिलेले आहे.त्यानुसार आठवडयात नोटीस देऊन काम टारगेट नुसार केलेले नाही म्हणून खुलासा घेतलेला होता त्याचा खुलासा सुध्दा प्राप्त झाला. तो समाधानकारक नाही म्हणून खुलासा घेतलेला होता.

त्याचा खुलासा प्राप्त झाला तो समाधानकारक नाही म्हणून पुन्हा करमुक्त निर्धारण अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यावर पुन्हा खुलासा आल्यानंतर ॲक्शन घेण्यात येईल. झोन मध्ये १-२ इमारत निरिक्षक वसुलीसाठी आहेत. त्यासाठी मनुष्य बळ वाढविण्याची आवश्यकता आहे.मध्यंतरी वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना वसुलीचे काम दिले होते.जवळपास २०० कर्मचारी आवश्यक आहे. ते जोपर्यंत येत नाही तोपर्यंत कर वसुलीच्या कामास गती येणार नाही. संगणकीकरणाने काम सुरु असल्याने झोनला बील देवू शकलो नाही. हस्तलिखित देण्यात येत होती ही वस्तुस्थिती आहे.संगणकीकरण करण्याशिवाय पर्याय नाही. मागील वेळेस पुणे व नाशिक महानगरपालिकेचे संगणकीकरणाचे काम केलेले लोक आलेले होते.त्यांनी सर्व मालमत्ता व इतर महत्वाच्या विभागाचे संगणकीकरण करुन देण्याचे आश्वासन दिले तसा ठराव सुध्दा मागच्या वेळेस मंजुर केलेला आहे.तो प्रस्ताव आता कार्यवाहीस्तव असुन टेंडर वगैरे काढुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. बील दिल्यानंतर बरेच लोक कर भरतात परंतु बऱ्याच लोकांना बिले मिळाली नाही.ही बाब सत्य असेल मागे सुध्दा विरोधी पक्षनेते यांनी तक्रार केल्यानुसार डीसपुट,वादग्रस्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यवाही करण्यात आली. सुरुवातीस कर लागल्यानंतर १५ दिवसाच्या आत ज्या ही लोकांच्या तक्रारी आल्या त्यावर हेरींग घ्यावी लागते.

परंतु पुढील वर्षापासुन अशा केसेसच्या बाबतीत आपण दर मंगळवारी लोक अदालत भरवण्यात येणार आहे त्या संबंधीची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे. यात दोन तीन निर्णय होत आहे. १) मालमत्ता कराचे संगणकीकरण करणे, २) घरांना नंबर देणे, ३) दर मंगळवारी कर अदालत भरविणे.कोठे भरवायचे हा प्रश्न होता या अगोदर संबंधित अधिकारी यांना झ ाोन वाईज वार ठरवुन कर अदालत भरविण्यात आले, चांगला प्रतिसाद मिळाला.यात येणाऱ्या प्रकरण हे त्यादिवशीच निकाली न लागल्यास त्यापुढील आठवडयात घेता येतील. अशा प्रकारचा एक प्रस्ताव तयार केलेला आहे. झोन अधिकारी यांना मा.आयुक्तांनी टारगेट निश्चित करुन दिलेले आहे. त्यानुसार आता यावर्षी वसुलीचे कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.मधुकर सावंत :** ज्या झोनची वसुली कमी झाली त्या अधिकाऱ्यावर काय कार्यवाही केली का? खुलासा देण्यात यावा व या वर्षाचे उद्दिष्ट पूर्ण करणार आहे का?

**उपआयुक्त (महसुल):** मागील आठवडयात झोन क्र.१ व ३ चे झोन अधिकारी यांना नोटीस दिलेल्या आहे. पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच निवास स्थानाबाबत प्रश्न उपस्थित झाला. अनधिकृतपणे कोणते कर्मचारी राहतात त्याची यादी घेतलेली आहे. तसेच माहिती सुध्दा घेतलेली आहे. कमिटीपुढे हा प्रश्न ठेवला जाईल. निवासस्थान हे वर्ग-१,२,३,४ असे वेगवेगळे आहेत. १ एप्रिल २००१ पासुन शासनाने निवास स्थानाचे दर ठरवून दिलेले आहे. त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल. तसेच जे कर्मचारी ज्या तारखेपासून राहतात तेव्हापासून वसुल केले जाईल.जे सेवानिवृत्त झाले त्याचे वारसांना प्रतिक्षा यादी नुसार निवासस्थान देण्यात येईल. वेटींग लिस्ट तयार केलेली असून काही कर्मचाऱ्यांनी अनधिकृतपणे निवास स्थान घेऊन राहतात. काहींनी भाडेकरु ठेवले. असे सुध्दा निदर्शनास आलेले आहे. २० ते २२ लोक अनधिकृतपणे राहतात अशा कर्मचाऱ्याकडून बी.ॲण्ड जी चा जो दर आहे, आहे त्याप्रमाणे निवासस्थानाचा भाडेदर लावुन भाडे वसुल केले जाईल. या संदर्भात आता २१ तारखेला बैठक आयोजित केलेली आहे. त्यामध्ये हा निर्णय घेतला जाईल व पगारातून वसुल केले जाईल.

**श्री.नंदकुमार फुलारी :** एक कर्मचारी निवासस्थानात राहतात. निवास स्थानाच्या बाजुला पत्र्याचे शेड टाकुन दुसऱ्या व्यक्तिला भाडयाने दिले अशा कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही झाली पाहिजे.

**उपआयुक्त (महसुल):** या संदर्भात चौकशी करण्यासाठी इतर कर्मचारी यांना सुचना दिल्या असुन लवकरच माहिती मिळेल. पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल. ज्या तारखेपासून राहतात तेव्हा पासुनचे भाडे वसुल करण्यात येईल.

**श्री.मधुकर सावंत :** मालमत्ता अधिकारी यांनी सभागृहाची दिशाभुल केली. चुकीची माहिती दिली कार्यवाही करण्याचे आदेश करावेत. अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभुल केली.

**मा.सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी एकही कर्मचारी अनधिकृतपणे राहत नाही असे सांगितले होते. योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**उपआयुक्त (महसुल):** कर्मचाऱ्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला असला तरी कर्मचारी /अधिकारी यांचेवर नियमानुसार ॲक्शन घेण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे व सभापती हे यासाठी

सक्षम आहे.त्यांनी आदेशित करावे त्यानुसार मालमत्ता अधिकारी यांचेवर कार्यवाही होईल. तसेच कर वसुलीसाठी स्वतंत्र उपजिल्हाधिकारी आदेशित करावे त्यानुसार मालमत्ता अधिकारी यांचेवर कार्यवाही होईल. तसेच कर वसुलीसाठी स्वतंत्र उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची शासनाकडून मागणी केलेली आहे. अधिकारी येईपर्यंत तात्पुरती जे वर्ग-१ चे सक्षम अधिकारी आहे त्यांना तात्पुरता प्र.चार्ज देण्यात येईल.

**डॉ.आशा बिनवडे :** कर आकारणीचे काम मुख्य कार्यालयात होते. तर वसुलीचे काम झोन अधिकाऱ्यामार्फत होते. त्यासाठी कर आकारणीचे कर्मचारी झोनला देऊन नागरीकांना एकाच ठिकाणी सुविधा देता येईल या दृष्टीने कार्यवाही करावी.

**उपआयुक्त (महसुल):** कर मुल्य अधिकारी तसेच झोन अधिकारी हे स्वतंत्र विभाग येतात यासाठी अधिकारी नियुक्त करायचे झाल्यास स्वतंत्र द्यावे लागतील. झोन अधिकारी यांना वसुलीची जबाबदारी आहेच त्यातुन त्यांना मुक्त करता येणार नाही. मुंबई ॲक्ट, नागपुर ॲक्ट तसेच या महानगरपालिकेचा ॲक्ट वेगवेगळे आहे. परंतु याबाबतीत तिन्ही ॲक्ट कॉमन आहे. झोन आफिसर आणि मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत वार्ड ऑफिसर यांचेवर सर्व वसुलीची जबाबदारी आहे. नियमानुसार त्यात बदल करता येणार नाही.

**श्री.जगदीश सिध्द :** दिनांक १-४-२००१ ते ३१-३-२००२ पर्यंत १०,३०५ मालमत्ता तयार झाल्या व नंतर कर आकरणी सुरु केली का? बांधकाम परवानगी ५३९ लोकांनी घेतलेली आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी-१ :** असेसमेंट करायचे बाकी आहे. ही आकडेवारी फक्त १-४-२००१ ते ३-३-२००२ पर्यंतची दिली.

**श्री.जगदीश सिध्द :** २००१ मध्ये ५३९ लोकांनी परवानगी घेतलेली असून एकूण १२४३२ कर आकारणी झालेली आहे. सन ९५-२००१ पर्यंत ३७२३३ मालमत्तेची नोंद झालेली असतांना ५२९४ घरानांच परवानगी दिलेली आहे. आताच्या स्थितीत चालु वर्षाचे १० हजारांचा समावेश आहे. आणखी ५० हजार ते ७५,००० हजारापर्यंत मालमत्तांना अजूनही कर आकारणी झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेतील आकडेवारी पाहिली असता १.०५ लक्ष मालमत्ता असुन ७० कोटी उद्दिष्ट ठेवण्यात येते. या शहरात १.२६ लक्ष मालमत्ता असतांना १३ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात येते. ही विसंगती आहे.

**श्री.साहेबराव कावडे :** शहरातील गुलमंडी ठिकाणच्या दुकानाला मालमत्ता कर आकारणी झालेली नाही.

**मा.सभापती :** १.२६ लक्ष मालमत्तेची नोंद झालेली असतांना फक्त ३७ हजार मालमत्तेलाच कर आकारणी करण्यात आली. कमीत कमी १ लक्ष मालमत्तेचा कर लावलेला नाही. अग्निशमन विभागामार्फत नुकतेच काही दिवसांपुर्वी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा उपक्रम राबविला जात आहे, त्यामुळे ज्या मालमत्तेचा ना हरकत प्रमाणपत्र देय असतांना मालमत्ता कर भरलेला आहे.किंवा नाही हे निदर्शनास आहे का? शहरात काही पेट्रोलपंप तसेच सिनेमागृह यांना टॅक्स आकारणी होत नाही अशी माहिती मिळाली. शहागंज पेट्रोलपंपास अद्याप टॅक्स लागलेला नाही.

**करमुल्य निर्धारण अधिकारी-१ :** शहागंज येथील पेट्रोलपंप मस्जीद कमेटीच्या जागेवर आहे. मस्जीद महानगरपालिकेस कर भरते. १.१६ लक्ष मालमत्तेत या मालमत्तेचा समावेश आहे.

**उपआयुक्त (महसुल):** मुंबई आणि औरंगाबाद तुलनात्मक तक्ता असा की, या महानगरपालिकेच्या अंतर्गत वाणिज्य वापरासाठीच्या मालमत्ता कमी आहे. मुंबई महानगरपालिकेत जवळपास ८०% वाणिज्य वापरासाठीच्या मालमत्ता असल्याने उद्दिष्ट जास्त असते.

**श्री.जगदीश सिध्द :** सन ९६-९७ मध्ये ६४३ मालमत्तांना परवानगी देण्यात आली. त्यापैकी फक्त ६६ लोकांनी बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले.सन ९७-९८ मध्ये ९१२ इमारतीचे परवानगी दिली. त्यापैकी २१५ इमारतधारकांनी बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले. प्रमाणपत्र घेण्यासाठी सुध्दा कुणी येत नाही. त्यासाठी सक्ती घालावी व प्रमाणपत्र दिल्यानंतर लगेच कर आकारणी झाली पाहिजे असा निर्णय घ्यावा.

**उपआयुक्त (महसुल):** प्रमाणपत्र असो किंवा नसो अनधिकृत वसाहतीतील मोकळी जागा असेल त्यावर सुध्दा कर लावता येतो. इमारतच असावी असा प्रश्न नाही. ओपन स्पेस जरी असेल तरी कर लावावा असे गृहीत आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** दरवर्षी १२ हजार मालमत्ता वाढवल्या असत्या तर १ लाख नवीन मालमत्ता अस्तित्वात असत्या.

**उपआयुक्त (महसुल):** संगणकीकरण करण्याची कार्यवाही चालु आहे या योजनेनुसार मालमत्तेत वाढ होणार आहे. त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल.

**मा.सभापती :** थकीत मागणी ३६ कोटीची असून उद्दिष्ट १५ कोटीचे चालु वर्षाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. थकबाकी सह उद्दिष्ट का ठेवण्यात आले नाही. थकबाकी वसुल होणार नाही का?

**मुख्यलेखाधिकारी :** चालू वर्षाचे उद्दिष्ट १२.८९ कोटीचे असून मागील अनुभव लक्षात घेता उद्दिष्टांच्या २५.३०% वसुली झालेली नाही. ३६ कोटी थकबाकी दाखवलेली असून त्यातील १२.८५ कोटी सिडको भागाची आहे. ती वजा केल्यास निव्वळ शहरातील थकबाकी २३ कोटी आहे. चालु डिमांड १३ कोटीचे आहे. असे एकूण ३६ कोटी होतात.

**मा.सभापती :** चालु वर्षाचे उद्दिष्ट ११ कोटीचे निश्चित केले होते. यावर्षी १५ कोटीचे निश्चित केले आहे. वसुली ११ ते १२ कोटी होणार याचा अर्थ २ ते ३ कोटीच वसुली वर्षात होणार आहे.असा प्रश्न निर्माण होतो. दुसरा प्रश्न बिलाबाबत उपस्थित झाला. ज्या मालमत्ता आहे. त्या लोकांना बिले पोहचत नाही खेदाची बाब आहे. जकात वसुलीचे उद्दिष्ट संप,भुकंप,आर्थिक मंदी व इतर नैसर्गिक कारणास्तर कमी होऊ शकते. परंतु मालमत्ता हया वाढतच असतात व त्यामुळे मालमत्तेचे उत्पन्न कमी न येता उलट जास्तच यावयास पाहिजे.कर्मचारी वर्ग कमी असेल तर त्याबाबत योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.दर ४ वर्षानंतर मालमत्तेचे नियमानुसार रिव्हीजन व्हावयास पाहिजे, परंतु त्या बाबतीत कार्यवाही केलेली नाही. जे नियमात येते त्याप्रमाणे सुध्दा मालमत्तेचे रिव्हीजनची कार्यवाही झालेली नाही. सक्षम अधिकारी असावेत का या बाबतीत पडताळणी व्हावी. जे काम करण्यास इच्छुक नसतील त्यांची बदली करावी. कर आकारणी विभागासाठी स्वतंत्र उपआयुक्त दर्जाचे अधिकारी नियुक्त होणार आहे. तशी ग्वाही मा.मुख्यमंत्री यांनी मा.महापौर यांनी दिली. आताच स.सदस्य ओक यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार वसुलीसाठी सक्षम प्र.अधिकारी किंवा पदोन्नतीद्वारे कुणास देता येत असेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी. कर्मचारी कमी असेल तर भरती करावे.

मा.आयुक्त यांनी वेळोवेळी वसुलीच्या बाबतीत बैठका घेतल्या त्यांचे जे प्रयत्न होते व ते त्यांनी केले. सर्व कार्यवाही करु सुध्दा यावर्षी २३-२४% वर वसुली गेलेली नाही. याचा अर्थ यापेक्षा जास्त वसुली करण्यास आपले अधिकारी सक्षम नाही.हे सिध्द होते.अधिकारी / कर्मचारी यांना नोटीसच न देता सक्तीने रजेवर पाठवावे. ज्या झोनची वसुली यावर्षी सर्वात कमी झाली. त्या झोनची वसुली खाजगीकरणामार्फत करावी. टेंडर काढून बील वाटपापासुन ते वसुलीपर्यंत खाजगीकरणामार्फत कार्यवाही करावी. शहरात किती मालमत्ता आहे. याचा रेकॉर्ड नाही असा प्रश्न उपस्थित झाला. दिल्लीला एक फायर नावाची संस्था आहे त्यात सर्व सेवानिवृत्त आय.ए.एस.अधिकारी आहे. मालमत्तेचा सर्व्हे करुन देण्याचे काम करते अशा भारतात भरपूर संस्था आहे. त्यासाठी प्रशासनाने टेंडर काढून मालमत्तेचे सर्व्हेचे काम करुन घ्यावे. जेणे करुन मालमत्तेपासून किती उत्पन्न प्राप्त होईल.ही बाब निदर्शनास येईल. येणाऱ्या आर्थिक बजेटमध्ये ठळक वैशिष्टयामध्ये हा मुद्दा प्रशासनाने ठेवावा. तसेच सर्व रेकॉर्ड संगणकीकरण करावे जेणे करुन रेकॉर्डमध्ये अनावश्यक फेरबदल होणार नाही व अधिकारी / कर्मचारी यांचेवर जी कार्यवाही होते ती टाळता येईल.तसेच झोन मार्फत होणारी वसुली व कर आकारणी विभाग हे दोन्हीही विभाग वेगवेगळया ठिकाणी आहे. त्यामुळे नागरीकांना येण्या-जाण्यास त्रास होतो.बरेच कर धारक कर भरल्या नंतरही झोन कडून कर आकारणी विभागात तसा रेकॉर्ड दिला जात नाही व पुन्हा जो कर आहे, तोच कर आकारणी होतो ही बाब सत्य असुन माझ्याच वार्डातील काही उदाहरण मी दिलेले आहे. त्यासाठी कर आकारणी झालेल्या पावत्या वेळेवर झोनमध्ये गेल्यास त्यानुसार वसुली वेळेवर होईल व तसा रेकॉर्ड कर आकरणी विभागास ताबडतोब देता येईल.या दृष्टीकोनातून दोन्ही विभागाच्या कामकाजामध्ये समन्वय कसा लवकर साधता येईल यासाठी प्रयत्न व्हावे व एक झोनची मालमत्ता वसुली व बिल वाटप खाजगीकरणामार्फत करण्यात यावी. तसे ठळक वैशिष्टयांमध्ये तो प्रस्ताव सादर करावा. मालमत्ता कराचे उद्दिष्ट १७ कोटी ठेवण्यात येते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** एकाच झोनचे खाजगीकरण न करता सर्वच झोनचे करावे.

**श्री. कावडे साहेबराव :** सद्यस्थितीत मालमत्तेची नोंद कमी आहे. मालमत्तेचा सर्व्हे करावा. घरांना नंबर द्यावे, संगणकीकरण करावे. त्यानंतर खाजगीकरण करण्यात यावे. जेणेकरुन उत्पन्न वाढेल व वसुली करण्यास अडचण येणार नाही.

**मा.सभापती :** सभागृहाच्या सम्मतीनेच निर्णय घेतलेला आहे. सभा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. (वेळ २.२५ वाजता सभेला सुरुवात ३.२० वाजता.)

**३)पाणीपट्टी**

**डॉ.आशा बिनवडे :** सन ९९-२००० मध्ये १० कोटींचे उद्दिष्ट त्यातील वसुली फक्त ६.०५ कोटी झाली. सन २०००-२००१ मध्ये १५ कोटीचे उद्दिष्ट त्यातील एकूण वसुली ८ (आठ) कोटी झाले. सन २००१-२००२ मध्ये २५ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात येऊन फक्त ८.८५ कोटी थकबाकीसह वसुल झाले. सन २००२-२००३ साठी १५ कोटीचे वसुलीचे उद्दिष्ट ठेवलेले असून मालमत्ता सारखेच नळ कनेक्शन हे स्थानिक असतात, त्यात बदल होऊन संख्या कमी होत नाही. उलट नळ कनेक्शन मध्ये वाढ होऊन त्याप्रमाणे उद्दिष्ट सुध्दा

वाढवावयास पाहीजे होते. त्याऐवजी सुधारीत मध्ये कमी होत गेले हे योग्य नाही अशी परिस्थिती असल्यास महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास आणखी वेळ लागेल. अस्थापनेवरील ३० कोटीचा जो खर्च आहे, तो वैधानिक खर्च  वेतन व भत्ता आहे. त्यात कमी करु शकत नाही. हा एवढा ३८ कोटीचा बोजा का म्हणून सोसावा असा प्रश्न निर्माण होतो. वेतन भत्ते नियमीत व त्या खर्चात कपात करता येत नसेल तर अधिकारी /कर्मचारी यांना वसुलीच्या बाबतीत सवलती देण्याची गरज नाही. अधिकारी /कर्मचारी यांनी वसुलीच्या बाबतीत हयगय केल्यास प्रशासन काय कार्यवाही करणार व जास्तीत जास्त वसुली होण्यासाठी प्रशासन काय उपाययोजनेची अंमलबजावणी करणार याचा सुध्दा खुलासा द्यावा.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** मालमत्ता / पाणीपट्टीची ५०% सुध्दा वसुली होत नाही यास कोण जबाबदार? वसुली कमी येत असल्याने शहरात विकासाची कोणतीच कामे करता येत नाही. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने खाजगीकरण करणे आवश्यक आहे तसा निर्णय घेण्यात यावा. महानगरपालिकेचे अधिकारी /कर्मचारी वसुली करीत नाही. वसुलीच्या उपाययोजना काय करणार त्याचा योग्य खुलासा देत नाही.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** मालमत्ता तसेच पाणीपट्टी वसुलीचे खाजगीकरण करावे जेणेकरुन वार्डात विकास कामे करता येईल. आजपर्यंत माझ्या वार्डात एकही मोठे विकास काम झालेले नाही. त्यासाठी खाजगीकरण करण्याचा निर्णय घ्यावा.

(त्याचवेळी स.सदस्य सभागृहाबाहेर जातात, सभागृहात फक्त स.सदस्य श्री.सावंत,श्रीमती डॉ.आशा बिनवडे उपस्थित असतात.)

**मा.सभापती :** कोरम अभावी सभा १० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते.

(सभा ३.२५ वाजता तहकुब पुन्हा सभा ४.१७ वाजता सुरु.)

**श्री.जयवंत ओक :** मालमत्ता वसुलीसाठी ज्या उपाययोजना राबविणार त्याप्रमाणेच पाणीपट्टी वसुलीसाठी राबवाव्यात, चालु वर्षाचे उद्दिष्ट १५ कोटी होते.सुधारीत अर्थसंकल्पात कमी करुन ८ कोटी निश्चित केले. प्रत्येक वेळेस सुधारीत मध्ये उद्दिष्ट कमी होत गेले तर विकास कामे होणार नाही. १५-२० हजार अधिकृत नळ कनेक्शन दिसुन आले.याचप्रकारे सर्व अनधिकृत वस्त्या ११४ झ ाोपडपट्टी स्लम भागात किती मालमत्ता आहे त्यात किती मालमत्ता धारकांनी नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्यात व्यावसायिक किती याचा सर्व्हे होणे आवश्यक असून सर्व मालमत्ताचे संगणकीकरण करुन रेकॉर्ड तयार करावे.चोरीचे प्रमाण कमी  होईल. यातुन ५ ते ७ कोटी रुपये आणखी जास्त मिळू शकेल. उपाययोजना काय करता येईल यावर चर्चा होऊन निर्णय घ्यावा.

**श्री.नंदकुमार फुलारी :** शहरात किती मालमत्ता व किती नळ कनेक्शन आहे.

**कार्यकारी अभियंता :** शहरात मालमत्ता १.२६ लक्ष असुन नळाची संख्या जवळपास ८३,६५३/- आहे. काही भागात मालमत्ता असुन नळ कनेक्शन घेतलेले नाही.स्लम मध्ये २५ हजार कनेक्शनची संख्या आहे. मालमत्ता कर लावणे व नळ कनेक्शन घेणे या वेगवेगळया बाबी आहे.

**श्री.भरत लकडे :** जे गरीब लोक आहे ते एकदम रक्कम भरुन नळ कनेक्शन घेऊ शकत नसल्याने २ ते ३ टप्प्याने रक्कम घेवून नळ कनेक्शन देण्यात यावे.

**डॉ.आशा बिनवडे :** सिडकोतील मालमत्ता वगळता ८३ हजार फक्त शहरातील मालमत्ता आहे का? या संख्येत सिडकोचा समावेश आहे का?

**उपआयुक्त (महसुल):** ३१ डिसेंबर पर्यत १.१६ लक्ष मालमत्तेची नोंद असून त्यानंतर १३ हजार मालमत्तेचा समावेश झालेला आहे अशा एकूण १.३३ लक्ष मालमत्ता अस्तित्वात आहे. रिकाम्या प्लॉटला सुध्दा नंबर दिला जातो. त्याचा यात समावेश आहे. सिडको व जुन्या शहराची नळ कनेक्शन संख्या यात मोठी तफावत आहे. याचे कारण असे की, काही नळ अनधिकृत तसेच काही नळांना आकारणी केलेली नाही, काही नळ अनिधिकृत वस्तीतील आहे.फेब्रुवारी २००१ च्या पुर्वी अनधिकृत वस्त्यात नळ कनेक्शन दिलेले आहे. मागील वेळेस बजेटमध्ये अभय योजनेचा प्रस्ताव होता तो सुधारीत करुन वन टाईम प्रिमीयम घेऊन पुढील कार्यवाही करणार आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** मालमत्ता कराच्या बाबतीत खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे नळ कनेक्शनचा सर्व्हे खाजगी संस्थेकडून (एन.जी.ओ.) करुन घ्यावा.

**श्री.जगदीश सिध्द :** सन ९९-२००० मध्ये ७१ हजार नळ कनेक्शनची संख्या होती सन २००० ते २००१ मध्ये ७९ हजार नळ संख्या झाली. सन २००१ ते २००२ मध्ये ८०५५६ नळाची संख्या होती. व्यावसायिक वापरासाठीच्या नळाची संख्या ६७२ होती, सन २००२-२००३ मध्ये चालु बजेटमध्ये घरगुती व इतर वापरासाठी एकूण ८२९१२ नळाची संख्या असुन यातील व्यावसायिक वापरासाठी ६६० नळ संख्या आहे. यात सिडकोच्या २६ हजार मालमत्ता वजा केल्यास तीर सुध्दा जेवढया मालमत्ता आहे, तेवढीच नळाची संख्या असावयास पाहिजे. कारण एकाच मालमत्तेमध्ये १ नळ कनेक्शन पेक्षा जास्तीचे नळ कनेक्शन घेतलेले आहे. काही इमारतीमध्ये १", २", ३" इंचाचे नळ कनेक्शन दिलेले असतांना १/२ इंच नळाचीच नोंद आहे. नवीन ५२९४ घरांना (मालमत्तेस) कर आकारणी व नळ कनेक्शन फक्त ३५६५ देण्यात आले.

**मुख्यलेखाधिकारी :** अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी मागील सर्व साधारण सभेत ठराव पारीत झालेला आहे. वन टाईम प्रिमीयम भरुन नळ कनेक्शन अधिकृत करणार आहे. त्या संदर्भात सभेने घेतलेला पॉलीसी निर्णय वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन कार्यवाही करावी लागेल त्यास प्रतिसाद मिळतो हे पहावे लागेल. ३ महिन्याच्या कालावधी नंतर सभागृहाने जे मत मांडले. त्यानुसार अनधिकृत नळे कनेक्शन शोध मोहिम काढुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. मोकळया जागेला, प्लॉटला सुध्दा मालमत्ता कर लावण्यात येतो. मालमत्ता कर आकारणी झाली तर तेथे नळ कनेक्शन दयावेच असा प्रश्न नाही म्हणून यात तफावत येऊ शकते. व्यावसायिक वापरासाठी जे नळ कनेक्शन घेतलेले त्याचा सर्व्हे करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना मा.आयुक्त यांनी मागील महिन्यातच आदेशित केलेले आहे.त्यानुसार ज्या त्या वार्डासाठी जे कनिष्ठ अभियंता दिलेले आहे. त्यांचेकडे हे काम सोपवणार आहेत व दोन महिन्याचा कालावधी दिलेला आहे.

**मा.सभापती :** हॉटेल असोशिएशनच्या पदाधिकाऱ्या समवेत बैठक झालेली होती. जो सर्व्हे करण्यात आला होता त्यानुसार आतापर्यंत अग्निशमन विभागाने किती लायसेन्स दिलेले आहे व या हॉटेलमध्ये किती नळ कनेक्शन अधिकृत आहे व अनधिकृत किती याचा खुलासा द्यावा.

**मुख्यअग्निशमन अधिकारी :** अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या लायसन्ससाठी एकूण ३१९ अर्ज या विभागात प्राप्त झालेले आहे. त्यातील १११ हॉटेल मालकांना लायसन्स दिलेले आहे. ३१९ पैकी जवळपास २०% लोकांकडे नळ कनेक्शन नाही असे नमूद केलेले आहे. शहरात एकूण १३१० हॉटेल आहे.आणखी १००० हजार हॉटेल्स धारकांना परवानगी घ्यावी लागेल, तसेच २०० ते २५० मंगल कार्यालय आहे. त्यांची यादी या विभागात आहे.

**मा.सभापती :** अग्निशमन विभागातर्फे जे लायसन्स देण्यात येत आहे. अधिकृत /अनधिकृत या बाबतीत झोनमध्ये चौकशी करुन कार्यवाही करावी. ज्या हॉटेल,मंगल कार्यालय यांचेकडे नळ कनेक्शन नाही किंवा अनधिकृत असेल या बाबतीत झोन अधिकारी यांना अशा तोंडी सुचना करुन झोन अधिकाऱ्यांनी त्या त्या हॉटेल धारकांना नळ घेण्यासाठी किंवा अनधिकृत नळ असेत तो कायम करण्यासाठी प्रयत्न करावे. मागील सर्वसाधारण सभेत, अनधिकृत नळ कनेक्शन कायम करण्यासाठी वन टाईम प्रिमीयम म्हणजेच २४००/- रु. भरुन नळ देणार आहोत असा निर्णय घेतलेला आहे.

आताच मालमत्तेचा सर्व्हे खाजगी एजन्सी मार्फत करावा म्हणून निर्णय घेतला. ज्या एजन्सीला हे काम दिले जाईल त्याच एजन्सी कडून त्या त्या मालमत्तेकडे नळ कनेक्शन आहे किंवा काय याची चौकशी करुन शहरात किती मालमत्तेला नळ कनेक्शन आहे. हे स्पष्ट होईल व पुढील कार्यवाही करण्यास प्रशासनाला अडचण येणार नाही. पाणी पट्टी वसुल करतांना प्रशासनाने जे व्यावसायिक नळ कनेक्शन आहे त्याकडे विशेष लक्ष द्यावे. शहरात १३१० हॉटेल आहे. तसेच २६९ दवाखाने आहे. तसेच वॉशिंग सेंटर व १५-२० हॉस्टेल असतील. या सर्वांची संख्या जवळपास ५ हजार येऊ शकते.परंतु जेवढी संख्या अर्थसंकल्पात नमुद केलेली नाही याचा अर्थ याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष दिसुन येते. आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला की, पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालवली नाही तर शिक्षण विभागासाठी महानगरपालिकेस येणारे शासनाचे अनुदान शासन परस्पर वळती करुन घेणार आहे. असे शासनाचे जी.आर आलेले आहे. यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले उचलावी कारण मालमत्ता व पाणी पट्टी ही वसुली कमी होणारी नसते. उलट वाढीव वसुली व्हावयास पाहिजे.परंतु तसे होत नाही. पाणीपट्टी वसुलीच्या बाबतीत प्रशासनाला विशेष महत्व द्यावे लागणार व शासनास तसे दाखवावे लागेल. मालमत्तेचे सर्वेक्षणाचे टेंडर काढणार त्याबरोबर अनधिकृत नळ कनेक्शनचा सर्व्हे करण्यासाठी सुध्दा कार्यवाही करण्यात यावी. १५ ते २० दिवसांच्या आत टेंडर काढावे अशा सुचना प्रशासनास देण्यात येत आहे. झोन मार्फत पाणी पट्टीची वसुली होते. यावर्षी जास्तीत जास्त वसुलीचे प्रमाण शासनास दाखवावे लागणार. त्यासाठी कर्मचारी यांना नेमून दिलेल्या कामात हयगय केल्यास त्यांचेवर कडक कार्यवाही करणे प्रशासनास भाग पडेल. नविन अर्थसंकल्पानुसार ज्या झोनची पाणीपट्टी कमी येईल. त्या संबंधितावर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.भरत लकडे :** वन टाईम प्रिमियम भरता एकूण २४००/- रु.घेवून नळ कनेक्शन देणार यासाठी गरीब नागरीकांना सवलत देवून दोन तीन टप्प्यात घेण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

**मा.सभापती :** तरच प्रस्ताव प्रशासनाने सर्व साधारण सभेपुढे सादर करावा.

**४) वाचनालय प्रवेश फि व मासिक वर्गणी दरवाढ.**

**श्री.मधुकर सावंत :** रमानगर भागातील वाचनालयात पुस्तके नाही. १० वेळेस पत्र दिले. किमान दैनिक वृत्तपत्र वाचनालयात असावे.

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते. पुस्तके देण्याबाबत कार्यवाही करावी तसेच दैनिक वृत्तपत्र असावे तरच वाचनालयास महत्व राहील. सर्व वाचनालयात दैनिक वृत्तपत्र ठेवावे.

**५) मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीवर व्याज आकारणे.**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** थकीत रकमेवर व्याज लावणे योग्य होणार नाही. व्याज आकरणी केल्यास वेळेवर पाणी देणार का?

**श्री.जगदीश सिध्द :** मागील रकमेवरसुध्दा व्याज आकारणी होणार का? किंवा यापुढील रकमेवर लावणार या बाबत खुलासा द्यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** ३१ मार्च २००२ पर्यंत चालू व थकबाकी रकमेवर यावर्षापासून व्याज आकारणी होईल. जे कर धारक आहेत त्यांची सर्वसामान्य प्रवृत्ती अशी झाली की, महानगरपालिका कर भरणा केला नाही. तरी काही ती कार्यवाही होत नाही. वर्षात वर्षाची थकबाकी आहे. जवळपास २३ कोटीची थकबाकी आहे.टेलीफोन खात्यात वेळेवर बील भरले नाही तर व्याज आकारले जाते.त्याचप्रमाणे एम.एस.ई.बी.चे आहे.२० तारखेच्या आत लाईट बील भरले नाही तर त्यावर व्याज आकारणी होते. पाणी पुरवठयासाठी लागणाऱ्या वीज पुरवठयाच्या बिलावर त्याच पध्दतीने व्याज आकारणी होते. जीवन प्राधिकरणाची ५६ कोटीची थकबाकी आहे. थकबाकी असतील वेळ निश्चित केल्यास, वेळेच्या आत भरणा न केल्यास जास्त रक्कम भरण्याची वेळ नागरीकांवर आल्यास तशा प्रकारची भीती त्यांच्या मनात राहीत. त्यासाठी व्याज आकारणी करणे आवश्यक आहे. उत्पन्नाच्या दृष्टीने हा प्रस्ताव मंजूर करावा व जे नागरीक वेळेवर रक्कम भरतील त्यांचेसाठी सुध्दा पुस्तकात नमुद केल्याप्रमाणे सवलत देण्यात आलेली आहे दोन्ही बाजु विचारात घेतलेल्या आहे. ही कार्यवाही करण्यासाठी वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देऊन पुढील कार्यवाही होईल.

**श्री.किशोर शिंदे:** मालमत्ता वसुली होण्यासाठी वृत्तपत्रात थकबाकीदारांचे नांवासहित जाहीर प्रगटन देण्यात आले होते. त्यानुसार किती वसुली झाली याचा खुलासा द्यावा.

**मुख्यलेखाधिकारी :** वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिल्यानंतर मालमत्ता कर ५०% भरणा आहे.थकीत रकमेवर व्याज आकारणी करण्या संदर्भात कन्नड, वैजापूर नगरपरिषदेने सुध्दा निर्णय घेतलेला असून त्याप्रमाणे महानगरपालिकेस हा निर्णय घेण्यास अडचण नाही.

**डॉ.आशा बिनवडे :** थकीत पाणीपट्टी वसुली वाढवावी, पाणपट्टी यावर्षी वाढ करु नये. जनतेला वेळेवर पाणी द्यावे व थकीत रकमेवर व्याज लावणे बरोबर होणार

नाही.एम.एस.ई.बी.ची रक्कम महानगरपालिकेकडे आहे म्हणून असा निर्णय घेता येणार नाही.

**श्री.मधुकर सावंत :** १५%ऐवजी १०% व्याज करावे. जे नागरीक लवकरात लवकर भरणा करणार त्याचे साठी जे टक्केवारी नुसार सवलत नमुद केली. त्यात प्रत्येकात १% नी वाढ करावी.

**मा.सभापती :** जे नागरीक ३० जुनपुर्वी भरणा करतील त्यांना ६% तर ३१ जुलै पुर्वी जे भरणा करतील त्यांना ५% तर ३१ ऑगस्ट पुर्वी जे थकबाकी भरतील त्यांना ४% व ३० सप्टेंबर पुर्वी जे थकबाकी भरतील त्यांना ३% तसेच ३१ ऑक्टोंबर पुर्वी जे भरतील त्यांना २% सवलत देण्यात यावी आणि थकबाकीवर १५% व्याज आकरणी करण्याऐवजी १०% आकारणी करावे. विषय मंजूर करण्यात येत आहे.

**६) व्यापारी वापरात असलेल्या नळ जोडणीचे मीटर पध्दतीने अवलंबीने.**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** यापुर्वी काही ठिकाणी मिटर बसविण्याची कार्यवाही केलेली होती. ते मीटर चालू आहे का?

**कार्यकारी अभि.(पा.पु.)** : काही मीटर चालू आहे. काही बंद आहे. जे व्यवसाय करतात त्यांचे नळासाठी ही कार्यवाही करणार आहोत पाण्याची बचत होवू शकते.

**मा.सभापती :** व्यावसायिक धारकांच्या नळ कनेक्शनला मीटर असणे आवश्यक आहे. पाण्याची बचत होवू शकते. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**७) पाणीपट्टी दरवाढ प्रस्ताव**

**श्री.जयवंत ओक :** जनतेला अगोदर पाणी द्यावे. त्यानंतर पाणी पट्टीत वाढ करावी. जेणे करुन नागरीकांना त्रास होणार नाही. (याचवेळी सभागृहात स.स.श्री.ओक पाण्याने भरलेला माठ घेवून सभागृहात येतात.)

**मुख्यलेखाधिकारी :** पाणी पुरवठा करण्यावर महानगरपालिकेचे ३० कोटी खर्च होतात. उत्पन्न फक्त १३ कोटीचे होते. दरवर्षी १७ कोटीची तुट सहन करावी लागते. या शहराला पाणी पुरवठा करणारी जी योजना आहे. ही ना नफा ना तोटा या तत्वावर चालविली जावी असे अर्थशासकीय पत्र २६ जुलै २००१ रोजी मा.सचिव शालेय शिक्षण विभाग यांनी कळविले, नसता प्राथमिक शिक्षण अनुदान ४.५० कोटी हे शासन परस्पर वळती करुन घेणार आहे. ही योजना चालविण्यासाठी प्रती नळ कनेक्शन वर ३३०० रुपये खर्च अपेक्षित आहे.१२००/- ऐवजी २१००/-रु.पाणीपट्टी दरवाढ सुचविण्यात आली असून काही प्रमाणात तोटा कमी होवून आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल हा या मागील हेतू आहे. संभाव्य दरवाढ केल्यास पाणीपट्टी पासुन सुमारे ९ कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. ९ कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरुनच बजेट तयार करतांना पृष्ठ क्र.६८ वर जो गोषवारा दिला, चालू वर्षाची जी कामे हाती घेण्यात आलेली होती त्यातील ७ कोटीची कामे यात अतिरिक्त कमे म्हणून समाविष्ट केलेली आहे. ११७ कोटीचे बजेटमध्ये फक्त २५ कोटीच रुपये विकास कामासाठी आहे. स्पील ओव्हर व चालु वर्षाची एकूण ३२ कोटीची कामे करण्याचे स्थायी समितीसमोर प्रस्तावित करण्यात आलेले आहे. पाणीपट्टीत वाढ केली नाही. महानगरपालिकेच्या शासनाकडे अनुदानापोटी ज्या थकीत रकमा आहे ते शासन परस्पर वळती करुन घेतील.

आताच पाणीपट्टी वसुलीवर चर्चा झाली. अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढावे व पाणी पट्टीत वाढ करु नये, अशा सुचना करण्यात आल्या. परंतु शहरात ८३ हजार नळसंख्या आहे. त्यातून १३ कोटी मिळणार परंतु प्रत्यक्षात वार्षिक खर्च हा ३० कोटीचा आहे. ११७ कोटी मध्ये वैधानिक व बाधील खर्च यात ८५ कोटी खर्च होतात. यामध्ये पगार, भत्ते,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ बिल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गोदावरी विकास महामंड, सरकारी कर्ज परत फेड,पोलीस दर,छावणी हिस्सा,रस्ते विकास महामंडळ, पेन्शन निधी, घसारा निधी ,शासन शिक्षक कर,ठेकेदार अनामत रक्कम असे सुमारे ७०.३५ कोटी रुपये खर्च होणारे आहे. हा बांधील खर्च आहे. तसेच याशिवाय भुसंपादन करणे, संगणकीकरण करणे,महानगरपालिकेचे जे विविध विभाग आहे, आरोग्य विभाग,प्राणी संग्रहालय,उद्यान चालवावे लागतात. यावर सुमारे १७ कोटी खर्च अपेक्षित आहे. एकूण बांधील खर्च हा ८९.०० कोटीवर जातो. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थितीनुसार नागरीकांना सबसिडीने पाणी पुरवठा करु शकत नाही. यासाठी किती सबसिडी ने पाणी पुरवठा करायचा याचा विचार करावा लागणार आहे. आज जवळपास ७०% सबसिडीने नागरीकांना महानगरपालिका पाणी पुरवठा करते. सध्या शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नसुन त्यामुळे शासनाने जी पावले उचलली त्यानुसार शासनाकडून शिक्षण विभागासाठी वेतन अदा करण्यासाठी येणारे ५०% अनुदान बंद झाले तर महसुली उत्पन्नातून शिक्षण विभागावर खर्च करुन कर्मचारी यांचे वेतन द्यावे लागेल.परिणामी त्याचा परिणाम विकास कामावर होईल. छावणी मंडळाचे कालच एक पत्र प्राप्त आले जो वार महानगरपालिका व छावणी बोर्डला द्यावे असे महानगरपालिकेस बाधीत केले होते. त्यानुसार वार्षिक ७० लक्ष रुपये महानगरपालिकेकडून छावणी बोर्डला दिले जात होते. छावणी बोर्ड हे केंद्र शासनाच्या अंतर्गत येते व राज्य शासनाच्या या निर्णयावर छावणी बोर्डने केंद्र शासनाकडे अपील केलेले असून लोकसंख्येच्या प्रमाणकानुसार हिस्सा द्यावा अशी मागणी केली होती. त्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून राज्य शासनाकडे तसे कळविलेले आहे.त्यानुसार राज्य शासनाने महानगरपालिकेस कळवून छावणी बोर्डला त्यांचे लोक संस्थेच्या प्रमाणकानुसार जकातीचा हिस्सा द्यावा असे निर्देश दिलेले आहे, नसता छावणी बोर्डला त्याचे हद्दीत स्वतंत्र जकात वसुलीचे परवानगी दिली जाईल असे केंद्र शासनाने स्पष्ट निर्देश दिलेले आहे. त्यानुसार सर्वसाधारण सभेत सुध्दा या संबंधीचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. लोकसंख्येच्या प्रमाणकानुसार जवळपास १.५० ते १७५ कोटी रुपये महानगरपालिकेला छावणी बोर्ड कडे अदा करावे लागणार आहे. अशा परिस्थितीत उत्पन्नाची साधने वाढविण्याचा प्रयत्न केला नाही तर पर्यायाने विकासाच्या कामासाठी अत्यंत अपुरा निधी उपलब्ध राहणार आहे. ८५ ते ९० कोटी हा बाधील खर्च आहे. त्यात काही कमी करु शकत नाही. ज्यात कर्मचारी यांचे पगार, एम.एस.ई.बी.चे बील तसेच सरकारी कर्ज नियमाने परतफेड करावेच लागणार आहे. उत्पन्न याच स्थितीत राहील्यास पर्यायाने पुढील वर्षापासून देखभाल दुरुस्ती शिवाय कोणतीही नवीन कामे करता येणार नाही.

प्रशासनातर्फे विनंती करण्यात येते की, पाणीपट्टी दरवाढीचा जो प्रस्ताव ठेवलेला आहे त्यास मान्यता द्यावी.

**श्री. कावडे साहेबराव :** पाणीपट्टीत वाढ केल्यास तेवढी वसुल होईल का?

**मुख्यलेखाधिकारी :** आताच सविस्तर खुलासा केलेला आहे. ज्यावेळेस गंभीर आर्थिक परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी सर्वांनाच यावर योग्य तो विचार करावा लागेल. ज्या ज्या उत्पन्नाच्या बाबी आहे. त्यावर लक्ष देवून कार्यवाही करणे आवश्यक आहे. मुळात असा प्रश्न आहे की, आजच ७०% ची सबसिडी देण्यात येते. ती देणे योग्य आहे का? ७०% वरुन ५०% वर आणल्यास महानगरपालिकेचे उत्पनात वाढ होईल. ही दरवाढ झाली नाही तर या अंदाजपत्रकातून ७ कोटीची कामे होतील हे ही सभागृहाच्या निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

**श्री. कावडे साहेबराव :** पाण्याचे नियोजन नाही या बाबतीत वारंवार सभागृहात चर्चा हाऊन अधिकाऱ्यांना सुचना सुध्दा देण्यात आलेल्या आहे. २५ घरांना पाणी सोडल्यास यात कमी जास्त पाणी दिले जाते. काही ठिकाणी खुप पाणी येते काहींना २-२ दिवस पाणी मिळत नाही. यावरून पाण्याचे नियोजन नाही हे स्पष्ट होते.

**श्री.मधुकर सावंत :** या संदर्भात एक कमेटी स्थापन केलेली होती ज्या ठिकाणी पाणी फिल्टर होते तेथेच बरेचशे पाणी वाया जाते असे निदर्शनास आलेले आहे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** पाणी पुरवठा ही तोटयात जाणारी योजना आहे. ३०-३२ कोटी खर्च होतात उत्पन्न फक्त १५ कोटीच येणार आहे. तरी सुध्दा ५०% जास्त होतो. दरवर्षी १९ कोटीची तुट येते असे नमुद केले यातच शासनाचे एकपत्र काढून जर ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालली नाही तर शिक्षण अनुदान महानगरपालिकेस न देता परस्पर वळती करुन घेतले जाईल.शासनाने केलेले आदेश आहे.दुरवरुन पाणी आणावे लागते त्यामुळे त्यावर येणारा महानगरपालिकेस जास्तीचा खर्च व पाणीपट्टी वाटीस होणारा विरोध या सर्व गोष्टीचा विचार केल्यास पाणीपुरवठा दुरवरुन करावा लागतो. त्यामुळे जो खर्च येतो तो जास्तीचा असुन त्यामुळे १९ कोटीची तुट दरवर्षी येते. यात जनतेचा दोष नाही. इतर शहरापेक्षा या शहराची पाणी पुरवठा करण्याच्या नियोजन पध्दती वेगवेगळया आहे. खर्च जास्तीचा येतो. महाराष्ट्रातील इतर कोणत्याच शहराला एवढे दुर वरुन पाणी आणावे लागत नाही व एवढ खर्च ही येत नाही. पाणी हे प्रत्येक कुटुंबासाठी आवश्यक आहे. पाणी सर्वांना लागते. म्हणून तो जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासन वेगवेगळया स्तरावर पाणी पुरवठा करण्यासाठी योजना राबवते व या शहराच्या जनतेला पाणीपुरवठा करण्यासाठी येणारा खर्च जी तुट येते ती न येता ना नफा ना तोटा या तत्वावर ही योजना राबविण्याचे शासन निर्देश देऊन अनुदान बंद करण्याचे कळवित असेल तर या शहराचा प्रत्येक नागरीकांच्या जीवनाशी शासन खेळत आहे. असेच म्हणावे लागेल. इतर महानगरपालिकेपेक्षा या महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना ही जास्त खर्चाची आहे. दुरवरुन पाणी आणावे लागते तसे शासनास प्रशासन का कळवित नाही. इतर जे उत्पन्नाची साधने आहे त्यात जकात, मालमत्ता कर वसुली जास्तीत जास्त करावी. पाण्याच्या खर्चामुळे येणारी तुट भरुन निघेल तशी कार्यवाही करावी. जो प्रस्ताव पाणी पट्टी दरवाढीचा ठेवलेला आहे तो

मंजूर करुन नये अशी सभागृहाच्या वतीने विनंती आहे. पाणी पुरवठयाच्या नियोजनाबाबत आताच सुधारणा करणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा किती दिवस होणार आहे. दिवसेंदिवस एम.एस.ई.बी.चे बील वाढतच जाणार यासाठी पर्यायाने उपाययोजना केली पाहीजे अशी परिस्थिती असेल तर आणखी १० वर्षात या शहरातील नागरिकांची पाण्याची मागणी महानगरपालिका पूर्ण करु शकणार नाही असे चित्र दिसते. त्यासाठी नांदुर मधमेश्वर कालव्यातून पाणी पुरवठा उपलब्ध करु शकतो का हा सुध्दा विचार झाला पाहीजे. त्याबाबतीत टाटा कन्सल्टंशी सारख्या एजन्सीज कडून सर्व्हेक्षणाचे काम करुन घ्यावे व पुढील कार्यवाही करावी. तसेच ज्या झोनची वसुली जास्त होते. त्या झोनमध्ये कामे झाली पाहीजे आणि जे वसुलीस अधिकारी / कर्मचारी कमी पडतील त्यांचेवर सुध्दा कारवाई करण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा.

**श्री. कावडे साहेबराव :** शहरात येणारे पाणी बरेच वाया जाते. त्याचे नियोजन व्हावे.प्रशासन या बाबतीत काय नियोजन करणार आहे. सभागृहात नेहमीच या विषयावर चर्चा होते व अधिकारी चुकीची माहिती पुरवितात.

**मा.सभापती :** पाणी भरपुर येते परंतु त्याचे नियोजन नाही, असा प्रश्न काही सदस्यांनी उपस्थित केलेला आहे, त्यासाठी संबंधित अधिकारी यांनी जेथून शहराला पाणी पुरवठा केला जातो जसे क्रांतीचौक, सिडको, मरीमाता सिडको या ठिकाणावरुन पाणी पुरवठा होतो. वैयक्तिक लक्ष घालून मायक्रोप्लॅन तयार करुन प्रत्येक वार्डात किती पाणी दिले जाते. तसे सदस्यांना त्या मायक्रॉप्लॅनची प्रत द्यावी व कोणत्या वेळात पाणी देता ते सुध्दा नमुद करावे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** माझ्या वार्डात व सिडको-हडको परिसरात १ दिवसाआड पाणी दिले जाते. सिडको-हडको वगळता शहरातील पाणीपट्टी दरात वाढ व्हावी.

**श्री.जयवंत ओक :** स.सदस्या बिनवडे यांनी चांगले मुद्दे उपस्थित केले. वसुलीमध्ये वाढ व्हावी. वसुली न वाढवता पाणीपट्टीत वाढ करणे योग्य होणार नाही. जकात मालमत्ता व इतर माध्यमाचे उद्दिष्ट वाढवावे टारगेट ठरवून द्यावे त्याप्रमाणे वसुली करावी. पाणी पुरवठयाची तूट त्यात भरुन काढावी येथे कन्नड,वैजापूर नगरपरिषदेचे उदाहरण देण्यात आले. थकीत रकमेवर व्याज आकारणार परंतु पाणी पुरवठा सुध्दा मुबलक झाला पाहीजे तरच जनता पैसे भरण्यास पुढे येईल.

काही भागात जास्त पाणी तर काही भागात १०,२०,३०,४० मिनिटे पाणी दिले जाते. अशी परिस्थिती असेल तर जनता पाणी पट्टी भरणार नाही व येणारी तुट ही कायमच राहील. सिडको-हडको भागतील जनतेला १ दिवसाआड पाणी दिले जाते. अगोदरच रु. १२००/- जनता पाणी पट्टी भरते.९००/- रु.वाढ केल्यास कुणीही पाणी पट्टी भरणार नाही. उलट अनधिकृत नळ कनेक्शनचे प्रमाणे वाढेल याचा सुध्दा विचार व्हावा.पाणीपट्टीची किमान ९०-१००%वसुली व्हावयास पाहीजे. त्यासाठी १००-२०० रुपये वाढविणे योग्य होवून शकेल. समजुन घेतले असता जनता ही पुढे येईल. ९०० रु.वाढ करणे योग्य होणार नाही. ही भुमिका प्रशासनाची बरोबर नाही. पाणीपट्टीत कसल्याही प्रकारची वाढ होऊ नये हा विषय सर्वसाधारण सभेसमोर येऊ द्यावा तुट भरुन काढण्यासाठी मालमत्तेचे

संगणकीकरण करावे.११४ अनधिकृत वसाहती, १८ खेडी या सर्व घरांना मालमत्ता कर लावावा. त्यामुळे ७ कोटीची जी तुट येते ती भरुन निघेल. गुंठेवारीच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करावी. उत्पन्न वाढेल. १५ कोटी ऐवजी मालमत्ता कराचे २५ कोटी सुध्दा येऊ शकेल. अगोदर जनतेला ामुबलक पाणी द्यावे. जनतेचे मत जाणून घ्यावे. ९००/-रु. ची वाढ दर्शविली ती रद्द करावी व हा प्रस्ताव योग्य निर्णयासाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा अशी विनंती करण्यात येते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** खर्च बाजू नाही तर जमेची बाजु वर सुध्दा चर्चा होणे गरजेचे आहे. प्रत्येक वर्षी पाणी पुरवठयाच्या खर्चात तोटा येतो. सन २००१-२००२ मध्ये १९ कोटीचा तोटा दाखविण्यात आलेला आहे. पाण्याचे नियोजन करण्याबाबत बऱ्याच वेळा चर्चा झाली. ५ वर्षापासुन सर्व्हेचे काम होत आहे. परंतु ही योजना १००% राबविण्याचे यश येत नाही. जनता सहकार्य करेल हा दृष्टीकोन समोर ठेवून १२००/- रुपये ऐवजी १५००/- रु.करण्यात यावे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे :** जे लोक कर भरीत नाही, पाणी पट्टी भरतीत नाही. त्यामुळे तुट निर्माण होते व तुट निर्माण झाली तर वाढ करण्याची गरज पडते व वाढ केल्यास जे कर भरतात त्यांचेवर अन्याय झाल्या सारखे होईल, त्यासाठी वसुलीचे प्रमाण वाढवावे. या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेत निर्णय घ्यावा.

**श्री.नंदकुमार फुलारी :** एक्सप्रेस लाईनचा ठराव पास केला त्या संबंधीचा खुलासा घ्यावा.सर्वसाधारण सभेत चर्चा होवून निर्णय घेता येईल.

**मा.सभापती :** पाणीपट्टी दरवाढ संदर्भात सविस्तर चर्चा केलेली असून ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालावी म्हणून प्रशासनाने २१००/- रु.पाणीपट्टी वाढसह सुचविलेले आहे. या सभागृहाचे एकंदरीत मत लक्षात घेता काही भागात पाणी देत नाही तर २१००/- रु.पाणीपट्टी लावणे योग्य राहील का असे प्रश्न उपस्थित केलेले आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** पुंडलीकनगर सारख्या भागात ४० टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो.एका टँकरसाठी २०००/- रु.खर्च धरल्यास ८०,०००/- रुपये प्रत्येक दिवशी खर्च होतात. त्यामुळे महानगरपालिकेस तोटा सहन करावा लागत आहे.

**मा.सभापती :** पाणीपट्टीत थोडयाफार प्रमाणात वाढ झाली पाहीजे असे सभागृह सहमत आहे. परंतु प्रशासनाने एकदम ९००/- दरवाढ सुचविलेले आहे. यात फार मोठी तफावत येते. सर्वसाधारण सभेत एकूण ८८ सदस्य असतील प्रत्येक सदस्याचे मत जाणून घेऊन योग्य जो निर्णय घेता येईल. या विषयावर योग्य तो निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** खाजगीकरण करण्यास नकार देता, पाणीपट्टी वाढ होत नाही विकास कामे कशी करणार हा सुध्दा प्रश्न उपस्थित होतो. खाजगीकरण करण्यास काहीचे मत नसेल, काहीचे असेल आपण सभापती आहात आपला अधिकार आहे. खाजगीकरण करण्यात यावे असा आपण निर्णय घ्यावा.

**श्री.नंदकुमार फुलारी :** जनतेला मुबलक पाणी द्यावे, तरच पाणी पट्टी दर वाढ करावी.

**मा.सभापती :** उत्पन्नाच्या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा केलेली आहे. खर्च या बाबीवर येत्या १३ तारखेला सकाळी ११.३० वाजता चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. आजची सभा तहकुब करण्यात येते.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या (अर्थसंकल्पीय) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक ११-३-२००२ रोजी तहकुब करण्यात आलेली (अर्थसंकल्पीय) स्थायी समितीचे सभा बुधवार दिनांक १३-३-२००२ रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता वंदे "मातरम्" यागिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
२) श्री. अशरफ युनुस मोतीवाला
३) श्री. कावडे साहेबराव राणुबा
४) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
५) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
६) श्री. लकडे भरत श्रीपती
७) श्री. सावंत मधुकर दामोधर
८) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
९) श्री. शिंदे किशोर रावसाहेब
१०) श्री. शेख इलियास किरमानी शेख उमर
११) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१२) श्री. ओक जयवंत केशवराव
१३) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१४) डॉ. आशा उत्तम बिनवडे

**मा.सभापती :** उत्पन्न बाजुवर ११ तारखेला सविस्तर चर्चा केलेली आहे. अर्ज बाजुवर चर्चा करावी.

**श्री.जगदीश सिध्द :** अनेक लोक बांधकाम परवानगी घेतात व बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेत नाही. सन ९७-९८ मध्ये ७७६ लोकांनी बांधकाम परवानगी घेतली व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र २७५ लोकांनी घेतले. ९८-९९ मध्ये सुध्दा १०६ लोकांनी पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले. ९९-२००० मध्ये ९१२ लोकांनी बांधकाम परवानगी घेतली त्यापैकी २१५ लोकांनी पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतले. बांधकाम परवागीशिवाय रक्कम १०,०००/- रु.वरुन वाणिज्य वापरासाठी ५०,०००/- करण्यात यावे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जे लोक व्यावसायीक आहे. भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करीत नाही त्यांचेसाठी यांचा विचार करण्यात यावा.

**मा.सभापती :** बांधकाम परवानगीसाठी बिल्डर्स परवानगी घेतात परस्पर विकुन मोकळे होतात व भोगवटा प्रमाणपत्रासाठी येत नाही. आपण जास्तीत जास्त १०,०००/- रुपये अनामत रक्कम घेतो. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होते. अनामत रक्कम वाढविता येईल का याबद्दल माहिती देण्यात यावी.

**उपअभियंता नगररचना :** बांधकाम परवानगीसाठी सर्वसाधारण निवासी वापरासाठी किती असावे व वाणिज्य वापरासाठी किती असावे या संबंधीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेला पाठविण्यात यावा.

**श्री.जगदीश सिध्द :** २% कशाच्या आधारावर ठरविलेले आहे व ज्यांनी लहान स्वरुपाचे बांधकाम केले त्यांना हे परवडणारे नाही.

**उपअभियंता नगररचना :** विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे आकारणी करण्यात येते.

**१) प्रशासकीय खर्च :**

**डॉ.आशा बिनवडे :** यापुर्वी उत्पन्नाच्या बाजुवर सविस्तर चर्चा केलेली आहे. उत्पन्नाची बाजु बळकट करणे गरजेचे आहे. खर्च करतांना अनावश्यक खर्च टाळले पाहीजे. आवश्यक असलेला खर्च तर टाळता येणार नाही. प्रशासकीय खर्च हा वैधानिक खर्च आहे. तो टाळता येत नाही.३४.६५ कोटीवरुन ३८.७० कोटी असे अपेक्षिलेले आहे. त्याबद्दल काळजी घेणे आवश्यक आहे. या खर्चाची बाब लक्षात घेऊन त्याचा उत्पन्न वाढविण्याची कामे सुध्दा जबादारीने करावी.जबाबदारी टाळता येणार नाही हे लक्षात ठेवावे. १००% वसुली होणार नाही. त्यामुळे शिक्षेचा निर्णय घेण्यात यावा. दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त वसुली होईल याचा विचार करावा अनावश्यक खर्च केला जाऊ नये. उद्दिष्टापेक्षा जास्त काम करणाऱ्या जे अधिकारी / कर्मचारी आहेत त्यांना बक्षिस देण्यात यावे. त्यांचाही विचार व्हावा.

**श्री.जगदीश सिध्द :** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे. पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी एक वर्षासाठी कमी करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** अर्थ संकल्पीय बैठकीपुर्वी या संदर्भात मी चर्चा केलेली होती. स.सदस्य जगदीश सिध्द यांनी सुचना केल्याप्रमाणे २०% कपात करुन राखुन ठेवावे. आर्थिक परिस्थिती बाबत सभागृहात चर्चा घडवून आणावी.

**श्री.जयवंत ओक :** अधिकारी /कर्मचारी हे कामे करतात. आपण ५व्या वेतन आयोगाची थकबाकी दिली नसेल तर देण्यात यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** आर्थिक बाजु पाहण्याचा सर्व सदस्यांचा अधिकार आहे. सर्व सदस्यांचे मत लक्षात घेऊन निर्णय घेण्यात यावा.

**श्री. मोतीवाला अशरफ :** महानगरपालिकेचे अधिकारी / कर्मचारी चांगले कामे करतात त्यांचे वेतन थांबवू नये.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** कर्मचाऱ्यांनी विरोध आहे असे समजू नये. खाजगी करणाबाबत मी एकटाच बोललो, वाईट वाटून देऊ नये व तसे वाटत असेल तर ६० वेतन आयोग देण्यात यावा कामे थांबवावी लागेल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** थकबाकी रोखायला सांगितले आहे. १ वर्षानंतर परिस्थिती चांगली झाल्यानंतर देण्यात यावे. कामे व्हावी यासाठी कुठेतरी काटकसर करावी लागेलच. परिस्थिती पाहुनच निर्णय घेण्यात यावा.

**श्री.जगदीश सिध्द :** परिस्थिती नाजुक आहे. वेतन थांबवून कामे करावे आर्थिक परिस्थिती सुधारली तर थकीत रक्कम देण्यात यावी.

**श्री.मीर हिदायत अली :** वसुली जास्त करावयास सांगावे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** विद्युत मंडळ तसेच जीवन प्राधिकरणाचे व्याजासह थकीत रक्कम वाढत आहे. त्या रक्कमा देणे आवश्यक असल्याने विकास कामास पैसा राहणार नाही. म्हणून कर्मचाऱ्यांची २०% रक्कम कपात करावी. आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर देण्यात यावी.

**डॉ.आशा बिनवडे :** मुख्यलेखाधिकारी यांचा खुलासा घ्यावा. त्यानंतर निर्णय घेता येईल.

**श्री.जयवंत ओक :** अनधिकृत वस्त्यांमध्ये सध्या सर्व सुविधा बंद आहे. हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत नाही. शहरामध्ये ६०% अनधिकृत वसाहती आहेत.शासन मान्यता मिळाल्यानंतर या वसाहतीमध्ये ड्रेनेज,लाईट,पाणी,साफसफाईची कामे करावी लागणार आहे. कर्मचारी / अधिकारी यांची आवश्यकता असुन त्यांचे वेतन कमी करण्यात येऊन नये. चांगली कामे करतात.जास्तीत जास्त काम करुन घेण्याची अपेक्षा करावी. जे कामामध्ये हलगर्जीपणा करतील त्यांचेवर कार्यवाही करावी या मताचा मी आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रशासकीय खर्चावर चर्चा होत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही ही सत्य परिस्थिती आहे. जो प्रशासकीय ३८.७० कोटीचा खर्च नमुद केलेला आहे हा वैधानिक खर्च आहे. ५ वा वेतन आयोगाची १.५० कोटी थकबाकी आहे. दिलेला पगार रोखण्याचे अधिकार नाही.डी.ए.वगैरे थांबविता येणार नाही. जे १.५० कोटी जी थकीत रक्कम आहे ती थांबविता येईल. २०% पगार थांबविता येणार नाही.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रीम तसेच वाहन खरेदी अग्रीम देण्याचे १ वर्षासाठी बंद करावे पान क्र.१६ वर दिलेले आहे. ती रक्कम विकास कामासाठी वापरली जावी.

**डॉ.आशा बिनवडे :** महानगरपालिकेने अग्रीम रक्कम न देता कर्मचाऱ्यांनी बँकेकडून कर्ज घ्यावे.महानगरपालिकेने गॅरन्टर व्हावे. पगार बँकेकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. महानगरपालिकेने का भार सोसायचा अग्रीम रक्कमा देण्याचे बंद करावे.

**मा.सभापती :** प्रशासकीय खर्चामध्ये ३८.७० कोटी रुपये ठेवलेले आहे. मागील वर्षी सुधारीत अंदाजपत्रक ९७ कोटी करण्यात आले. याचा विचार केल्यास जर ९७ कोटीच वसुली झाल्या त्यातून प्रशासकीय खर्च ३९ कोटी गेल्यास ५८ कोटीच राहणार आहे. त्यातुन जीवन प्राधिकरण,विद्युत मंडळ यांची थकबाकी रक्कम तसेच इतर कर्ज देणे इत्यादीवर २६ कोटी गेल्यास ३२ कोटी रुपये शिल्लक राहतील. तसेच उद्यान व यांत्रिकी विभाग यावर ६ ते ७ कोटी रुपये खर्च होतात म्हणजेच २० ते २५ कोटीच रुपये विकास कामासाठी राहतात.त्यातुन १३ ते १४ कोटीची कामे स्पील ओव्हरची असतात. फक्त १२ ते १३ कोटी रुपये विकास कामासाठी उपलब्ध होतील.१० ते १२ कोटीची कामे करण्यासाठी प्रशासकीय खर्च ३९ कोटीचा खर्च म्हणून कर्मचाऱ्यांना पगार दयावा लागतो असे सदस्यांनी मनोगत व्यक्त केले.महानगरपालिकेची परिस्थिती किती गंभीर आहे या संदर्भात मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केलेला आहे.निर्णय घेणे बंधनकारक आहे.वसुली परिणाम २०% च्यावर नाही व ८०% थकबाकी आहे.दरवर्षी परिस्थिती सौम्य असते. यावर्षी गंभीर स्वरुपाची आहे. ५व्या वेतन आयोगाची २०% कपात प्रवास भत्ता,निर्वाह भत्ता,घर अग्रीम वाहन अग्रीम थांबविण्याबाबत चर्चा झाली. ५व्या वेतन आयोगाचे १.५० कोटी रद्द करता येत नाही किंवा करायचे नाही. ते थांबविणे गरजेचे आहे. घर बांधणी ४० लक्ष वाहन अग्रीम १५ लक्ष १.५० कोटी रुपये पाचवा आयोग हे थांबविण्यात यावे. वसुली कर्मचारी नेमले. पगार कमी करावा असे मत आहे. शेवटच्या

तीन महिन्यात पगार वसुलीवर घेता येईल का ही बाब प्रशासनाने महापालिकेसमोर आणावी.

**श्री.जयवंत ओक :** वसुली कर्मचाऱ्यांना मारहाण होते. साधा निषेध देखील होत नाही. खेदाने सांगावे लागते.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग, श्री.भरत लकडे :** पोलीस दलास ३५ लाख खर्च होतो तो कशासाठी खर्च होतो.

**मा.सभापती :** कर्मचारी वसुलीच्या बाबतीत काही प्रकार घडले असतील पदाधिकारी व नगरसेवक यांचा पूर्ण पाठिंबा आहे म्हणून पोलीस दलावर ३५ ते ४० लक्ष खर्च करतात.

**श्री.भरत लकडे :** जे उद्दिष्ट पुर्ण करतील त्यांना बक्षिस देण्यात यावे. जे उद्दिष्ट पुर्ण करणार नाही त्यांना शिक्षा व्हावी.

**मा.सभापती :** ही बाब विचाराधीन आहे. चांगली बाब आहे.

**२) <u>पाणीपुरवठा व्यवस्था :</u>**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** पाण्याच्या संदर्भात काही ग्रामपंचायतीकडून येणे आहे. किती ग्रामपंचायती आहे.

**कार्यकारी अभियंता (पा पु) :** एकूण ४५ लाखाची थकबाकी आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** वर्षभराचे १२ कोटी आहे.दरमहा ७५ लक्ष देण्यात येते. प्रतिमहा ७५ कोटी प्रमाणे वर्षाचे ९ कोटी व इतर पाणीपुरवठयावर ३ कोटी असे एकूण १२ कोटी देण्यात येते.

**डॉ. बिनवडे आशा :** पाणी पुरवठा योजनेकरीता कुणाकडून कर्ज घेतलेले आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** तीन कोटी खुल्या बाजारातून घेतेलेले आहे. ते देणे आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** जलवाहिनी सी.आय आहे की,एसी आय यांचा खुलासा दयावा.

**कार्यकारी अभियंता :** ज्याला प्रेसर आहे त्याला सी आय व वितरण वाहीन्या आहेत त्यांना एसी आय पाईप वापरण्यात येतात.

**श्री.जगदीश सिध्द :** अंगुरीबाग येथे १०० व्यासाची जलवाहीनी टाकणार आहे. तेथे फार वर्दळ आहे. म्हणून ती फुटते.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग, श्री.जगदीश सिध्द :** पाणी दुषित होत नाही. सी आय पाईप वापरावे. पुन्हा पुन्हा जलवाहीनी टाकण्याची गरज पडत नाही.

**मा.सभापती :** सी आय पाईप वापरावे असा मुद्दा उपस्थित झालेला आहे. स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे सी.आय.पाईप वापरावे त्या ठिकाणी वर्दळ जास्त असते.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** २९ नांवे दिलेली आहे. कोणती कामे करणार आहे. विहीर बुजविण्याचा खर्च दाखविण्यात आलेला आहे. महापालिकेची जबाबदारी आहे का?

**कार्यकारी अभियंता (पा पु) :** कोर्टाचा निर्णय आलेला आहे. बुजवण्यात यावे म्हणून ग्रामपंचायतने खोदली होती. आपल्या ताब्यात आहे. १.२५ लक्ष न ठेवता १० हजार ठेवावे. हे काम रद्द करण्यात यावे. बुजवायचे काम सुरु आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** जी यादी दिलेली आहे. यातून कोणती कामे होणार आहे.

**मा.सभापती :** क्रमांक ८,९,११,२१,३६,६२ वगळण्यात येत आहे. अनुक्रमांक ३ वरील ७५ लक्ष ऐवजी २५ लक्ष ठेवण्यात येते.

**श्री.जयवंत ओक :** आम्ही सदस्यांनी दिलेली यादी क्रमांक ७० च्या पुढे समावेश करावी.

**डॉ.आशा बिनवडे :** विभाग प्रमुखानी जी यादी सादर केलेली आहे, प्रस्तावित यादीसाठी कोणते निकर्ष लावलेले होते. का प्राधान्य दिले या ठिकाणी खुलासा करावा. लोकांची मागणी आहे की, स.सदस्यांनी दिले किंवा प्रत्यक्ष पाहणी करण्यात आले. कशा आधारे प्रस्तापित केले याचा खुलासा व्हावा.

**श्री.किशोर शिंदे :** माझ्या वार्डातील लिगल वस्त्यामधील कामे झालेली नाही. भाग एकच आहे. सदरील कॉलनीतील लोक बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे तेथे सुविधा दिल्या गेल्या पाहिजे. १००% ले-आऊट झालेले आहे. एकही काम घेतलेले नाही.

**मा.सभापती :** विभाग प्रमुखांनी खुलासा करावा की, संबंधीत सदस्यांचे वार्डातील काम का झालेले नाही.

**श्री.भरत लकडे :** आम्ही पत्र देवून ज्या कामाची मागणी केली त्या कामांचा यात समावेश झालेला नाही.

**कार्यकारी अभियंता (पा पु) :** वर्क वाईज बजेट ठेवतांना त्या भागातील लोकांनी १००% विकास निधी भरलेला आहे का? त्यांना प्रथम प्राधान्य नंतर वर्षभरात पाणी पुरवठा सुरळात होण्यासाठी नवीन कामे नंतर स्लमची कामे असे निकष लावले आहे.

**मा.सभापती :** ज्या ज्या वेळी सभागृहात प्रश्न उपस्थित होईल त्या त्या वेळी उत्तर दिले जाईल का?

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** अर्थसंकल्पामध्ये कांचनवाडी व नक्षत्रवाडीचे जास्त कामे घेतलेली आहे.हा भाग महापालिकेने दत्तक घेतला आहे का? बाकीचे का घेतले नाही याचा खुलासा दयावा. १२ पैकी ७ कामे आणि पाणी पुरवठयाच्या सुधारीत कामात नक्षत्रवाडी,कांचनवाडी या वार्डात कामे दाखविण्यात आलेली आहे.

**अति.शहर अभियंता :** तेथे पुर्वीची स्पील ओव्हरची कामे चालू आहे. त्यात या यादीत समावेश केलेला आहे.

**३) <u>भुमीगत जलनि:व्यवस्था :</u>**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागील दोन वर्षापुर्वी एका ट्रिटमेंट प्लँटचे काम दिलेले होते. २.२५ कोटीचे बजेट ठेवलेले होते त्यातून ७५ लक्ष कमी करुन १.५० कोटीचे करण्यात आले. काम करणारे गुत्तेदार काम करीत नाही. त्यांना वेळ मर्यादा घालून दिलेल्या नाही का प्रत्येक वेळेस द वाढवून येतात व तरतुद करण्याची मागणी होते.

**कार्यकारी अभियंता (पा पु) :** काम सुरु होऊन ९ महिने झालेले आहे. टाईम लिमिट हे ६ महिन्याचे असते. ७५ लक्षची आवश्यकता असतांना ५० लक्ष रुपयाची तरतुदीचीच मागणी केलेली आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** ५० लक्ष ऐवजी २५ लक्ष ठेवावे. एक वर्ष उशीर लागला तरी चालेल.

**श्री. कावडे साहेबराव :** जे काम चालु आहे ते बोगस चालु आहे. मा.आयुक्त यांनी ताबडतोब पाहणी करावी. या संदर्भात मी पत्रही दिलेले आहे. त्वरीत काम बंद करावे.बजेट ठेवून नये. दबाई नाही, वायरींग केलेली नाही.

**कार्यकारी अभियंता (पा पु) :** अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्थापत्य,विद्युत व यांत्रिकी विभागाचे प्राध्यापकाची स्थळ पाहणी झालेली आहे. त्यांनी तपासणी केलेली आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** महानगरपालिकेच्या मोठया स्वरुपाची कामे जसे झाल्टा ट्रीटमेंट,प्लॅन,मौलाना आझाद संशोधन केंद्र प्रशासकीय इमारत ३ टप्पा ही कामे वैयक्तिक स्वरुपाची नाही. ६ महिन्यात पुर्ण होतील.त्यांचे देयके देणे आवश्यक आहे.५० लक्ष लागत असतील तर ठेवावे लागेल. मा.आयुक्तांनी काम निहाय अर्थसंकल्प तयार करतांना ४ ही विभाग प्रमुखांना बोलाविले त्यात रस्ते,लाईट,पाणी,ड्रेनेज यांना प्राधान्य देतांना १००% विकास खर्च भरलेला आहे.त्यांना प्राधान्य दिले.स्लममध्ये कामे नाही. १८ खेडी ज्यात कामे झालेली नाही त्याचा विचार केलेला आहे. अर्थसंकल्पपान क्र. ६८ वर गोषवारा दिलेला आहे. त्यात सुधारीत तरतुद स्पिलओव्हर विभागाची मागवी एकूण व प्रस्तावित अंदाजपत्रकीय तरतुद दाखविण्यात आलेली आहे. चालु आर्थिक वर्षात २५.३९ कोटीची तदतुद आहे. स्पील ओव्हर १२.३६ कोटीची असुन १३ कोटीची कामे ४ विभाग प्रमुखात विभागणी केलेली आहे. १३ कोटीत ८८ नगरसेवकांची कामे होतील शक्य नाही. ज्यांची कामे प्रलंबीत राहतील ती कामे पुढील आर्थिक वर्षात नियोजन करुन घेण्यात येतील. प्रत्येकांच्या वार्डात कामे होतील असे नाही. अद्याप ७.५० कोटीची देयके दयायची आहे. गुत्तेदारांना ७.५० दिले नाही तर स्पिल ओव्हर वाढेल. मागील वर्षी ब्लॉक बजेटमुळे झाले.

**श्री.जयवंत ओक :** वार्डवाईज बजेंट दयावे.माझ्याकडे काम झाले का जनता विचारेल सर्वसाधारण सभेत बजेट मंजुर झाल्यानंतर सर्व सदस्यांना कामे करून घेण्याची घाई होईल. वार्डवाईज १० लक्षचे एक काम असे ५ कामे केल्यास ५० लक्ष एक वार्डासाठी मिळतील.

**श्री.जगदीश सिध्द :** शहरामध्ये जलनि:सारण वाहीनी या चिनी मातीच्या असाव्यात.

**कार्यकारी अभियंता (जल.नि.) :** व्यास वाढतो त्या ठिकाणी चिनी मातीचे पाईप मिळत नाही.३०० मी.मी. व्यासापर्यंत वापरल्या जातात. त्यामुळे आर सी सी चे पाईप वापरण्यात येतात. ३०० किं.मीटरच्या खाली वापरण्यास हरकत नसावी.

**श्री.जगदीश सिध्द :** ९ इंच चिनी मातीची वाहीनी १३ इंच आर सी सी ची बरोबरी करते.८ इंच व्यासाची सराफामधील जलनि:सारण वाहीनी आतापर्यत उघडलेली नाही.

**मा.सभापती :** चांगला मुद्दा आहे. प्रशासनाने सुचना लक्षात घेऊन चिनी मातीच्या पाईपचा उपयोग करावा. सर्व्हिस चांगल्या प्रकारची आहे. जेथे आवश्यक आहे तेथे वापरावी भांडवली कामे पान क्र.१०३ वर १ ते ३० मध्ये काही सुचना असल्यास मांडाव्या. पान क्र.१०५ अ.क्र.१ ते ४८ सर्व चिनी मातीची पाईप लाईन वापरावी.

**कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) :** प्रस्तावित कामे लॅन्ड इस्टिमेंटने केलेली आहे. सुचना केल्याप्रमाणे करण्यात येईल. कामांना महत्व देतांना मुख्य लेखाधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे केलेली आहे. एखाद्या वार्डाचे एकही काम नसेल तर पुढील वर्षी प्राधान्य देण्यात येईल. तसेच मजबुरीने ही काही राहीली असतील तर ब्लॉक बजेट ठेवलेले आहे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** पान क्र. १०६ वरील अ.क्र. १६,३.५० लक्षचे काम आहे. ही जलनि:सारण वाहीनी केव्हा टाकली का बदलण्यात येते याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) :** सदरचे काम अप्रुटींगचे काम आहे.

**मा.सभापती :** पान क्र. १०५ वरील अ.क्र.१,९,१०,१४,१७,२२,२३,२६,३२,३३ ही कामेकमी करण्यात आलेली आहे विभाग क्र. ८ साठी ५० लक्ष ठेवलेले आहे. हेडमधून खर्च करावे.

**कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) :** शासनाकडे प्रस्ताव गेला. अनधिकृत भागात कामे करायची की नाही. शासनाची मंजुरी मिळाल्यावर करता येईल.

**श्री. कावडे साहेबराव :** झाल्टा ट्रिटमेंट प्लॉंट येथे जलनि:सारण वाहीनी चालू नाही.

**मा.सभापती :** ५० लक्ष ठेवलेले आहे.५० लक्षची कामे होणार नाही. या कामाच्या संदर्भात थर्ड पार्टी इन्स्पेक्शन प्रस्तावात आहे.मा.आयुक्त पाहणी करतील दोष आढळून आल्यास पुर्ण तरतुद कमी करु शकतो. तसेच याच प्रस्तावात शहरी भागासाठी संडास बांधणेसाठी १० लक्ष तरतुद केलेली आहे. परंतु पान क्र. १०८ वर निरंक दाखविलेले आहे. तेथे १० लक्ष तरतुद असे नमुद करावे या प्रस्तवास मंजुरी देण्यात येते.विषय क्र. ३ मंजूर करण्यात येत आहे व सभा ३० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येत आहे. ( वेळ दुपारी २.२५ वाजता पुन्हा सभेला सुरुवात दुपारी ३.१५ वाजता.)

**४) <u>५% कमकुवत घटक कल्याणकारी योजने अंतर्गत झोपडपट्टी विकास कार्यक्रम :</u>**

**मा.सभापती :** पान क्र.११ वर चर्चा करावी.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** खांडकी रस्ते करण्याऐवजी क्रॉकींट रस्ते करावे.

**मा.सभापती :** खांडकी रस्ते न करण्याबाबत मागील वर्षी निर्णय घेतलेला आहे.पुन्हा प्रस्ताव आणण्याचे गरज नाही, का नमुद केलेले आहे.

**अति.शहर अभियंता :** खांडकी रस्ते करणार नाही ते रद्द केलेले आहे, काँक्रीटचे रसते करणार आहोत.

**मा.सभापती :** क्र. १ मध्ये १८ खेडी कार्यक्रम कोणत्या पानावर दिलेले आहे.

**अति.शहर अभियंता :** पान क्र.७६वर दिलेले आहे. पान क्र. ८७ वर क्र. ९ मध्ये क्रांतीचौक येथील सुलभ शौचालयाचे कामात बदल झालेला आहे. त्याचा यात समावेश करावयाचा आहे. ५ लक्ष रुपयाचे काम आहे.

**मा.सभापती :** पान क्र. ७६ वर क्र. १ मधील १८ खेडी विकास योजना मंजुर, क्र. २ खडी रस्ते व कल्व्हर्ट मंजुर, क्र. ३ मध्ये खांडकी रस्ते हा शब्द वगळावा काँक्रीट रस्ते म्हणून मंजुरी देण्यात येते.क्र. ५ खुल्या गटारी व संरक्षित भिंत बांधणे मंजुर, क्र. ६ स्लम भागात पुर्न डांबरीकरण करणे मंजुर, क्र. ७ स्लम देखभाल दुरुस्ती मंजुर, क्र. ८ नविन डांबरी रस्ते मंजुर, क्र. ९ सुलभ शौचालय मंजुर.

**अति.शहर अभियंता :** क्रांतीचौक येथील एक सुलभ शौचालयाचे कामात बदल झालेला असल्याने यात समावेश करावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या कामाची यादी देणार आहे. त्या यादीत समावेश करावा.आपण एकदा ठरविलेले आहे.आम्ही दिलेले कामे वाढविली नाही. समावेश सुध्दा करणार नाही. क्र. १०-५ % कमकुवत घटक कल्याणकारी योजनेमध्ये क्र. ३ मध्ये लायन्स बल्ब मुकुंदवाडी येथे जुनी वायर फेन्टींग करु नये. बांधकाम नीवन वायन फेन्सींग बसविणे बाबत दिले तेथे लोक तार विकतात म्हणून वायर फेन्सींग करुन नये बांधकाम हे वाल कंपाऊंड करावे. क्र. १०

मंजुर करण्यात येत आहे. क्र.१२ विकास इमारती शाळा,दवाखाने,हर्सुल शाळेचे किती काम होणार आहे.

**शहर अभियंता :** हर्सुल शाळाचे काम मंजुर आहे. यावर्षी फक्त ३० लक्ष ठेवलेले आहे.

**मा.सभापती :** हर्सुल व हत्तेसिंगपुरा या शाळेत विद्यार्थी किती आहे. या इमारती बांधण्याची आवश्यकता आहे का?

**श्री.जगदीश सिध्द :** शासनाचे किती अनुदान येते खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** शासनाकडे आपण प्रपोजल पाठवित असतो. शासन ३ कोटी अनुदान देणार असेल तर १/३ हिस्सा महानगरपालिकेस ठेवावा लागतो. त्या अंतर्गत या कामाचा समावेश केलेला होता, परंतु बजेटमध्ये असे केले आहे.शासनाचे जे बजेट येते ते जमा बाजूत घेतलेले आहे. परंतु ब्लॉक बजेट इमारती बांधण्यासाठी १ कोटी देतो तो सुध्दा महानगरपालिका फंडातुनच खर्च होतात.शासनाकडे पाठवित असतांना एक माहितीस्तव देत असतो यातून शासकीय अनुदान हे शब्द वगळावे.

**मा.सभापती :** विकास इमारती,शाळा,दवाखाने यातील क्र.१ व ३ हर्सुल,इटखेडा मधील कामे मंजुर करण्यात येते.उर्वरीत क्र. २,४,५ वगळण्यात येत आहे. या रक्कमेची डांबरीकरण करण्याच यावे.

**<u>(प्राणी संग्रहालय विकसीत करणे)</u>**

**श्री.नंदकुमार फुलारी :** जे प्राणी मृत्यू होतात त्यांच्या बाबतीत इन्शुरन्स काढलेला आहे काय.

**श्री.सावंत मधुकर :** इतर महानगरपालिकेमध्ये प्राण्यासाठी एक डॉक्टर आहे. आपल्या महापालिकेत ४ डॉक्टर असून प्राणी मृत्यू होतो. पिंपरी-चिंचवड येथे एकच डॉक्टर प्राण्याची देखरेख करतात.डॉक्टर काय काम करतात याची चौकशी व्हावी.जनतेचा पैसा खर्च होत आहे. एकच डॉक्टर ठेवावा.

**संचालक प्राणी संग्रहालय :** जे प्राणी आजारी होतात त्यांच्यासाठी ट्रिटमेंट केज केलेले आहे.एकच आहे ते वाढविण्याची आवश्यकता आहे. पक्षासाठी व्यवस्था होणे करीता अनेक अंदाजपत्रक केलेले आहे.

**मा.सभापती :** प्राणी मृत्यूमुखी पडतात,कर्मचारी संख्या असतांना असे का होते. किती कर्मचारी आहे.

**संचालक प्राणी संग्रहालय :** माझ्याकडे १ क्लर्क ,२ पशुधन पर्यवेक्षक (L.S.S.) व दोन स्वच्छता निरीक्षक आहेत.१९८६ पासुन सर्वच प्राण्यांचे इन्शुरन्स काढलेले आहेत. भारतात हा पहिलाच आहे. यापुर्वी हत्तीचा मृत्यू झाला. त्याचे ३.९५ लक्ष विमा काढलेला आहे. ८०% रक्कम मिळते. याविभागात एकच डॉक्टर आहे. बाकीचे सुपर वायझर आहे. पुणे येथे प्राण्यांचे वेगवेगळे पार्क आहेत. प्राण्यांना सर्व सुविधा दयाव्या लागतात. सांबर वगैरे याचा मृत्यू उन्हामुळे सुध्दा होऊ शकतो.

**श्री.जयवंत ओक :** मागील काही दिवसांपुर्वी हत्ती मृत्यूमुखी पडला आणखी एक हत्ती मागवावा.

**संचालक प्राणी संग्रहालय :** दिल्लीला परवानगी मागविली आहे.

**मा.सभापती :** परवानगी मागविलेली आहे. परवानगी मिळाल्यानंतर मागविण्यात येईल जे प्राणी खरेदीसाठी ४० लक्ष ठेवले त्यातून खर्च करावे.

**वाचनालय / उर्दु वाचनालय**

**श्री.मधुकर सावंत :** माझ्या वार्डात दोन मजली वाचनालय आहे. परंतु बंद आहे. केव्हा सुरु करणार आहेत.

**श्री.जयवंत ओक :** खडकेश्वर येथे सर्वात मोठे वाचनालय आहे. दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम केलेले नाही. सर्वात जास्त उत्पन्न या वाचनालयापासुन मिळते.

**श्री.जगदीश सिध्द :** माझ्या वार्डात ७ वर्षापासून व्यायामशाळा,वाचनालय बांधुन पडले. सुरु केव्हा करावयाचे.

**मा.सभापती :** पान क्र.७९ ते ८० वरील १ ते १८ मंजुर करण्यात येत आहे.

**आठवडी बाजार विकसीत करणे.**

**मा.सभापती :** पान क्र. ८० वरील आठवडी बाजार विकसीत करणे. मंजुर करण्यात येते.

**अद्यावत कत्तलखाने.**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** उस्मानपुरा येथील कत्तलखाना शिफ्ट करावा. कत्तलखान्याचे अपुर्ण बांधकाम आहे. ५ लक्ष करावे.

**मा.सभापती :** ठिक आहे. ५ लक्ष तरतुद करण्यात येते.

**मटन बिफ मार्केट.**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र.**

**डॉ.आशा बिनवडे :** यात दोन संशाधन केंद्र बांधले काय उद्देश होता. उत्पन्न काय आहे. याचा खुलासा दयावा.

**प्रकल्प संचालक :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर जनशताब्दी वर्षानिमित्त बांधले. अपेक्षा अशी होती की, कायदेविषयक सल्ला सामाजिक संस्था समाजशास्त्र संशोधन एकाच ठिकाणी होईल.गेल्यावर्षी विद्यापीठातील संशोधकांची नियुक्ती केलेली होती.एक दोन संशोधक जरी आले तर उद्देश सफल होणार आहे. फक्त वाचनालय म्हणून जे काही प्रस्ताव आहे ते येत्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येणार आहे. जेणे करुन पुढील काम खऱ्या अर्थाने सुरु होईल.औरंगाबाद शहरात सहा (६) रिसर्च गाईडस आहे. त्यांना कन्सेंट दिले. मान्यता दिलेली आहे. स्विकृती दिलेली थोडया मानधनावर घेता येईल त्यांचे तसे लेखीपत्र प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये डॉ.पानतावणे तसेच सुधाताई काळदाते आहे असे ६ गाईडस आहेत.

**डॉ.आशा बिनवडे :** इमारती बांधल्या यातुन नुसते पांढरे हत्ती पोसावयाचे का? असा प्रश्न निर्माण होतो हे संशोधन केंद्र चालवणे परवडणारे आहे का?

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी निमित्त जे कार्यक्रम होतील त्यात पांढरा हत्ती पोसायचे का असे म्हणणे बरोबर नाही.

**प्रकल्प संचालक :** प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर केलेले उत्पन्न मिळेल, अपेक्षा नाही. आतापर्यंत १ कोटी पर्यंत इमारतीवर खर्च झालेला आणि इतर कामासाठी १५ लाखाची मागणी केलेली होती. वर्षभरामध्ये होणाऱ्या कामाची आखणी सुध्दा केलेली आणि गेल्या स्थायी समितीपुढे तो प्रस्ताव ठेऊन मंजूर सुध्दा झालेले आहे. तो कायम झाल्यानंतर कार्यक्रम घेता येईल. आता फक्त

कार्यक्रम आणि देखभाल दुरुस्तीसाठी २५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. येणाऱ्या सर्वसाधारण सभेत पुर्ण प्रस्ताव दिलेला संपूर्ण यादी दिलेली आहे.

**श्री.जयवंत ओक :** सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार सर्व साहित्य मिळाले का? मौलाना आझाद संशोधन केंद्रात येईल का?जनतेचा प्रतिसाद मिळतो का? किती जनता त्याचा फायदा घेत आहे. बाहेरून किती जनता लाभ घेत आहे माहिती द्यावी.

**प्रकल्प संचालक :** सर्वसाधारण सभेत तसे प्रस्ताव येणार आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करणार आहे.

**मा.सभापती :** पान क्र.११ वर दिले का मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे बांधकाम करणार आहे. त्याकरीता अर्थसंकल्पात रुपये ६०.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. या प्रकल्पाकरीता जास्त तरतुद लागल्यास उपलब्ध फरक देता येईल असे दिले. ८० लक्ष तरतुद केली असे दिले. तसेच डॉ.बाबसाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचा समावेश केलेला आहे. यात ८० लक्ष ऐवजी ४० लक्ष तरतुद करण्यात येते व पान क्र.८१ वर १९ मध्ये तिन्ही काम मिळून ३० लक्ष ऐवजी १० लक्ष करण्यात येत आहे.

**अति.शहर अभियंता :** या केंद्रात लाईन्स स्केपींगचे काम विद्युत पुरवठयाचे काम,रोड कंपाऊंडचे काम सुध्दा बाकी आहे. सर्वसाधारण सभेने १.७२ कोटीची मंजुरी दिलेली आहे. १ कोटी खर्च झाला आहे. ७२ लक्ष ऐवजी ६० लक्ष ठेवले आहे. आता ४० केल्यास काम पूर्ण होणार नाही.

**<u>विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण :</u>**

**श्री.जयवंत ओक :** ओपन स्पेस साठी जास्त तरतुद करावी. १३जागा नाही.२५० जागा आहे.

**मा.सभापती :** ५५ लक्ष तरतुद करण्यात येते. सुधारीत मध्ये प्रशासानाने ५५ लक्ष केले. मंजुर करण्यात येत आहे.

**<u>स्मशानभुमी विकास कार्यक्रम :</u>**

**श्री. सिध्द जगदीश :** यासर्व जागा महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत का?

**मा.सभापती :** सुधारीत यादीत ६ स्मशानभुमीची व कब्रस्थान ६ असे एकूण १२ केलेले आहे.

**श्री. सिध्द जगदीश :** ही कामे करणे गरजेचे नाही. स्थगीत ठेवावे. मनपाच्या जागेत नाही. वादाचा प्रश्न आहे.

**मा.सभापती :** १ ते १२ कामे स्थगीत करण्यात येत आहे.

**<u>नवीन उद्याने :</u>**

**श्री.किशोर शिंदे :** माझ्या वार्डात उद्याने आहे. विभागाचे लक्ष नाही. महानगरपालिका विकास करुन खर्च करते. जनता अतिक्रमण करीत आहे.

**मा.सभापती :** १ ते ८ कामे मंजुर करण्यात येत आहे.

**<u>सिध्दार्थ उद्यान विकास :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**<u>आयुर्वेदिक उद्यान :</u>**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** या उद्यानासाठी २ कोटी खर्च येणार आहे. उद्यान कुठे आहे. खुलासा द्यावा.

**उद्यान अधिक्षक :** आपल्याकडे सर्वच प्रकारचे गार्डनस (वनस्पती) आहेत. जी औषधी तयार करायची त्यासाठी सर्व प्लॅन्टचे संशोधन करुन लोकांना माहिती होईल असे उद्यान आहे. आयुर्वेदिक उद्यान नांव देत आहोत तेथे सुध्दा गार्डन राहणार आहे. इतर ही वनस्पती राहतील.

**मा.सभापती :** शासनाचे यासाठी अनुदान मिळते त्यासाठी १००% अनुदान मंजुर करुन घ्यावे यासाठी १ लक्षची तरतुद करण्यात येते.

**<u>बागा देखभाल व दुरुस्ती :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**श्री.किरमानी इलियास :** हर्सुल उद्यानासाठी आतापर्यंत किती खर्च केला. उत्पन्न काहीच नाही. खर्च करणे योग्य होणार आहे का? याचा विचार व्हावा.

**<u>नारेगांव ट्रिचिंग ग्राऊंड :</u>**

**श्री. सावंत मधुकर, श्री. कावडे साहेबराव :** ५ लक्ष खर्च करणार उत्पन्न काहीच नाही.रद्द करावे तरतुद ठेवू नये.

**श्री. शिंदे किशोर :**रद्द करावे. महानगरपालिकेच्या फायदयाचे नाही.

**मा.सभापती :** रद्द करण्यात येते.

**<u>पिंजरे खरेदी व दुरुस्ती :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**<u>वृक्ष-अशदान निधी</u>** :

**मा.सभापती :** मान्यता देण्यात येते.

**<u>डी पी-डी सी फंड :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते. पान क्र. ११ वर पहावे.क्र. ५वर चर्चा केली.४० लक्ष तरतुद केली आता पान क्र. १२ वरील क्र.६ वर बोलावे.

**<u>रस्ते तयार करणे :</u>**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग, श्री.नंदकुमार फुलारी :** डांबरी करणाचे रस्ते चांगले होत नाही. सिमेंट कॉंक्रीटचे करावे.

**मा.सभापती :** पान क्र. ८८ वर पहावे.

**श्री.जयवंत ओक :** एन.ओ.सी.घेऊनच काम करावे. १०,२०,३० फुट रस्त्याचे कांूक्रीट रस्ते करता येईल. डांबरीकरण व सिमेंट कॉंक्रीट यामध्ये खर्चास जास्त तफावत येत नसेल तर सर्वच रस्ते कॉंक्रीटचे करावे.

**मुख्यलेखाधिकारी :** सिमेंट रस्ते करण्यास हरकत नसावी परंतु नवीन सिमेंट रस्ते करायचे झाल्यास १ किमी रस्त्यासाठी २० लक्ष खर्च येतो. कामाची मागणी जास्त आहे.एवढी कामे करण्यासाठी ८-१० कोटी लागतील.एवढया रकमेत एकाच ठिकाणी काम होईल. तेच काम ९ लक्ष रुपयात डांबरीकरणाने होईल.

**श्री.जयवंत ओक :** एका वर्षात पुन्हा डांबरीकरणाची कामे करण्याची गरज पडत आहे. सिमेंट कॉंक्रीटची केल्यास १०-१५ वर्ष रस्ते खराब होत नाही. किती खर्च येईल. सर्वसदस्यांना माहिती दयावी तेच ते डांबरीकरण होत आहे. सर्व पुर्नडांबरीकरण करीत आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** सिमेंटची एवढया कामासाठी ८-१० कोटी लागणार आहे.या कामासाठी तदतुद आहे. म्हणून यावेळेस तरी सिमेंटचे रस्ते करण्याचा निर्णय घेता येणार नाही.

**श्री.जयवंत ओक :** जे लोक १००% बेटरमेंट चार्जेस भरतात तेथे १ कि.मी.साठी ९० लक्ष लागले तरी करण्यास हरकत नसावी. ५,७,८लक्ष ठेवल्यास कामे होतील का? यात वाढ करावी खडी रस्ते,नवीन खांडकी रस्तेच व पुर्नडांबरीकरण या तीन ही खर्च एकत्र करुन सिमेंट रस्ते करता येईल. आतापर्यंत झालेली डांबरीरस्ते वरील खर्चाचा तपशील मागवावा. ते कामे करणे गरजेचे होते का? कामाचे ठिकाणी किती खर्च झाला याचा अहवाल मागवावा. स.सदस्यांना प्रत दयावी.परिस्थिती समजेल. यापुर्वी जो खर्च झाला त्यात सिमेंटचे रस्ते झाले असते. असे माझे मत आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** जी विकास कामे प्रस्तावित केली ती ३२ कोटीची होणार आहे. पृष्ठ क्र. ६८ वर सविस्तर तक्ता दिला आहे. यातुन १२.३६ कोटीची स्पील ओव्हरची कामे होणार आहे. नवीन कामे २०.२१ कोटीची होणार आहे. पाणी पट्टीत जी वाढ दर्शविण्यात आलेली त्यातून ७ कोटीची अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे.९ कोटीची वसुली पाणीपट्टी मुळे अपेक्षित धरलेली आहे. पाणी पट्टीत वाढ केली नाही तर सुधारीत बजेटमध्ये ७ कोटीची कामे कमी होतील वाढीव तरतुदी कोणत्याही शिर्षकाखाली टाकता येणार नाही.

**मा.सभापती :** सुधारीत अंदाजपत्रकानुसार मंजुरी देण्यात येते.

**श्री.किशोर शिंदे :** माझ्या वार्डातील एक एक अधिकृत वस्तीतील कामाचा समावेश झालेला नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** ११.९४ कोटीची कामे होती, ८.८४ ची प्रस्तावित केली ३ कोटीची कामे डिलीट होणार आहे. वाढ प्रस्तावित नसल्याने करता येणार नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** पुढील वर्षात नवीन कामे करता येणार नाही असे चित्र दिसते. स्पील ओव्हरचीच कामे करण्याची वेळ येईल असे वाटते.

**मा.सभापती :** सुधारीत अंदाजपत्रकात काही सुचना करावयाच्या का? सिमेंट कॉंक्रीट रस्ते करण्याबाबत स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला, परंतु प्रशासनाने खुलासा केल्यानुसार महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असे उत्तर दिले. परंतु इतर महानगरपालिकेत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते केले जातात या महानगरपालिकेमध्ये ट्रायल बेसीसवर सिमेंट रस्ते क्रण्यासाठी १० लक्षची टोकन अमाऊंट ठेवण्यात येते. पान क्र. १२ वरील क्र."६ ला मंजुरी देण्यात येते.

<u>**विद्युत :**</u>

**डॉ.आशा बिनवडे :** पान क्र. १०९ वर क्र. ६मध्ये सारंग सोसायटी असे दिले ते शास्त्रीनगर आहे. अशी दुरुस्ती करावी.

**मा.सभापती :** सारंग ऐवजी शास्त्रीनगर वाचावे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. सोडीयम व्हेपर १००,२००,२५० लावण्यात येतात. विद्युत मंडळाचे महानगरपालिकेकडे १८० कोटी थकीत आहे.दरवर्षी त्यात वाढत आहे. एवढी मोठी रक्कम महानगरपालिका भरुन शकत नाही.महानगरपालिका संकटात आहे.सौरउर्जा प्रकल्प शहरात चालू शकतो का? खुलासा दयावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागील सर्वसाधारण सभेत ९ मी. ते १५ मी. रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे लावण्यात येऊ नये असा निर्णय झाला. त्याप्रमाणे कार्यवाही होणार आहे का?

**कार्यकारी अभियंता विद्युत :** जी कामे प्रस्तावित केली आहे. यात ठराविक व्हॅटचा लाईट लावणार असे म्हटलेले नाही. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून मायक्रोप्लॅन बघुन ७० व्हॅटपासून २५० व्हॅटपर्यंत उपलब्ध होईल. या हिशोबाने सर्व्हे करुन कमीत कमी लहान रस्त्यावर टयुब लाईट लावण्याचा प्रयत्न राहील. किती वॅटचे लावावे असे दिलेले नाही. दुसरा मुद्दा उपस्थित झाला बिल कमी येण्याच्या दृष्टीने त्या संदर्भात अभ्यास चालू आहे. आजच पुर्ण येथील कन्सलटंट येऊन गेले. सर्व ठिकाणी टायमर्स लावले जातील. ज्या बेसिक दुरुस्त्या आहे त्या कराव्या लागणार आहे.

**श्री.जयवंत ओक :** केंद्र शासनाची मान्यता घेवून केंद्रात उर्जा मंत्री याच राजयाचे आहेत. त्यांच्याकडून तात्काळ काम करुन घ्यावे. नसता पवन उर्जा पध्दतीबद्दल उपाययोजना करावी.

**मा.सभापती :** सौर उर्जा प्रकल्प करुन तात्काळ राबविता येईल. त्यासाठी प्रयत्न करावे.

**श्री. सिध्द जगदीश :** मागील एका बैठकीत ९ मी. रस्त्यावर टयुब लाईट लावण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला आतापर्यंत किती टयुब लाईट लावण्यात आल्या १५ मी.पेक्षा जास्त रुंद रस्त्यावर किती सोडीयम व्हेपर दिवे लावले.

**कार्यकारी अभियंता विद्युत :** ५०% सर्व्हे झालेला कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.जयवंत ओक :** नवीन इमारतीसाठी सौर उर्जा प्रकल्प राबवावा.

**कार्यकारी अभियंता (विद्युत) :** नवीन प्रशासकीय इमारतीत सौर उर्जा प्रकल्प राबविणार आहे.प्राथमिक अहवाल मा.आयुक्तांना सादर केलेला आहे.

**मा.सभापती :** सौर उर्जा प्रकल्पाबाबत चर्चा होत आहे. जेष्ठ सदस्य यांनी चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. औरंगाबाद,पुणे रस्त्यावर सुप्याजवळ पवन उर्जा प्रकल्प आहे. नातेवाईकांन एक फॅन बुक करुन घेतलेला आहे.एक फॅनची किंमत ६ कोटी आहे. मार्चपर्यंत ज्यांनी पैसे भरले तर सेल टॅक्स व इन्कम टॅक्स मध्ये देखील सवलत आहे. महानगरपालिकेच्या बाबतीत मी चर्चा केली होती त्यास सबसीडी आहे. हे महानगरपालिकेच्या आर्थिक हितास परवडणारे नाही.तरी सुध्दा मुद्दा उपस्थित केला. लातुर येथील एम.आय.डी.सी.मध्ये मा.मुख्यमंत्री यांनी हा प्रकल्प आणलेला आहे. केंद्र शासनाचे यास ६५% अनुदान असते. या प्रकल्पानुसार महानगरपालिकेस करता येईल का याबाबतीत प्रयत्न करावे. आताच सुचना केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील मंत्री महोदय श्री. सुरेश प्रभु हे केंद्रात उर्जामंत्री आहे. तसेच राज्यमंत्री म्हणून जयंतीबेन मेहता यांच्याकडे या प्रकल्पासाठी प्रयत्न केले जातील. हा प्रोजेक्ट दिल्लीला पाठवून मंजुरी घेतली जाईल.

**श्री.सावंत मधुकर :** माझ्या वार्डात एकही पोल टाकलेले नाही. पोल शिफ्टींगसाठी एम.एस.ई.बी.कडे पैसा भरणा केलेले होते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागील वेळेस पोल शिफ्टींगसाठी २५ लक्ष ठेवले होते.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा दयावा.

**उप अभियंता विद्युत :** जवळपास २९४ पोलचे १३.८४ लक्ष रक्कम एम.एस.इ.बी.कडे भरलेले आहे. त्यापैकी सध्या १०० पोलचे काम पुर्ण झालेले आहे. नवीन पोल त्यांच्याकडे उपलब्ध नाही. यासंदर्भात वेळोवेळी झालेल्या मा.आयुक्त

यांच्याकडे ही बैठका झालेल्या आहे. नवीन पोल आल्यास काम सुरु करण्यात येईल असे उत्तर मिळाले होते. एम.एस.इ.बी.हा विभाग संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागणारा पोल साठा खरेदी होतो तो न आल्यामुळे काम अपुर्ण राहिलेले आहे. पोल शिफ्टींगचे ७६ पोलचे जवळपास १० लक्ष रुपये भरलेले आहे. त्यापैकी ३४ पोल शिफ्ट केले. ४२ पोल शिफ्ट करायचे बाकी आहे.

**मा.सभापती :** पोल सिस्टीम बाबत एम.एस.इ.बी.कडे भेटी देऊन तात्काळ कार्यवाही करावे.

**श्री. इलियास किरमानी :** विद्यापीठ ते लिटलफ्लॉवर या रस्त्यावर दोन्ही बाजुने विद्युत दिवे असतांना पान क्र. १०९ पुन्हा दिवे लावण्याबाबत प्रस्तावित केले.

**मा.सभापती :** खुलासा करण्यात यावा.

**उप अभियंता (विद्युत) :** दोन्ही बाजूने पोल नाही. एकाच बाजुने दिवे लावलेले आहे.प्रस्ताव मध्यभागी दिवे लावायचा आहे.

**मा.सभापती :** दोन्ही बाजुने लाईट असतील रद्द करावे. त्या रकमेत दुसरे काम करण्यात यावे. प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**८) <u>सुलभ शौचालय आणि स्त्री-पुरुषाकरीता मुताऱ्या बांधणे :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**९) <u>नवीन उद्याने</u> :**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**१०) <u>इतर विकास इमारती :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**११) <u>इतर भांडवली कामे :</u>**

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**मुख्यलेखाधिकारी :** इतर मनपातसुध्दा या पध्दतीने स्वेच्छा निधी ठेवलेला आहे. नवीन २ कोटी रुपये निधी राहील. नियमावली दिलेली आहे. त्याप्रमाणे स्वेच्छा निधीतून कामे करता येतील. नियमावलीची प्रत सर्व स.सदस्यांना दिलेली आहे.

**मा.सभापती :** नियमाने तरतुद वाढविता येत असेल तर वाढवावी.

**१४) <u>पुर नियंत्रण कामे :</u>**

**श्री.जयवंत ओक :** नाल्याच्या कडेला जे गरीब लोक राहतात. वेळोवेळी नाला साफसफाई झाली पाहीजे. दरवर्षी किती खर्च केला जातो.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** कांचनवाडी नाला साफसफाईचे काम कसे झाले. इतर कामे का झालेली नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** ८ लक्षांची निविदा प्रस्तावित केलेली होती. ८ लक्ष रुपये खर्च केलेले आहे.

**अति.शहर अभियंता :** स्पील ओव्हरची कामे आहेत. नवीन काम नाही. म्हणून सादर केलेले आहे.जी कामे ३१ मार्च पर्यंत पूर्ण करुन शकलो नाही तशा कामाचा समावेश केलेला आहे.

**श्री.जयवंत ओक :** ८-१० लक्ष खर्च करतो परंतु साफसफाई झाल्याचे दिसून येत नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** प्रत्येक वर्षी सर्वच नाल्याची सफाई केली जात नाही.

**श्री.जयवंत ओक :** १२ लक्षचे नाला सफाई करण्याचे मशीन घेतले. त्याचा वापर करावा. सर्वच नाले साफसफाई करावे. का काम सुरु केलेले नाही.

**अति.शहर अभियंता :** आताच स.सदस्य श्री.जयवंत ओक यांनी सुचना केल्याप्रमाणे सदर मशीनचे ट्रायल मनपाच्या इमारतीच्या बाजुला असलेल्या नाला सफाईसाठी घेतले होते. जे नाले ओपन व त्या मशीनसाठी जाण्यास जागा आहे.तेथेच साफसफाई मशीनद्वारे होऊ शकते. लहान नाल्यात मशीनने साफसफाई होत नाही. उदा.औषधी भवनजवळ खाली नाला आहे. तेथे मशीन जाऊ शकत नाही. सदर मशीनची किंमत ९.८० लक्ष एवढी आहे.

**श्री.जयवंत ओक :** आरोग्य विभागाकडून खुलासा घ्यावा. लहान नाल्याची सुध्दा या मशीनद्वारे साफसफाई होते. तोपर्यंत मोठमोठया नाल्याची सफाई व्हावी.

**जीवशास्त्रज्ञ (बायोलॉजीस्ट) :** शहरातील १०-१५ नाले साफसफाईचे आहे. त्याचे क्षेत्र जवळपास ५० कि.मी.पेक्षा जास्त आहे. नाले साफ करण्यासाठी ३ टीम आहेत. त्यांचेकडून साफसफाई करुन घेतली जाते. खरा प्रश्न पावसाळयामध्ये येतो. पाऊस जास्त झाला की नाले तुडुंब भरुन वाहतात व आजुबाजूला नाल्याच्या कडेला जी जनता राहते त्यांचे घरामध्ये सरळ पाणी जाते. त्यामुळे साथीचे रोग पसरतात. गॅस्ट्रो,कॉलरा,मलेरिया सारखे आजार होतात. एक मशीन मार्केटमध्ये आलेली आहे. ही मशीन कसल्याही नाल्यामध्ये उतरते. नाल्यातील संपुर्ण साठलेला गाळ बाहेर काढु शकते. खोली वाढली तर जास्तीत जास्त पाणी जाऊ शकेल व पावसाळयामध्ये लोकांच्या घरात पाणी जाणार नाही. एकदा मशीन खरेदी केली की, दरवर्षी मनुष्य बळाचा वा इतर खर्च वाचेल. मागील वर्षी या मशीनची किंमत १७ लक्ष पर्यंत होती. ८० ते ९०% नाल्यामध्ये ही मशीन जाऊ शकते. प्रत्यक्ष बघायचे झाल्यास टाऊन हॉल जवळच्या नाल्याची साफसफाई होणार आहे. त्यावेळी सर्वांनी प्रत्यक्ष बघावे.

**मा.सभापती :** ५ लक्षची टोकन अमाऊंट ठेवण्यात येते.

**१५) <u>क्रिडा संकुले व बांधकाम :</u>**

**मा.सभापती :** गरवारे क्रिडा संकुल साठी मनपा व शासन मिळुन प्रोजेक्ट राबविणार आहोत. दरवर्षीप्रमाणे महापौर स्पर्धा घेतल्या. त्यात अंध-अपंग साठीच्या स्पर्धा मराठवाडा पातळीवर घेण्यात आल्या. पुढील वर्षी महाराष्ट्र पातळीवर घेण्याचा प्रयत्न होईल. तसे मा.महापौर यांना विनंती केली जाईल. कबड्डी,खो-खो या स्पर्धा कुठेही होतात. परंतु अंध-अपंग साठीच्या होत नाहीत. मराठवाडा पातळीवर आपण घेतल्या. यात त्याचा समावेश करावा.

**१६) <u>विविध क्रिडा स्पर्धा आयोजन करणे :</u>**

**मा.सभापती :** यात हॉकी आणि बुध्दीबळ स्पर्धेचा समावेश करावा.

**१७) <u>विशेष शासकीय अनुदानातील विकासाची कामे :</u>**

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**१८) <u>सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे :</u>**

**श्री.जयवंत ओक :** यात संगीत महोत्सवाचा समावेश करावा.

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते. यात संगीत महोत्सवाचा समावेश करावा.

**१९) <u>घर बांधणी / वाहन खरेदी अग्रीम :</u>**

**मा.सभापती :** घर बांधणी अग्रीम वाहन खरेदी अग्रीम,सणानिमित्त अग्रीम रद्द करण्यात येते. इतर अस्थायी अग्रीम मंजुरी करण्यात येते.

**२०) <u>शिक्षण :</u>**

**श्री.जगदीश सिध्द :** पुर्वीपेक्षा शाळेचा दर्जा सुधारलेला आहे का?

**मुख्यलेखाधिकारी :** पृष्ठ क्र. ४६ वर सर्व तक्ता दिलेला आहे. एकूण ९.९५ कोटी खर्च असुन ९.९५ कोटी खर्च वेतनावर होतो. ७० लक्ष इतका खर्च केला जातो.

**डॉ.आशा बिनवडे :** पगारावर व इतर खर्च जवळपास १० कोटी होत असतांना माझ्या वार्डात दोन शाळा आहेत.मुलांना बसण्यासाठी आसनपट्टया नाहीत.

**मुख्यलेखाधिकारी :** फर्निचर खरेदीवर ५ लक्ष खर्च होतात. स्वतंत्र तरतुद केलेली आहे. ४०० आसनपट्टया चालु आर्थिक वर्षात देण्यासाठी हर्सुल कारागृहातून मागविलेल्या आहेत. त्या वितरीत करण्यात येतील. शालेय इमारतीसाठी २५ लक्ष दिलेले एप्रिल नंतर संपूर्ण कामे हाती घेतली जातील.

**मा.सभापती :** प्रकल्प संचालक यांचे निदर्शनास आणुन देतो की, ज्यावेळी शिक्षक पुरस्कार योजना राबविता त्यावेळीच मनपातील अग्निशमन विभागातील दोन कर्मचारी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. त्यांचा शिक्षक पुरस्काराच्या वेळी सन्मान करण्यात यावा. तसेच शाळा दुरुस्तीसाठी २५ लक्ष ठेवले होते. शिक्षण करात वाढ केलेली असल्याने ३० लक्ष शाळेच्या देखभाल दुरुस्तीसाठी ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री.जगदीश सिध्द :** किती मुलांना स्कॉलरशीप दिली त्याची यादी द्यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांना शिक्षणाधिकारी यांनी यादी द्यावी.

**२१) <u>डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना :</u>**

**श्री. मधुकर सावंत :** गणवेश वेळेवर मिळत नाही. वर्षाच्या शेवटी मिळाले.आर्थिक वर्ष संपताच निविदा काढावी.

**मा.सभापती :** १५ ऑगस्टपुर्वी विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात यावे. दरवर्षी प्रमाणे उशीर होऊ देऊ नये. मंजुरी देण्यात येते.

**२२) <u>विकास आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी जमीन आणि इतर मालमत्ता संपादन करणे :</u>**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** शहरातील जुना भाग विकसीत करण्याच्या दृष्टीने वाढती लोकसंख्येचा विचार करुन काही रस्ते विकसीत करणे गरजेचे आहे.त्यात बाब पेट्रोल पंप ते दिल्ली गेट व रेल्वेस्टेशन ते चिकलठाणा हे रस्ते विकसित करावे. जी तरतुद केली ती कमी ठेवलेली आहे. गेल्या वर्षी ६

कोटी ठेवले होते. यात जास्तीत जास्त तरतुद करावी.३०० वर्षापुर्वीचे रस्ते आहेत. त्यात काजीवाडा ते फाजलपुरा रस्ता रुंदीकरण, राजाबाजार,सुपारी हनुमान ते चौराहा, औरंगपुरा ते जुना मोंढा असे चार रस्ते रुंदीकरण करावेत.

**श्री. <u>अशरफ मोतीवाला</u> :** खासगेट ते दिल्ली गेट हा रस्ता देखील रुंद करावा.

**श्री.जयवंत ओक :** विकास आराखडया संदर्भात न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. जी तरतुद केली त्यात खाजगी जमीनीवरचे रस्ते विकसित करायचे नाही. जे ९ मी.रुंद रस्ते आहेत ते विकसित करायचे आहेत. मोबदला दिल्याशिवाय कुणी जागा देणार नाही. नसता जनतेला धाक दाखवायचा का? गेल्या वेळेस ७.५० कोटी ठेवले होते. १ कोटीमध्ये रस्ते रिकामे होणार नाही. ही तरतुद कमी आहे. भाजी मंडई ते देना बँक हा रस्ता यात घेण्यात यावा. मोबदला दिलेला असे समजते. जागा ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करावी. तरतुद वाढवावी. रक्कम दिल्याशिवाय कुणाच्या मालमत्तेचे नुकसान करु नये. अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** १ कोटीची तरतुद केलेली आहे. रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी महापौर दालनात बैठकीसाठी आले होते. रोशनगेट ते किराडपुरा हा रस्ता रस्ते विकास महामंडळाने विकास करण्यासाठी टेंडर कॉल केलेले आहे. परंतु त्या रस्त्यावरील मालमत्ता भुसंपादन केलेल्या नाही म्हणून टेंडरसुध्दा रद्द होऊ शकेल. यात मनपाचे ५० ते ६० लक्षचे रस्त्याचे काम होणार होते.जी काही कार्यवाही करायची असते ती योग्य पध्दतीने केली पाहीजे. यापुर्वीचे ते उपसंचालक नगररचना श्री.गोसावी यांनी टी.डी.आर मुद्दा उपस्थित केला होता. त्यापासुन मनपाचा फायदा आहे. नाशिक मनपाचा अभ्यास केला तर श्री. भोगे साहेबांनी नाशिक मनपामध्ये ५० कोटीची मालमत्ता टी.डी.आर.मध्ये हस्तांतर करुन कायापालट केला. टी.डी.आर.पध्दत स.सदस्यांनी चांगल्या प्रकारे समजुन घेतली तर फार मोठी कामे होऊ शकतील. उत्पन्न मिळेल हा त्यामागचा उद्देश नाही. नगररचना विभागाने तशी टिप्पणी सर्व स.सदस्यांना द्यावी. १ कोटी ऐवजी २ कोटी तरतुद करण्यात येत आहे.

**२३) <u>महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण :</u>**

**श्री.जयवंत ओक :** पाणीपट्टी,मालमत्ता कराचे संगणकीकरण करावे.

**मुख्यलेखाधिकारी :** सर्वच विभागाचे संगणकीरकण करणार आहोत.यासाठी ५० लक्ष तरतूद ठेवलेली आहे.संगणक चालविण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहोत.

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**२४) <u>महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी संगणक प्रशिक्षण देणे :</u>**

**मुख्यलेखाधिकारी :** शासनाने काही मार्गदर्शक तत्वे या संदर्भात दिलेली आहेत. त्या तत्वाला अनुसरुन मनपा स्वतः निविदा काढणार आहे. व्यवसायातील प्रशिक्षित संस्थेकडूनच ही कार्यवाही करावी लागणार आहे.

**मा.सभापती :** मंजुरी देण्यात येते.

**२५) <u>महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देणे :</u>**

**मा.सभापती :** मंजुर

**डॉ.आशा बिनवडे :** गजानन महाराज मंदीर रस्त्यावर पॅचवर्कचे काम मोठया प्रमाणात आहे.विभाग क्र. ४ मध्ये कमी रक्कम दर्शविलेली आहे. पान क्र. ९१ वर दिले. विषय क्र.४ च्या संदर्भात बोलत आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** सर्वच विभागांना सारखीच तरतुद केलेली आहे. झोन क्र. ४ध्ये ४ लक्ष,३ लक्ष असे दोन भाग नमुद केलेले आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** अग्निशमन विभागासाठी रस्क्यु व्हॅन,खरेदीसाठी ६० लक्ष तरतुद केलेली आहे. वैधानिक विकास मंडळ अनुदान देणार का?

**मुख्यलेखाधिकारी :** दोन वर्षापुर्वी दुकान भाडयाचे दर वाढविलेले आहे. दर पाच वर्षांनी सर्व्हेक्षण करतील म्हणून तरतुद केलेली आहे. ६० लक्ष मनपा फंडातून तरतुद केलेली आहे. वैधानिक विकास मंडळाकडून नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** रिक्षा खरेदीचा प्रस्ताव मंजूर केला होता. अद्याप कार्यवाही नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** रिक्षा खरेदी केल्यास अस्थापनेवरील खर्च वाढतो. त्यास एक वाहन चालक लागेल आणि सध्या दै.वेतनावरसुध्दा कर्मचारी घेऊ नये असे शासनाचे निर्देश आहेत. त्यामुळे सध्या खरेदी न करण्याचे प्रशासनाचे मत आहे.

**मा.सभापती :** प्रत्येक बैठकीत रिक्षा खरेदीचा प्रश्न उपस्थित होतो. प्रथम समितीच्या बैठकीत सुध्दा प्रश्न उपस्थित केला होता. लहान गल्ल्यामध्ये मोठया गाडया जात नाही म्हणून या बजेटमध्ये रिक्षा खरेदीसाठी २ लक्षची तरतुद करण्यात येत आहे. उत्पन्न आणि खर्च या विषयावर सविस्तर चर्चा घडुन आणली त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो. प्रशासनाची आकडेवारी व सभागृहाने ठरविलेली आकडेवारी यात वाढ दिसुन येत आहे. काही सदस्यांनी काम सुचविले आहे.५-६ सदस्यांची कमिटी केली होती. त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून काही कामाची यादी सादर केलेली आहे. ही यादी प्रशासनाकडे देण्यात येते.या कामाचा या अर्थसंकल्पामध्ये समावेश करावा. मनपाची कामाची परिस्थिती पाहता कामाचा व्याप जास्त व कर्मचारी वर्ग कमी दिसुन येतो. खाजगीकरण मार्फत पाणी पट्टी वसुली व मालमत्ता कर वसुल करण्याचा कालच निर्णय घेतलेला आहे. मायकोप्लून नुसार नियोजन केल्यास जो कर्मचारी वर्ग आहे तो फक्त ४० ते ५० वार्डासाठी पुरेसा होऊ शकतो.याचा अर्थ उर्वरीत वार्डाचे सुध्दा काम त्याच कर्मचाऱ्यांकडून करुन घेतली जाते सिडको-हडको भागात बोल्ट पध्दतीने किंवा टेंडर पध्दतीने साफ सफाई होते.त्या पहिले ५ वार्ड कर वसुलीत असतील.

त्या वार्डात बोल्ट पध्दतीने घंटा गाडीच्या माध्यमातून सफसफाईची कार्यवाही करणार आहोत. तसेच सिडको सारखेच ५ वार्डाचे विद्युत देखभाल दुरुस्तीचे खाजगी अभिकर्त्यामार्फत कार्यवाही केल्यास फार मोठा फायदा मनपास होणार आहे.यासाठी कार्यवाही करावी.त्याचप्रमाणे ५% मुलभूत घटक योजनेच्या अंतर्गत जे मुक बधीर व अपंग विद्यार्थी असतील त्यांचेसाठी जे अपंग असतील त्यांना कुबडया व ज्यांना कमी ऐकायला येते त्यांना हेअर-केअर यंत्र मनपातर्फे ९०% अनुदानावर देण्याचा निर्णय देत आहोत. त्यासाठी या बजेटमध्ये २ लक्ष रुपयांची तरतुद करण्यात येत आहे.ज्या सुचना प्रशासनाला करण्यात आल्या त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सर्व पदाधिकारी / नगरसेवक यांचे सहकार्य राहील.

तसेच ज्योतीनगर येथील स्वीमींगपुल केंद्र शासनाच्या अनुदान योजनेमार्फत करणार त्यासाठी पाच लक्षची टोकन अमाऊंट ठेवण्यात येते. तसेच सिडकोच्या नाटयगृहासाठी टोकन अमाऊंट ठेवण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आलेले सन २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक रु. ९७ कोटी ११ लाख ५० हजार एकूण जमा व रु. ९६ कोटी ९९ लाख ८० हजार खर्च व रु.११ लाख ७० हजार शिलकी आणि सन २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रक रु. १२१ कोटी २८ लाख ८५ हजार खर्चास व रु. २८ लाख ३० हजारच्या शिलकी अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येवून सभागृहात आलेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन २००२-२००३ वर्षाकरीता सभागहासमोर सादरकरण्यात आलेल्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे फेरफार व दुरुस्ती करण्यात येते व ठरावास फेरफार / दुरुस्तीसह मान्यता प्रदान करुन त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**अ) जमा बाजु**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १) | जकात | ६१ कोटी | ६२ कोटी | १ कोटी |
| २) | मालमत्ता कर | १५ कोटी | १७ कोटी | २ कोटी |
| ३) | पाणीपट्टी | १३ कोटी | १४ कोटी | १ कोटी |

**ब) खर्च बाजु (आकडे हजारात)**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १) | वेतन व थकबाकी | ३८७०४५ | ३७२०४५ | १५००० |
| २) | घरबांधणी व खरेदी अग्रीम | ४००० | ------ | ४००० |
| ३) | वाहन खरेदीसाठी अग्रीम | १५०० | -------- | १५०० |

**क) खर्च बाजु (आकडे हजारात )**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १) | रिक्षा खरेदी | निरंक | २०० | २०० |
| २) | नाला सफाईसाठी नवीन मशीन खरेदी करणे | निरंक | १५०० | १५०० |
| ३) | डिफर पेमेंट | निरंक | २५०० | २५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सिमेंट कॉंक्रीट रोड | | | |
| ४) | सिडको नाटयगृह | निरंक | ५०० | ५०० |
| ५) | हर्सुल प्रभागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे | १०० | ३०० | २०० |
| ६) | विद्युत साहित्य खरेदी | ३५०० | ५००० | १५०० |
| ७) | श्रवणयंत्र खरेदी करणे | निरंक | २०० | २०० |
| ८) | भुसंपादन करणे | १०००० | ३८५०० | २८५०० |

**प्रशासनाने प्रस्तावित केलेली परंतु स्थायी समितीने रद्द केलेली कामे : (आकडे हजारात)**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | विकास इमारती,शाळा दवाखाने | |
| १) | हत्तेसिंगपुरा पाण्याच्या टाकीजवळ शाळा बांधणे. | २००० |
| २) | राजनगर येथे मनपा शाळेस दोन खोल्यांचे वाढ करणे. | ४०० |
| ३) | गणेश कॉलनी मनपा शाळेस खोल्यांची वाढ करणे | ४०० |
| ४) | शहाबाजार मनपा शाळेस खोल्यांची वाढ करणे | ४०० |
| ५) | नारेगाव मनपा शाळेस खोल्यांची वाढ करणे | ६०० |
| ६) | पडेगाव मनपा शाळेस खोल्यांची वाढ करणे | ४०० |
| ७) | कांचनवाडी मनपा शाळेवर पहिल मजला बांधणे | १००० |
| | **एकूण** | **५२००** |

**वाचनालय /उर्दु वाचनालय**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | विकास इमारती,शाळा दवाखाने | |
| १) | ब्रिजवाडी येथे वाचनालय बांधणे | ४५० |
| २) | समर्थनगर येथे वाचनालय बांधणे | ४५० |
| | **एकूण** | **९००** |

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | संशोधन केंद्रातील वसतीगृहाचे वाढीव काम करणे.स्मशानभुमी विकास कार्यक्रम | ५०० |
| १) | नारेगांव येथील दशनाम गोसावी हिंदु | १००० |

| | | |
|---|---|---|
| | स्मशानभुमी व मुस्लीम कब्रस्थान विकसित करणे. | |
| २) | गंजे शहीदा कब्रस्थानची संरक्षित भिंतीची उंची वाढविणे. | ३०० |
| ३) | गारखेडा गावाजवळील कब्रस्थानास सरंक्षित भिंत बांधणे | ३२८ |
| ४) | गरवडीपिरकब्रस्थान,शहानुरवाडी,शहानुर मियाँ दर्गा सरंक्षित भिंत बांधणे. | २७२ |
| ५) | पडेगांव स्मशानभुमी संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व दुरुस्ती करणे. | १५० |
| ६) | ब्रिजवाडी कब्रस्थान संरक्षित भिंत व तार कुंपन करणे व इतर काम करणे. | ३०० |
| ७) | गादिया विहार येथील स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधणे | १५० |
| ८) | इटखेडा स्मशानभुमी विकसित करणे | २५१ |
| ९) | हर्सुल येथे धनगर समाज स्मशानभुमीस रेस्टींग शेड बांधणे. | १२० |
| १०) | मसनतपुर येथे लहान मुलांच्या स्मशानभुमीस संरक्षित भिंत बांधणे | ११३ |
| ११) | मुकुंदवाडी कब्रस्थाना अंतर्गत कॉंक्रीट रोड व ओटा बांधणे | ५० |
| १२) | कांचनवाडी मनपा स्मशानभुमीचा विकास करणे | १५० |
| | **एकूण** | **३१८४** |

**प्राणी संग्रहालय विकसित करणे.**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राणी संग्रहालय कार्यालयावर पहिला मजला बांधणे. | ४०० |

स्थायी समितीने सुचविलेले नवीन प्रस्ताव :

**मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी वर व्याज आकारणी :**

| पहिला प्रस्ताव | प्रशासनातर्फे प्रस्तापित | स्थायी समितीचे शिफारस केलेले |
|---|---|---|
| | जे नागरीक खालील निर्धारीत वेळेच्या आत मालमत्ता कराचा पुर्ण भरणा करतील त्यांना खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल. | |
| १) | ३० जुन पुर्वी थकबाकीसह पुर्ण रकमेचा भरणा केल्यास चालु मागणीवर ५% सवलत. | ६% |

| | | |
|---|---|---|
| २) | ३१ जुलै पुर्वी थकबाकीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यास चालु मागणीवर ४% सवलत. | ५% |
| ३) | ३१ ऑगस्ट पुर्वी थकबाकीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यास चालु मागणीवर ३% सवलत. | ४% |
| ४) | ३० सप्टेंबर पुर्वी थकबाकीसह पुर्ण रकमेचा भरणा केल्यास चालु मागणीवर २% सवलत. | ३% |
| ५) | ३१ ऑक्टोंबर पुर्वी थकबाकीसह पुर्ण रकमेचा भरणा केल्यास चालु मागणीवर १% सवलत. | २% |

या सवलतीमुळे शहरातील नागरीक मालमत्ता कराचा लवकरात लवकर भरणा करतील अशी अपेक्षा आहे.

**दुसरा प्रस्ताव :**

| | | |
|---|---|---|
| | ज्या नागरीकांकडे मोठया प्रमाणात मालमत्ता कर व पाणीपट्टी मोठया प्रमाणावर बाकी आहे व जे नागरीक वेळोवेळी नोटीस देवून ही मालमत्ता कराचा व पाणी पट्टीचा भरणा करीता नाही अशा नागरीकांना थकीत रकमेवर द.सा.द.शे.१५%व्याज आकरणी ३१ मार्च २००२ रोजी थकीत असलेल्या रकमेवर १ एप्रिल २००२ पासून करण्यात येईल. | द.सा.द.शे.१०% दराने व्याज आकारणी करणे. |

**स्थायी समितीने सुचविलेले नवीन प्रस्ताव :**

१) कराधान नियम २१ नुसार दर ४ वर्षांनी मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यात यावे.
२) पाणीपट्टी वसुली ही खाजगी अभिकर्त्यामार्फत प्रायोगिक तत्वावर करता येईल का? ही बाब तपासून २ ते ३ विभागामध्ये (झोनमध्ये) ही पध्दत अवलंबविण्यात यावी.
३) प्रायोगिक तत्वावर खाजगीकरणातुन ५ वार्डाची साफसफाई करण्यात यावी.
४) एका विभागाची (झोन) विद्युत देखभालप व दुरुस्ती खाजगी तत्वावर करण्यात यावी.
५) कर्ण बधिरांना महानगरपालिकेतर्फे ९०% अनुदान व संबंधितांना १०% वाटा या तत्वावर श्रवणयंत्र पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. याकरीता रु. २.०० लाखाची तरतुद करण्यात आली.
६) नाला सफाई व गाळ काढण्याकरीता अद्यावत मशिनरी इतरत्र उपलब्ध आहेत. त्यानुसार एक मशीन महानगरपालिकेमध्ये खरेदी करण्यात यावी.
७) डिफर पेमेंट तत्वावर शहरात सिमेंट कॉंक्रीट रोड बांधण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.
८) महापौर चषक क्रिडा स्पर्धातंर्गत हाकी / बुध्दीबळ व अपंगाचे राज्यस्तरीय स्पर्धेचा समावेश करण्यात यावा.

९) संगणक प्रशिक्षण हे १ ते ३ संवर्गातील सर्व अधिकारी /कर्मचारी यांना देण्यात यावे.

१०) पाणीपट्टी वाढीच्या प्रस्तवावर स्थायी समितीत कोणताही निर्णय न घेता सर्व साधारण सभेच्या विचारार्थ प्रस्ताव वर्ग करण्यात येतो.

११) स्थायी समितीने काही उत्पन्नाच्या बाबीमध्ये वाढ सुचविली आहे.त्या अनुषंगाने खर्चाच्या बाबींमध्ये उपरोक्त प्रमाणे वाढ सुचवुन सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात एकूण रु. २,६१,५५,०००/- इतक्या रकमेचे विविध लेखा शिर्षातंर्गत ६४ नवीन कामांचा समावेश केलेला आहे.त्याचा तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे.

दिनांक १३-३-२००२ च्या विशेष अर्थसंकल्पीय स्थायी समितीच्या बैठकीत स्थायी समितीने प्रस्तावित केलेली नवीन कामे.

| | | | | आकडे हजारात |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | विभाग | लेखाशिर्ष | अंदाजीत रक्कम |
| १) | चिकलठाणा आठवडी बाजारात जाण्यासाठी पुल बांधणे. | अ.श.अ. | खडी रस्ते व कल्व्हर्ट | ५०० |
| २) | चिकलठाणा स्मशानभुमी विकसित करणे. | श.अ. | स्मशानभुमी विकास | १०० |
| ३) | सुराणानगर येथे नविन ड्रेनेज लाईन टाकणे. | का.अ.(ड्रे.) | भांडवली जलनिःसारण | २०० |
| ४) | बालाजीनगर विहीर पा.पु.यो. | का.अ.(पापु .) | देखभाल दुरुस्ती पाणी. | ३०० |
| ५) | स.न.९ व ९/२ मध्ये रस्ते तयार करणे. | अ.श.अ. | खडी रस्ते व कल्व्हर्ट | ८०० |
| ६) | समता नगर येथे सिमेंट रोड तयार करणे. | का.अ.(स्लम) | सिमेंट कॉंक्रीट रोड | ५०० |
| ७) | मसनतपुर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | का.अ.(स्लम) | नवीन डांबरी रस्ते स्लम. | ५०० |
| ८) | एन-४,एच-१ मध्ये ५०० रनिंग मी.१०० मी.मी. व्यासाची लाईन टाकणे. | का.अ.पापु. | पापु.देखभाल दुरुस्ती | ५०० |
| ९) | ज्योतीनगर,दशमेशनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. | का.अ.ज.नि. | नाला ट्रेनिंग | ८०० |
| १०) | ज्योतीनगर येथे जलतरण तलाव बांधणे. | अ.श.अ. | जलतरण तलाव | ५०० |
| ११) | मोंढनाका ते जाफरगेट या रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकणे. | अ.श.अ. | शहर सौंदर्यीकरण | २०० |
| १२) | कैलासनगर येथील ५ फुट रुंद गल्ली क्र.१,२,३ मध्ये कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | अ.श.अ. | खांडकी /कॉंक्रीट रोड | १५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३) | उल्कानगरी ओंकारेश्वर मंदीर स्नेहवर्धिनी कॉलनी,भगवती कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | श.अ. | वि.यो.अ.भुखंड | ७०० |
| १४) | श्रेयनगर येथील झांबड इस्टेट पासुन नाल्यापर्यंत कॉंक्रीटची सहिड ड्रेन बांधणे. | का.अ.ज.नि.<br>ा. | खुल्या गटारी | ३०० |
| १५) | सिडको भागात नाटयगृह बांधणे. | अ.श.अ. | नाटयगृह बांधकाम | ५०० |
| १६) | चेलीपुरा ते गणेश कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| १७) | एन-७ येथील चर्चपासुन ते एन-८ ३०० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकणे. | का.अ.(पापु.) | भांडवली कामे (पापु.) | ५०० |
| १८) | इंदिरानगर न्यु बायजीपुरा येथे शाळेसाइी जागा संपादित करणे. | नगररचना | भुसंपादन करणे. | ५०० |
| १९) | केसरसिंगपुरा येथे खुल्या जागेत उद्यान विकसित करणे. | श.अ. | नवीन उद्यान | ३०० |
| २०) | क्रांतीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | श.अ. | भुखंडाचे संरक्षण | ४०० |
| २१) | भोईवाडा पाणी पुरवठयाची व्यवस्था सुरळीत करणे. | का.अ.(पापु.) | देखभाल व दुरुस्ती | ३०० |
| २२) | नंदनवन कॉलनीत पाणी पुरवठयाची व्यवस्था सुरळीत करणे. | का.अ.(पापु.) | देखभाल व दुरुस्ती | ४०० |
| २३) | पिसादेवी ते हर्सुल रस्त्याचे खडीकरण /डांबरीकरण करणे | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| २४) | गुरुगणेशनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | डांबरीकरण | ८०० |
| २५) | भिमनगर भावसिंगपुरा मुख्य रस्ता लगत सुलभ | श.अ. | सुलभ शौचालय | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शौचालय बांधणे. | | | |
| २६) | माळेगल्ली,बेगमपुरा भागात नवीन पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे. | का.अ.(पापु.) | भांडवली कामे (पापु.) | १५० |
| २७) | आंबेडकर नगर येथील बुध्दविहारास प्रवेशद्वार बांधणे. | श.अ.श. | शहर सौंदर्यीकरण | १३५ |
| २८) | गारखेडा-देशमुखनगर भागात नवीन डांबरीकरण करणे. | श.अ.श. | नवीन डांबरीकरण | १००० |
| २९) | रेंगटीपुरा ते खासगेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| ३०) | तेलंगवाडा भागातील गल्ल्यामध्ये कॉंक्रीटींग करणे. | अ.श.अ. | खांडकी / कॉंक्रीट | १५० |
| ३१) | दत्तानगर येथील विहीर साफ करणे. | का.अ.(पापु.) | पापु.देखभाल दुरुस्ती | ७० |
| ३२) | शहाबाजार भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ३०० |
| ३३) | शहाबाजार भागात ज.नि.वाहीनी टाकणे. | का.अ.ज.नि. | भांडवली कामे ज.नि. | २०० |
| ३४) | शहाबाजार भागातील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. | का.अ.ज.नि. | नाला ट्रेनिंग | ८०० |
| ३५) | अपनानगर रस्त्याचे मजबुतीकरण करणे. | अ.श.अ. | खडी रस्ते | ७०० |
| ३६) | अपनानगर भागात नवीन ज.नि.वाहीनी टाकणे. | का.अ.ज.नि. | भांडवली कामे ज.नि. | ५०० |
| ३७) | भाजी मंडई येथील बोट बाजाराचे विद्युतीकरण करणे. | श.अ. | आठवडी बाजार | ५०० |
| ३८) | राजाबाजार भागात गटार बांधणे. | का.अ.ज.नि. | खुल्या गटारी | ५०० |
| ३९) | अहिंसानगर येथे बॅडमिंटन हॉल बांधणे. | श.अ. | वि.ई.शाळा / दवाखाने | ११०० |
| ४०) | गितानगर भागात नवीन पाण्याची पाईप लाईन टाकणे. | का.अ.पा.पु. | भांडवली कामे (पा.पु.) | ३०० |
| ४१) | कैलासनगर येथील | श.अ. | स्मशानभुमी | ३५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | स्मशानभुमी विकसित करणे. | | विकास | |
| ४२) | चिकलठाणा येथील दवाखाना विकसित करणे. | श.अ. | वि.ई.शाळा / दवाखाने | १५० |
| ४३) | गुरु रामदासनगर येथील खुल्या जागा विकसित करणे. | श.अ. | वि.यो.अं.भुखंड | ५०० |
| ४४) | सिंधी कॉलनी भागात ड्रेनेज लाईन टाकणे. | का.अ.ज.नि. | भांडवली कामे ज.नि. | ६०० |
| ४५) | कुशलनगर भागात पाण्याची पाईप लाईन टाकणे. | श.अ. | भांडवली कामे पा.पु. | २०० |
| ४६) | रमानगर स्मशानभुमीस सरक्षिंत भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे. | श.अ. | स्मशानभुती विकास | २०० |
| ४७) | मनजितनगर येथे नवीन पाणीपुरवठा लाईन टाकणे. | का.अ.पा.पु. | भांडवली कामे पापु. | ३०० |
| ४८) | एस.टी कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. | का.अ.पा.पु. | नाला ट्रेनिंग | २०० |
| ४९) | खडकेश्वर यशोदीप कॉलनीत पाण्याची पाईप लाईन टाकणे | का.अ.पा.पु. | भांडवली कामे पापु. | २०० |
| ५०) | नुरकॉलनी भागात कॉँक्रीट रस्ते तयार करणे. | अ.श.अ. | कॉँक्रीट रस्ते | २०० |
| ५१) | खडकेश्वर येथील चौकाचे सुशोभिकरण करणे. | अ.श.अ. | शहर सौंदर्यीकरण | २०० |
| ५२) | भाजीमंडई येथील पीया मार्केट येथे उर्वरित कामे करणे. | श.अ. | व्यापारी संकुले | २०० |
| ५३) | खडकेश्वर येथील वाचनालयाची पुर्नबांधणी करणे. | श.अ. | वाचनालय | २०० |
| ५४) | राजाबाजार भागातील गल्ल्यात कॉँक्रीट रस्ते तयार करणे. | अ.श.अ. | कॉँक्रीट रस्ते | ५०० |
| ५५) | हर्सुल ते म्हाडा कॉलनी मनपा शाळेपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| ५६) | दिल्लीगेट हर्सुल गाव पर्यंत रस्त्याचे विद्युतीकरण | का.अ.वि. | नविन पथदिवे | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करणे. | | | |
| ५७) | सिंधी कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| ५८) | किराणा चावडी भागातील लहान गल्ल्यात कॉँक्रीट करणे. | अ.श.अ. | कॉँक्रीट रस्ते | ३०० |
| ५९) | शास्त्रीनगर जवाहर कॉलनी येथील वाहतुक बेट येथील विकसित करणे | अ.श.अ. | शहर सौंदर्यीकरण | २०० |
| ६०) | नाथनगर जालनारोड येथील खुली जागा विकसित करणे. | श.अ. | वि.यो.अं.भुखंड | ४०० |
| ६१) | चिंतामणी कॉलनी,शांतीनिकेतन कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| ६२) | सुराणानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | ५०० |
| ६३) | वार्ड क्र. ३१ येथील मनपा हेल्थ क्लबसाठी साहित्य खरेदी करणे. | अ.श.अ. | क्रिडा साहित्य | ३५० |
| ६४) | नागसेन कॉलनी येथे खासगेट ते सिया दुध डेअरीपर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे. | अ.श.अ. | पुर्नडांबरीकरण | २५० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचबरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १८-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १८-३-२००२ (दिनांक २०-२-२००२ ची तहकुब सभा) रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.०० वाजता "वंदेमातरम्"या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. लकडे भरत श्रीपती
७) श्री. सावंत मधुकर दामोधर
८) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
९) श्री. शिंदे किशोर रावसाहेब
१०) श्री. शे.इलियास किरमानीशे.उमर
११) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१२) श्री. ओक जयवंत केशवराव
१३) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१४) डॉ. आशा उत्तम बिनवडे

**संवाद :**

**मा.सभापती :** सभा कोरम अभावी ५ मिनिटे तहकुब करण्यात येते.
(तहकुब करण्यात आलेली सभा पुन्हा १२.१५ वाजता सुरु झाली.)

**विषय क्र. ७७/१ :**

दिनांक ३०-१-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**डॉ.आशा बिनवडे :**दिनांक ३०-१-२००२ चे इतिवृत्त कायम करतांना आरोग्य विभागासाठी लागणारे,औषध खरेदी या विषयावर चर्चा झालेली होती व तशी इतिवृत्तामध्ये नोंद सुध्दा झालेली आहे. तो इतिवृत्तांत आहे. गेल्या दोन वर्षासाठी म्हणजेच सन २००२-२००१ व २००१-२००२ या वर्षासाठी ८ तात्पुरत्या स्वरुपात ३० लाखाची औषधी व साहित्य खरेदी करण्यात आले. यासंदर्भात जी शंका मला होती त्या बाबतीत पत्र देवून माहिती घेतली असता दिनांक २२-११-२००१ रोजी मला लिखित स्वरुपात माहिती दिली.त्यात काही बाबी निदर्शनास आल्या त्यानुसार मी दिनांक ३०-१-२००२ च्या स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित करावयाचे होते. त्या बैठकीला संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते, म्हणून काही प्रश्नाचा खुलासा होऊ

शकत नाही.आजच्या सभेला संबंधित अधिकारी उपस्थित आहे,त्यांनी माझ्या प्रश्नाचा खुलासा करावा.दिनांक २०-११-२००१ रोजी पत्र दिले होते.दिनांक ३०-१-२००२ च्या सभेत विचारायचे होते.गेल्या वर्षात मे.केकरे ब्रदर्स,मुंबई,मे.तिविम फार्मास्युटिकल्स म्हापसा, तसेच मे.अश्विनी फार्मास्युटीकल्स या तीन कंपन्याकडून औषधी खरेदी केली.असे उत्तर देण्यात आले.दिनांक ३०-३-२००१ रोजीच्या मंजुरीनुसार १०१ औषधी केंकरे ब्रदर्स,मुंबई यांचेकडून खरेदी केली व यातील १७ औषधाच्याच कंपन्याचे नांव नमुद केले.उर्वरीत ८४ औषधाच्या कंपन्याचे नांव नमुद केलेले नाही.तसेच जी औषधी खरेदी केली ती एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने का खरेदी केली? याचा खुलासा करावा. गोवा येथील कंपनीकडून खरेदी केलेली टी.व्ही.फ्लेम गोळीचे कटेंन्स काय आहे, ही गोळी जीवरक्षक आाहे का? लाईफसेव्हींग ड्रग म्हणजे काय ? १०१ गोळयापैकी जीवरक्षक औषधी गोळया कोणत्या आहेत.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** औषधी खरेदी संदर्भात १७ कंपन्यांची नांवे दिलेले आहे.बाकीच्या कंपन्यांची का नाही,या बाबतीत आज प्रश्न उपस्थित झालेला आहे.माहिती घेण्यासाठी एक आठवडयाचा वेळ द्यावा.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** पत्र देवून माहिती मागविली होती त्यानुसार मला दिनांक २२-११-२००१ रोजी उत्तर दिलेले आहे. त्यांना माहित होते.कोणत्या कंपन्याचे दर आहेत.मला ज्या उत्तराची अपेक्षा होती ,ते उत्तर न देता अर्धवट माहिती दिली. आज प्रश्न उपस्थित केला म्हणून वेळ देण्याची आवश्यकता नाही. उत्तर शोधण्याची गरज नाही. ते ते आता सुध्दा उत्तर देवून शकतात.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आज जो उपप्रश्न विचारलेला असल्यामुळे मला वेळ द्यावा.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** जी यादी दिली त्यात १७ कंपन्यांचीच नांवे दाखविलेली आहे,उर्वरित कंपन्यांची नांवे नाही त्या कंपन्या बोगस असु शकतात.अधिकाऱ्यांना सभागृहात उत्तर द्यायचे नाही. म्हणून संभेला गैरहजर होते.वेळ देण्याची गरज नाही.दिनांक २२-११-२००१ रोजी जे उत्तर मला दिले त्यातील जी अर्धवट माहिती दिली त्या संदर्भात त्यांचेकडे संपुर्ण माहिती मिळाली पाहिजे. उत्तरे का लपवितात.गेल्या अनेक बैठकापासुन मांडलेले आहेत.मागच्या वेळेस संधी दिली होती. ते उत्तर देत नसतील तर या १७ स्टँडर्ड ,निकृष्ट दर्जाचे आहेत,बॉम्बे मार्केटचे आहे, म्हणून उत्तर देवू शकत नाही. किमान टी.व्ही.फ्लेम या गोळयातील कन्टेनन्स काय आहेत हे एम.बी.बी.एस.प्रथम वर्षात शिकणाऱ्यांना माहित असते, जीवरक्षक कोणते त्यास संचिका पाहण्याची गरज नाही.

**मा.सभापती :** दिनांक ११-०२-२००२ रोजी अहवाल दिला होता,सर्व स.सदस्यांना त्यात काय आहे,याचा अभ्यास व्हावा,त्यासाठी दिले होते.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** अहवालावर चर्चा करता येईल, परंतु एम.आर.पी .पेक्षा जास्त दराने औषधी गोळया खरेदी का केल्या याचे उत्तर अधिकारी देऊ शकत नाही, जीवरक्षक गोळया माहित नाही तर काय जीवरक्षक ठेवले असेल हे महानगरपालिकेचे डॉक्टर उत्तर देवू शकत नाही. याचा काय अर्थ घ्यायचा.

**मा.सभापती :** सभागृहात स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार अहवाल मागविलेला होता तो अहवाल मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेला आहे. दिनांक ११-२-

२००२ रोजी सर्व सदस्यांना अहवाल वाटप करण्यात आलेला आहे, त्यावेळी अभ्यास करावा म्हणून वेळ देण्यात आला.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** एक अमुक गोळी जीवरक्षक आहे किंवा काय हे अधिकाऱ्यांना माहित नाही असे असेल तर आज पर्यंत संबंधीत अधिकारी यांनी या शहरातील जनतेसाठीची जी सेवा केली ती कितपत योग्य ठरलेली आहे याचा अंदाज येतो. डॉक्टरांना औषधाची माहिती नाही याचा अर्थ या शहरातील जनतेला आजपर्यंत देण्यात आलेली औषधी बरोबर होती का हे डॉक्टरांना माहित नाही. त्यामुळे जनतेचा विश्वासघात झालेला आहे.निकृष्ट दर्जाची औषधी खरेदी करुन औषधोपचाराच्या माध्यमातून या शहरातील जनतेला औषधी दिली. जनतेने अत्यंत विश्वासाने ही महानगरपालिका लोकप्रतिनिधींकडे सोपविली. कुंपनाने शेत खाल्ले अशी परिस्थिती दिसते.पैशाची उधळपट्टी होते.डॉक्टरांना एक माहिती विचारली तर सांगु शकत नाही.मागच्या सभेत २ वर्षात औषधी खरेदी झाली त्याचे सविस्तर परिक्षण अहवाल सर्वांना दिला.वातावरण निर्माण करण्यात आले होते. बोलण्याची संधी दिली नाही, म्हणून कारण कळाले.संबंधित अधिकारी हे जनतेच्या जीवनाशीच नाही तर जिवाशी खेळले आहे. त्यावेळेस त्यांच्या भावना होत्या का? त्याच अहवालावर १-५ महिन्यानंतर चर्चा होत असतांना पुन्हा अधिकारी उत्तर शोधण्यास वेळ मागतात,हे बरोबर नाही. त्यांना वेळ न देता नियमाने कार्यवाही करावी. तसे आदेश करावे.२०-२-२००२ पासुन वेळ दिलेला आहे. सभागृहात वाचुन दाखविला पाहीजे.

**श्री.जयवंत ओक :** आरोग्य विभागाच्या औषधी खरेदी संदर्भात दोन ते तीन महिन्यापासून सतत चर्चा होत आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही झाली पाहीजे.भ्रष्टाचारीला फाशीला लटकवा.आरोग्य सिध्द होते का नाही. आपण आपले मनोगत व्यक्त करतो.अधिकाऱ्याचे मनोगत जाणवले होते की नाही.चौकशी करतांना अधिकाऱ्याचे मनोगत घेतले पाहीजे, जी औषधी खरेदी झाली ती टेंडर विना झाली का आयुक्तांची मंजुरी नाही का? डायरेक्ट रक्कम घेतली.औषधी खरेदी केली असा प्रकार होऊ शकत नाही.डॉक्टरावर आरोप होतात.त्यांनी २८ वर्षे या नागरीकांची सेवा कशी केली तेव्हा का आरोप केले गेले. अहवालाविषयी विचारा,कोणाच्या भावनेशी खेळु नका चिकलफेक केली काय निर्णय घेत आहात, प्रश्न पाहीजे,उत्तर पाहीजेत अहवाल सभागृहात वाचायचा का नाही. तात्पुरता अहवाल आहे का फायनल अहवाल आहे, हा सुध्दा मुद्दा विचारात घ्यावा.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** मला प्रश्न विचारण्याचा हक्क आहे, २८ वर्षाची गरज नाही. मी आता सदस्य आहे.

**श्री. कावडे साहेबराव :** गेल्या ३-४ बैठकीपासून या विषयावर मुद्दा उपस्थित होत आहे. एका स.सदस्यांनी प्रश्न केल्यावर माहिती मिळत नाही. उत्तरे देत नाही.सभेला अधिकारी नेहमी गैरहजर राहतात व आता प्रश्न उपस्थित केल्यानंतर पुन्हा अधिकारी वेळ मागतात. बाकी स.सदस्य आक्षेप घेतात तीन-तीन वेळेस मुद्दा सभागृहात उपस्थित होतो अधिकारी उत्तरे देत नाही. त्या अगोदरच सदस्य बोलतात अधिकारी बोलत नाही.

**मा.सभापती :** जो अहवाल मुख्य लेखा परिक्षक यांचेकडून जो अहवाल आला त्यातील एक एक मुदयावर चर्चा करावी. सचिव यांनी अहवाल वाचुन दाखवावा. प्रस्तावना

वगैरे वाचुन दाखववी. अहवालामध्ये काय आहे व अधिकाऱ्यांनी काय उत्तर दिले यात काही आढळुन आल्यास चर्चा करता येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** हा अहवाल आहे का,चौकशी केली आहे.यावेळी मेडीकल बोर्डाचे मत घेतले का? निविदा प्रसिध्द करतांना त्यांना बोलावण्याची गरज होती का?

**श्री.जयवंत ओक :** अहवाल वाचण्याची गरज नाही. आयुक्तांचे मत घ्यावे. गोपनीय अहवाल वाचता येतो का?

**मा.सभापती :** माझ्या अधिकारात मी वाचण्याची परवानगी देत आहे. एकुण ८ सदस्यांनाच अहवाल दिलेला होता. उर्वरित ८ सदस्यांना वाचुन दाखविल्यास माहिती होईल व सविस्तर चर्चा करुन निर्णय घेता येईल. अहवाल वाचण्यासंदर्भात आयुक्तांची परवानगीची आवश्यकता नाही. नगरासचिव यांनी अहवाल वाचुन दाखववा.

**नगरसचिव :** (अहवाल वाचून दाखवितात,अहवालाची प्रत सोबत जोडली आहे.)

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** डॉक्टर देशपांडे यांनी काय खुलासा केलेला आहे, तो सुध्दा वाचुन दाखववा.

**मुख्यलेखापरिक्षक :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जो खुलासा केला, त्याचे उत्तर त्यांना दिलेले आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** माझा ती केलेला खुलासा वाचुन दाखववा.

**मा.सभापती :** डॉक्टर देशपांडे यांनी अहवालानुसार जो खुलासा केला तो सचिव यांनी वाचुन दाखववा.

**नगरसचिव :** (डॉ.देशपांडे यांचे दि.२०-२-२००२ चे उत्तर वाचुन दाखवितात, सोबत प्रत जोडली आहे.)

**मुख्यलेखापरिक्षक :** डॉ.देशपांडे यांनी उत्तर दिल्यानंतर त्यांना पुन्हा उत्तर देण्यात आले.त्यांनी सुध्दा खुलासा आयुक्तांकडे केला होता. पुन्हा जे उत्तर दिले, त्याची प्रत त्यांना व मा.आयुक्तांना दिलेली आहे.

**नगरसचिव :** अंतिम अहवाल आलेला आहे.

**मा.सभापती :** मुख्येलेखा परिक्षक यांनी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना दिनांक ८-३-२००२ पुन्हा पत्र दिलेले आहे, तो अहवाल वाचल्यानंतर कोणते मुद्दे वगळायचे ते लक्षात येईल. नगरसचिव यांनी अहवाल वाचुन दाखववा.

**नगरसचिव :** (दिनांक २८-२-२००२ च्या पत्राच्या खुलाशावर मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेले पत्र वाचुन दाखवितात. दिनाक ८-३-२००२ चे पत्र सोबत जोडलेले आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** आताच सचिव यांनी वाचुन दाखविल्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जे उत्तर दिले, त्यानुसार त्यांना पुन्हा उत्तर देण्यात आलेले आहे.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना उत्तर दिल्यानंतर मुख्यलेखापरिक्षक यांनी अंतीम अहवाल दिलेला आहे, तो वाचुन दाखववा.

**मा.सभापती :** सचिव यांनी मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल वाचुन दाखववा.

**नगरसचिव :** (दिनांक १३-३-२००२ च्या पत्राने कळविलेला अहवाल वाचुन दाखवितात,सोबत प्रत जोडली आहे.)

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केलेले आहे,याचा उल्लेख दिसत नाही, लाखो रुपयाचे नुकसान झालेले आहे व या अगोदर इतिवृत्त कायम होत असतांना कोणत्या कंपनीच्या व किती जीवरक्षक गोळया

खरेदी केल्या या प्रश्नावर संबंधित अधिकारी यांना माहिती विचारली असता १ आठवडयाचा वेळ मागील वेळेस त्यांनी मागितला होता. त्यांनी जो अहवाल दिला त्यातच परिच्छेद (ब) ७ मध्ये त्यांनी असे म्हटले की,टी.व्ही.फ्लेम ही गोळी महानगरपालिकेतील दवाखान्यात मोठया प्रमाणात वापर करावा लागतो.त्यामुळे सदर गोळयाचा स्टॉक जीवरक्षणाकरीता म्हणून करण्यात आलेला आहे व याचा वापरही चालु आहे, असे स्टेटमेंट वैद्यकीय अधिकाऱ्यांचे आहे,तर टी.व्ही.फ्लेम ही गोळी जीवरक्षक आहे का? तिच्या कन्टेन्स काय आहेत,जीवरक्षक गोळी कोणती हे त्यांना माहित असल्याशिवाय स्टेटमेंट केलेले आहे का? डॉक्टरांना या बाबतीत सर्व काही माहित असेल,तेव्हाच त्यांनी ५ लक्ष गोळयांची खरेदी केलेली आहे.सभागृहात गोळयाच्या बाबतीत उत्तर माहित नाही असे म्हणायचे आणि एकीकडे औषधी खरेदी करायची यात फार मोठी विसंगती आहे. याप्रश्नांचे डॉक्टरांनी उत्तर द्यावे.टी.व्ही.फ्लेम हे गोळी जीवरक्षक आहे का, तिच्या कन्टेन्स काय आहे किंवा जीवरक्षक गोळया व औषधी कोणती याचे उत्तर त्यांनी मला द्यावे.त्यांना उत्तर माहित नसेल तर मी सर्व लिस्ट सभागृहात वाचुन दाखविते. याप्रश्नाचे उत्तर ते देत नसतील तर त्यांचे वैद्यकीय ज्ञानाविषयी शंका येते.ही गोळी जीवरक्षक नाही हेच त्यांना माहित नाही,खोटी माहिती सादर करतात. जीवरक्षणासाठीची जी औषधी आहे, ती एकूण ३२ ते ३५ आहे. त्यापैकी फक्त चार प्रकारचे इंजेक्शन यात खरेदी केलेले आहे.त्याचे सुध्दा कंपन्या नमुद केलेल्या नाही. जी चार औषधी खरेदी केली ती सुध्दा निकृष्ट दर्जाची आहे व चांगल्या क्वालीटीची नाही व कंपन्यांचे नांव सुध्दा त्यावर नाही हे सभागृहाच्या प्रामुख्याने लक्षात आणुन द्यायचे होते.टि.व्ही.फ्लेमची गोळी साधी वेदनाशामक गोळी असुन त्यासाठी कोणत्याही डॉक्टरांची चिठ्ठी लागत नाही. त्या काऊंटरवर मिळू शकतात. अत्यंत साधी जसे ब्रोफेन,पॅरासिटामोल,ॲसप्रीन,डीस्प्रीन असे आहे, म्हणून विचारत होते ते सफाईने टाळतात व दिशाभुल करतात यात त्यांनी म्हटले की,ही गोळी साईड इफेक्टस नाही.चांगले इफेक्टस आहे. या गोळीची कोणती बाजू अशी आहे की, इफेक्टस नाही. गोळीचे इफेक्टस नसतील तर साईड इफेक्टस कसे येतील. या गोळया कोणत्या कंपनीतून खरेदी केलेल्या याची चौकशी सुध्दा गोव्याला जावून केली पाहिजे. ही कंपनी सध्या अस्तित्वात आहे का? कंपनीचे नांव दिलेले नाही याचा अर्थ ही कंपन्या उत्कृष्ट प्रतिच्या नाही व उच्च प्रतिच्या कंपनीच्या गोळया औषधी हया पॅकमध्ये येतात. हया गोळया औरंगाबाद शहरात तर कुठेच मिळणार नाही व ही गोळी उत्कृष्ट दर्जाची आहे असा भास निर्माण करुन जनतेला गोळया दिल्या व ही गोळी फक्त वेदना श्यामक गोळी आहे. सदर या वर्षभरात २ ते २.२५ लक्षच्या लागतात त्या ५ लक्षांच्या खरेदी केल्या यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, जनतेच्या पैशांचा महानगरपालिकेच्या रकमेचा संबंधित अधिकारी यांनी संगनमताने जाणून बुजून अपहार केलेला आहे. भ्रष्टाचार झाला नाही,अशी शंका घेण्याला वाव नाही. १००% भ्रष्टाचार केलेला आहे.सुरुवातीपासुन जी कार्यवाही होत आणि ती चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेली आहे.ज्या वृत्तपत्राचा खप कमी आहे. त्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द केली. यात तीनच निविदा भरुन आल्या यात केंकरे  ब्रदर्स यांनीच

६०० ते ७०० ॲटमचे दर भरले. बाकीच्यांनी भरले नाही. फक्त दर पत्रक मागविलेले होते. मागणी (रिक्वायमेंट) किती हे कळविले नाही. एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने ज्या उत्कृष्ट दर्जाच्या १७ कंपन्या दर्शविण्यात आल्या, त्यात सुध्दा एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात आलेल्या आहे. उर्वरीत ज्या ८४ कंपन्या आहेत, टी.व्ही.फ्लेम व कॉम्बी फ्लेम,ब्रुफेन,पॅरासिटामोल हया स्वस्त दराचे गोळया घेण्याचे सोडून टी.व्ही फ्लेम घेतले. दोन्ही गोळयाचे पावर सारखेच आहे. कॉम्बीफ्लेम स्वस्त गोळी सोडून त्या गोळीच्या किंमतीपेक्षा दोन तीन पट जास्त किंमतीची टी व्ही फ्लेम गोळी खरेदी केली. या सर्व बाबींचा विचार करुन तसेच या शहरातील जनतेशी संबंधित अधिकारी जीवनाशी खेळलेले याचा सुध्दा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. संबंधित अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची आता वेळ आलेली आहे.हे मी सभागृहात वेळोवेळी दाखवुन दिलेले आहे.एम.आर.पी.पेक्षा सुध्दा जास्त दराने औषधी खरेदी झालेली आहे. ही बाब सिध्द झालेली असून आता पुन्हा चौकशी अहवाल मागविण्याची आवश्यकता नाही.

संबंधित अधिकाऱ्यांनी औषधी खरेदी प्रकरणात सखोल चौकशी करण्यासाठी एक आयोग किंवा कमिशन नियुक्त करण्याची गरज आहे. सन ९५-९६ वर्षापासुन २००१-२००२ पर्यंतच्या औषधी खरेदी संदर्भात चौकशी करावी लागेल. त्यासाठी आयोग नेमावा,त्यात मा.आयुक्त,उपआयुक्त,मुख्यलेखापरिक्षक यांचा समावेश असावा.तसेच बाहेरील संबंधीत उपसंचालक आरोग्य पदाचे अधिकारी तसेच एफ.डी.ए.(घाटीचे डीन) तसेच औषध शास्त्राचे प्राध्यापक,विभागीय कार्यालयातील मुख्यलेखा परिक्षक यांचा आयोग नेमावा. सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी व संबंधीत अधिकारी यांनी त्यांचे चौकशी संदर्भात अडथळा आणू नये. यासाठी त्यांचे विभागातील रजिस्टर औषधी खरेदीची कागदपत्रे सील करावी. ती सुरक्षित करावे व यात काही अडथळा येवू नये म्हणून संबंधित अधिकारी यांना निलंबित करावे व एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केले ते सिध्द झाले आहे. त्यामुळे ड्रग प्राईज कंट्रोल इन्सेशीयल कोमोडीटी ॲक्ट १९५० अन्वये जास्त दराने औषधी विकणाऱ्या केकरे ब्रदर्स व विविम फार्मास्युटिकल्स गोवा यांचेवर गुन्हा दाखल करावा व संबंधित अधिकारी यांना सर्व नियम माहित असतांना एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केली त्यानुसार त्यांचेवर ही गुन्हा दाखल करावा.

संबंधित  अधिकारी यांनी जाणून बुजून जनतेच्या पैशाचा गैरवापर,उधळण केलेली असल्याने आय.पी.सी.सेक्शन ४०३ खाली त्यांचेवर गुन्हा नोंदवावा. एक शासकीय अधिकाऱ्यांनी गैरफायदा उचलला,४०९ खाली गुन्हा नोंदवावा. तसेच संबंधित अधिकारी यांनी वेळोवेळी सभागृहाची दिशाभुल करुन प्रस्तावास मंजुरी घेतली व मी जी कार्यवाही करतो ती बरोबर असल्याचे सभागृहात दाखवुन सभागृहाची नेहमीच दिशाभुल केली.त्यानुसार ४२० चा गुन्हासुध्दा दाखल करावा.तसेच संबंधित कंपन्या व संबंधित अधिकारी यांनी संगनमत करुन औषधी खरेदीत गैरव्यवहार केलेला

असल्याने त्यानुसार कलम ४६८ खाली गुन्हा नोंदवावा. हा निर्णय सभागृहाने घ्यावा अशी विनंती करण्यात येते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या औषधी खरेदीच्या संदर्भात टेंडर काय होते. निविदेत काय आहे व त्याचे अटी काय आहेत. दर कायम असतात. दराच्या कमी किंवा जास्त दर येवू शकते. निविदा दरापेक्षा जास्त किंवा कमी दराने मंजुर करायची हे स्थायी समिती किवा मा.आयुक्तांचा अधिकार आहे. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली.दैनिक झाले.साप्ताहिक नाही.ज्या वृत्तपत्रास शासन मान्यता आहे. अशा वृत्तपत्रामध्ये रोटेशननुसार कार्येवाही केलेली आहे.रोटेशन नुसार जाहीरात प्रसिध्द करणे हे काम जनसंपर्क अधिकारी यांचे असते. टेंडर काढणे,वाटाघाटी करणे या बाबतीत काय निर्णय ही कामे प्रशासनाची आहे. अर्थसंकल्पात आरोग्य विभगाचे स्वतंत्र तरतुद केलेली आहे.एका वर्षात ५ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त औषधी,गोळया खरेदी करायच्या ही ही जबाबदारी प्रशासनाची आहे. दुसरा मुद्दा असा की,आलेली औषधीचा स्टॉक बरोबर आहे की नाही ते पाहणे तसेच औषधी कालबाहय आहे की नाही हे देखील पाहणे स्टोअर्सचे काम आहे. ज्या गोळया,औषधी दिल्या गेल्या त्या बरोबर व त्यांचे दर बरोबर होते का? या संदर्भात चौकशी समिती नियुक्त करावी हा सभागृहाचा निर्णय आहे,परंतु जी गोळी बाजारामध्ये विक्रीस येते ती शासन परवानगी शिवाय येत नाही.जी गोळी निकृष्ट दर्जाची विक्री होत असेल तर हे शासन व पोलीस विभगाने चौकशी करण्याते काम आहे. ज्यांनी पुरवठा केला त्यांचेवर कार्यवाही करावी.जीवरक्षक तांत्रिक मुद्दे आहेत. मेडीकल बोर्डला रेफर करावे.चुकीचे असेल तर रोखण्याची कामे पोलीसची आहे. डॉक्टरची कामे कोणती गोळी देतात ते पाहण्याचे आहे. निविदा काढल्यानंतर निविदा दरापेक्षा कमी जास्त दराने मंजुर करण्याचा अधिकार १० लाखापर्यंत मा.आयुक्त यांचा आहे. स्वत: खरेदी करत असेल तर मेडीकल बोर्डाकडून चौकशी करावी तोपर्यंत शिक्षा देता येणार नाही.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केलेली आहे.अशावेळी गुन्हा दाखल होऊ शकतो. हे अधिकाऱ्यांना माहित असतांना औषधी / गोळया खरेदी केलेल्या आहे. म्हणून संबांधित अधिकारी व संबंधित कंपन्यांवर आताच मी नमुद केल्याप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात यावे नसता सभागृहाचे निर्णयानुसार प्रशासनाने कार्येवाही केली नाही तर आम्ही स्वत: गुन्हे दाखल करु.

**श्री.जयवंत ओक :** औषधी खरेदीत घोटाळा, भ्रष्टाचार झाला असेल तर निर्णय घ्यावा. परंतु चौकशी केली. ऑडीट झाले. अहवाल आला यावर निर्णय घेतांना लेखा परिक्षणाच्या अंतीम अहवालात स्पष्टपणे नमुद केले आहे की, हा अहवाल चौकशी अहवाल नाही. त्यामुळे एखादया अधिकाऱ्यावर कार्यवाही करायची असल्यास त्यांचेवर दोषारोप ठेवून रितसर सक्षम अधिकाऱ्याच्या मार्फत चौकशी करणे आवश्यक आहे म्हणून अशी रितसर चौकशी करुन मा.आयुक्तांनी कारवाई प्रस्तावित करणारा अहवाल सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आवश्यक आहे. प्रशासकीय कार्यवाही पुर्ण न होता सभागृहाने निर्णय दिल्यास प्रशासन त्याची अंमलबजावणी करणार नाही.प्रशासन याबाबत बोट ठेवेल. मा.आयुक्तांचा खुलासा घ्यावा ही नम्र विनंती आहे. तज्ञ

डॉक्टर तसेच घाटीचे डीन वगैरे सदस्य नियुक्त करुन चौकशी करण्यात यावी. प्रशासनाचे मत घेतल्याशिवाय कार्यवाही करु नये.

**मुख्यलेखापरिक्षक :** अहवालासंबंधी माझे ऐकून घ्यावे, नंतर निर्णय घ्यावा. जो अहवाल सादर केला त्या संदर्भात जी चर्चा होते की, हा अहवाल बेकायदेशीर आहे.स्थायी समितीला अधिकार नाही. परंतु याबाबत अधिनियमात स्पष्ट दिलेले आहे. कलम ४७(१) प्रमाणे स्थायी समिती करुन शकते.लेखा परिक्षण आदेश करु शकते.कलम १०६ (१) प्रमाणे ज्या वेळेस एखादी बाब निदर्शनास येइल त्यावेळेस ती बाब मुख्यलेखापरिक्षक स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देऊ शकते. बऱ्याच सदस्यांचे म्हणणे होते की,अगोदर लेखा परिक्षण सादर केलेले आहे व आता ही बाब का निदर्शनास आली.त्याचे उत्तर असे की, कलम १०६ (१) प्रमाणे ज्यावेळेस एखादी बाब निदर्शनास येईल त्यावेळेला,त्यानुसार स्थायी समितीने ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे व स्थायी समितीने ४७ (१) प्रमाणे आदेशित केल्यानंतरच हा अहवाल तयार केलेला आहे. हा अहवाल पुर्वी लेखापरिक्षण झाले का त्यात समावेश झाला नाही याची दोन उत्तरे आहेत.

१) लेखा परिक्षणाचे आपण कोणतेही नियम तयार केलेले नाही.कायदयाप्रमाणे लेखा परिक्षणाचे नियम तयार केले पाहिजे.परंतु लेखा परिक्षण विभागाकडून नियम तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत.नियम तयार केलेले नाही म्हणून हाफ मार्जिने का दिली नाही उत्तरे का घेतले नाही, असे प्रश्न निर्माण होते. आताच विचारणा झाली की.टेंडर म्हणजे काय, निविदा म्हणजे काय. ही औषधी खरेदी केली ती टेंडर न मागविता दरपत्रक मागवुन खरेदी केलेली आहे. अ,ब निविदेप्रमाणे नाही. यादी देवून दरपत्रक मागविले आहे जी औषधी खरेदी केलेले आहे. त्या खरेदीच्या संचिका आहे.त्या लेखापरिक्षणासाठी तसेच खर्च बाब पुर्वी केव्हाही आलेल्या नाहीत. तसेच खर्च बाबीचे १००/-/ लेखा परिक्षण नाही. यापुर्वी जे लेखा परिक्षण अहवालात दिले ते एन-८ येथे असलेला स्टॉक,तेथील रजिस्टर वरुन केलेले होते. ज्या ज्या वेळी औषधी खरेदीच्या संचिका मागविल्या त्यावेळी त्या आयुक्त, लेखा विभागात असे सांगण्यात आले असे उत्तरे देण्यात आली.सन २०००-२००१ व २००१-२००२ या दोन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल तयार केलेले नाही. २०००-२००१ चे लेखा परिक्षणास फेब्रुवारी महिन्यात करणार होतो.परंतु मध्येच स्थायी समितीत या संदर्भात चर्चा झाल्यामुळे सन २०००-२००१,२००१-२००२ या दोन वर्षाचा लेखी अहवाल नाही.लेखापरिक्षण अहवाल आहे आणि या अहवालावावर स्थायी समितीला चर्चा करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. व स्थायी समितीने घेतलेला निर्णय सर्वसाधारण सभेला पाठवायचा असतो.जी कार्यवाही करायची त्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे,हा अहवाल तयार करीत असतांना एम.आर.पी.बद्दलच्या तांत्रिक अडचण आली.एम.आर.पी.चे दर हे अधिकृत मिळालेले नाही. नांव पुर्ण नाहीत.इनिशियल आहेत.यापैकी फक्त इतरत्र दर एम.आर.पी. पेक्षा जास्त आहे. अधिकृत दरपत्रक न मिळाल्याने एम.आर.पी. एम.आर.पी. पेक्षा जास्त दर आहे, असे ठामपणे सांगता येणार नाही. त्यामुळे हा

मुद्दा तांत्रिक तपासणी मध्येच स्पष्ट होणार आहे. अमुक गोळी अचुक गोळी वापरली असती तर कमी रक्कम खर्च झाली असती हा मुद्दा सुध्दा मेडीकल कमेटीने सिध्द करुन दाखविल्यावर स्पष्ट होणार आहे.जे नुकसान दाखविण्यात येते ते अंतरिम स्वरुपात हा अहवाल आहे. तज्ञाकडून याची पुर्ण तपासणी झाल्यानंतरच कार्यवाही करावी त्या संदर्भात स्थायी समितीने काय जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** आजपर्यंत जेवढे अहवाल आले त्या बाबतीत सर्वांचे चौकशी बसवावी.

**श्री.सावंत मधुकर :** हे होत राहील सुर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. १२ लक्ष रुपयाची हानी झालेली ते वसुल वसुल करण्यात यावे. अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे यात महानगरपालिकचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे.

**मुख्यलेखापरिक्षक :** हा चौकशी अहवाल नाही हा लेखा परिक्षण अहवाल आहे. या संदर्भात सखोल चौकशीसाठी संचिका तसेच इतर कागदपत्रे मिळालेली नाही.

**श्री.सिध्द जगदीश :** अहवाल सादर झाला भ्रष्टाचार झाला उघडवणे नमुद केले अशा अहवालानुसार या सभागृहाला अधिकारी यांचे बाबतीत त्यांचे निंलंबन, त्यांचेवर गुन्हे वगैरे दाखल करण्याचा निर्णय घेता येतो का? किंवा कमिटीने चौकशी अहवाल दिल्यानंतरच अशी कार्यवाही करता येते का? प्रशासनाचे विधी सल्लागार यांचे मत जाणून घेण्यात यावे नंतर निर्णय घेण्यात यावा.

**उपआयुक्त (प्र) :** जो अहवाल मुख्यलेखा परिक्षक यांनी स्थायी समिती निर्णय घेण्यास सक्षम आहे व घेतलेला निर्णय पुढील कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभा किंवा आयुक्त यांचेकडे परावर्तीत करण्याची कार्यवाही करुन शकतो. डॉ.देशपांडे आरोग्य वैद्यकिय अधिकारी हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ४५ अन्वये संविधानिक पद असल्याने त्याचे वर कार्यवाही करण्यास सर्वसाधारण सभा सक्षम असुन निलंबन वगेरे कार्यवाही करण्यास आयुक्त सक्षम आहे.

**श्री.शेख इलियास किरमानी :** औषधी खरेदी केली त्यास स्थायी समितीने मान्यता दिलेली,स्थायी समिती व मा.आयुक्त ही जबाबदार राहतील.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :**एखादे अधिकारी / कर्मचारी यांनी संशयास्पद भ्रष्टाचार केलेला आहे असे वाटत असेल तर त्यांना निलंबित करण्याबाबतचा निर्णय या सभागृहाला घेता येतो. नियम काय सांगतात ते पहावे.

**उपआयुक्त (प्र) :** कायदयाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित झालेला आहे. कलम ४५ नुसार जे अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या, त्यांचेवर कार्यवाही करण्याच्या बाबतीत काय तरतुदी त्या स्पष्ट करण्यात येत आहे. ५६(१) ब आयुक्त प्रतिनियुक्तीने शासकीय अधिकारी असलेला परिवहन अधिकारी वगळुन महानगरपालिकेने अथवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेला अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेचे आदेश होईपर्यंत आयुक्त निलंबन करुन शकेल,अशा अधिकाऱ्यावर निलंबन कार्यवाही ताबडतोब महानगरपालिकेस कळविली पाहिजे व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्याच्या आत निलंबन केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल. म्हणून मुख्यलेखापरिक्षणाच्या अहवालावर स्थायी समितीने मा.आयुक्तांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा.

**श्री.शेख इलियास किरमानी :** जी औषधी खरेदी केली त्यास सभागृहाने मान्यता दिली, त्यात सभागृह सुध्दा दोषी आहे का?

**मा.सभापती :** त्यांनी विभागप्रमुख म्हणून एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने खरेदी करीत आहोत असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले नाही.

**श्री.सिध्द जगदीश :** नियमात तरतुद असेल तर पुढील कार्यवाही करण्यासाठी अहवाल आयुक्ताकडे द्यावा.

**मा.सभापती :** जवळपास गेल्या २-३ महिन्यापासुन आरोग्य विभागासाठी औषधी खरेदी व साहित्य खरेदी या संदर्भात स्थायी समिती सभेमध्ये चर्चा होत आहे. सभागृहामध्ये चर्चा करुन या प्रकरणी एक कमिटी स्थापन करुन लेखा परिक्षण करण्यात यावे, असे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार मुख्यलेखा परिक्षक यांनी औषधी व साहित्य खरेदी संदर्भाने लेखा परिक्षण करुन त्याचा गोपनीय अहवाल स्थायी समिती समोर सादर केलेला होता. त्यानंतर सभागृहामध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना लेखा परिक्षण अहवालाच्या अनुषंगाने खुलासा / उत्तर सादर करण्यासाठी वेळही देण्यात आला होता. संबंधित अधिकाऱ्यांनी त्याचे उत्तरही दिलेले आहे. अंतरिम लेखा परिक्षण अहवालाचे स्थायी समिती समोर वाचनही झालेले आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे तरतूदीप्रमाणे आयुक्त,उपआयुक्त,आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे वैधानिक भ्रष्टाचार झालेला आहे किंवा नाही. यासाठी सक्षम समिती नेमून चौकशी करण्याची गरज आहे. लेखा परिक्षण अहवालावरुन प्रशासनाला सांगू इच्छितो की, चौकशी समितीत तज्ञ लोकांचा समावेश असावा.ज्यामध्ये उपसंचालक आरोग्य,एफ.डी.ए.विभागीय आयुक्त कार्यालयातील मुख्यलेखापरिक्षक वैद्यकीय महाविद्यालयातील औषधी विभागाचे प्राध्यापक (प्रोफेसर) महापालिका आयुक्त इत्यांदीची संयुक्त चौकशी समितीसाठी शिफारस करण्यात येते.या समितीने चौकशी करुन आपला अहवाल लवकरात लवकर स्थायी समितीपुढे ठेवावा त्यामुळे प्रशासनासमोर सत्य उघडकीस येईल.एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने औषधी खरेदी केली की ही बाब विभागप्रमुख या नात्याने आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी निदर्शनास आणून देणे आवश्यक होते.त्यांनी ही बाब निदर्शनास आणुन दिली नाही व ती का आणून दिलीनाही हे लेखा परिक्षण अहवालात आलेले आहे. म्हणून नियमानुसार त्यांचेवर गुन्हा दाखल करावा. तसेच एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने ज्या एजन्सीने औषधांची विक्री केली आहे.त्यांचेवर गुन्हे दाखल करण्याची मागणी झाली आहे. वरीलप्रमाणे समिती लवकरात लवकर नेमून अंतिम अहवाल येईपर्यत संबंधित अधिकारी यांना निलंबीत करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे. तसेच सन १९९५ पासुन ते २००२ पर्यंतचे सर्व अभिलेख,संचिका,कागदपत्रे इत्यादी सर्व मा.आयुक्तांनी सील करुन ठेवावे. वरीलप्रमाणे कार्यवाहीस मंजुरी देण्यात येते.

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे वरील दुरुस्त्यासह दिनांक ३०-१-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

लेखा परिक्षण अहवाला संदर्भात झालेला निर्णय सभागृहामध्ये औषधी व साहित्य खरेदी संदर्भाने झालेल्या चर्चेअंती ठरवल्यानुसार लेखा परिक्षण अहवालावरुन असे सिध्द झाले आहे की,आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी औषधी व साहित्य खरेदी करतांना एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने औषधी

खरेदी केली व विभागप्रमुख या नात्याने त्यांनी ही बाब प्रशासनाचे दिर्शनास आणुन दिलेली नाही.त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे सभागृहाचे मत झाले आहे. करीता या प्रकरणी चौकशी करण्याकरीता सक्षम समिती नेमण्यात यावी.या समितीमध्ये उपसंचालक आरोग्य,असि.डायरेक्टर (एफ.डी.ए.) विभागीय आयुक्त कार्यालयातील मुख्यलेखा परिक्षक वैद्यकीय महाविद्यालयातील औषधी विभागाचे प्राध्यापक (प्रोफेसर) महापालिका आयुक्त इत्यादींचा समावेश असावा,अशी शिफारस करण्यात येते. समितीने लवकरात लवकर चौकशी करून आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा. नियमानुसार संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच एम.आर.पी.पेक्षा जास्त दराने ज्या एजन्सीने औषधांची विक्री केली आहे. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे असे सभागृहात मागणी झाली.त्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी आणि समितीचा अहवाल येईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यास निलंबित करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवणेसही शिफारस करण्यात येते.सन १९९५ पासुन ते २००२ पर्यंतचे सर्व अभिलेख, संचिका कागदपत्रे इत्यादी सर्व मा.आयुक्तांनी सील करावे असे ठरले. वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील रस्त्यावर विविध संघटना तसेच नागरीकांतर्फे विविध कार्यक्रमासाठी महानगरपालिकेची परवानगी न घेता कमानी उभारल्या जातात.त्यामुळे रस्त्यावर खड्डे पडुन रस्ते खराब होतात व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो व रस्ते दुरुस्तीचा खर्च महानगरपालिकेला सोसावा लागतो. त्यामुळे महानगरपालिकेचे विनाकारण आर्थिक नुकसान होत आहे.

अशा विना परवानगी उभारण्यात येणाऱ्या कमानीवर आळा बसावा व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही याकरीता ज्यांनी रस्त्यावर विना परवानगी कमान उभारली आहे,त्यांना दंड आकारुन दंड वसुली करणे, तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले म्हणून त्यांच्या विरूध्द पोलीसांत गुन्हा / तक्रार नोंदविणे व त्यांचा माल जप्त करणे ही कार्यवाही करणे उचित होईल.

तरी शहरात त्या संघटना व नागरीक विना परवानगी कमानी उभारतील त्यांना रक्कम रु. १०,०००/- (दहा हजार रुपये) दंड करणे,त्यांच्या विरुध्द पोलीसांत गुन्हा /तक्रार नोंदविणे व त्यांचा कमानीचा माल जप्त करणे ही कार्यवाही करण्याच्या आदेशासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.जयवंत ओक :** विविध पक्षाच्या व्यक्तिच्या हार्दिक स्वागत संदर्भात कमानी उभारल्या जातात. किती रक्कम जमा करून परवानगी देणार आहे.सद्य:स्थितीत ज्या ज्या कमानी आहे,त्यांना दंड म्हणून आकारणी करणार का? किंवा यापुढे उभारण्यात येणाऱ्या कमानीला दंड आकारणार का? खुलासा द्यावा. महानगरपालिकेने परवानगी दिल्यानंतर किती दर लावणार माहिती द्यावी.

**मा.सभापती :** महानगरपालिकेने एखाद्या कमानीला परवानगी दिली तर किती दर लावणार ते प्रस्तावात दिले नाही, तसेच शहरात ज्या कमानी आहे.त्यांचेवर दंड लावणार का? प्रशासनाने खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** विना परवानगीने कमानी लावल्यास १०,०००/- रु. दंड आकारला जाणार आहे. ज्यांनी परवानगी घेऊन कमानी उभारल्या त्यांना २५० ते ५००/- रु.आकारणी होणार आहे.

**मा.सभापती :** ज्या कमानी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन लागलेल्या आहे. मित्रमंडळातर्फे तसेच महानगरपालिकेने उभारलेल्या त्या कमानीवर सुध्दा दंड आकरणी होणार आहे का? कायम स्वरुपी कमान उभारायची असेल तर किती चार्ज लागणार आहे.

**अति.शहर अभियंता :** ज्यांनी विना परवानगीने उभारलेल्या आहे. दंड आकारणी होईल,त्याची यादी तयार करावी लागेल व यापुढे जे परवानगी घेतील त्यांना नियमाने रक्कम भरावी लागेल. कायम स्वरुपी कमान लावण्यास परवानगी देता येणार नाही. मा.उच्च न्यायालयाचे तसे निर्देश आहे.

**मा.सभापती :** ज्या कमानी उभारलेल्या त्या सर्वच न्यायालयाच्या निर्देशानुसार काढणार काय?

**अति.शहर अभियंता :** न्यायालयाच्या निर्देशानुसार ९ मीटर ते ४५ मीटरच्या रस्त्यामध्ये ज्या ही कमानी असेल कायम स्वरुपी असेल, विना परवानगीच्या आहे.परवानगी घेतलेल्या असतील त्या सर्व काढाव्या लागतील.

**मा.सभापती :** परवानगीने व विनापरवानगीने किती दंड आकारला जातो, इतर ५-६ महानगरपालिकेचे दर मागवुन घ्यावे तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे इतर महानगरपालिकांमध्ये रस्त्यावर तात्पुरत्या व कायमस्वरुपी कमानी उभारणेसाठी परवानगी देणे,दर व दंड किती आकारण्यात येतो याची माहिती घेण्यात यावी. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ७९/३:**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी विकासाची कामे करण्यात येतात. या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २० ते ४० टक्के कमी दराच्या निविदा प्राप्त होतात.वास्तविक पाहता एवढया कमी दराने कंत्राटंदारांना काम परवडु शकत नाही.त्यांचे दर व वर्केबल (Workable) नसतात.त्यांना दर पृथ्थकरण बाब निहाय मागितले असता कंत्राटदार लेख कळवितात की, त्यांना एवढया कमी दराने काम परवडते. वास्तविक पाहता हे दर अन वर्केबल (Unworkable) असल्यामुळे तांत्रिक विभागाकडून फेर निविदेची शिफारस करण्यात येते. मात्र लेखा विभागाकडून पुनर्निविदेची शिफारस करण्यात येते. मात्र लेखा विभागाकडुन पुनर्निविदेची शिफारस डावलण्यात येवून ज्या दराने (२० ते ४० टक्के कमी) कंत्राटदाराने निविदा भरलेली आहे, त्याच दराने त्यांचेकडून काम करुन घ्यावे. स्पेसिफिकेशन (Specitication) नुसार काम करुन घेण्याची जबाबदारी तांत्रिक विभागावर आहे, अशा प्रकारचे शेरे लेखा विभागातर्फे संचिकेत दिल्या जातात.तथापि कामावर देखरेख करणाऱ्या कर्मचाऱ्यांची तोकडी संख्या विचारात घेता अशा प्रकारच्या प्रत्येक कामावर प्रभावी नियंत्रण ठेवणे नेहमीकरीता शक्य होत नाही.अशा परिस्थितीत कंत्राटदार त्यांनी दर कमी भरलेले असल्याने कामाच्या गुणवत्तेकडे ते लक्ष देत नाहीत व त्यांना नफ्याचे प्रमाण वाढविण्याचा किंवा तोटयाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करतात ही.वस्तुस्थिती आहे.

तसेच दर कमी असल्यामुळे फेर निविदेची जेव्हा शिफारस करण्यात येते व शिफारस मंजुर होऊन जेव्हा फेरनिविदा मागविल्या जातात तेव्हा निविदा पहिल्या वेळेपेक्षा जास्तीच्या दराने येतात. अशा वेळेस दोन निविदांमधील टक्केवारीमध्ये फरक येतो व लेखापरिक्षण अहवालात संबंधित विभगाकडे आक्षेप (Haif Margin) पाठविण्यात येवून संबंधित विभागावर ठपका ठेवण्यात येतो.

तरी या विषयावर सविस्तर चर्चा होवून एक धोरण ठरणे आवश्यक आहे.तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा किती टक्क्यापर्यंत कमी दराच्या निविदा स्विकारायच्या किंवा किती दरापर्यंत निविदा नाकारायच्या याबाबत एक धोरण ठरणे आवश्यक आहे. तरी प्रस्ताव सविस्तर चर्चेस्तव व योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागील एका बैठकीत या विषयासंदर्भात चर्चा केलेली होती.

**श्री.जयवंत ओक :** लेखा विभागामार्फत खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव का ठेवण्यात आला संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.प्रशासनाचा उद्देश काय आहे.

**प्र.कार्य.अभियंता (ज.नि.व वि.) :** या विषयानुसार जवळपास सर्वच अभियंत्यांच्या अशा प्रकारच्या सुचना आहे असे समजावे.हा प्रस्ताव मी सादर केलेला असला तरी ज्यावेळेस टेंडर काढले जाते. त्यात ३०-३५४-४०% कमी दर भरता येतो.त्यामुळे रि टेंडर काढावे व तेथून असे शेरे येतात की, संबंधीत ठेकेदार ४०-४५% बिलाने करण्यास तयार असेल तर आपला आक्षेप काय?या संदर्भात माहिती विचारली जाते. एकतर उत्कृष्ट काम होण्याच्या दृष्टीने कर्मचारी वर्ग कमी आहे. सर्वच कर्मचाऱ्यांना ऑफिसमध्ये थांबवावे लागते.तसेच इतर प्रॅक्टीकल अडचणी आहेत हे सर्वांना माहित आहे.या पार्श्वभुमीवर क्वॉलीटी कंट्रोल करणे अडचणीचे होत आहे.एखाद्या कामाबाबत चर्चा करुन निर्णय घेता येऊ शकते. एखाद्या संचिकेबाबत री टेंडर झाले तर पुन्हा त्याच कामाचे जास्तीचे दराचे टेंडर येऊ शकते.पुढे पाच वर्षांनी किंवा जेव्हा ऑडीट होईल तेव्हा आक्षेप घेतला जातो व याची जबाबदारी आपली असे पत्र दिले जाते.

**मा.सभापती :** २५% वर देणार नाही असे टेंडर फॉर्म मध्येच घ्यावे.सभागृहाची मान्यता घेऊन योग्य होणार आहे का?

**प्र.कार्य.अभियंता (ज.नि.व वि.) :** असे करता येणार नाही.टेंडरमध्ये नमुद करुन शकत नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** एखादे टेंडर १०% बिलोने आले तर काय निर्णय होणार आहे.मर्यादा घालुन दिली तर २०% कमी दरानेच निविदा स्विकाराव्या.

**प्र.कार्य.अभियंता (ज.नि.व वि.) :** भविष्यात ऑडीट होईल त्यावेळी अभियंत्यावर जबाबदारी फिक्स करु नये असे सर्व अभियंत्यांचे मत आहे,तसा तरी निर्णय घेण्यात यावा.

**श्री.जयवंत ओक :** ३५% ते ४०% बिलोने निविदा गेल्यास ऑडीटमध्ये आक्षेप घेतले जातात,ऑडीट विभागाची मान्यता कशी असू शकते.प्रशासनाची मान्यता काय असावी याबाबत विचार विनिमय असावे.सार्वजनिक बांधकाम खाते जिल्हा परिषद मध्ये ज्याप्रमाणे कामे होतात त्याप्रमाणे करता येईल का? याबाबतीत काय उपाय योजना करता येईल ते पहावे.

**श्रीमती डॉ.आशा बिनवडे :** कमी दराने निविदा येणार व उत्कृष्ट काम झाले नाही तर त्या ठेकेदाराचे बिल थांबवितात का? आणि अमुक दरापर्यंत निविदा स्विकारायच्या याबाबत निर्णय घेता येतो का?

**प्र.कार्य.अभियंता (ज.नि.व वि.) :** किती बिलोपर्यंत निविदा स्विकारायच्या याबाबत सभागृह निर्णय घेवू शकते.

**मा.सभापती :** मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** सर्व प्रथम असे निवेदन करु इच्छितो की,प्रस्ताव सादर केल्यानुसार स्थायी समितीस असे दर निश्चित करण्याचा अधिकार नाही. शासनाने निविदा वगैरे स्विकारणे या संदर्भात कार्यप्रणाली ठरवुन दिलेली आहे.सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे विभाग यांचेकडे जी कार्यप्रणाली अवलंबविली जाते, तीच कार्यप्रणाली महानगरपालिकेमध्ये अवलंबविली जाते.

ठेकेदाराचे मत लक्षात न घेता ज्यावेळेस निविदा री टेंडरसाठी शिफारस केली जाते. किंवा री टेंडर झाले असेत तरच अभियंत्यावर ठपका ठेवला जातो. शेडयूल बी नुसार ठेकेदारांनी निविदा भरलेली असते.तो काम करण्यास तयार असेल तर नियमाने काम करुन घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची असते. बिलाची रक्कम अदा करतांना काम व्यवस्थित व शेडयुल बी नुसार झालेले आहे किंवा काय ही सर्व जबाबदारी त्या विभागाची असते. अभियंत्यावर ठपका ठेवला जातो,असा काही प्रकार यातुन होत नाही.शासन जी.आर.असा आहे की, १५% बिलोपर्यंतच्या निविदा साधारणपणे स्विकाराव्यात. आजच्या परिस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागात ३८ ते ४०% कमी दराने निविदा स्विकारल्या जातात. शेडयुल-बी नुसार एखादा ठेकेदार काम करण्यास तयार असेल तर लेखा विभागाकडून हेच स्विकारल्या जाते की, संबंधीत ठेकेदार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे शेडयुल-बी नुसार काम करीत असेल तर ते करुन घेण्यात यावे. आताच प्रश्न उपस्थित झाला २०% पर्यंत मर्यादा घालुन द्यावी.परंतु १० लोकांनी २०% पर्यंत कमी दराने निविदा भरली तर टेंडर द्यायचे कुणाला हा प्रश्न निर्माण होईल. टेंडर हे स्पर्धात्मक दरासाठीच असते.त्यामुळे निश्चित दर मर्यादा घालून करण्याचा निर्णय घेता येणार नाही व तसे अधिकार स्थायी समितीला नाही.

**श्री.मीर हिदायतअली :** यापुर्वी काही कामे ५०% बिलोने गेलेली होती. ४०-५०% कमी दराने निविदा सादर झाल्यास त्या कामाचा दर्जा निकृष्ट असतो व ऑडीटमध्ये अधिकाऱ्यावर ठपका ठेवला जातो. किती तरी प्रकरणात निविदा २-३% भरुन आलेल्या आहे, त्या संदर्भात सुध्दा अधिकाऱ्यावर ठपका ठेवलेला आहे.

**मुख्यलेखा अधिकारी :** ऑडीटमध्ये असे आरोप कुणावरही केले जात नाही. कुणाचे आक्षेप असेल तर ऑडीट करुन विचारणा केली जाते की, पुर्वी १०-१५ निविदा भरुन आलेल्या होत्या. पुन्हा निविदा १०-१५ विक्री होतात, परंतु प्रत्यक्षात निविदा २ ते ३ येतात. त्यावेळेस ऑडीट विभागाकडून विचारणा होते की,स्पर्धा झालेल्या नाही, वाटाघाटीसाठी बोलवावे. अभियंत्यावर आरोप केलेले नाही. आतापर्यत तरी मी संचिकेत तसे लिहिलेले नाही.

**श्री.जयवंत ओक :** २० ते २५% कमी दराने निविदा स्विकारल्या गेल्या तर संबंधित ठेकेदारांनी चांगली कामे केली पाहीजे ही जबाबदारी सोपवावी.

**मा.सभापती :** या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झालेली आहे. असे प्रस्ताव घेता येत नाही असे प्रशासनानेच खुलासा केलेला आहे, म्हणून यापुढे अशा प्रस्तावावर मा.आयुक्त यांनी मान्यता देवून प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणु नये व सभागृहाचा वेळ वाया घालवु नये व योग्य रितीने अभ्यास करुनच प्रस्ताव सादर करावे, हा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रस्ताव नामंजुर करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले, त्यास मंजुरी देण्यात आली.

**श्री.औताडे रावसाहेब :** टेंडर होऊन ६ महिने झाले.हर्सुल येथील फुलेनगर भागात ड्रेनेजचे काम थांबवुन आहे ते केव्हा सुरु करणार आहे.

**मा.सभापती :** आताच स.सदस्य श्री.औताडे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार संबंधित ठेकेदाराकडुन काम करुन घ्यावे, करण्यास तयार नसेल तर संबंधित ठेकेदार यांना काळया यादीत समावेश करावा व त्याचे डिपॉझिट रक्कम जप्त करावी.

**श्री.कावडे साहेबराव :** १ लक्ष ते १० लक्षची जी कामे असतात, अशा कामांना ५-६ महिन्याची मुदत असावी. परंतु १-१ वर्ष कामे होत नाही याची चौकशी करुन नियमाने कार्यवाही व्हावी. करण्यास तयार नसेल तर दुसरे टेंडर काढुन कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** अे-१,बी-१ मधील व इतर जी कोणतेही कामे थांबवुन असतील ती दोन आठवडयात पुर्ण करुन घ्यावी. करण्यास तयार नसेल तर काळया यादीत टाकावे,कामे वेळेवर केले नाही व अे-१,बी-१ मध्ये २ आठवडयाच्या आत काम सुरु केले नाही तर त्यापुढे प्रत्येक दिवशी दंड आकारणी करु शकतो. वर्क ऑर्डर दिल्यानंतर २ आठवडयात काम सुरु केले पाहिजे.

**श्री.जयवंत ओक :** ३५ ते ४०% बिलोने जी कामे दिलेली आहे व संबंधित ठेकेदार काम करण्यास तयार नसेल तर दुसऱ्या क्रमांकाची ज्याची निविदा भरुन आले त्यांना काम देण्यात यावे अशी किती कामे आहे की ती कामे करण्यास ठेकेदार तयार नाही.

**मा.सभापती :** जी जी कामे थांबवुन आहे किंवा ठेकेदार काम करण्यास तयार नाही अशी किती कामे आहे व ठेकेदारांची नांवे या संदर्भात प्रत्येक प्रमुखांनी यादी तयार करुन पुढील बैठकीत सादर करावी त्यावर निर्णय घेता येईल.

**विषय क्र. ८०/४:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इ.स.२००२ वर्षातील साजरे करावयाच्या कार्यक्रमांची यादी व नियमावली मा.आयुक्तांकडे सादर केली होती.त्यांच्या मान्यतेनंतर सदरील कार्यक्रम स्थायी समिती यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. वर्षभरातील कार्यक्रम पत्रिका सोबत जोडली आहे.

संशोधन केंद्रातर्फे समता व परीवर्तनवादी समाजसुधारक व राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या,स्मृतीदिन व इतर महत्वाचे कार्यक्रम परिसंवाद, चर्चासत्र कार्यशाळा वगैरेचे आयोजन करण्यात येते अशा कार्यक्रमासाठी औरंगबाद बाहेरील प्रमुख वक्ता असल्यास त्या कार्यक्रमासाठी एकूण खर्च रु.९५००/- पर्यंत व स्थानिक वक्ता असल्यास कार्यक्रमावरील

खच्र रु. ७०००/- पर्यंत येतो. परिसंवादासाठी निमंत्रित स्थानिक वक्त्यांना प्रत्येकी रु. ३००/- चे मानधन देण्याचा प्रस्ताव आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**प्रकल्प संचालक :** एकूण काय्रक्रम २१ होणार आहे. एका कार्यक्रमासाठी ९५००/-रु.खर्च येईल. स्थानिक वक्ता असेल तर ७०००/- खर्च येईल.

**मा.सभापती :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात चालु वर्षात एकूण २१ कार्यक्रम होणार आहे अशी यादी प्रशासनाने सादर केलेली आहे. यास जवळपास रु. २ लक्ष खर्च येणार आहे. यातील १० कार्यक्रम य वर्षात प्रायोगिक तत्वावर घेण्यात यावे. पुढील वर्षापासुन सर्व कार्यक्रम घेण्यात यावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या कार्यक्रमात रोहीदास महाराज यांचा सुध्दा कार्यक्रमाचा समावेश करावा.

**मा.सभापती :** यात रोहीदास महाराज यांचे कार्यक्रमाचा समावेश करावा. एकूण १० कार्यक्रम घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे सन २००२ मध्ये साजरे करावयाचे २१ कार्यक्रमापैकी १० कार्यक्रम घेण्यास व या कार्यक्रमात रोहीदास महाराज यांचेवर आधारीत कार्यक्रम घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/५:**

(दि.१५-१२-२००१ च्या स्थायी समिती सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव क्रमांक ६१/५)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द वेळेवेळी कार्यालयीन अनियमितता व प्रशासकीय प्रकरणात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत असतात. सदरच्या विभागीय चौकशी महानगरपालिका अस्थानेवरील कार्यरत वर्ग -१ व वर्ग-२ दर्जाच्या अधिकाऱ्याकडे दिल्या जातात. संबंधित अधिकाऱ्यांना स्वतःच्या विभागाची कामे सांभाळून अशा विभागीय चौकशी कराव्या लागतात. महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी त्यांच्याकडील कामाच्या व्यापामुळे विभागीय चौकशी सारख्या प्रकरणांना पुरेसा वेळ देवू शकत नाहीत. परिणामी चौकशी प्रकरणे निर्धारीत वेळेत पुर्ण न होता प्रदिर्घ काळासाठी प्रलंबित राहतात.

उपरोक्त बाबींचा विचार करता भारतीय प्रशासकीय सेवेत निवृत्त अधिकारी / निवृत्त जिल्हा न्यायाधीश / निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची चौकशीच्या काम कामाजासाठी विशिष्ट मानधनावर नियुक्त केल्यास चौकशी प्रकरणे एकाच अधिकाऱ्यांमार्फत व निर्धारीत वेळेत निकाली निघू शकतील. या कामासाठी औरंगाबाद शहरात वास्तव्यास असलेल्या निवृत्त अधिकारी व न्यायाधिशांकडून सविस्तर तपशिलासह अर्ज मागविण्यात येतील. मानधनाबद्दल वेळोवेळी स्थायी समिती सभेस माहिती देण्यात येईल.

**टीप :**

(दिनांक १५-१२-२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत ठरल्यानुसार --------

"मा.विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधला असता विभागीय आयुक्त कार्यालयातील चौकशी अधिकारी यांचेकडे प्रकरणांची संख्या जास्त असल्याने चौकशीसाठी अधिकारी उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे.तरी याद्वारे आपणास कळविण्यात येते की,भारतीलय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी / निवृत्त जिल्हा न्यायाधिश / निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्यांचे वास्तव्य औरंगाबाद शहरात आहे अशा अधिकाऱ्यांची चौकशीच्या कामकाजासाठी विशिष्ट मानधनावर नियुक्ती करणे आवश्यक आहे." असे प्रशासनातर्फे दिनांक १२-२-२००२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा,श्री.भरत लकडे :**मानधन किती देणार आहे.

**मा.सभापती :** शासनाचे जे काही दर असतील जसे विभागीय आयुक्त कार्यालयात ज्या प्रमाणे मानधन देण्यास व या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालकेचे अस्थापनेवरील कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीसाठी विशिष्ट मानधनावर भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त जिल्हा न्यायाधीश, निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची विशिष्ट मानधनावर चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्यलेखापरिक्षक यांनी सन १९९७-९८ ते ९९-२००० या काळात संत एकनाथ रंगमंदिर येथील आरक्षण करण्या संबंधाने वसुली केलेली रक्कम महानगरपालिका फंडात जमा न करणे, रंगमंदिर भाडयापोटी स्विकारलेल्या रकमेच्या एकुण ३६ पावत्या (स्थळप्रती) पैकी गहाळ केलेल्या २२ पावत्या कार्यालयास सादर न करणे व त्याची रक्कम लेखा विभागात जमा न करणे. इ.संबंधाने लेखा परिक्षण अहवाल सादर केला आहे.

मुख्य लेखा परिक्षक यांच्या सन १९९७-९८ च्या लेखा परिक्षण अहवालानुसार संत एकनाथ रंगमंदिर येथील आरक्षण संबंधाने पावती पुस्तकातील ३६ पावत्यापैकी २२ पावत्या गहाळ करण्यात आल्या यास श्री.बी.के.रगडे वरिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग हे जबाबदार आहेत.तसेच १९९८-९९ या वर्षातील लेखा परिक्षण अहवालानुसार सदर प्रकरणी एकूण २० पावत्यांच्या स्थळप्रती संबंधित पावती पुस्तकात नाहीत. याबाबत मुख्येखापरिक्षक यांनी वेळोवेळी पावती पुस्तकातील स्थळप्रती सादर करण्याबाबत श्री रगडे यांना कळविले. तथापि त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच १९९८-९९ लेखा परिक्षणाच्या अहवालावरुन रु. ११,१००/- इतक्या रकमेचा अपहार केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झालेले आहे.

सन १९९९-२००० च्या लेखा परिक्षणाच्या अहवालावरुन संत एकनाथ रंगमंदिर भाडे वसुली अंतर्गत रकमेचा कमी भरणा करणे, बेरजेमध्ये चुक करुन रकमेचा कमी भरणा करणे इ.बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. तसेच लेखा परिक्षण अहवालात दर्शविलेली रु. ९०,९६०/- एवढया रकमेचा अपहार केलेला आहे हे मुख्यलेखा परिक्षक यांच्या सन १९९७-९८,९८-९९ व ९९-२००० च्या लेखा परिक्षण अहवाल व उपआयुक्त (महसुल) यांच्या चौकशी अहवालावरुन दिसुन आलेले आहे.

उक्त कारणास्तव कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/१२८०/२००० दि.३१-५-२०००नुसार श्री.बी.के.रगडे,वरिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांस निलंबीत

करण्यात आले व जा.क्र.मनपा/अस्था-१/२०००१८५० दि. ५-७-२००० नुसार श्री.बी.के.रगडे यांस आरोपपत्र देण्यात येवून त्यांचे खाते चौकशी प्रकरणी श्री.एस.डी.पानझडे,उपअभियंता (स्लम-२) यांची चौकशी अधिकारी म्हणून दि. ५-७-२००० च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली होती.चौकशी अधिकारी यांनी दि.२१-११-२०००रोजी चौकशी अहवाल सादर केलेल्या निष्कर्षानुसार श्री.बी.के.रगडे यांनी एकूण रक्कम रु.१,८०,०२०/- इतक्या रकमेचा अपहार केलेला होता, पैकी रु. ८९,३४०/- एवढया रकमेचा कार्यालयात भरणा केला असून उर्वरीत रक्कम रु. ९०,६८०/- अद्याप भरणा केलेला नाही.

कार्यालयीन नोटीस जा.क्र./मनपा/अस्था-१/२००१/ २५७५ दि. ११-९-२००१ नुसार श्री. बी.के.रगडे यास रू.९०,६८०/- इतक्या रकमेचा कार्यालयात भरणा करण्यासाठी आदेशित करण्यात आलेले होते. तथापि उक्त रकमेचा भरणा न केल्यामुळे त्यास महानगरपालिका,औरंगाबादच्या सेवेतून कायमचे कमी (बडतर्फ) का करण्यात येऊ नये,याबाबतचे लेखी स्पष्टीकरण सात (७) दिवसाचे आत सादर करण्यासाठी जा.क्र./मनपा/अस्था-१/ २००१/२९६६ दि. ५-११-२००१ च्या नोटीस अन्वये कळविण्यात आले.त्या उत्तरी श्री.बी.कं.रगडे यांनी त्यांचे दि. १२-११-२००१ च्या अर्जान्वये त्यांचे स्पष्टीकरण सादर केले. तथापि त्यांनी सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नव्हते. शिवाय त्यांनी अपहारीत रकमेचा भरणा केलेला नाही.

श्री.बी.के.रगडे यांच्या विभागीय चौकशीमध्ये त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे तसेच त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ (१)(३)चा भंग केला असल्याचे सिध्द झालेले आहे. करीता त्यांचेवर मुंबई प्रांतिक महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार शास्ती लावणे आवश्यक आहे.

करीता मु.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (६) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे श्री.बी.के.रगडे वरिष्ठ लिपीक (सध्या निलंबित) यांस महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे बाबतचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** न्यायालयातील परिस्थिती काय आहे या संदर्भात खुलासा करावा.

**विधी सल्लगार :** श्री.रगडे यांचे प्रकरणामध्ये त्यांनी मा.उच्च न्यायालय येथे रिट याचिका क्र. ३६,३७ /२००१ नुसार सादर केलेली होती व न्यायालयाने असे सांगितले की,या प्रकरणात चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार काही कार्यवाही प्रस्तापित करण्याची बाकी असेल तर १५ दिवसांत प्रशासनाने अंतिम निर्णय घ्यावा.तो घेतला नाही तर संबंधित कर्मचाऱ्याचे निलंबन काळातील सर्व सेवेचे फायदे वगैरे त्यांना द्यावे लागतील. असे आदेश आल्यानंतर कार्यवाही प्रस्तपित करण्यात आली परंतु विहित मुदतीत कार्यवाही पुर्ण न झाल्याने प्रशासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयाकडून वेळ मागवून न देता प्रशासनाच्या पध्दतीने ही कार्यवाही पुर्ण करावी असे आदेश केले.

**श्री.मीर हिदायतअली :** संबंधित कर्मचारी दोन वर्षापासुन निलंबित आहे. निलंबन काळात सुध्दा ७५%,५०% वेतन दिले जाते. त्यांना कामावर घेण्यात यावे. न्यायालयाच्या काय जो निर्णय येईल त्यानुसार पुन्हा कार्यवाही करता येईल. यापुर्वी ८-१० निलंबित होते, त्यांनाही घ्यावे.

**श्री.जयवंत ओक :** न्यायालयाचा निर्णय न लागता प्रशासन बडतर्फ करु शकते का, खुलासा देण्यात यावा.

**उपआयुक्त (प्र) :** लेखापरिक्षण अहवालानुसार श्री.रगडे यांनी काही रकमेचा अपहार केलेला होता त्यानुसार त्यांना निलंबित करण्यात आले व त्यानंतर सविस्तर चौकशी करण्यात आली व चौकशीच्या अहवालानुसार त्यांना सेवेतून कायमचे बडतर्फ करावे असा प्रस्ताव स्थायी समितीसमोर देण्यात आलेला आहे व बडतर्फ करण्यास स्थायी समितीसमक्षम आहे. यापुर्वी निलंबन करण्यास आयुक्त सक्षम होते, त्यानुसार निलंबन केले नंतर चौकशी केली.आरोप सिध्द झाल्याने तसा प्रस्ताव बडतर्फ करण्याचा सादर केलेला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी बडतर्फीच्या निर्णयावर उच्च न्यायालयात चालेना केले व त्यावर उच्च न्यायालयाने निर्देश दिले की, १८ तारखेपर्यंत बडतर्फी बाबत निर्णय घ्यावा व कार्यवाही करावी. नसता तो कामावर आहे असे समजण्यात येईल. त्या पध्दतीने मुदतीत चौकशी पुर्ण न झाल्यामुळे त्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार कामावर घेतलेले आहे. प्रस्ताव हा बडतर्फीचा प्रशासनाने ठेवलेला आहे.स्थायी समिती निर्णय घेण्यास सक्षम आहे.कामावर घेऊ शकते. शिक्षा करु शकेल,वेतनवाढ बंद करु शकेल, काढुन टाकण्याचे सुध्दा अधिकारी आहे. तसेच निलंबीत करणे, बडतर्फ करणे या दोन्ही बाबी वेगवेगळया आहे.

**श्री.जयवंत ओक :** न्यायालयात प्रकरण चालु असतांना कामावर घेतले पुन्हा बडतर्फीचा प्रस्ताव कसा येतो.

**श्री.जगदीश सिध्द :** चौकशी चालु असतांना त्यांना निलंबित केले, चौकशी पुर्ण झाली त्या अहवालावर न्यायालयात गेले उच्च न्यायालयाने १५ दिवसाची मुदत दिलेली होती व १५ दिवसांत कार्यवाही न केल्यास ते कामावर आहे असे समजण्यात येईल. प्रशासनाने मुदतीत कार्यवाही न केल्याने कामावर घेतले आता कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे, प्रस्ताव बरोबर आहे.

**श्री.नंदकुमार फुलारी :** बडतर्फ करु नये. निलंबन काळातील फायदे देऊ नये. कामावर घेण्यात यावे.

**श्री.भरत लकडे :** १०-१५ कर्मचारी सध्या निलंबित असुन त्यांना ७५% वेतन दिले जाते, काम न करता ७५% वेतन देणे परवडणारे नाही. चौकशी होईपर्यत त्यांना कामावर घेण्यात यावे.

**उपआयुक्त (प्र) :** निलंबन काळातील कोणतेही फायदे संबंधित कर्मचाऱ्यांना मिळणार नाही.कारण प्रकरण न्यायालयात होते व जे आरोप ठेवण्यात आले ते सिध्द झालेल आहे.

**मा.सभापती :** या विषयावर सविस्तर चर्चा झालेली आहे. संबंधित कर्मचारी श्री. रगडे यांनी ९०६८०/- रु.अद्याप महानगरपालिकेकडे भरणा केलेले नाही. त्यांचेकडून ९०६८०/- रु.भरणा करुन घ्यावे व त्यांचे ३ वेतनवाढ कमी करण्यात यावेत आणि कोणतेही थकबाकी देण्यात येवू नये. त्यांना कामावर रुजू करुन घ्यावे असा निर्णय घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे श्री.बी.के.रगडे वरिष्ठ लिपिक , मालमत्ता विभाग यांनी अद्याप रु.९०,६८०/- महानगरपालिकेकडे भरणा केलेले नसल्याने त्यांचेकडून भरणा

करुन घेण्यास आणि त्यांचे ३ वार्षिक वेतनवाढ कमी करण्यास व कोणत्याही प्रकारची थकबाकी मिळणार नाही. या अटीसह त्यांना कामावर घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री.जगदीश सिध्द :** १६ तारखेच्या सामना वृत्तपत्रात हर्सुल तलावाच्या जागेत २००X२०० जागेत टरबुज,खरबुज लागवड करण्यासंदर्भात निविदा सुचना काढलेली आहे.ही लागवड २० मार्च ते २० जुन पर्यंतच होणार आहे.परंतु निविदा नुकत्याच निघालेल्या असुन यापुर्वीच त्या जागेवर टरबुज,खरबुज लागवड झालेली आहे.काही टरबुज विक्री सुध्दा झालेले आहे. (सभागृहात स.सदस्य टरबुज,खरबुज लागवड झालेल्याची छायाप्रत दाखवितात.) ही परवाची छायाप्रत आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** स.सदस्य जो फोटो दाखवित आहे, त्याचा सर्व्हे नंबर वेगळा असु शकतो. अधिकाऱ्यांचा खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित कुणी व्यक्तिने अनधिकृतपणे लागवड केलेली असेल तर त्यास आपण जबाबदार राहणार नाही. अनधिकृत पेरणी काढुन टाकण्यात आली.मागील वर्षी निविदा नव्हती.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** जबाबदार नाही असे उत्तर देणे बरोबर नाही.

**श्री.जगदीश सिध्द :** हर्सुल तलावाची जागा किती किती जागेवर लागवड झाली हे सुध्दा अधिकाऱ्यांना माहित नाही. माहित असेल तर त्यांनी खुलासा करावा. दरवर्षी हाच प्रकार होत असेल असे वाटते. गेल्यावर्षी टेंडर काढले होते का?

**मालमत्ता अधिकारी :** एकूण जागा किती हे आताच खुलासा करता येणार नाही परंतु दरवर्षी अनधिकृत लागवड होत असे महणूनच यावर्षी पासुन टेंडर काढुन कार्यवाही करीत आहोत. या अगोदर टेंडर काढलेले नव्हते.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी उत्तर देतांना जबाबदारीने उत्तर दिले पाहीजे, मला माहित नाही. अनधिकृत केलेले आहे, जबाबदार नाही. आपण मालमत्ता अधिकारी आहात महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. भान ठेवून उत्तर .द्यावे.

**मालमत्ता अधिकारी :** तेथे जे काम चालू होते. ते बंद केलेले आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** गंभीर स्वरुपाची बाब आहे. जे मालमत्तेचे संरक्षण करतात त्यांना माहित नाही. हर्सुल तलावाची जागा किती आहे, अशी परिस्थिती असेल तर योग्य नाही.

**श्री.मधुकर सावंत :** संबंधित मालमत्ता अधिकारी त्यांची जबाबदारी टाळत आहे व चुकीचा खुलासा करुन सभागृहाची दिशाभुल करीत आहे. सध्या त्या ठिकाणी टरबुजाची लागवड झाली. टरबुज आलेले आहे. हे स.सदस्य प्रत्यक्ष छायाप्रत दाखवित असतांना मला माहित नाही. अनधिकृत असेल,त्यास जबाबदार नाही, असे उत्तर देणे बरोबर नाही. यापुर्वी महानगरपालिकेच्या निवासस्थानात किती कर्मचारी अनधिकृत राहतात या बाबत माहिती विचारली असता एक ही कर्मचारी महानगरपालिकेच्या निवासस्थानात अनधिकृतपणे राहत नाही असे उत्तर दिलेले होते. परंतु काही स.सदस्यांनी

माहिती घेतली असता २१ कर्मचारी अनधिकृतपणे निवासस्थानात राहतात हे स्पष्ट झाले. यामुळे अधिकारी दिशाभुल करतात व सभागृहाचा वेळ वाया घालवितात, म्हणून त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश करावे.

**श्री.भरत लकडे :** राम विहार हौसिंग सोसायटीचे अतिक्रमण काढण्याबाबत का उशीर झालेला आहे. खुलासा करावा.

**मा.सभापती :** आताचा स.सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार महानगरपालिकेच्या जागेवर रामविहार हौसिंग सोसायटीचे अतिक्रमण झालेले होते. या संदर्भात कॅव्हेट दाखल होवून स्थगिती आदेश आलेले होते.

तो स्थगित आदेश रद्द झालेला असून विधी सल्लागार यांनी प्रशासकीय अधिकारी यांना तसे अतिक्रमण काढण्याबाबत कळविलेले आहे.तरी सुध्दा अद्याप ते अतिक्रमण काढलेले नाही, त्यामुळे मा.आयुक्त यांना सुचना देण्यात येत आहे की, उद्याच ते अतिक्रमण काढावे नसता संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी. ज्या व्यक्तिीने त्यांचे नावाने बोगस पी.आर.कार्ड तयार केले होते, त्यांचेवर महानगरपालिकेने ४२० चा गुन्हा दाखल करावा व त्याची प्रत संबंधित नगरसेवकांना त्वरीत द्यावी.तसेच हर्सुल तलावातील अनधिकृतपणे टरबुजाची लागवड केलेल्या जागेचा मालमत्ता अधिकारी यांनी पंचनामा करावा संबंधित व्यक्तिच्या नावाने पोलीसकेस दाखल करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा ताब्यात घ्यावी.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# ***औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद***

**दिनांक २७-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक २७-३-२००२ रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.३० वाजता स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदेमातरम्"या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. लकडे भरत श्रीपती
७) श्री. सलीम पटेल समशेर पटेल
८) श्री. सावंत मधुकर दामोधर
९) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
१०) श्री. शे.इलियास किरमानी शे.उमर
११) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१२) श्री. ओक जयवंत केशवराव
१३) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१४) डॉ. आशा उत्तम बिनवडे

**विषय क्र. ८३/१:**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्रीय सिमा शुल्क विभागामार्फत कर बुडविणाऱ्या कंपनी / संस्था यांचेवर धाडी टाकण्यात आल्यानंतर संबंधितांकडून दंडापोटी वसुल केल्या जाणाऱ्या रकमेपैकी १०% रक्कम ही संबंधित कार्यवाही करणाऱ्यांना बक्षिसाचे स्वरुपात देण्याची पध्दत आहे. तसेच इतर महानगरपालिकेमध्ये दंडात्मक वसुल केलेल्या रक्कमेच्या १०% रक्कम कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर देण्यात येते.

यांच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात विभागातील भरारी पथकामार्फत शहर हद्दीत विना जकात माल आयात करणाऱ्या आयातकांना पकडून त्यांचेकडून जकात व त्यावर दहापट दंड म्हणून वसुल करण्यात येते. दंडापोटी वसुल करण्यात आलेल्या एकूण रक्कमेच्या ५% रक्कम ही कार्यवाही करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व माहिती देणाऱ्या व्यक्तीस मात्र बक्षिस स्वरुपात देण्यात यावी. जेणेकरुन कर्मचाऱ्यांमध्ये काम करण्याचा उत्साह वाढीस लागेल व पर्यायाने महानगरपालिकेचे जकात उत्पन्नात देखील चांगली वाढ होण्याची शक्यता आहे.

करीता महानगरपालिका जकात कर्मचाऱ्यांनी विना जकात माल शहर हद्दीत आणणाऱ्या आयातकांना पकडून त्यांचेकडून जेवढी रक्कम दंडापोटी वसुल करण्यात येईल,त्याचे ५% रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना बक्षिस स्वरुपात देण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.मीर हिदायतअली :** केंद्रीय सिमा शुल्क कर्मचाऱ्यांना १०% रक्कम दिली जाते. त्याप्रमाणे मनपाच्याही कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. जकातीचे उत्पन्न वाढेल.

**श्री.सलीम पटेल :** हेतूपुरस्सर गाडी नाक्यावरुन सोडणे व नंतर गाडी पकडुन दंड वसुल करुन बक्षिस म्हणून देणे बरोबर होणार नाही. मुद्दामहुन गाडया सोडण्यात येऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

**मा.सभापती :** मुद्दामहुन गाडी सोडून दंड वसुल करुन बक्षिस वजा रक्कम देऊ नये.मुद्दामहुन गाडी सोडणे असे प्रकार होऊ नये यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचा जकात विभागातील कर्मचाऱ्यांनी विना जकात शहर हद्दीत माल आणणाऱ्या आयातकांना पकडुन त्यांचेकडून जेवढी रक्कम दंडापोटी वसुल करण्यात येईल. त्याच्या ५% (पाच टक्के) रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना व माहिती देणाऱ्या व्यक्तिस बक्षिस स्वरुपात देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/२:**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मुख्यालय व टाऊनहॉल परिसर या दोन ठिकाणी उपहारगृह भाडे तत्वावर देण्यासाठी दै.लोकमत समाचार,दै.विश्वमित्र,दै.लोकविजय या वर्तमानपत्रात क्र./मनपा/भा म अे/१४२०/२००१ दि. ३१-१२-२००१ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दिनांक ८-१-२००२ पर्यंत १४ (चौदा) निविदा विकल्या गेले व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दिनांक १०-१-२००२ पर्यंत (१२) बारा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदामध्ये मुख्यालय परिसर करीता (७) सात व टाऊन हॉल परिसर करीता (५) पाच अशा निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याखालील प्रमाणे आहेत.

**<u>मुख्यालय परिसर करीता</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सुनिल शेट्टी | ३७५०/-प्रतिमहा |
| २) | श्री.शेख अख्तर शे.जब्बार | ३३००/-प्रतिमहा |
| ३) | श्री.हरीश एन.शेट्टी | ३०००/-प्रतिमहा |
| ४) | श्री.सलीमोद्दीन शे.कमालोद्दीन | २७००/-प्रतिमहा |
| ५) | श्री.सय्यद जमीर स.बशीर | २६५७/-प्रतिमहा |
| ६) | श्री.कल्याणी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था | २०००/-प्रतिमहा |
| ७) | श्री. तहसीन जफर नवाब | १२००/-प्रतिमहा |

**<u>टाऊन हॉल परिसर करीता</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद जमीर सय्यद बशीर | ३२५०/-प्रतिमहा |

| | | |
|---|---|---|
| २) | श्री.शे. सलीमोद्दीन शे.कमालोद्दीन | ३०००/-प्रतिमहा |
| ३) | श्री.सुधीर शेट्टी | २२५०/-प्रतिमहा |
| ४) | श्री.कल्याणी बहुउद्देदशीय सेवाभावी संस्था | १६००/-प्रतिमहा |
| ५) | श्री. तहसीन जफर नवाब | १५००/-प्रतिमहा |

याप्रमाणे प्राप्त निविदामध्ये मुख्यालय परिसरामध्ये उपहारगृहे चालविणेसाठी श्री.सुनिल शेट्टी यांचे दर तुलनात्मकदृष्टया रु. ३७५०/- प्रतिमहाचे जे की, सर्वात जास्त आहेत.

टाऊन हॉल परिसरात उपहारगृह चालविण्यासाठी श्री.सय्यद जमीर सय्यद बशीर यांचे दर तुलनात्मकदृष्टया रु. ३२५०/- प्रतिमहाचे जे की, सर्वात जास्त आहेत.

करीता प्राप्त दरात सर्वात जास्त दराचे निविदाधारकाचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मुख्यालय परिसरामध्ये उपहारगृह चालविण्यासाठी श्री. सुनिल शेट्टी यांचे दर रु. ३७५०/- प्रतिमहा तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त असल्याने आणि टाऊन हॉल परिसरात उपहारगृह चालविण्यासाठी श्री. सय्यद जमीर सय्यद बशीर यांचे दर रु.३२५०/- प्रतिमहा तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त असल्याने सदर निविदा धारकांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५/३:**

उपआयुक्त (प्र.) मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा अंतर्गत सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहायल कार्यान्वित आहे. प्रत्येक ठिकाणी नागरीकांना प्रवेश देतांना मनपाकडून प्रवेश शुल्क आकारण्यात येतो. नागरिकांना सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी दोन ठिकाणी रांगा लावाव्या लागतात, त्यामुळे नागरीक नाराज होतात.तरी प्रेक्षकांचे सोयीसाठी फक्त सिध्दार्थ उद्यान पहावयाचे आहे. त्यांना मुख्य प्रवेशद्वाराजवळ प्रचलित दरानुसार उद्यानासाठी प्रवेश द्यावा. परंतु ज्यांना उद्यानासह प्राणी संग्रहालय पहावयाचे असल्यास अशा प्रेक्षकांना खालील दराप्रमाणे (ब) प्रवेश शुल्क आकारण्यात यावे. जेणेकरुन मनपाचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

**<u>अ) सिध्दार्थ उद्यान (प्रचलित दर रुपये)</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रौढांसाठी | २.०० |
| २) | मुलांसाठी | मोफत प्रवेश |

**ब) प्राणी संग्रहालय**

| | प्रचलित दर रु. (फक्त प्राणी संग्रहायल) | प्रस्तावित दर रु.(सिध्दार्थ उद्यान प्रवेश,प्राणी संग्रहालयासह) |
|---|---|---|
| प्रौढांसाठी | ५.०० | ६.०० |
| मुलांसाठी (३ ते १२ वर्ष) | २.०० | २.०० |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी या प्रस्तावासंबंधी सभागृहात सविस्तर माहिती द्यावी.

**संचालक प्राणी संग्रहालय :** प्रौढांसाठी फक्त उद्यान बघण्यासाठी २.०० रु. फीस आकारणी होत असे व लहान मुलांसाठी मोफत प्रवेश होता.प्राणी संग्रहायल पाहण्यासाठी प्रौढांसाठी ५.०० रु.आकारणी होत असे व लहान मुलांसाठी २.०० आहे. परंतु बऱ्याच वेळा येणारे पर्यटक व इतर लोक उद्यान व प्राणी संग्रहालयासाठी स्वतंत्र म्हणजेच एकूण ७.०० रुपये आकारणी होत असे परंतु जे उद्यान व प्राणी संग्रहालय पाहु इच्छितात त्यांचेसाठी उद्यान परिसर व प्राणी संग्रहालयासाठी ६.००रु. आकारणी करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. दोन्ही ठिकाण बघणाऱ्यांना १.०० रुपये सवलत देत आहोत. यामुळे भेट देणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन मनपाचे उत्पन्न वाढेल. वर्षभरामध्ये १५ ऑगस्ट व २६ जानेवारी मोफत प्रवेश असतो.

**मा.सभापती :** १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे दोन दिवस सोडून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर मंजुर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान प्रवेश प्राणी संग्रहालयासह प्रौढांसाठी रु. ६.०० व मुलांसाठी (३ ते १२ वर्षे वयाच्या) रु. २.०० प्रस्तावित दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रेयनगर, अनुपम सोसायटी, मंथन सोसायटी,उस्मानपुरा इत्यादी वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां. विभागाच्या सन २०००-२००१ वर्षाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्ष अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल तरी रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ.आशा बिनवडे :** सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात स्पील ओव्हरच्या कामामध्ये या कामाचा समावेश का करण्यात आला खुलासा दयावा. वार्डातील वर्दळ पाहता गजानन महाराज मंदीरापासुनच्या रोडचे कित्येक दिवसापासुन काम करण्याची मागणी मी पत्राद्वारे केलेली असतांना कार्यवाही केलेली नाही. जी कामे गरजेचे आहे ती सोडून अंदाजपत्रक मंजुर नसतांना स्पील ओव्हरमध्ये कामाचा समावेश केला जातो. गंभीर स्वरुपाची बाब आहे. माझ्या वार्डातील काम सुध्दा अंडर प्रोसेस मध्ये होते ते का समावेश केला नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता :** या कामासांबंधीची संचिका नोव्हेंबर मध्येच मंजुरीसाठी गेलेली होती. त्यावर बजेट हेड पडलेले होते. त्यामुळे सदर काम स्पील ओव्हरमध्ये घेतलेले आहे. त्यामुळे सदर काम स्पील ओव्हरमध्ये घेतलेले आहे. संचिका कार्यवाहीस्तव होती.

**मा.सभापती :** रु. १४.१७ लक्षच्या पुर्नडांबरीकरणाचे अंदाजपत्रक आज मंजुरीसाठी सादर केले. ज्या कामाला बजेट हेड पडले ते काम स्पील ओव्हरमध्ये काम घेऊ शकत नाही. ज्या कामाचे टेंडर झाले ती काम स्पील ओव्हरमध्ये घेऊ शकतो.

**डॉ.आशा बिनवडे :** टेंडर झालेले नसंताना प्रस्ताव का बजेटमध्ये स्पील ओव्हरमध्ये घेतलेला आहे.त्याबद्दल खुलासा घ्यावा. यात अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. हे स्पष्ट होते. सर्वसाधारण सभेसाठी जे बजेट पुस्तक दिले त्यातील पान क्र. १०६ वर या काम स्पील ओव्हरमध्ये दिले आहे. एक कामाच्या बाबतीत निदर्शनास आले. अशा किती कामाचा त्यात समावेश आहे.त्याचा सुध्दा खुलासा व्हावा. या कामाला एवढे महत्व का देण्यात आले.

**मा.सभापती :** संबंधित सर्व विभाग प्रमुख यांना आजच ताकीद दयावी व असा प्रकार यापुढे होऊ नये याची दक्षत घेण्यात यावी. विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रेयनगर, अनुपम सोसायटी, मंथन सोसायटी,उस्मानपुरा इत्यादी वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगपालिकेतर्फे विविध विकास कामाकरीता निविदा पत्रके मागविण्यात येतात.यामध्ये कंत्राटदाराकडून सरासरी २५ ते ३० टक्के यापेक्षा कमी दराने निविदा प्राप्त होतात. कंत्राटदाराने अत्यंत कमी दर दिल्याने कामाचा दर्जा निकृष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनपामध्ये विकासाची बरीचशी कामे एकाच वेळी चालु असतात व त्यावर देखरेख ठेवण्याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने कामाचा योग्य तो दर्जा राखणे कठीण होत आहे.

सध्या अशा विकास कामाकरीता कंत्राटदाराकडून २% अनामत रक्कम भरणा करुन घेतल्या जाते व सदरील रक्कम काम पुर्ण झाल्याच्या तारखेपासुन तीन महिन्याच्या कालावधी करीता ठेवली जाते व ती परत केल्या जाते. अनामत ठेवण्याचा कालावधी अत्यंत कमी असल्याने व रक्कमही कमी असल्याने कंत्राटदाराची जबाबदारी लवकर संपुष्टात येते.

तरी विकास कामे करतांना कंत्राटदाराची जबाबदारी वाढावी याकरीता संबंधित कंत्राटदाराकडून १०% अनामत रक्कम तीन वर्षाकरीता ठेवून घेतल्यास कंत्राटदाराची जबाबदारी वाढेल व निश्चितच कामाचा दर्जा दिलेल्या मापदंडाप्रमाणे (स्पेसीफिकेशन प्रमाणे) राहण्यास मदत होईल.

तरी यापुढे मनपातील विकास कामाकरीता कंत्राटदाराकडुन १०% अनामत रक्कम तीन वर्षाच्या कालावधीकरीता घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मीर हिदायतअली :** १०% अनामत रक्कम तीन वर्ष न ठेवता १ वर्ष ठेवावी. तीन वर्षाची मुदत जास्त होते.

**श्री.सलीम पटेल,श्री.मधुकर सावंत :** सार्वजनिक बांधकाम खात्याचे नियम काय आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ३ वर्षाची मुदत असावी कामे चांगली होतील कामाचा दर्जा सुध्दा टिकुन राहील.

**मा.सभापती :** तीन वर्षे ऐवजी २ वर्षासाठी अनामत रक्कम १०% ऐवजी ५% ठेवण्यात यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विकास कामाकरीता मागविण्यात येणारे निविदापत्रके २५ ते ३० टक्के निविदेपेक्षा कमी दराने प्राप्त होतात. कामाचा दर्जा उत्कृष्ट रहावा म्हणून यापुढे महानगरपालिकेतील विकास कामाकरीता कंत्राटदाराकडुन ५% अनामत रक्कम दोन वर्षाच्या कालावधी करीता घेण्यात यावी. विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विविध चौकांचे / बेटांचे नुतनीकरण, सौंदर्यीकरण करुन देणे बाबत विविध खाजगी संस्था / बँका /औद्योगिक संस्था यांच्यासमोर मांडण्यात आला होता. सदर विषयावर तत्कालीन महापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली होती.तद्नंतर दोन वेळा प्रायोजकांना मा.आयुक्त यांचे दालनात पाचारण करण्यात आले होते.या विषयावर सविस्तर चर्चा घेऊन असे ठरले की, बेटांचे सौंदर्यीकरण व नुतनीकरण इत्यादी बाबी प्रथम प्रायोजकांनी त्यांच्या खर्चाने करावयाचे आहे. त्यानंतर त्यांनी विकसित केलेले सौंदर्यीकरण मनपाने जोपयासायचे आहे. या जोपासनेकरीता व रंगरंगोटीकरीता संबंधित प्रायोजकांकडून खाली दर्शविल्यानुसार रक्कम भरणा करुन घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | वाहतुक बेटास रंगरंगोटीचा खर्च. (परिद्यांचे क्षेत्रफळ) | रक्कम रु.७५/- प्रति चौ.मी. |
| ब) | जोपासना व संरक्षण करणेचा खर्च | रु. १२,०००/- प्रतिवर्ष प्रतिबेट. |

वरील "अ" व "ब" ची रक्कम प्रायोजकांना प्रतिवर्ष महानगरपालिकेत भरावी लागेल. मनपातर्फे विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा केला जाईल. सदर अटी ज्या प्रायोजकांना मान्य असतील त्यांच्या बरोबर करार करण्यात येईल. (कराराचा मसुदा सोबत अवलोकनार्थ जोडलेला आहे.)

बहुतांश प्रायोजकांनी / संस्थानी सौंदर्यीकरण, सुशोभिकरण करुन देण्याची संम्मती दर्शविलेली आहे. परंतु जोपासना व दुरुस्ती मनपाने करण्याकरीता सुचविले आहे.त्यांची सदरील मागणी मा.आयुक्तांनी मान्य न करता वरीलप्रमाणे त्यांच्याकडून आवश्यक खर्च वसुल करणेकरीता सुचवले आहे. बेटालगत प्रत्येक आठ फुटांच्या (८") अंतरावर (८' सेंटर टु सेंटर) असे किंवा योग्य त्या ठिकाणी १ १/२"X१ १/२' (०.४५ मीटरX०.१५ मीटर) आकाराचे जाहीरात फलक लावण्याची परवानगी प्रायोजकांना देण्यात येईल. सदर प्रस्तावाबाबत आकारावयाच्या दराबाबत जाहीरात फलक लावणेच्या परवानगीबाबत विचार विनिमय करुन प्रकरण निर्णयास्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** या प्रस्तावात मनपा वीज पुरवठा व पाणी देणार याचा अर्थ मनपा वीज बील भरणार काय.

**श्री.जयवंत ओक :** विकसित केलेले सौंदर्यीकरण व नुतनीकरण यावर येणारा विद्युत पुरवठयाचा खर्च संबंधित एजन्सीने करावा अशी दुरुस्ती करावी. या अगोदरचेच वीज मंडळाची थकबाकी १८० कोटी मनपावर आहे.

**मुख्यलेखा अधिकारी :** बेटाचे सौंदर्यीकरण व नुतनीकरण प्रथम प्रायोजकांनी त्यांच्या खर्चाने करावयाचे आहे. प्रायोजकांनी सौंदर्यीकरण करुन दिल्यानंतर जोपासण्याचे काम मनपा करणार त्याचा खर्च प्रायोजकांकडून म्हणजेच जे दर दर्शविले त्याप्रमाणे वसुल करणार आहे. बेटालगत त्यांना प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाहिरात फलक लावण्याची परवानगी देण्यात येईल.

**मा.सभापती :** एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर द्यावे. ना नफा ना तोटा या तत्वावर चालत असेल तर काहीही हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध चौकांचे /बेटांचे नुतनीकरण,सौंदर्यीकरण खाजगी संस्था /बँका/औद्योगिक संस्था यांचेकडून वाहतुक बेटास प्रतिवर्ष दोन वेळा रंगरंगोटी करणे, जोपासना व संरक्षण करणे, इत्यादी प्रायोजकांकडून प्रस्तावित केलेली आकारणी करण्यास तसेच प्रस्तावित आकाराचे जाहीरात फलक लावण्याचे परवानगी देण्यास आणि ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेसाठी एक वर्षाच्या प्रायोगिक तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/७:**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मजनुहील येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या संपुर्ण प्रकल्पासाठीच्या एकूण रु. १७२.०० लाखाच्या प्रस्तावास दि. ४-१०-१९९७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१०२/६ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील प्रकल्पातील बांधण्यात आलेल्या सभागृहाची अंतर्गत सजावट करणेच्या कामाकरीता रक्कम रु. २४,२०,५००/- चे सविस्तर अंदाजपत्रक सा.बांधकाम विभागाच्या सन ९९-२००० च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून मान्यता मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतीम तारखेनंतर एकूण ६ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत खालील प्रमाणे एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या.

निविदा धारकांची नावे खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.डी.आर.साने | २२.२८% कमी |
| २) | श्री.धनाजी वा.मोहिते | २१.११% कमी |
| ३) | मे.वन्डर कन्स्ट्रक्शन | २०.३७८% कमी |
| ४) | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | १८.४२% कमी |
| ५) | मे.एम.एस.एस.आय.डी.सी. | ०४.५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा २२.२८% कमी दराची असलेली निविदा श्री. डी.आर.साने यांच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो., मजनुहील येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी बांधण्यात आलेल्या सभागृहाची अंतर्गत सजावट करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २२.२८% कमी दराची श्री.डी.आर.साने यांची निविदा मान्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/८:**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडून नवीन गटार बांधणेच्या कामासाठी अं.प.रक्कम रु. ११,८४,२५९/- ला दि. ४-८-२००१ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान आहे.

कामाची निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | हाईटेक कन्स्ट्रक्शन | ३०.९६% कमी |
| २) | मन्नानखान | २१.७८६% कमी |
| ३) | निलेश कन्स्ट्रक्शन | १८.८७% कमी |
| ४) | एस.ए.नवाब | १७.१७% कमी |
| ५) | गरुड कन्स्ट्रक्शन | १६.५३ % कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा ३०.९६% कमी दराची हायटेक कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्त यांनी "५% अनामत रक्कम ठेवावी व थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवावे." या अटीवर दि. १०-०२-२००२ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडून नवीन गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.९६% कमी दराची हायटेक कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/९:**

कार्यकारी अभियंता (पापु) मनपा यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वर्ष २००१-२००२ करीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील पाणी शुध्दीकरण आवश्यक असलेल्या तुरटी खरेदी संदर्भात रु. १५,४०,०००/- चा प्रस्ताव सादर केला होता.या प्रस्तावास स्थायी समितीचा ठराव क्र. ४९/२ दि. १३-११-२००१ अन्वये मान्यता झालेली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६३/२००१ जी की, दै.लोकमत व सकाळ (पुणे) या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून "डी" फॉर्मवर दर मागविण्यात आले.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (६) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.श्री.इन्टरप्रायझेस | २४५१/- प्रति मे.टन |
| २) | मे.एम.एस.एस.आय.डी.सी. | २४६०/- प्रति मे.टन |
| ३) | मे.शिव केमिकल्स | १९५९/- प्रति मे.टन |
| ४) | मे.विकास इन्टरप्रायझेस | २१६०/- प्रति मे.टन |
| ५) | मे.फोनिक्स केमिकल्स | १९९९/- प्रति मे.टन |
| ६) | मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन | निविदा उघडण्यात आलेली नाही. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.शिव केमिकल्स यांचा होता,परंतु मा.आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार मे.शिव केमिकल्स यांना दराबाबत वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले.वाटाघाटी अंती मे.शिव केमिकल्स यांनी रु. १९२५/- प्र.मे.टन असा दर मान्य केला व त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

तरी मे.शिव केमिकल्स यांचा वाटाघाटी अंतीचा दर रु. १९२५ प्र.मे.टन याप्रमाणे निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वर्ष २००१-२००२ करीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील पाणी शुध्दीकरण आवश्यक असलेल्या तुरटी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.शिव केमिकल्स यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे प्रति मे.टन रु. १९२५/- या दराने तुरटी खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/१०:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी रक्कम रु. २५,५०,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४८१/४ दि. २०-९-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७/२००२ जी की दै.लोकमत व सकाळ (पुणे) या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून "डी" फॉर्मवर ब्लिचिंग पावडर उत्पादक तथा अधिकृत विक्रेते यांच्याकडून दर मागविण्यात आलेत कोरी निविदा फॉर्म विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोरी निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्याखालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.श्री.गजानन केमिकल इन्डस्ट्रीज | ११,९००/-प्र.मे.टन |
| २) | मे.निधी असोशिएटस | ९,३६०/- प्र.मे.टन |
| ३) | मे.शिव केमिकल | १०,०४०/-प्र.मे.टन |
| ४) | मे.बी.एस.ठाकर | १०,८००/-प्र.मे.टन |
| ५) | मे.श्री.रॉयलसिमा डच केसबीलि. | १०,९८०/-प्र.मे.टन |
| ६) | मे.फोनिक्स केमिकल | ९,१५६/- प्र.मे.टन |
| ७) | मे.क्लोरोफेम इन्डस्ट्रीज | ९,२७०/- प्र.मे.टन |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.फोनिक्स केमिकल यांचा आहे.म्हणजेच रक्कम रु. ९,१५६/- प्र.मे.टन असा दर दिलेला आहे. मा.आयुक्तांनी पुरवठाधारक मे.फोनिक्स केमिकल यांच्या सोबत दराबाबत वाटाघाटी केल्या. ब्लिचिंग पावडर ही ग्राजीम कंपनी उत्पादीत राहील व त्यास रु. ९,१५०/- प्र.मे.टन असा दर निश्चित करण्यात आला आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर रु. ९,१५०/- प्र.मे.टन या दराने मे.फोनिक्स केमिकल यांची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**डॉ.आशा बिनवडे :** विषय क्र. १० व ११ ब्लिचिंग पावडर खरेदी संदर्भात आहे. दोन्ही प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या दिनांक २०-९-२००१ च्या सभेत मंजुर झालेले आहेत. एकाच दिवशी वेगवेगळे टेंडर का? यात एकूण ५० ते ६० लक्ष रुपये किंमतीचे ब्लिचिंग पावडर खरेदी करणार आहे. एकत्र का नाही काढले.

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) :** फारोळा येथे येणारे ब्लिचिंग पावडरसाठी जकात आकारली जाणार नाही. त्यासाठी वेगळे भांडार आहे. हर्सुलसाठी लागणारे ब्लिचिंग पावडरवर जकात आकारली जाते. तसेच ट्रान्सपोर्ट खर्चसुध्दा वाढ होऊ शकते.

**डॉ.आशा बिनवडे :** एकत्र टेंडर केले असते तर स्पर्धा झाली असती व त्यात मनपाचा फायदा झाला असता.

**श्री.सलीम पटेल :** दोन्ही प्रस्ताव रद्द करुन पुन्हा एकत्र टेंडर मागविण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता :** दोन्ही प्रस्तावात ब्लिचिंग पावडर खरेदीचे दर जवळपास सारखेच आलेले आहे. हर्सुलसाठी जे ब्लिचिंग पावडर येणार त्यात फक्त जकात आकारणी करुन समावेश झालेला आहे.

**मा.सभापती :** पुढील वेळेस असे प्रस्ताव ठेवतांना सर्व अटी शर्ती सादर करुन ठेवावे विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फोनिक्स केमिकल यांचेशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार त्यांचेकडून ग्रासीम कंपनी उत्पादीत ब्लिचिंग पावडर प्रति मे.टन रु. ९,१५०/- या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/११:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी रक्कम रु. २६,७७,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४८०/३ दि. २०-९-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली.आहे.कार्यालयाची निविदा सुचना क्र.६७/२००२ जी की,दै.लोकमत, सकाळ (पुणे),महाराष्ट्र टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देण्यात येवून "डी" फॉर्मवर ब्लिचिंग पावडरचे उत्पादक अथवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून दर मागविण्यात आले.

कोरी निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोरी निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्याखालील प्रमाणेच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.शिव केमिकल | १०,३२०/-प्र.मे.टन |
| २) | मे.फोनिक्स केमिकल | ९,४३०/- प्र.मे.टन |
| ३) | मे.श्री.रॉयल सिमा डच केसबी लि. | ११,६५६/-प्र.मे.टन |
| ४) | मे.निधी असोशिएटस | ९,५८०/-प्र.मे.टन |
| ५) | मे.क्लोरोकेम इन्डस्ट्रीज | ९,५२५/- प्र.मे.टन |
| ६) | मे.श्री.गजानन केमिकल इन्डस्ट्रीज | निविदा उघडण्यात आली नाही. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक तक्ता पाहता मे.फोनिक्स केमिकल यांचा दर कमी आहे. म्हणजेच रु. ९,४३०/- प्र.मे.टन असा दर आहे.

मा.आयुक्तांनी पुरवठा धारक मे.फोनिक्स केमिकल यांच्या सोबत दराबाबत वाटाघाटी केल्या, त्यामध्ये ब्लिचिंग पावडर ही ग्रासीम कंपनी उत्पादीत राहील व त्यास रु. ९,१५०/- + जकात कर असा दर निश्चित करण्यात आला आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर रु. ९,१५४/- जकात कर (प्र.मे.टन) या दराने मे.फोनिक्स केमिकल यांची निविदा स्विकृतीसह व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फोनिक्स केमिकल यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार त्यांचेकडून ग्रासीम कंपनी उत्पादीत ब्लिचिंग पावडर प्रति मे. टन "रु. ९,१५०/-+जकात कर" या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/१२:**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता चंपामस्जीद ते दमडी महल या रस्त्याने बाधीत मिळकत न.भु. क्र. १०८७१/८ ही अंशतः बाधीत असुन बाधीत क्षेत्र १२१.१० चौ.मी.असुन बाधीत क्षेत्र प्रत्यक्ष रस्त्यासाठी महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली आहे. करीता मिळकत धारकाने बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळण्यासाठी अर्ज केला आहे व त्यानुसार मिळकतधारकास शिघ्र गणक दरानुसार आणि वजा वटी करुन रु. ४,०८,८३४/- मोबदला निश्चित होता. प्रकरणात मिळकतधारकास तुर्त ५०% मोबदला देणेबाबत मा.आयुक्तांनी तत्वतः देवून उर्वरीत ५०% माहे एप्रिल २००२ मध्ये द्यावे व जागेचे नोंदणीकृत दस्तऐवजसाठी एकूण रु. ६०,५५०/- खर्च येईल. त्यापैकी ५०% खर्च मिळकतधारक व ५०% खर्च महानगरपालिका करणार आहे.

मिळकतधारकांस एकूण मोबदला (रु. ४,०८,८३४/-) हे खरेदी खत खर्च ५०% म्हणजे रु. २,०४,४१७/-वजा जाता निश्चित केलेली आहे.तुर्त मोबदल्याच्या ५०% म्हणजे रु. २,०४,४१७/-(रुपये दोन लाख चार हजार चारशे सतरा फक्त) देणे आणि उर्वरीत ५०% मोबदला रक्कम आहे.एप्रिल २००२ मध्ये देणेस व खरेदी खतासाठी लागणारी अग्रीम रक्कम रु. ६०,५५०/- (रुपये साठ हजार पाचशे पन्नास फक्त) श्री.डी.डी. कालेले,शाखा अभियंता यांना देणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** श्री.डी.डी.कालेले यांनी या अगोदर ही अग्रीम रक्कम घेतलेली आहे.ती जमा केलेली नाही. ऑडीटमध्ये तसा रिमार्क आलेला आहे. त्या संबंधीताचा खुलासा करावा.

**प्र.स.स.नगररचना :** डी.डी.कालेले यांचे नांव असलेली रक्कम त्यांनी अदा केलेली आहे.

**मुख्यलेखा अधिकारी :** यासंबंधीची संचिका कार्यवाहीस्तव आहे. सर्व बील त्यांनी सबमिट केलेले आहे.

**मा.सभापती :** विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता चंपामस्जीद ते दमडी महल या रस्त्याने बाधीत मिळकत न.भु. क्र. १०८७१/८ चे बाधीत क्षेत्र १२१.१० चौ.मी. क्षेत्राचा शिघ्र सिध्द गणक दरानुसार खरेदी खतासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाच्या ५०% रक्कम वजा जाता निश्चित करण्यात आलेल्या मोबदला रक्कम रु. ४,०८,८३४/-पैकी तुर्त ५०% रक्कम रु.२,०४,४१७/- (दोन लाख चार हजार चारशे सतरा रुपये.) मिळकत धारकास देण्यास आणि उर्वरीत ५०% मोबदला रक्कम

आहे.एप्रिल २००२ मध्ये देण्यास व खरेदीखतासाठी लागणारी रक्कम रु. ६०,५५०/- अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/१३:**

उपआयुक्त (महसुल) यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कराधीन नियमातील मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इ.बाबत नियम क्र. २ नुसार रितसर नोटीस देणे

आवश्यक आहे व अशा नोटीस सोबत कलम २ मधील पोटकलम ३ प्रमाणे स्थायी समिती नोटीस स्विकारण्यासाठी वेळोवेळी विहीत करीत अशी फिस भरणे बंधनकारक आहे.

सन १९८९-९० पासुन ते आजतागायत जागेच्या हस्तांतरणाबाबत (नामांतराबाबत) कोणत्याही करयोग्य मुल्यांच्या मिळकतीस रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) असे शुल्क आकारण्यात येते. तथापि सदरील बाब ही योग्य नसुन मुल्यांकनाच्या दृष्टीने ज्या व्यक्तिचे करयोग्य मुल्य जास्त आहे. त्या मिळकतींना कर आकारण्याची हस्तांतरण करतांना तुलनात्मकदृष्टीने वाढीव शुल्क आकारणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे करयोग्य मुल्यांच्या वाढीनुसार सामान्य कराची टक्केवारी वाढविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर मालमत्ता कर आकारण्याचे हस्तांतर शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे. त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे असावे.

| अ.क्र. | ज्या मिळकतीचे हस्तांतरण करावयाचे त्याचे करयोग्य मुल्य | प्रस्तावित हस्तांतरण शुल्क/ नामांतर शुल्क |
|---|---|---|
| १) | १ ते १०,००० | ५००/- रुपये |
| २) | १०,००० ते २०,००० | १०००/- रुपये |
| ३) | २०,००१ ते ५०,००० | १५००/- रुपये |
| ४) | ५०,००१ ते १,००,००० | २५००/- रुपये |
| ५) | १,००,००० ते पुढे | ५०००/-रुपये |

वरील प्रमाणे नामांतर शुल्काचे दर आकारण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कराधीन नियमातील मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इ.बाबत नियम क्र. २ नुसार रितसर नोटीस देणे व त्यासोबत कलम २ मधील व कलम ३ प्रमाणे स्थायी समितीस फिस आकारणी करण्याचे तरतुदीस अधीन राहुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे करयोग्य मुल्यांवर खालील दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित हस्तांतरण शुल्क/नामांतर शुल्क आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | ज्या मिळकतीचे हस्तांतरण करावयाचे त्याचे करयोग्य मुल्य | प्रस्तावित हस्तांतरण शुल्क/ नामांतर शुल्क |
|---|---|---|
| १) | १ ते १०,००० | ५००/- रुपये |
| २) | १०,००० ते २०,००० | १०००/- रुपये |
| ३) | २०,००१ ते ५०,००० | १५००/- रुपये |
| ४) | ५०,००१ ते १,००,००० | २५००/- रुपये |
| ५) | १,००,००० ते पुढे | ५०००/-रुपये |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/१४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १५-९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ३९/३ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता की, श्री.एम.एम.साजेद निलंबीत जकात लिपीक यांचे खाते चौकशी प्रकरणात त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम ३चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (६) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे श्री.एम.ए.साजेद,कनिष्ठ लिपीक (निलंबीत) यांस औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला होता,परंतु सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.एम.ए.साजेद जकात अधिक्षक लिपीक (निलंबीत) यांचे खाते चौकशीमधील आरोप क्र. २ बाबत मुख्य लेखा परीक्षकांकडून लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी व तो पर्यंत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा असा मा.स्थायी समितीने ठराव पारीत केलेला होता.

करीता जा क्र./मनपा/अस्था-१/२००१/२६०९ दिनांक १५-९-२००१ च्या पत्रान्वये मा.मुख्यलेखा परिक्षक यांना,श्री.साजेद यांनी रु. २२२९२९/-कमी भरुन तेवढया रकमेचा अपहार केला.या आक्षेपासंबंधी चौकशी अधिकाऱ्यांसमोर संबंधित अभिलेख उपलब्ध न झाल्याने निर्णय घेता न आल्यामुळे त्या आक्षेपाबाबत सविस्तर अहवाल पाठविण्यासाठी कळविण्यात आले.

मुख्यलेखा परिक्षक यांनी त्यांचेकडील जाक्र./मनपा/मु ले प /१८१/२००१ दिनांक २९-९-२००१ नुसार या लेखा परिक्षण आक्षेपासंबंधाने त्यांचा अहवाल सादर केला.त्यांनी सादर केलेल्या अहवालावरुन असे निदर्शनास आलेले होते की, श्री.साजेद यांनी रु. २२२९२९/- इतक्या रकमेचा निश्चितपणे अपहार केलेला आहे.

त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/अस्था-१/२००१/२७६७ दिनांक ८-१०-२००१ च्या पत्रासोबत मुख्यलेखा परिक्षक यांचेकडील २९-९-२००१ च्या लेखा परिक्षणाची प्रत श्री.एम.ए.साजेद यांना पाठवून रक्कम रु. २२२९२९/- चा २४ तासात मनपा फंडात जमा करण्यासाठी कळविण्यात आले.

श्री.एम.ए.साजेद यांनी त्यांच्या दि. १०-१०-२००१ च्या पत्रान्वये सदरील रक्कम त्यांनी दि. १७-१-९४ व दि. २०-१-९४ रोजी जिन्सवार क्र. ४६० पान क्र. ४५९२७ व ४५९६३ द्वारे मध्यवर्ती जकात नाका येथे जमा केलेली असल्याचे कळविले व रक्कम जमा झाली असल्यामुळे रक्कम भरण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे त्यांनी कळविले.

श्री.साजेद यांनी सादर केलेल्या उत्तरावर मुख्यलेखा परिक्षक यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी त्या संदर्भाने त्यांचे अभिप्राय सादर केले की,श्री.साजेद यांच्या खुलाशाची छाननी केली असता त्यांच्या पुष्टर्न जोडलेल्या कागदपत्राची सत्यता पडताळून पाहण्यासाठी जकात विभागातील मुळ कागदपत्राची आवश्यकता आहे. मात्र सदर कागदपत्र वेळोवेळी व तोंडी तसेच लेखी मागणी करुनही उपलब्ध झालेले नाही ते उपलब्ध होताच प्रकरणात अंतीम अहवाल देण्यात येईल असेही त्यांनी नमुद केले तोपर्यंत दि. २९-९-२००१ मधील अवालातील मुद्दे कायम असल्याचे कळविले.याच संदर्भाने मुख्य लेखा परिक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचेकडील जा क्र./मनपा/मुलेप/२६८/२००१ दि. २१-१२-२००१ नुसार पुन्हा अहवाल पाठविला की, श्री.साजेद यांनी त्यांचे खुलाशासोबत तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील जा.क्र./मनपा/मुलपे/२२३/९५ दि. १७-१०-९५ च्या पत्राची झेराक्स प्रत जोडलेली आहे. सदर पत्र त्यांचे कार्यालयाच्या रेकॉर्डला उपलब्ध नाही.तसेच त्यासंबंधी आवक-जावक रजिस्टरवर त्यावेळच्या काम करणाऱ्या व्यतिरिक्त अन्य कर्मचाऱ्याने नोंदी केलेल्या आढळून आल्या. करीता त्या पत्राच्या वैधतेबाबत शंका घेण्यास जागा आहे. तसेच श्री.साजेद यांच्या खुलासा पत्रासोबतच्या जिन्सवर पुस्तक क्र. ४६० मधीन पान क्र. ०४५९२७ मध्ये पुस्तक क्र. २९९५ पा.क्र. २९९४०१ ही रु. १२७९७५/- ची नोंद करण्यात आलेली आहे. ती मुळ नोंदणीनंतर केल्याचे दिसुन येते. तसेच जिन्सवार पुस्तकातील पान क्र. ४५९६३ वरील पा.क्र. २९९४०२ ते २९९४०४ या ३ पावत्यांची नोंदही नंतर केल्याचे दिसुन येते. त्यातील पावत्यांची एकूण रक्कम ९४४४९/- एवढी आहे, यातील पा.क्र. १,२,३ या चेकच्या रकमांच्या आहेत. सदरचे चेक लेखा विभागाकडे जमा आहेत. मात्र रोख स्वरुपात जमा झालेली रक्कम भरण्याबाबत संदिग्धता दिसुन येत असल्याचेही त्यांनी नमुद केलेले आहेत. शिवाय याबाबत मुळ रेकॉर्ड उपलब्ध झाल्याशिवाय सदरच्या प्रकरणी अंतीम निष्कर्ष देता येणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदरचे मुळ रेकॉर्ड उपलब्ध करण्याकामी जकात अधिक्षक यांना सक्त सुचना देऊन अथवा अन्य उपायाचा अवलंब करून रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे व तोपर्यंत दि. २९-९-२००१ रोजी दिलेल्या अहवालातील मुद्दा कायम समजण्यात यावा असेही त्यांनी नमुद केलेले होते.

जकात विभागाकडून उपलब्ध न होऊ शकलेल्या रेकॉर्ड व पावत्या पुस्तकाबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याची कार्यवाही करणेसाठी जकात अधिक्षक यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

तथापी दि. १५-९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र. ३९/३ नुसार श्री.एम.ए.साजेद जकात लिपीक (निलंबीत) यांच्या खाते चौकशी मधील आरोप लवकर चौकशी करुन घ्यावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा असा मा.स्थायी समितीने जो ठराव पारीत केलेला होता, त्यानुसार मुख्यलेखा परिक्षक यांनी त्यांचा अहवाल सादर केला असून त्या अहवालानुसार श्री.साजेद यांनी रु. २,२२,२९२/- इतक्या रकमेचा निश्चितपणे अपहार केला असल्याचे त्यांनी नमुद केलेले आहे.

करीता मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री.साजेद यांनी रु. २,२२,९२९/- इतक्या रकमेचा अपहार केलेला असल्यामुळे दि. १५-०९-२००१ रोजी मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार,श्री.एम.ए.साजेद,निलंबीत जकात लिपीक यांच्या खाते चौकशी प्रकरणात त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे

श्री.एम.ए.साजेद,निलंबित नाका लिपीक यांस औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात येत आहे.

**दुरुस्ती प्रस्ताव :**

मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र. १६ मधील विषय क्र.१४ नुसार श्री.एम.ए.साजेद,निलंबीत नाका लिपीक यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विषय पत्रिकेतील पृष्ठ क्र.८ते १० वर विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात आलेला आहे.

या प्रस्तावानुसार उक्त विषयात दुरुस्ती प्रस्ताव सादर करण्यात येत असून विषय क्र. १४ मधील पृष्ठ क्र.१० वरील परिच्छेद १ व २ ऐवजी खालील प्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

"तथापि दि. १५-९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र.३९/३ नुसार श्री.एम.ए.साजेद जकात लिपीक (निलंबीत) यांच्या खाते चौकशी मधील आरोप क्र. २ बाबत मुख्यलेखा परिक्षकांकडून लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

असा मा.स्थायी समितीने जो ठराव पारीत केलेला होता त्यानुसार मुख्यलेखा परिक्षक यांनी त्यांचा अहवाल सादर केला असून त्या अहवालानुसार सदर प्रकरणात मुळ रेकॉर्ड उपलब्ध झाल्याशिवाय अंतीम निष्कर्ष देता येणे शक्य होणार नसल्यामुळे मुळ रेकॉर्ड उपलब्ध करण्याकामी जकात अधिक्षक यांना सक्त सुचना देऊन अथवा अन्य उपायांचा अवलंब करुन रेकॉर्ड होणे आवश्यक असल्याचे अहवालात नमुद केलेले आहे व तो पर्यंत त्यांनी २९-९-२००१ अन्वये सादर केलेल्या अहवालातील मुद्दा कायम समजण्यात यावा असेही नमुद केलेले आहे.

"करीता मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार प्रकरणातील मुळ रेकॉर्ड उपलब्ध होईपर्यंत श्री.साजेद यांनी रु. २,२२,९२९/- इतक्या रकमेचा अपहार केलेला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन आल्यावरुन दि. १५-९-२००१ रोजी मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार श्री. एम.ए.साजेद निलंबीत जकात लिपीक यांच्या खाते चौकशी प्रकरणात त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपलकलम २ (ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे श्री.एम.एम.साजेद,निलंबीत नाका लिपीक यांस औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**श्री.सावंत मधुकर :** मागील बैठकीत हा प्रस्ताव स्थगीत ठेवलेला होता. आता मंजुर करायचा किंवा काय याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय व्हावा.

**श्री.शे.इलियास किरमानी :** दि. १५-०९-२००१ रोजी या सभागृहात श्री.एम.ए.साजेद निलंबन प्रकरण विषयी मी काही मुद्दे उपस्थित केले होते. श्री.एम.ए.साजेद यांना निलंबन भत्ता का देण्यात आला नाही? त्यांना मागील आठ वर्षापासुन निलंबन भत्ता या नावाने फक्त ९००/- रुपये देण्यात येते असे का? महानगरपालिका प्रशासनामध्ये बरेच कर्मचारी निलंबीत होतात व सध्याही आहे, परंतु मनपा प्रशासनाने लाच घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना व खुनाच्या

गुन्हयामध्ये अटक झालेल्यांना ७५% निलंबन भत्ता म्हणून पगार देण्यात येतो. परंतु श्री.एम.ए.साजेद यांच्या बाबतीत न्यायालयाचे आदेश असतांना मनपा प्रशासनाने ज्या नियमानुसार निलंबीत केले होते त्याच प्रमाणे निलंबन भत्ता आजपर्यंत अदा केला नाही. या प्रकरणी श्री.एम.ए.साजेद यांच्या बडतर्फीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (६) नुसार स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले. यात नियमात दर्शविलेल्या (ब) प्रमाणे मनपा प्रशासनाने श्री.एम.ए.साजेद यांचे निलंबन बाबत सर्वसाधारण सभेची परवानगी घेतली नाही. नियमाप्रमाणे त्यांचे निलंबन ६ महिन्यानंतर संपुष्टात आले आहे. त्यांना निलंबीत करुन ८ वर्ष होत आहे, म्हणून सदरचा प्रस्ताव पुर्णतः रद्द करुन त्यांना त्वरीत कामावर रुजु करुन घ्यावे व नियमानुसार पुर्ण वेतन देण्यात यावे.

श्री.एम.ए.साजेद निलंबन प्रकरणात तत्कालीन आयुक्त श्री.डी.एन.वैद्य यांना न्यायालयात अटक वारंट निघाला होता त्यांनी आरोपी होऊन जामीन घ्यावा लागला या रागामुळे आयुक्त वैद्या यांनी श्री. एम.ए.साजेद यांच्या फाईलवर १९९७ साली बडतर्फ करावे असा शेरा लिहुन त्यांची फाईल ७ वर्ष दाबुन ठेवली. त्यांना १०००/- रु. दंडही आला.

महानगरपालिका प्रशासनाने सहा महिन्यानंतर श्री.एम.ए.साजेद यांचे निलंबन प्रकरणात निलंबन चालु ठेवण्यासाठी सर्वसाधारण सभेची परवानगी आवश्यक होती, परंतु आयुक्त व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले.ज्या नियमानुसार त्यांना निलंबीत करण्यात आले म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल या नियमाप्रमाणे त्यांना निलंबीत भत्ता देण्यात आलेला नाही त्या नियमाप्रमाणे मनपा प्रशासनाने महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांची परवानगी घेतली नाही व तत्कालीन आयुक्त यांनी त्यांची संचिका ७ वर्षापासून दाबुन ठेवलेली होती. आज प्रस्ताव सादर होतो. एवढा वेळ का लागलेला आहे. महानगरपालिकेत बरेच कर्मचारी भष्टाचार करतात बऱ्याच कर्मचाऱ्यांचे निलंबन होऊन ३ महिन्याच्या आत कामावर घेतलेले आहे, याच प्रकरणात का उशीर झालेला आहे.

**श्री.मीर हिदायतअली :** मागील एका बैठकीत रगडे नावाचे कर्मचारी यांना अशाच प्रकरणातून कामांवर घेण्याबाबत निर्णय घेतला, त्याप्रमाणे यांना सुध्दा कामावर घेण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

**श्री.सलीमपटेल :** श्री.साजेद यांचे प्रकरण न्यायालयात चालु आहे. न्यायालयाच्या निकालास अधिन राहुन त्यांना कामावर घेण्यात यावे.

**डॉ.बिनवडे आशा :** दि. १८-३-२००२ रोजी या कर्मचाऱ्याच्या संदर्भात औद्योगिक न्यायालयात निकाल आलेला आहे. खुलासा द्यावा. प्रकरण कोणत्या स्टेजला आहे. त्यांना बडतर्फ करावे असे म्हटले का?

**श्री.सलीम पटेल :** रेकॉर्ड मिळत नाही असे प्रस्तावात दिले आहे तर अशा कर्मचाऱ्यांना बडतर्फ करता येईल का? ७-८ वर्ष निलंबीत ठेवून आता बडतर्फ करणे बरोबर नाही त्यांना न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. न्यायालयाचा निकालास अधिन राहुन त्यांना पुढील कार्यवाही व्हावी.

**उपआयुक्त (म) :** न्यायालयात प्रकरण निलंबीत आहे.

**विधीसल्लागार :** याप्रकरणी औद्योगिक न्यायालय कामगार न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. वकीलपत्र दाखल करण्यात आले होते व वेळ मागितला होता.३१-८-

२००१ ला चौकशी पुर्ण झाली. त्यानंतर सेवेतुन बडर्त करण्याचे आदेश आले. त्यानंतर ओद्योगिक न्यायालयात आव्हान दिले.त्यांची तक्रार फेटाळली. रिव्हयू पिटीशन रिजेक्ट झाले. प्रकरण ३/२००१ पेडींग आहे.३१-०८-२००१ च्या आदेशावर अंतीम आदेश घेऊ नये म्हणून स्थगिती आहे. एका वेळेस रु. १०००/- कौस्ट लावण्यात आलेली आहे. स्थायी समितीला निर्णय घेता येईल.

**श्री.शे.इलियास क्रिमानी :** इतर कर्मचाऱ्यांना निलंबीत झाल्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन कामावर घेतलेले सर्वानांच सारख्याच पध्दतीने न्याय मिळावा. श्री.साजेद यांना सुध्दा कामावर घेण्यात यावे. न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करता येईल. माणुसकीच्या नाते सर्वांना घेतले. परंपरा चालु राहील.

**श्री.मीर हिदायतअली :** मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन कामावर घेण्यात यावे.

**नगरसचिव :** प्रशासनाकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तोपर्यंत सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात येत आहे.

**मा.सभापती :** मागील बैठकीत दि. १५-९-२००१ च्या सभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. या विषयावर खुप चर्चा झालेली होती व चर्चेअंती प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आलेला होता व सविस्तर रेकॉर्ड तपासणी करुन सविस्तर प्रस्ताव ठेवावा असे ठरले होते व आज पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे. मागील वेळेस चर्चेमध्ये असा प्रश्न उपस्थित झाला की, जकात विभागाचे रेकॉर्ड का सापडत नाही आणि ते रेकॉर्ड तपासुनच प्रस्ताव ठेवावयाचे सांगण्यात आले होते,परंतु आजचा प्रस्तावात सुध्दा पुन्हा तो मुद्दा उपस्थित केला की,जकात विभागाचे रेकॉर्ड सापडत नाही प्रस्ताव स्थगीत केल्यापासुन प्रशासनाने रेकॉर्ड शोधण्याचे काम केले नाही का? काय प्रयत्न केले याचा खुलासा व्हावा.दिनांक १७-१०-९५ रोजी महानगरपालिकेतर्फे पैशाचा भरणा केला आहे असे पत्रद्वारे सांगण्यात आलेले आहे. खुलासा व्हावा.

**श्री.जयवंत ओक :** मागील बैठकीत दि. १५-९-२००१ च्या सभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. या विषयावर खुल चर्चा झालेली होती व चर्चेअंती प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आलेला होता व सविस्तर रेकॉर्ड तपासणी करुन सविस्तर प्रस्ताव ठेवावा असे ठरले होते व आज पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे. मागील वेळेस चर्चेमध्ये असा प्रश्न उपस्थित झाला की, जकात विभागाचे रेकॉर्ड का सापडत नाही आणि ते रेकार्ड तपासुनच प्रस्ताव ठेवावयाचे सांगण्यात आले होते, परंतु आजचा प्रस्तावात सुध्दा पुन्हा तो मुद्दा उपस्थित केला की,जकात विभागाचे रेकार्ड सापडत नाही. प्रस्ताव स्थगीत केल्यापासून प्रशासनाने रेकॉर्ड शोधण्याचे काम केले नाही का? काय प्रयत्न केले याचा खुलासा व्हावा दिनांक १७-१०-९५ रोजी महानगरपालिकेतर्फे पैशाचा भरणा केलेला आहे. असे पत्रद्वारे सांगण्यात आलेले आहे.खुलासा व्हावा

**श्री.जयवंत ओक :** प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर नियमाने कार्यवाही करण्यात यावी.

**मुख्यलेखा परिक्षक :** मुळ अहवाल तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक श्री.भोसले यांनी ९४-९५ ला सादर केलेला होता. वेगवेगळया रकमा दाखवल्या होत्या. ही रक्कम भरली आहे असे पत्र श्री.साजेद यांना दिले. चौकशी अहवाल वैयक्तिक कर्मचाऱ्यांना देत नाही. दि. १७-१० ९५ चे पत्र रेकॉर्डला नाही. श्री.साजेद

यांना रक्कम रु.२,२२,९२९/- भरण्याबाबत दि. ८-१०-२००१ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. त्यावर त्यांनी १०-१०-२००१ रोजी पत्र देऊन जिन्सवार क्र. ४६० पावती क्र. ०४५९२७ व ०४५९६३ द्वारे मध्यवर्ती जकात नाका येथे जमा केलेली असल्याचे कळविले.

परंतु ही रक्कम भरलेली आहे काय या संबंधीचे रेकॉर्ड मिळत नाही. पावत्या मिळत नाही. मुळे रेकॉर्ड जिन्सवार उपलब्ध होत नाही. रेकॉर्ड जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत अंतीम अहवाल देणे शक्य होणार नाही. पावत्यांची झेरॉक्स आहेत. बेरीक टॅली करण्याचा प्रयत्न केला बेरीज जास्त भरणा कमी एकूण २,२२,९२९/- रु. अपहार हा रेकॉर्ड मिळण्याच्या अधीन आहे.

**श्री.पटेल समशेर :** मुळ रेकॉर्ड मिळाले नाही तर बडतर्फ करण्याची कार्यवाही बरोबर नाही. रेकॉर्ड का सापडत नाही. तेवढी रक्कम दाखवण्यात आली. तेवढा भरणा केलेला आहे.

**श्री.शे.इलियास क्रिमानी :** रेकॉर्ड उपलब्ध होत नाही. सी.आय.डी.सी.बी.आय.चौकशी करावी तोपर्यंत संबंधीत कर्मचारी यांना कामावर घ्यावे.

**डॉ.बिनवडे आशा :** खरे तर प्रशासनाचे या ठिकाणी मनापासून अभिनंदन करावे. योग्य ती चौकशी करुन अहवाल सभागृहात सादर केलेला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या सभागृहाने पाठीशी घालणे योग्य होणार नाही. संबंधीत कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याप्रकरणी खाते निहाय चौकशी अहवाल लेखापरिक्षणाचा अंतीम अहवाल हा कायम करणे योग्य आहे व या प्रकरणाची चौकशी होत असतांना संबंधीत कर्मचाऱ्यांने दिलेले लेखी अभिप्राय यावरुन निदर्शनास येते की, संबंधीत कर्मचाऱ्यांवर चार आरोप सिध्द झालेले आहे. पहिला आरोप असा की, संबंधीत कर्मचारी यांनी रु. १,९६,३२२/- च्या रोखीने वसुल केले खोटे धनादेश मनपा फंडात जमा केले हे कागदोपत्री अहवालात नोंद झालेले आहे. ही गोष्ट नाकारता येणार नाही.

दुसरा आरोप असा की, २ (ड) मधील रु. ३६,९६३/- कमी भरणा करुन अफरातफर केली व उशिरा १५ महिन्यांनी रक्कम मनपाकडे जमा केली. तसेच आरोप क्र. २ (ब) मध्ये सुध्दा संबंधीत कर्मचारी यांनी १८,०००/- रुपयाचा कमी भरणा करणेचा आरोप स्पष्ट आहे. वेळोवेळी कोर्टात उत्तरे सादर करतांना त्यांचेवर जो आरोप लागलेला होता तो कोर्टात बाजु प्लीड करता आली नाही. आरोप क्र. २(अ) मध्ये रु. २२,९२९/- कमी भरणा केले. याबाबतीचा अहवाल पुर्वीच्या अधिकाऱ्यांनी दिलेला होता.त्या अहवालाचा अर्थ वेगळया धरण्याचे कारण नाही. आरोप गुंतागंतीच्या संभ्रम निर्माण करणारा आहे. तर संबंधित कर्मचाऱ्यांनी १३-०१-९४ रोजी केलेली नोंदी ते पान गहाळ असेल नंतर चिटकाविलेले असेल तर या गोष्टी संभ्रमीत करणाऱ्या होत्या हे विसरुन चालता येणार नाही. म्हणून संबंधीत मुख्यलेखा परिक्षक यांना झालेल्या नोंदी हया संभ्रमीत करणाऱ्या आहे याचा अर्थ वेगळा काढणे बरोबर नाही.म्हणून संबंधित कर्मचाऱ्यांनी काहीच केले नाही.त्यांना निर्दोष ठरवुन रेकॉर्ड का उपलब्ध होत नाही असा ठपका चौकशी अधिकाऱ्यांवर ठेवता येणार नाही. ज्या पध्दतीने चोकशी करायची होती त्या पध्दतीने चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे काम योग्य प्रकारे केलेले आहे. या सर्व बाबी वरुन असे निदर्शनास येते की, संबंधित

कर्मचाऱ्यांनी पैशाची अफरातफर निश्चितपणे केलेली आहे. चौकशीच्या वेळी गैरहजर राहून कधी कामगार न्यायालय तर कधी औद्योगिक न्यायालय तर कधी उच्च न्यायालयात जाणे, अपील करणे व चौकशीच्या वेळी मनपामध्ये गैरहजर राहणे या सर्व गोष्टी वेळ काढुपणाच्या आहे. याच दरम्यान न्यायालयात जायचे व पुन्हा उलट माझी केस कोर्टात चालु आहे. निर्णय घेता येत नाही. असे बोलणे योग्य नाही व एकूण या प्रकरणाचा अभ्यास करता ही गोष्ट लक्षात येते की, एखादया कर्मचाऱ्यांनी पैशाची अफरातफर केल्यास ही गंभीर स्वरुपाची बाब आहे व अशा कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेली चुक माफ करणे योग्य नाही व अशा कर्मचाऱ्यांना या सभागृहाने पाठीशी घालणे योग्य नसुन सभागृहाला मानसन्मान मिळून देणारी नाही. आज कोर्टाने सुध्दा या सभागृहासमोर अंतीम निर्णयासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे. याचा अर्थ असा नाही की. आपण चुकीचा काहीही निर्णय घ्यावा म्हणून अशा दोषी कर्मचारी/अधिकारी यांच्याबाबत योग्य निर्णय घेतला नाही तर जे कर्मचारी अशा पध्दतीने भ्रष्टाचार करतात त्यांचे मनोधैर्य वाढेल व जे चांगले काम करतात नक्कीच मनोर्धर्य खचेल यात शंका नाही म्हणून संबंधित कर्मचारी यांनी बडतर्फ करण्याचा जो प्रस्ताव सादर झालेला आहे तो मान्य करावा अशी मी विनंती करते.

**श्री.शे.इलियास क्रिमानी :** यालगत पुर्वीच्या स्थायी समिती सभेस श्री.रगडे व लिपीक यांच्या बडतर्फीचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर झाला होता. त्यांचेकडून पैसे भरणा करून घेणे बाकी होते. त्यावेळी शिल्लक असलेले पैसे भरुन घ्यावे व कामावर घ्यावे असा निर्णय घेण्यात आला. त्याचा माणुसकी दाखविण्यात आली तशीच माणुसकी यांना पण दाखविण्यात यावी. यांना आठ वर्ष निलंबीत का ठेवले? सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली नाही. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांची देखील मंजुरी घेतली नाही. तत्कालीन आयुक्त श्री.वैद्य यांना या प्रकरणात अटक वारंट निघाले होते व एक हजार रुपये दंड झाला होता. त्यांच्याशी सुडाची भावना ठेवण्यात आली. दुसऱ्यांना पैसे भरुन कामावर घ्यावे व यांनी पैसे भरलेले आहेत. त्यामुळे त्यांचेशी देखील माणुसकीची भावना ठेवण्यात यावी व त्यांना कामावर घेण्यात यावे.

**मा.सभापती :** आरोप क्र.२ बाबत मुख्यलेखा परिक्षकाकडून चौकशी करुन घ्यावी या कारणास्तव प्रस्ताव स्थगीत ठेवला होता. आरोप क्र. २ सिध्द झाल्यानंतर कार्यवाही अपेक्षित होती.सुधारीत प्रस्तावात देखील मुळ रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.मा.उच्च न्यायालयात प्रशासन काय बाजू मांडेल हे आज माहित नाही. दुसरी बाजू मांडली गेली तर स्थायी समिती दोषी ठरेल. महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक श्री.भोसले साहेबांनी दिलेले पत्राचे पुरावे सत्य ठरेल तर स्थायी समितीवर ताशेरे ओढले जातील. न्यायालयात लवकर निकाल लागत नाही. या प्रकरणात महानगरपालिका पॅनलवरील सध्या काम पहात असलेले वकील बदलून चांगला वकील लावावा. तत्कालीन आयुक्तांना या प्रकरणात दंडही झालेला आहे.वारंट निघालेले होते. मा.उच्च न्यायालयात कागदपत्राची मागणी होईल. श्री.भोसले,तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक यांच्या अहवालावर त्यांचीच सही आहे का व त्यासाठी सही पडताळणी विभागाकडे पत्र पाठवावयास पाहीजे होते. तसे पत्र पाठवले नाही. ती सही बरोबर आहे की

नाही ते तपासावे. श्री.आय.टी.गायकवाड व श्री.भोसले यांचे अहवालावरील सही तपासून घ्यावी.मा.औद्योगिक न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचा किंवा सक्षम न्यायालयाचा जो अंतीम निर्णय होईल तो सर्वांवर स्थायी समिती वरही बंधनकारक राहील. तोपर्यंत त्यांना कामावर घेण्यात यावे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहुन त्यांना कामावर घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री.मधुकर सावंत,डॉ.आशा बिनवडे :** संबंधित कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला असतांना ही बाब समोर आली असतांना अशा कर्मचाऱ्यांना कामावर घेणे योग्य होणार नाही. आपला निर्णय मागे घ्यावा. त्यांना बडतर्फ करावे. न्यायालयाचा निर्णय येईल तेव्हा कामावर घ्यावे.

**मा.सभापती :** प्रस्तावामध्ये वरील परिच्छेदमध्ये रेकॉर्ड उपलब्ध नाही व खालील परिच्छेद मध्ये दिले बडतर्फ करावे अशा दोन प्रकारच्या भुमिका सादर केलेल्या आहे. म्हणून न्यायालय जो निर्णय देईल तो प्रशासनाला तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना बंधनकारक राहील. स्थायी समितीकडे न्यायालयाने ताशेरे ओढु नये म्हणून वरीलप्रमाणे निर्णय घ्यावा लागलेला आहे.

**श्री.मधुकर सावंत :** न्यायालयातील कमिटी स्थायी समितीवर ताशेरे ओढेल त्यांना कामावर घेऊ नये. यास माझा विरोध आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** कामावर घेण्याबाबत निर्णय घेत असेल तर माझा त्यास विरोध आहे. संबंधित कर्मचारी यांना त्वरीत बडतर्फ करण्याचा निर्णय व्हावा या मताशी मी सहमत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.एम.एम.साजेद,जकात लिपीक (निलंबीत यांचे खाते चौकशीत मुळ अभिलेख मिळाले शिवाय निष्कर्ष देणे शक्य नाही असेही नमुद केलेले असल्याने व विविध न्यायालयात प्रकरण चालु असल्यामुळे मा.न्यायालयाचे अंतीम निर्णय स्थायी समितीसह सर्वांवर बंधनकारक राहील. मा.न्यायालयात सदरील प्रकरण लवकर निकाली काढण्याचे दृष्टीने मनपातर्फे दुसऱ्या जेष्ठ विधिज्ञाची नियुक्ती करण्यात यावी.मा.न्यायालयाचे अंतीम निर्णयास अधिन राहुन श्री.एम.ए.साजेद,जकात लिपीक (निलंबीत) यांना कामावर घेण्यास बहुमताने स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/१५:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदांतनगर ते पद्मपुरा पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर,पद्मपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकावयाची आहे.त्यासाठी रक्कम रु. २८,२५,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५५३/२ दि. २०-१२-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६६/२००२ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यास येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.व्ही.आर.महाजन | ४.४४% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| २) | श्री.मौला अलीयार खान | ४.८६% जास्त दराने |
| ३) | श्री.जी.आर.घोडेले | ६% जास्त दराने |
| ४) | श्री.मन्नानखान | १% कमी दराने |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री.मन्नानखान यांचा आहे. म्हणजेच अं.प.दरापेक्षा १% कमी असा दर दिलेला आहे.मा.आयुक्त यांच्या तजवीज नुसार ठेकेदार श्री. मन्नानखान यांना दराबाबत वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी असा दर ठरला.त्यास ठेकेदार श्री.मन्नानखान यांनी सम्मती दिली.

तरी वाटाघाटीअंतीचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने श्री.मन्नानखान यांची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वेदांतनगर ते पद्मपुरा पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर,पद्मपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने श्री.मन्नानखान यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/१६:**

मा.कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटारी (बसविणे) बांधणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९९-२००० च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. ११,७१,७०२ रु. स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकूण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेला एकूण पांच (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.संजय टोनगावकर | अं.प.दरापेक्षा २७.१७% कमी दराने |
| २) | मे.राणा कन्स्ट्रक्शन | --//-- २३.२५% --//-- |
| ३) | मे.एस.एच.असोशिएट | --//-- २१.२१% --//-- |
| ४) | श्री.अमरीश प्रयागजी | --//-- २१% --//-- |
| ५) | श्री.एस.एम.मंडोरे | --//-- १४.९०% --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.संजय टोनगांवकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची आहे.

तरी श्री.संजय टोनगांवकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी.गटारी बांधणेच्या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची श्री.संजय टोनगांवकर यांची निविदा सर्वानुमते मान्य करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/१७:**

मा.कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला की,महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) मार्फत राज्यात केंद्र व राज्य शासनाच्या मदतीने अपारंपारीक उर्जा स्त्रोत साधने सौर उर्जा,पवन उर्जा,बायोगॅस उर्जा इत्यादीचे प्रसार व प्रचार कार्यक्रम राबविण्यात येतात.

सदरील उर्जा स्त्रोत मंत्रालय केंद्र शासन नवी दिल्ली यांच्या आर्थिक मदतीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान "एक उर्जा उद्यान" प्रकल्प प्रस्तापित करण्याची योजना आहे.योजनेतील सर्व उर्जास्त्रोत साधने उभारण्यास केंद्र शासनामार्फत १००% अनुदान उपलब्ध होते.

सदर प्रकल्पाचा उद्देश प्रचार,प्रसार तसेच या साधनाचा वापराविषयीसर्व सामान्यांना माहिती देणे असा आहे.

या उर्जा उद्यानासाठी लोकांनी गर्दी असलेली ठिकाणे गार्डन,पर्यटन स्थळे अशी जागा लागेल. या प्रकल्पासाठी उर्जा साधने अस्थपित करण्यासाठी आवश्यक असणारी जागा मोफत उपलब्ध करुन देणे उर्जा साधनाची देखभाल व व्यवस्थापना करण्याची सुरक्षिततेची हमी संबंधीत संस्थेने घेणे आवश्यक आहे. तसेच उर्जा प्रकल्प मंजुर झाल्यानंतर रु. ५०००/- महाउर्जास भरावे लागतील.

यामध्ये या बाबीची सर्वसामान्यांना माहिती होईल.

या प्रकल्पाबाबत मेडाचे अधिकारी यांनी सिध्दार्थ उद्यानाची पाहणी करुन स्विमींग पुलाच्या दक्षिण,पुर्वची जागा निश्चित केली आहे.यात खालील साधने लावण्यात येणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | सोलार वॉटर हिटींग सिस्टीम | १ नग |
| २) | सोलार कुकर | २ नग |
| ३) | सोलार स्टील | २ नग |
| ४) | एस.पी.व्ही.स्ट्रीट लाईट | ५ नग |
| ५) | गार्डन लाईट | ५ नग |
| ६) | घरगुती लाईट | २ नग |
| ७) | "कंदील | ४ नग |
| ८) | "पंप (१ एच.पी.) | १ नग |
| ९) | सुधारीत चुल | २ नग |
| १०) | ऐरो जनरेटर (१ की वॅट) | १ नग |
| ११) | वाहतुक संकेतांक (छोटा) | २ नग |

वरील सर्व कामासाठी रु. १०.०० लक्ष (१००%अनुदान) केंद्र शासनाकडून मिळणार आहे.योजना मंजुर झाल्यास एम.ई.डी.ए.तर्फे काम करण्यात येईल,तसेच या उर्जा उद्यानाची

देखभाल व सुरक्षा मनपाने करावयाची आहे.तसेच योजना मंजुर झाल्यानंतर रु. ५०००/- हाताळणी शुल्क एम.ई.डी.ए. पुणे यांना भरणा करावे लागतील तसेच सदरील प्रस्ताव मान्य झाल्यास केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मेडा पुणे यांना पत्र व पुरक माहिती द्यावी लागेल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** विद्युत विभागाचे दोन ऐनवेळचे प्रस्ताव सादर झालेले आहे. उर्जा उद्धान प्रकल्प असा एक ठराव केंद्र शासनाकडे पाठवावयाचा आहे. यास १० लक्ष रु. केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. महाराष्ट्र शासनाची जी मेडा संस्था आहे,त्यांचे अंतर्गत हे प्रपोजल पाठवावयाचे आहे. ऐनवेळचे प्रस्ताव आपण घेत नाही, परंतु जे प्रपोजल मनपाच्या फायद्याचे असुन अनुदान १००% मिळते म्हणून हा प्रस्ताव घेण्यास हरकत नसावी. मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,केंद्र शासनाच्या मदतीने एक उर्जा उद्यान उभारणीसाठी सिध्दार्थ उद्यानालगत प्रस्तावित केलेली जागेत वर दर्शविल्याप्रमाणे १ ते ११ साधने लावण्यास आणि योजना मंजुर झाल्यावर रु. ५०००/- आकारणी शुल्क मेडा पुणे यांना पत्र व पुरक माहिती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/१८:**

मा.कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) या संस्थे मार्फत उर्जा स्त्रोत व साधनांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.यामध्ये प्रामुख्याने पवन उर्जा,बायोगॅस,सौरउर्जा इ.वर आधारीत असलेली संयत्रे अस्थापित करण्यात येतात. यामध्ये केंद्र शासनामार्फत तसेच राज्य शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

केंद्र शासनामार्फत पवन-सौर संकरीत वीज निर्मिती करण्याची योजना जाहीर झालेली असून २००१-२००२ या वित्तवर्षासाठी ही योजना लागु आहे. याकरीता ८०% अनुदान उपलब्ध होते. अशा पध्दतीच्या विजेचा कार्यालयातील संगणक,दिवे,पंखे वगैरे गोष्टीकरीता वापर होऊ शकतो. अशा प्रकारच्या सयंत्राची क्षमता जास्तीत जास्त १० किलोवॅट पर्यंत ठेवता येते व केंद्र शासनाकडून १० किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या प्रस्तावांना अनुदान उपलब्ध होऊ शकते.

पवन उर्जेवरील छोटया क्षमतेच्या जनित्रातुन सिच सोलर फोटो व्होलाईक पॅनेल मार्फत वीज निर्माण करण्यात येते व ती वीज बॅटरीमध्ये साठविण्यात येते व साठविलेली वीज कार्यालयीन उपकरणे चालविण्यासाठी वापरता येते.अशा पध्दतीचे संयंत्रसाठी अंदाजे रु. ३,५०,०००/- प्रती किलो वॅट इतका खर्च येतो व त्यावर केंद्र शासनाकडून रु. २,००,०००/- प्रती किलो वॅट इतके अनुदान उपलब्ध होते.सदरील सयंत्र उभारणीस्तव संस्थेस जागा उपलब्ध करुन द्यावी लागते व या जागेभोवती १०० मीटरचे आंत कोणत्याही प्रकारची उंच इमारत अथवा झाले असु नयेत व वाऱ्याचा वेग किमान ३ ते ४ मीटर प्रति सेकंद इतका असावा लागतो.

उपरोक्त सयंत्र बसविणेसाठी तयार कराव्या लागणाऱ्या प्रस्तावाबाबत महाउर्जा कार्यालयाकडून पुर्णपणे तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येणार असुन यासाठी प्रति किलोवॅट रु. २००० नुसार हाताळणी शुल्क (नॉन रिफंडेबल प्रोसेसिंग फि) महाउर्जा कार्यालयास द्यावे लागेल. यासोबतच केंद्र शासनाचे अनुदान प्राप्तीसाठी रु. २०००/- प्रति किलो वॅट नुसार

बांधीलकी शुल्क (कमिटमेंट चार्जेस) महाउर्जाकडे सादर करावे लागतात.सयंत्र कार्यान्वीत झाल्यानंतर सदर बांधिलकी शुल्क संस्थेस परत मिळते परंतु अनुदान मंजुर होऊनही लाभार्थी संस्थेने सयंत्र न बसविल्यास बांधिलकी शुल्क परत करण्यात येत नाही.

वरील प्रमाणे उपलब्ध होणाऱ्या अनुदानाचा उपयोग करुन औरंगाबाद महानगरपालिकेकरीता अशी सयंत्रे अस्थापित करण्याचा या विभागाचा प्रस्ताव असुन कार्यालयीन उपकरणाकरीता अपेक्षित असलेली वीज व १० किलोवॅट पर्यंतच्या सयंत्रासाठी मिळणारे अनुदान विचारात घेता महापालिकेच्या नव्या / जुन्या प्रशासकीय इमारतीवर प्रत्येकी एक प्रमाणे ५ किलोवॅटचे सयंत्र अस्थापित करण्याचे प्रस्तावित करण्यात येते आहे.यामुळे वीज वापरावर परिणाम होऊन वीज बिलासही बराच फरक पडु शकेल.

करीता हाताळणी शुल्क,बांधीलकी शुल्क व सयंत्रच्या किंमतीपैकी मनपाचा वाटा असे एकुण सुमारे १५.५० लाख स १० किलोवॅटच्या सयंत्रसाठी खर्च येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर वर प्रस्तावित सयंत्रे अस्थापित करण्याचा प्रस्ताव तयार करुन अनुदान प्राप्ती करीता केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी "महाउर्जा" स पत्र देऊन कळविण्यात येईल व हाताळणी शुल्क जमा करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा.सभापती** : महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्वर उर्जा यंत्र बसवण्याबाबतचा प्रस्ताव आहे.त्यामुळे मनपास विद्युत बील येणार नाही. याबाबतीत शासनाकडे मागणी करुन ७०% ते ८०% अनुदान मिळते त्यामुळे कमी खर्चात विज उललब्ध होईल व मनपास विजेचा खर्च येणार नाही म्हणून हा सुध्दा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या जुन्या व नवीन प्रशासकीय इमारतीवर केंद्र शासनामार्फत पवन सौर संकरीत वीज निर्मिती करण्याच्या योजनेअंतर्गत १० किलोवूट पर्यंतचे सयंत्र अस्थापित करण्याचे करीता आवश्यक असलेले हाताळणी शुल्क व बांधीलकी शुल्क संबंधीताकडे जमा करण्यास प्रस्ताव तयार करुन अनुदान प्राप्ती करीता केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी "महाउर्जा" स कळविण्यास व हाताळणी शुल्क जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,सिल्क मिल कॉलनी स.नं.१७ न.भु.क्र.१८७७८जागेचा वाद न्याय प्रविष्ट होता.दावा क्रमांक १०४८/९६ सिल्क मिल कॉलनी एज्युकेशन सोसायटी विरुध्द जिल्हाधिकारी व मनपा असे होते.

दि. २९-११-९६ रोजी मनपा व सिल्क मिल कॉलनी एज्युकेशन सोसायटी तर्फे मा.आयुक्त यांच्या दालनात बैठकी होवून मनपास ३९८३.५८ मीटर जागा देण्याबाबत चर्चा झाली.त्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे व त्याचा उल्लेख सुध्दा दाव्यामध्ये आहे.या संबंधाने मा.आयुक्त यांच्या दालनात झालेल्या तडजोडीनुसार मनपास दिलेल्या जागेचा नकाशा ज्याचे क्षेत्रफळ ३९८३.५८ चौ.मी.असून दोन्ही बाजुने स्वाक्षरीत असुन मनपातर्फे विधी सल्लागार यांची स्वाक्षरी आहे.आता सदरील जागेमध्ये एक आरोग्य केंद्र, मंगल कार्यालय व पाण्याची टाकी या सर्व वास्तु तयार आहेत.मनपाने या सर्व वास्तुंवर पुष्कळ खच्र केला आहे,या सर्व वास्तुंच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करता सदरील जागेस

संरक्षक भिंत बांधण्याबाबतचे अंदाजपत्रक मंजुर असुन सदरील भिंतीचे काम पुर्व बाजुने प्रगती पथावर आहे.मात्र सदरील मनपास दिलेल्या जागेस पुर्व,पश्चिम व उत्तर बाजुस नागरीकांची घरे असुन त्या सर्व घरांची ड्रेनेज लाईन टाकलेली आहेत,ड्रेनेज देखभालीसाठी सदरील उपलब्ध जागेमध्ये संरक्षक भिंत बांधण्यापुर्वी तिन्ही बाजुस १.५ मीटर जागा सोडणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त महोदय यांच्या आदेशान्वये शहर अभियंता व कार्यकारी अभियता (जलनिःसारण) यांची संयुक्तीक पाहणी दि. ७-३-२००२ रोजी झालेली आहे व कार्यकारी अभियंता (जलनिःसारण) यांनी सदरील जागेच्या तिन्ही बाजुने ड्रेनेज देखभालीसाठी कमीत कमी १.५ मीटर रुंदीची जागा सोडून प्रस्तावित संरक्षक भिंत बांधण्याबाबत अहवाल दिला आहे.

तरी मनपाच्या दृष्टीने शहर अभियंता यांनी सादर केलेला प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्क मिल कॉलनी स.नं.१७ न.भु.क्र.१८७७८मधील मनपास मिळालेल्या ३९८३.५८ चौ.मी.जागेतील विविध वास्तुंच्या संरक्षणाचे दृष्टीने व कार्यकारी अभियंता (ज.नि.) यांचे अहवालानुसार सदरील जागेच्या तिन्ही बाजुने ड्रेनिज देखभालीसाठी कमीत कमी १.५ मीटर रुंदीची जागा सोडुन प्रस्तावित संरक्षक भिंत बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा.सभापती :** मुख्य अग्निशकमन अधिकारी यांचे दोन अपील आलेले आहेत ते नगर सचिव वाचुन दाखवितात.

**नगर सचिव :** (अपील वाचुन दाखवितात.)

**विषय क्र. १०२/२०:**

मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन यांची मारुती जिप्सी क्र. एम.एच.२० ए.३३३३ साठी रेडीयल टायर खरेदीच्या प्रकरणात गोठविलेली वेतनवाढ चालु करण्यासंदर्भात अपील.

**संवाद :**

**मा.सभापती :** प्रशासनामार्फत खुलासा व्हावा.

**उपआयुक्त (म) :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे बंद केलेली वेतनवाढ बाबत त्यांना झालेली शिक्षा या संदर्भात अपील समितीपुढे ठेवलेला आहे.कुठल्या परिस्थितीत वेतनवाढ बंद करण्यात आलेली होती त्याची सविस्तर माहिती घेवून पुढील बैठकीमध्ये अभिप्राय देण्यात येईल.ही माहिती २-३ विभागाशी संबंधीत आहे.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी अपील सादर केलेले यावर प्रशासनाचे मत काय आहे याबाबत एक सविस्तर टिप्पणी पुढील बैठकीत प्रशासनाने सादर करावी.पुढील बैठकीत यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन यांची मारुती जिप्सी क्र. एम.एच.२० ए.३३३३ साठी रेडीयल टायर खरेदी प्रकरणात गोठविण्यात आलेली एक वेतनवाढ संदर्भात दाखल झालेल्या अपिलावर प्रशासनाने पुढील बैठकीत सविस्तर अभिप्रायासह माहिती देणे बाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/२१:**

मुख्य अग्निशमन अधिकारी एस.बी.झनझन यांचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणे बाबत.

**संवाद :**

**मा.सभापती :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांना मेडीकल बील मिळालेली नाही.त्यांनी तसे अपील केलेले आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** म्हैसमाळ येथे गेल्यावर्षी घटना घडलेली होती.या विभागातील काही कर्मचारी व मी स्वतः खोल पाण्यात राहुन काम केले.त्यामुळे माझ्या शरीराला इजा झाली व ऑपरेशन करावे लागेल.या संदर्भाने मेडीकल बील सादर केले आसता नियमान येत नाही असे म्हटले.बील मिळत नसेल तर पुढील वेळेस अशा घटनावर मात करणे अडचणीचे होईल.

**श्री.जयवंत ओक :** म्हैसमाळ येथे गेल्या वेळेस त्यांनी चांगले काम केलेले आहे.एका व्यक्तिचा मृतहेद काढलेला आहे.त्यामुळेच त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळलेला आहे.त्यांची भावना जाणून घेवून त्यांना औषधोपचारासाठी आर्थि मदत देण्यात यावी.या कर्मचाऱ्यांना मृत्यूला सामोरे जावे लागते अशा कर्मचाऱ्यांना मदत दिली पाहीजे.

**श्री.मधुकर सावंत :** स्थायी समितीला अधिकार असेल तर त्यांचे अपील मंजुर करावे.जेवढा खर्च झाला त्या नियमाने त्यांना आर्थिक मदत करावी.त्यांची भावना लक्षात घ्यावी.

**मा.सभापती :** घटनेच्या किती दिवसानंतर बील दाखल केले होते.विहीत मुदतीत प्रशासनाकडे अपील सादर केले होते का?

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** वेळेच्या आत संचिका डॉ.देशपांडे यांचेकडे गेलेली होती.

**श्री.भरत लकडे :** मेडीकल बील थांबवुन ठेवू नये नसता त्यामुळे कर्मचाऱ्यांची काम करण्याची उत्सुकता राहणार नाही.

**श्री.जयवंत ओक :** विशेष बाब म्हणून मंजुर करण्यात यावे.

**श्री.मधुकर सावंत :** अधिकाऱ्यांचे मोनधैर्य वाढत असेल तर अपील म्हणून मंजुर करण्यास हरकत नसावी.कुणावर अन्याय होऊ नये.

**श्री.मीर हिदायत अली.:** या विभागातील कर्मचारी जीव धोक्यात घालुन कामे करतात.औषधोपचाराची मदत देण्यास मंजुरी दयावी.

**मा.सभापती :** आरोग्य अधिकारी यांचे मत घेऊन निर्णय घेता येईल.

**डॉ.आशा बिनवडे :** का? मेडीकल बील देता येत नाही.त्याचे बील देण्यासाठी संबंधित अधिकारी उपस्थित नाही व ते नेहमीच सभागृहात गैरहजर राहतात हे योग्य नसुन माझ्या माहितीप्रमाणे १५ आजारावर औषधोपचारासाठी खर्च दिला जातो.इतर कर्मचारी /अधिकारी यांचे डॉ.देशपांडे यांच्या बद्दल तक्रारी आहे.कोणत्या आजारासाठी आर्थिक मदत करु शकतो हे न बघता

कर्मचाऱ्यांना तोंडी किंवा संचिकेवर एक ओळीत शेरा देवून टाकतात यात बदल नाही.हे चुकीचे धोरण आहे,काय येते,काय येत नाही ही कळत नाह.इएनटी,मेंदुचा आजार हे डॉक्टरांना कळत नाही.मेडीकलचे बील योग्य आहे.उत्तराची वाट न बघता मंजुर करावे.

**मा.सभापती :** स्थायी समितीसमोर अपील सादर झालेले होते.त्या अपीलावर सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि ते अधिकारी ज्या विभागात काम करीत आहे त्या विभागाचे काम म्हणजे सर्व नागरीकांसाठी व तुमच्या आमच्यासाठी,ज्वलंत अशा प्रश्नाशी निगडीत आहे.आरोग्य विभागामार्फत आजारासाठी आर्थिक मदतीची कार्यवाही होते.शासनाने नेमुन दिलेल्या किंवा मनपाने नेमून दिलेल्या आजारामध्ये हा आजार त्यात नमुद नसेल तरी त्या आजाराचा त्यात समावेश करण्यात यावा असे स्थायी समिती तर्फे निर्णय घेण्यात येत आहे व त्यानुसार संबंधीत अग्निशमन अधिकारी यांचे मेडीकल बील मंजुर करण्याबाबत तात्काळा कार्यवाही व्हावी.जे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे जे अर्ज दिलेल तेच अपील ग्राहय धरुन आज निर्णय देण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन यांचे दाखल केलेल्या वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्तीसाठी दाखल केलेले क्लेम त्यांनी ज्या आजारासाठी दाखल केले.विशेष बाब म्हणून त्या आजाराच्या मेडीकल परतावासाठी नमुद केलेल्या आजारात समावेश करुन व त्यांनी दाखल केलेले देयक अपील म्हणून मान्य करुन वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री.भरत लकडे :** मागील बैठकीत चर्चा झालेली होती.रामविहार हौसिंग सोसायटीचे अतिक्रमण काढण्याचे आदेश केले होते.काढले नाही तर संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करणार होती.त्याबाबत खुलासा दयावा. २२ तारखेपासून आतापर्यत का कार्यवाही झालेली नाही.

**श्री.नंदकुमार फुलारी :** स.स.श्री. लकडे यांनी या इमारती संदर्भात बऱ्याच वेळा सभागृहात मुद्दा उपस्थित केला,त्यावर अंतिम निर्णय व्हावा.

**मा.सभापती :** रामविहार हाऊसिंग सोसायटी बाबत बऱ्याचवेळा सभागृहात स.स.श्री. लकडे यांनी प्रश्न उपस्थित केलेला होता त्या संदर्भात संबंधित विभागाचे अधिकारी यांनी वेळोवेळी सुचना केलेल्या आहे आणि न्यायालयात सुध्दा या केस बाबत अडचण नसुन आजच दुपारी ४.०० वाजेपर्यंत संबंधित विभागाचे कर्मचारी घेऊन संबंधित अधिकारी यांनी अतिक्रमण पाडावे असे उपआयुक्त (म.) यांना सुचना करण्यात येत आहे.वेळ पडल्यास हे सभागृह सुध्दा जागेवर प्रत्यक्ष पाहणी करेल.आजच्या आज अतिक्रमण न काढल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

**श्री.जयवंत ओक :** दोन-तीन दिवसापासुन पाण्याची भीषण टंचाई आहे. वृत्तपत्रात बातम्या येत आहे. जनतेला पाणी दयावे. एक मुलाचा नुकताच टँकरखाली मृत्यू झाला.

(याचवेळी जनतेला पाणी देण्याची मागणी करुन स.स.श्री. जयवंत ओक,श्री.फुलारी नंदकुमार,श्री. भरत लकडे,श्री.जगदीश सिध्द इ.सदस्य मा.सभापती यांचे डायस समोर खाली बसतात.)

**मा.सभापती :** सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. पाण्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा करता येईल.तसेच परवाच मिसारवाडी येथे एका बालकाचा टँकरखाली येवुन निधन झालेले आहे. फार वाईट प्रसंग घडलेला आहे.त्यासंदर्भात ही चर्चा करण्यात येईल असे सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.सविस्तर चर्चा करण्यात येईल हे प्रकरण कशामुळे घडले. (याचवेळी सर्व सदस्य आपल्या आपल्या जागेवर जावून बसतात.) याबाबत रिपोर्ट आलेला आहे का?

**श्री.नंदकुमार फुलारी :** पाणी पुरवठा अधिकारी सभागृहात नाही. पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**श्री.जयवंत ओक :** ज्या मुलांचा पाण्यासाठी टँकर खाली येवून मृत्यू झाला त्यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत दयावी. नागरीकांचे जीव धोक्यात येत आहे.मनपा नागरीकांना पाणी देऊ शकत नाही.वाड्र वाईज पाणी दिले पाहिजे. जनता पाणी येत नाही म्हणून नगरसेवकांकडे येतात याची जाणीव प्रशासनाला नाही. अधिकारी सुध्दा सभागृहात नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी मला विचारुन गेलेले आहे. त्यांना झोनमध्ये काम होते.जो मुद्दा उपस्थित झाला संबंधित ज्या मुलाचे टँकरखाली मृत्यू झाला त्यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत माझी संमती आहे व याबाबत संबंधित कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** सभागृहात चर्चा होवू दयावी. ज्या ज्या भागात पाणी नाही अशा भागात प्रशासन काय उपाययोजना राबविणार आहे. सिडको-हडको भागात सध्या १ दिवसाआड पाणी दिले जाते ते सुध्दा पुरेसे नाही. पुढील काळात आणखी परिस्थिती भीषण झाल्यास अशा भागात टँकरद्वारे पाणी देणार का?जायकवाडी जलाशयामध्ये पाणी साठा पुरपुर आहे का हर्सुल तलावाची परिस्थिती काय आहे. पावसाळा येईपय्रंत येत्या दोन-तीन महिने काय उपाय योजना करणार आहे.वार्डातील विहीरी, हातपंप साफसफाई करणार काय? खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी सभागृहात नाही. अधिकाऱ्यांना सुचना देवून पाणी प्रश्नावर उपमहापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याचे सुचवण्यात येईल.

**उपआयुक्त (म) :** पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता (पापु.) यंना आराखडा तयार करण्याचे बाबतीत सुचना देण्यात आलेल्या आहे. या आठवडयातच आणि पुढील तीन महिन्यांसाठी प्रति आराखडा तयार करण्यासाठी मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांचे समवेत पुढील आठवडयात बैठक आयोजित करणार आहेत.

**मा.सभापती :** एक आठवडा कालावधी जास्त होतो. आजच उपमहापौर यांच्या दालनामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांना बोलाविण्यात यावे. संबंधित अधिकारी सुध्दा राहतील. छावणी परिषदेच्या संदर्भात आज बैठक घेणार आहोत. त्यानंतर लगेच पाणी प्रश्नाच्या बाबतीत चर्चा करण्यात येईल.संचालक, प्राणी संग्रहालय यांचे

विभागाचे ऐनवेळचे प्रस्ताव आहेत. संबंधित अधिकारी खुलास करतील. त्यांचेनंतर हे प्रस्ताव घ्यायचे की नाही हे ठरविता येईल.

**संचालक, प्राणी संग्रहालय :** प्राणी संग्रहालयातील प्राण्यासाठी बिफ (मटन),घास,लसुन,ब्रेड आणि पशुखाद्य हे चार ॲटम खरेदी करावयाचे आहे.निविदा मागविल्या आहे.ते त्या सबंधीचे दर आपल्या समोर ठेवलेले आहे.मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी कमी आहे ते मंजुर केल्यास योग्य होईल.

**मा.सभापती :** प्रस्तावामध्ये बीफ (मटन) दर ९.९० रु.झालेले आहे.मागील वर्षी किती होते.

**संचालक, प्राणी संग्रहालय :** मागील वर्षी २३/- रु. किलोने घेतलेले होते.या वर्षी ९.९० रु. दर आलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** संबंधित अधिकारी त्यांची बाजु मांडण्याचा प्रयत्न करतात तुर्त प्राण्यांना अन्न नसेल तर मंजुर करावे.

**डॉ.आशा बिनवडे :** ऐनवेळी असे प्रस्ताव घेऊ नये.यापुर्वीच का प्रस्ताव सादर झालेला नाही.

**संचालक, प्राणी संग्रहालय :** आज सकाळीच मंजुरी मिळालेली आहे.नवीन दर १ एप्रिल पासुन लागु राहतील.३१ मार्चपर्यंत जुनेच दराने खरेदी होईल.२३/- रु. ऐवजी ९/- रु. किलोन बिफ मिळत आहे.घेण्यास हरकत नसावी.

**श्री.नंदकुमार फुलारी, श्री.भरत लकडे,जगदीश सिध्द :** मनपाचा यात फायदा असेल तर प्रस्ताव मंजुर करावा.खराब बिफ येणार नाही याची दक्षत घेण्यात यावी.नसता प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये.

**संचालक, प्राणी संग्रहालय :** जुन्या व नविन दरामध्ये १३/- रु. प्रति किलो मागे फरक येत आहे.दररोज दोन क्विंटल (बिफ) लागते याचा अर्थ २६००/- रु. प्रत्येक दिवसाला होणार आहे.बिफ खराब देऊ शकणार नाही त्याची तपासणी होऊनच प्राण्यांना दिले जाते.यानिविदा मध्ये स्पर्धा झालेल्या आहे.त्यामुळे दर कमी आलेले आहे.एकूण १५ लाखाची खरेदी आहे.

**मा.सभापती :** नविन दराने १५ लाख ऐवजी ९ लाखाची खरेदी होईल असे असेल तर असे प्रस्ताव स्थायी समिती समोर येण्याची गरज नाही.

**डॉ.आशा बिनवडे :** प्राण्यांना तुर्त अन्नाची आवश्यकता आहे हे अधिकाऱ्यांना माहित असतांना यापुर्वीच का प्रस्ताव सादर केलेला नाही यात दोष अधिकाऱ्यांचा आहे.उशिरा संचिका सादर करुन आताच मंजुरी झाली असे उत्तर देणे बरोबर नाही.

**श्री.मधुकर सावंत :** महानगरपालिकेचा यात फायदा होणार होता हे अधिकाऱ्यांना माहित नसतांना यापुर्वीच का प्रस्ताव दिलेला नाही.आपले अधिकारी रस्त्यावरील बकरे ओढुन आणुन किंवा कत्तल केलेले बकऱ्यांचे मांस आणले जाते ते मांस खाल्ले जाते अशी चर्चा आहे.हा प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्याची आवश्यकता नाही.अधिकारी नेहमीच प्रस्ताव ऐनवेळी सादर करुन मंजुरी घेतात हे बरोबर मंजुर करु नये.

**संचालक, प्राणी संग्रहालय :** जे मांस जप्त केले जाते ते पोलीसांच्या समक्ष होते ते आपण नारेगांवला पुरतो.

**मा.सभापती :** पुढील स्थायी समितीपुढे हा विषय ठेवण्यात यावा.
(दिनांक १३-११-२००१ च्या स्थायी समिती सभेमध्ये स्थगीत ठेवण्यात आलेला प्रस्ताव विषय क्र. ५२/५)

**विषय क्र. १०४/२२:**

मा.स्थायी समितीने दि. ८-१-९९ रोजी संपन्न झालेल्या विषय क्र. ४५७/२४ अन्वये मंजुर केलेला ठराव रद्द करणे बाबत.

मो.उस्मानपुरा येथील सर्व्हे नं. ६ मधील रहिवासी वापरासाठीचे रेखांकन सन १९६६ मध्ये तत्कालीन औरंगाबाद नगरपालिकेने मंजुर केले होते.हया मंजुर रेखांकनात २४ मी.विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र दर्शविण्यात आले होते.सदर २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मावेजा जमीन मालकास अद्याप देण्यात आलेला नाही. सदर मावेजा धन स्वरुपात देण्याऐवजी रेखांकनातील खुल्या जागेतून देण्यासंबंधीचा प्रस्ताव अर्जदाराचे विनंतीवरुन मनपा प्रशासनापुढे आला असता प्रशासनाने त्यावर विचार करुन रेखांकनातील १०% खुल्या जागेतील भुखंड मोबदल्याचे स्वरुपात अर्जदारास देण्यात यावा असा निर्णय तत्कालीन आयुकत यांनी दि. २१-७-९८ रोजी विचारार्थ ठेवण्यात आला असता स्थायी समितीने २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्राचे मोबदल्यापोटी रेखांकनातील १०% खुल्या जागेपैकी २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड मुळ जमीन मालकास निवासी वापरासाठी देण्यात यावा असा ठराव पारीत केला.

मा.स्थायी समिती सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने करारनामा व इतर अटी शर्ती हया संबंधाने पुढील कार्यवाही प्रशासनाने पुर्ण करुन मुळ मालकासोबत दि. १५-५-१९९९ रोजी करारनामा करण्यात आला.हया करारनाम्यात २५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड रेखांकनातील १०% खुल्या जागेच्या क्षेत्रातून अर्जदारास देण्यासंबंधी उल्लेख करण्यात आलेला आहे.दरम्यानच्या काळात तत्कालीन मा.विरोधी पक्षनेता हयांनी त्यांचे पत्र क्र. २९/९९ दि. २८-१-९९ अन्वये स्थायी समितीच्या ठरावास व रेखांकनातील खुल्या जागेपेकी क्षेत्रातून रहिवाशी वापराचा भुखंड देण्याच्या प्रस्तावास आक्षेप घेतला आणि सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा व तोपर्यंत प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करुन नये अशी मागणी केली. करारनाम्यानुसार रेखांकनातील खुल्या जागेपैकी २५० चौ.मी.चा भुखंड मुळ जमीन मालकास देण्याबाबत स्थायी समितीचा ठराव झालेला असतांना संबंधीत जमीन मालकाने शहर भुमापन कार्यालयातून ३९२.७५ चौ.मी. हया क्षेत्राच्या भुखंडाचे पी.आर.कार्ड प्राप्त करुन घेतले. जे करारनाम्यानुसार नाही व स्थायी समितीच्या ठरावाची पायमल्ली करणारे आहे.

मजुर रेखांकनातील किमान १०% किंवा त्यापेक्षा जास्त सोडण्यात आलेल्या सार्वजनिक खुल्या जागेत रहिवाशी भुखंड देण्याची व खुल्या जागेचे आवश्यक क्षेत्र विकास नियंत्रण नियमावली नुसार न सोडता ते कमी करण्याची कार्यवाही कायद्याला व नियमाला धरुन नाही.

स्थायी समितीच्या उक्त ठरावाद्वारे रेखांकनातील खुल्या जागेत मुळ जमीन मालकास रहिवाशी भुखंड दिल्यास खुल्या जागेचे क्षेत्र रेखांकनातील एकूण क्षेत्राच्या ८.५४% एवढे राहते.जे कायद्यात न बसणारे व नियमाचा भंग करणारे ठरते.प्रशासनाने सदर प्रकरणातील झालेल्या कार्यवाहीचा स्थायी समितीच्या ठरवाचा संपुर्ण अभ्यास केला असता स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी करणे कायदा व नियम सोडून होईल.हया निष्कर्षाप्रत प्रशासन आलेले आहे.रेखांकनातील खुल्या जागेत रहिवाशी भुखंड नियमानुसार देता येत नसल्यामुळे २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला धन स्वरुपात किंवा बदली चटई क्षेत्र निर्देशकांद्वारे मुळ जमीन मालकास देणे हे कायद्याला व नियमाला धरुन होईल असे प्रशासनाचे मत आहे.तरी सदर प्रस्तावात झालेली कार्यवाही व मुळ जमीन मालकाने प्राप्त करुन घेतलेल्या बेकायदेशीर पी.आर.कार्डच्या पुनर्विचार करुन मा.स्थायी

समितीने ठराव क्र. ४५७/२४ दि. ८-१-१९९९ रद्द करावा व कायदेशीर प्रकिया पुन:स्थापित करावी असा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात येतो.

**संवाद :**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मो.उस्मानपुरा सर्व्हे नं. ६ मधील एका गरीब व्यक्तिची जागा मनपाने भुसंपादन केली.सतत ३ वर्षापासून हा प्रश्न स्थायी समितीसमोर येत आहे.रस्ता रुंदीकरणासाठी जागा भुसंपादन केली व ओपन स्पेस मधील जागा संबंधीत मालकास दिलेली आहे व तसा ठराव दि. ८-१-१९९९ रोजी सम्मत करण्यात आलेला आहे.तो ठराव रद्द करण्यासंदर्भात मागील १३-११-२००१ रोजीच्या बैठकीत तसा प्रस्ताव सादर झालेला होता.स्थायी समितीने घेतलेला निर्णय हा कायम करण्यात आला पाहिजे.राजाबाजार येथील अशा एका प्रकरणात न्यायालयाचे निर्देश होते.त्यानुसारच या प्रस्तावाच्या बाबतीत मा.आयुक्तांची सविस्तर टिप्पणी आलेली आहे.सभापती या नात्याने योग्य तो निर्णय घ्यावा.प्रशासनाला जागेची गरज नसेल तर संबंधीत व्यक्तिला जागा दयावी नसता मोबदला दयावा.

**मा.सभापती :** संबंधित व्यक्तिला सन ९९ पासुन जागेची डिमांड करीत आहे.जेवढी अलॉट केलेली आहे तेवढी द्यावी नसता संबंधित व्यक्तिला पैशाच्या स्वरुपात मोबदला द्यावा.

**श्री.जगदीश सिध्द :** मनपाने जागा घेतली.संबंधीत व्यक्तीला जेवढी जागा दयायची तेवढी दिली नाही व जागा लागत नसेल तर जागा दयावी किंवा जागेचा मोबदला ऐनवेळी प्रशासकीय ठरावाची गरज नाही.पुर्वीचा जो ठराव झालेला आहे.त्याचीच अंमलबजावणी करावी.

**मा.सभापती :** जेवढी प्रशासनाला मान्य असेल तेवढीच जागा संबंधित मिळकत धारकाला देण्यात यावी.जर जागा घेण्यास कबुल नसेल तर मोबदला देण्यात यावा.

**श्री.जयवंत ओक :** तीन पिढयांपासून संबंधित व्यक्तिची जागा होती त्यांनी मनपास मदत केलेली आहे.स्थायी समितीने संबंधीत व्यक्तीला २५० चौ.मी.जागा दयावी म्हणून प्रस्ताव मंजुर केला.तो निर्णय योग्य आहे.

**मा.सभापती :** प्रशासनाने संबंधीत व्यक्तीकडून जागा घेण्यासाठी जी कार्यवाही केली होती ती कार्यवाही जशीच्या तशी ठेवून संबंधीत मिळकत धारकाला त्यांची जागा देण्यात यावी.त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मो.उस्मानपुरा येथील सर्व्हे नं. ६ मध्ये रेखांकनातील खुल्या जागेत २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे मोबदल्यास जितकी जागा प्रदान करण्यात आलेली आहे तेवढीच जागा देण्यात यावी.संबंधीत व्यक्ति जागा घेण्यास तयार नसेल तर पैशाच्या स्वरुपात संपादीत जमिनीचा मोबदला देण्यात यावा.प्रशासनाने संबंधित व्यक्तिकडून जागा घेण्यासाठी जी कार्यवाही केली ती जशीच्या तशी ठेवून प्रदान केलेली जागा त्यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**डॉ.आशा बिनवडे :** मागील बैठकीत डॉ.देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा या सभागृहाने निर्णय घेतलेला होता, त्या संबंधीची

कार्यवाही केलेली आहे का खुलासा दयावा. रेकॉर्ड सील करण्याचे आदेश केले होते. ती सुध्दा कार्यवाही झालेली आहे किंवा नाही याचा खुलासा दयावा.

**उपआयुक्त (म) :** प्रोसीडींग प्राप्त झाली आहे. कार्यवाही अंतर्गत आहे.प्रोसेस चालु आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** संबंधीत अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यास विलंब होत आहे, त्याचप्रमाणे जे रेकॉर्ड अंतीम चौकशीसाठी आहे. त्यास सिल करण्याचे आदेश करुन कार्यवाही झालेली नाही. विलंब झाल्यास त्या रेकॉर्ड मध्ये फेरबदल होऊ शकतो. यास कोण जबाबदार आहे. त्यासाठी तात्काळ ज्या चौकशीच्या संचिका आहे त्यात सील करावे. तसेच संबंधीत मेडीसीन पुरवठा करणाऱ्या कंपन्यावर सुध्दा गुन्हे दाखल करण्याचे आदेश झालेले होते. त्यानुसार काय कार्यवाही केलेली आहे.

**उपआयुक्त (म) :** सर्व कायदेशीर बाबी तपासून योग्य ती ॲक्शन घेण्यात येईल. उपसंचालक आरोग्य विभाग यांचेकडून रिपोर्ट मागविलेला आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** संचिका सील करण्यास का उशीर होतो आहे. संचिका सील करण्यास अहवालाची गरज नाही. तात्काळ संबंधित रेकॉर्ड सील करावे.

**श्री.मीर हिदायत अली :** मंजीतनगर येथे एका संस्थेने भाडेतत्वावर मनपाची जागा घेतली.अद्याप मनपास भाडे भरणा केले नाही.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित मालकाने रक्कम भरणा केली.

**मा.सभापती :** संबंधीत संस्थेने रक्कम देत नाही. सदरील जागा १०% प्रमाणे ओपन स्पेस मधील आहे ती नागरीकांच्या मागणीनुसार खुली करण्यात यावी व लवकरात लवकर विकसीत करावी.

**श्री.कावडे :** मा.सभापती नाथसुपर मार्केट येथील दुकान क्र.१ सौ.मंगला प्रकाश पारख यांनी स्थायी समितीकडे दुकान क्र.१ च्या पाठीमागे असलेली जागा भाडे तत्वावर मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. यावर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

**मा.सभापती :** सदरील महिलेने स्थायी समितीकडे अर्ज केलेला आहे. नाथ सुपर मार्केट दुकान क्र. १च्या पाठीमागील जागा सै.मंगला प्रकाश पारख यांना दुकानाच्या पाठीमागील जागा त्यांच्या मागणीनुसार भाडेतत्वावर देण्यात यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सर्व्हे नं. ५३/२,५४/१ गारखेडा येथे मनपाची ३ एकर खुली जागा असुन मनपाने विकास करण्यासाठी विकत घेतलेली आहे. त्या जागेवर एका बिल्डरने तेथे पक्के बांधकाम केले त्यास मनपातील अधिकाऱ्यांनी सुध्दा बांधकामास मंजुरी दिली. यात मनपाच्या मालमत्तेचे नुकसान झालेले असून संबंधित बिल्डर व बांधकामास परवानगी देणारे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही व्हावी.१० लक्ष रु. देवून जागा खरेदी केलेली आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** मनपाच्या जागेवर कुणी अतिक्रमण करीत असेल तर तात्काळ संबंधितांवर पोलीस गुन्हा दाखल झाला पाहिजे.

**प्र.उपसंचालक नगररचना :** मनपाच्या मालकीची जागा आहे,परंतु पुर्ण तपासणी करुनच पुढील कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** गारखेडा परिसरात ३ एकर जागा मनपाने विकास कामासाठी विकत घेतली व त्या जागेवर एक बिल्डर बांधकाम करीत आहे असे स.सदस्य श्री.

तुळशीबागवाले यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले त्याबद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो.ओपन स्पेसवर अतिक्रमण होते परंतु ती जागा मनपाने विकत घेतली त्या जागेवर अतिक्रमण होत असेल तर योग्य नाही.खेदाची बाब आहे. उपआयुक्त (म) श्री. गुट्टे साहेब यांना सुचना देण्यात येतात की,आजच्या आज या जागेवर नगररचना विभागाचे अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी घेऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अतिक्रमण झालेले काढुन टाकावे व किती जागेवर अतिक्रमण झाले वगैरे व काय कार्यवाही केली याचा अहवाल पुढील स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा.

या नंतर "जन गण मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

**औषधी / वैद्यकीय उपकरणे / साहित्य इत्यादी खरेदी बाबत लेखापरिक्षण अहवाल**

**प्रस्तावना :**

दिनांक ३०-१-२००२ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडील औषध खरेदी इ. मध्ये झालेल्या कथित गैरप्रकाराविषयी लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण करुन आपला अहवाल स्थायी समितीस सादर करावा असे आदेशित करण्यात आले.विशेषत: सन २०००-२००१ व सन २००१-२००२ मधील औषधी खरेदीचे लेखा परिक्षण त्वरीत करुन दिनांक ४-२-२००२ रोजी अहवाल सादर करण्याबाबत कार्यवाही व्हावी असे सुचित करण्यात आले.मात्र सदरचे काम हे एवढया कमी वेळात पुर्ण करणे शक्य नसल्याचे दिनांक १-२-२००२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात येऊन दिनांक ११-२-२००२ पर्यंत अहवाल सादर केला जाईल अशी विनंती करण्यात आली.त्यानुसार सदरचे काम करण्यात येऊन अहवाल सादर करण्यात येत आहे.

**अहवाल :**

**अ)** आरोग्य विभागाने सन २०००-२००१ व २००१-२००२ या कालावधीत निविदेनुसार खरेदी केलेल्या औषधी इ.चा खर्च खालील प्रमाणे आहे.या व्यतिरिक्त किरकोळ खरेदी थोडया प्रमाणात आहे.

१) मे.केंकरे ब्रदर्स-मुंबई :

| | |
|---|---|
| रु. ०८,१८,०७८ =०० | सन २०००-२००१ |
| रु. ०७,६१,३४७ =०० | सन २००१-२००२ |
| रु. १५,७९,४२५ =०० | |

२) मे.तिविम फार्मास्युटीकल्स,म्हापसा,गोवा:

रु. ०४,९२,७०० =००    सन २०००-२००१

रु. ०४,९२,७०० =००    सन २००१-२००२

रु. ०९,८५,४००=००

३) मे.प्रिमिअर असोशिएटस,नागपुर :

रु. ०३,१३,२०० =००    सन २०००-२००१

रु. ०१,६०,२२० =००    सन २००१-२००२

रु. ०४,७३,४२० =००

४) इतर :

रु. ४५,३०० =००    सन २०००-२००१

रु. ४५,३०० =००

**एकूण : (१+४) रु. ३०,८३,५४५=००**

याव्यतिरिक्त सन १९९६-९७ ते १९९९-२००० या चार वर्षातील निविदेनुसार एकूण खरेदीची माहिती काढण्यात आली.ती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सन १९९६-९७ | रु.२०,१९,८३८=०० |
| २) | सन १९९७-९८ | रु.२५,२१,९०३=०० |
| ३) | सन १९९८-९९ | रु.४२,०१,७५६=०० |
| ४) | सन १९९९-२००० | रु.२९,१५,९७४=०० |

सदरच्या खरेदीच्या रकमा या निविदेद्वारे मागविण्यात आलेल्या दरानुसार आहेत.या व्यतिरिक्त तातडीच्या प्रसंगी काही किरकोळ प्रमाणात खरेदी केलेली आहे.

**ब)** निविदाद्वारे केलेल्या खरेदीबाबत आक्षेप :

औषधी खरेदी बाबत शासनाने वेळोवेळी काढलेले आदेश,सुचना इत्यादीचे पालन करणे आवश्यक होते.विशेषत: शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग दि. ३१-८-१९९० व तद्नंतर वेळोवेळी काढण्यात आलेले आदेश यांचा विचार करता शासन दरकरार,हाफकिन इन्स्टिटयुट,मुंबई व अन्य प्रमाणित कंपन्या यांचेकडून खरेदी करणे सहज शक्य होते परंतु त्याबाबत काहीही दखल घेण्यात आल्याचे दिसून आले नाही.निविदा मागवून करण्यात आलेल्या खरेदीच्या पध्दतीमध्ये अनेक त्रुटी आहेत.त्यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे.सदरच्या त्रुटी खालील प्रमाणे आहेत.

१) औषधी /वैद्यकीय साहित्य खरेदी इ.चे वेगवेगळे गट तयार करुन त्या त्या उत्पादकांकडून अथवा पुरवठा दारांकडून दर प्राप्त करणे आवश्यक होते.परंतु सर्व मिळून साधारणत: ६३५ बाबींची एकच निविदा प्रसारीत केल्यामुळे व त्यासाठी भरवी लागणारी अनामत रक्कम मोठी असल्यामुळे पुरेशा निविदा प्राप्त झालेल्या नाही.

२) संख्या करार अथवा दरकरार या पध्दतीने खरेदी करण्याची मुभा आहे.मात्र शक्यतोवर खरेदीची अंदाजीत रक्कम ठरवून वर्षभरासाठी लागणाऱ्या औषधी इ.ची संख्या कराराद्वारे खरेदी केली गेल्यास निविदाधारकास पुरवठा करावयाच्या मालाची आगाऊ कल्पना असल्यामुळे किफायतशीर दर प्राप्त होऊ शकतात.मात्र अशी पध्दती न अवलंबिता फक्त दर प्राप्त करावा लागेल तशी खरेदी केलेली आहे.

३) खरेदीचे संपुर्ण आर्थिक वर्षाचे आगाऊ नियोजन करुन निविदा मान्य होण्याचा संभाव्य कालावधी विचारात घेता आर्थिक वर्ष सुरु होण्यापुर्वी निविदा अंतीम करणे आवश्यक होते.परंतु गेल्या ५/६ वर्षात असे नियोजन न केल्यामुळे एक एप्रिल पासुन पुढच्या वर्षाची

निविदा कधी कधी ऑक्टोंबर / नोव्हेंबर पर्यंत अंतीम होऊन तो पर्यंत मागील निविदा दरानेच खरेदी करण्यात आली ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे.

४) संपुर्ण वर्षभरात निविदेद्वारा खरेदी केलेल्या औषधांची किंमत विचारात घेता नियमानुसार सदरच्या निविदा सुचना राज्य स्तरावरील एक प्रादेशिक स्तरावरील एक व जिल्हा स्तरावरील एक अशा सर्वाधिक खपाच्या दैनिक वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करणे बंधनकारक असतांना एक / दोन अपवाद वगळता निविदा सुचना या स्थानिक पातळीवरील कमी खपाच्या वर्तमानपत्रात (जसे दै.मराठवाडा /लोकवार्ता, विश्वमित्र,आलमगीर टाईम्स,शासन सम्राट इ.) प्रसिध्दीस आल्या.त्यामुळे स्पर्धात्मक दराच्या निविदा प्राप्त होऊ शकल्या नाहीत.तसेच प्रत्येक वेळी ३/४ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

ही बाब आर्थिकदृष्टया महानगरपालिकेचे नुकसान करणारी असल्याने याबाबत तीव्र आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

५) प्राप्त निविदापैकी फक्त एकाच निविदा धारकाने (मे.केंकरे ब्रदर्स,मुंबई) जास्तीत जास्त बाबीचे दर नमुद केलेले आहेत.उर्वरीत निविदा धारकाची अत्यल्प बाबीचे दर नमुद केलेले आहेत.तसेच शासन नियमानुसार दोन लिफाफा पध्दती अवलंब करण्याचे आदेश असतांना फक्त एकच लिफाफा पध्दतीचा अवलंब केल्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर न करणाऱ्या निविदाधारकांचा सुध्दा विचार करण्यात आलेला आहे.प्राप्त झालेल्या निविदा या केवळ मे.केंकरे ब्रदर्स,मुंबई यांची एकच निविदा ही सर्व बाबींसाठी असल्यामुळे व इतरांनी अल्प बाबींचे दर भरल्यामुळे स्पर्धात्मक दरांचा कोणताही फायदा झालेला नाही.त्यामुळे फेर निविदा मागविणे आवश्यक होते.

६) एकाच निविदेद्वारे प्राप्त झालेले दर हे इतर उपलब्ध माहिती दरपत्रके दरकरार इ.च्या आधारे तांत्रिकदृष्टया तपासून ते दर योग्य आहेत किंवा कसे?याची पुर्णपणे शहानिशा करण्याची जबाबदारी-विभागप्रमुख म्हणून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची होती,परंतु तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता एकाच निविदेद्वारे प्राप्त झालेल्या पुरवठा धारकांशी वाटाघाटीचे वेळी सरसकट १०% दर कमी करुन निविदा मंजुर केलेल्या आहेत.मात्र त्याचवेळी प्राप्त दर हे सर्व समावेशक असतांना २% पॅकिंग चार्जेस म्हणून अदा केलेले आहे.त्यामुळे महापालिकेस बऱ्याच प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

७) खरेदीचे व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे सन २०००-२००१ यावर्षी आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी केल्यामुळे महापालिकेचा निधी एकाच प्रकारच्या औषधीमध्ये अडकुन पडल्याची बाब निदर्शनास आली ती खालील प्रमाणे.

मे.तिविम फार्मास्युटीकल्स,म्हापसा,गोवा यांचेकडून दि. १५-२-२००१ व दि. ३१-३-२००१ रोजी "तिविफ्लॅम" या गोळयांची प्रत्येकी २.५० लाख याप्रमाणे एकूण ५.०० लाख गोळयांची खरेदी करण्यात आली.या गोळयांचा वार्षिक खप हा जास्तीत जास्त वापर झाला असे गृहीत धरुन सुध्दा २.२५ लाख इतकाच आहे.असे असतांना सुध्दा ५.०० लाख गोळया खरेदी करणे व त्यासाठी एकाच बाबींवर एकूण रु. ६.१५ लाख इतकी रक्कम एकाच वेळी खर्च करणे ही बाब तीव्र आक्षपार्ह असुन यात महानगरपालिकेचा निधी विनाकारण अडकुन पडला आहे.

८) पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरणासाठी "क्लोरीन" गोळयांची खरेदी करण्यात आली आहे.त्यासाठी शासनाचा दर करार होवून दर हजारी रु. ४५.०० अशा दराने सदर गोळया उपलब्ध आहेत.या गोळया सर्वसाधारण नियमित वापरातील व क्लोरीनचे प्रमाणे ३३%,३४% इतके असणाऱ्या घेणे अपेक्षित आहे.त्यात कोणत्याही प्रकारचे विशेष गुणधर्म (Specil Specifications) नसल्यामुळे दर करारावरील गोळया खरेदी करावयास पाहिजे होत्या.परंतु तसे न करता माहे ऑक्टोंबर-९८ मध्ये दै.मराठवाडा / लोकपत्र या दोन

वर्तमानपत्रातून व ऑक्टोंबर-२००० मध्ये दै.लोकमत टाईम्स/सामना/शासन सम्राट या वर्तमानपत्रातून निविदा प्रसिध्दीस देऊन दर प्राप्त करण्यात आले.त्याद्वारे नागपुर येथील तीन एजन्सीज कडून दर प्राप्त होऊन मे. प्रिमिअर असोशिएटस,नागपुर यांचे रु. ७२.५० प्रति हजार असे दर मंजुर करुन त्या आधारे वेळोवेळी खरेदी करण्यात आली.तसेच याच निविदा सुचनेत मे.तिविम फॉर्मासुटीकल्स,गोवा यांचेकडून प्राप्त एकाच निविदाद्वारे लक्षावधी रुपयांची खरेदी करण्यात आली.त्यात महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.याबाबतचा तपशील पुढील भागात नमुद करण्यात आलेला आहे.

क) सन २०००-२००१ व २००१-२००२ या कालाधीत करण्यात आलेल्या औषध खरेदीद्वारे झालेल्या जादा खर्चा बाबतचा तपशील :

अहवालामध्ये सुरवातीच्या (अ) भागात उपरोक्त दोन वर्षात केलेल्या औषध खरेदीमध्ये केलेल्या एकूण खर्चाचा तपशील दिलेला आहे. सदर खरेदीत किती जास्त खर्च आला असावा याबाबतचा अचुक तपशील मिळणे ही अत्यंत अवघड बाब आहे. कारण जी औषधी खरेदी करण्यात आली त्या वेगवेगळया कंपनीची दरपत्रके पुर्णपणे उपलब्ध होऊ शकली नाहीत,तसेच शासन दर करारानुसार तशाच प्रकारच्या औषधांचा मान्य दरांचा विचार केला असला तरी संपुर्णपणे त्यावर अवलंबुन राहता येत नाही. कारण आपण खरेदी केलेली औषधी व दर करारातील औषधांची नांवे / गुणधर्म ही काही प्रमाणात भिन्न असु शकतात,असे असले तर दरकरारातील शासनातर्फे घेण्यात येणारी औषधी ही बऱ्याच प्रमाणात मोठमोठया शासकीय रुग्णालये (दवाखाने,जिल्हा परिषद व नगरपरिषद दवाखाने इ. मध्ये वापरण्यात येतात. त्यामुळे ती औषधी खरेदी करण्यात काहीही वावगे ठरले नसते.त्यामुळे त्या दरातील फरक हे विचारात घेण्यात आलेले आहेत.तसेच यावर्षी निविदा पध्दतींचा योग्यप्रकारे अवलंब केल्यामुळे प्राप्त झालेले स्पर्धात्मक दर यांचाही तुलनात्मकदृष्टया विचार करण्यात आला. त्याआधारे किती जादा खर्च करण्यात आला याबाबत ढोबळमनाने माहिती तयार करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा तपशील सोबत दिलेल्या तक्ता "अ" मध्ये देण्यात आला आहे.

सदरील तक्त्यावरुन दोन वर्षात जादा खर्चामुळे झालेले आर्थिक नुकसान खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.केंकरे ब्रदर्स,मुंबई | रु. ०३,२४,८०३=०० |
| २) | मे.प्रिमिअर असोशिएटस | रु. ०२,०३,४२०=०० |
| | | रु. ०५,२८,२२३=०० |

३) मे.तिविम फॉर्मास्युटीकल्स,म्हापसा,गोवा यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या औषधी गोळयासाठी रु. ०९,८५,४००=०० इतका खर्च करण्यात आलेला आहे.सदर खरेदी ही विशिष्ट गुणधर्माच्या गोळयांचे Tradoname देऊन व एकच निविदा अंतर्गत वाटाघाटी करुन खरेदी केलेली आहे. मंजुर केलेले दर हे कंपनीच्या अधिकतम किंमतीपेक्षा (एम.आर.पी.) कमी आहेत.मात्र त्याऐवजी तसेच गुणधर्म असणाऱ्या दर करारवरील अथवा अन्य कंपनीच्या औषधी गोळया खरेदी केल्या असल्या तर होणारा एकूण खर्च हा रु. ४,७७,९००=०० ने कमी होऊ शकला असता व पर्यायाने महापालिकेचा आर्थिक फायदा झ ाला असता. विशिष्ट ब्रॅन्डच्या औषधी गोळया खरेदी केल्या याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेशी समक्ष चर्चा केली असता खरेदी केलेल्या गोळया या चांगल्या दर्जाच्या असून त्यापासुन कोणतेही साईड इफेक्ट नाही असे सांगितले,त्यामुळे सदरची बाब ही वैद्यकीय दृष्टया तपासण्याची आवश्यकता आहे.

उपरोक्त खरेदी ही प्रामुख्याने औषधी / इंजेक्शन इ.बाबतीतील आहे. यामध्ये वैद्यकीय उपकरणे / साहित्य,फर्निचर खरेदी केलेली नाही.त्यामुळे यापुर्वी सन १९९८-९९ व १९९९-२००० यावर्षी खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त साहित्याच्या काही बिलांची चाचणी तपासणी (टेस्ट चेकींग) घेण्यात आली.त्यात प्रामुख्याने एक्स-रे फिल्म,ग्लास सिरीज हॉस्पीटल बेड साईड लॉकर्ड इ. ठळक साहित्याची प्रत्यक्ष पडताळणी व खरेदीचा बीले तपासण्यात आली.त्यातही आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.उदा.एक्स-रे फिल्मच्या रु. ९९,२३४/- च्या खरेदीत रु. ५९,२००/- ही रक्कम अदा केल्याचे दिसून आले.एकंदरीत गेल्या ५ वर्षाखालील या खरेदीने तपशलवार लेखापरिक्षण करावे लागणार आहे.त्यासाठी आणखी बराच अवधी लागण्याची शक्यता आहे.तसे आदेशित झाल्यास वेगळा अहवाल देण्यात येईल.अन्यथा नियमित लेखापरिक्षणाचे वेळी हे लेखापरिक्षण पुर्ण करण्यात येऊन वार्षिक लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट विभागाने करण्यात येईल.

उपरोक्त अहवालवरुन असे निदर्शनास येते की,आरोग्य विभागाने औषधी खरेदी /उपकरणे खरेदीत पुरेशी दक्षता न घेता केवळ दर्जेदार औषधी खरेदी करावयाचा भास निर्माण करुन सर्वसाधारण दर्जाचीच औषधी खरेदी केलेली असावीत असा कायास आहे व त्याद्वारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे.असे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी असे सुचित करण्यात येते.

स्वाक्षरीत/-
(म. न. सोनार)
मुख्य लेखा परिक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

प्रत
१) मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांना सादर.
२) नगरसचिव,महानगरपालिका,औरंगाबाद यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सस्नेह.

स्वाक्षरीत/-
(म. न. सोनार)
मुख्य लेखा परिक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**"तक्ता 'अ'"**

**:-वर्ष २०००-२००१=२००१-२००२ :-**

| अ.क्र. **अ) १)** | पुरवठाधारकाचे नांव | बिलाची रक्कम | जादा झालेला खर्च | पॅकींग खर्च २% सेंटल सेल्स टेक्स | एकूण जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंकरे ब्रदर्स,मुंबई | २,८९,१९४/- | ७६,२७२/- | ५,७००/- | ८१,९७२/- |
| २) | --//-- | ६,९३१/- | २,०९५/- | १३६/- | २,२३१/- |
| ३) | --//-- | १,८९,९६०/- | १२,८७९/- | ३,७४०/- | १६,६१९/- |
| ४) | --//-- | ३,३१,९९३/- | ३६,७०५/- | ६,५१०/- | ८३,२१५/- |
| ५) | --//-- | ७,६१,३४७/- | १,२५,८३८/- | १४,९३८/- | १,४०,७६६/- |
| | **एकुण** | **१५,७९,४२५/-** | **२,९३,७८९/-** | **३१,०१४/-** | **३,२४,८०३/-** |
| | | | | | |
| **अ) २) १)** | **मे.प्रिमियर असोशिएट्स,नागपुर.** | **७८,३००/-** | **२७,५००/-** | **५,८००/-** | **३३,३००/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | --//-- | ७८,३००/- | २७,५००/- | ५,८००/- | ३३,३००/- |
| ३) | --//-- | ७८,३००/- | २७,५००/- | ५,८००/- | ३३,३००/- |
| ४) | --//-- | ७८,३००/- | २७,५००/- | ५,८००/- | ३३,३००/- |
| ५) | --//-- | ८१,९२०/- | २७,५००/- | ५,८००/- | ३३,३००/- |
| ६) | --//-- | ७८,३००/- | २७,५००/- | ९,४२०/- | ३६,९२०/- |
| | **एकुण** | ४,७३,४२०/- | १,६५,०००/- | ३८,४२०/- | २,०३,४२०/- |
| | | | | | |
| ब) १) | मे.तिविम फॉर्मा,म्हापसा,गोवा | ४,९२,७००/- | २,२०,०००/- | १८,९५०/- | २,३८,९५०/- |
| २) | --//-- | ४,९२,७००/- | २,२०,०००/- | १८,९५०/- | २,३८,९५०/- |
| | **एकुण** | ९,८५,४००/- | ४,४०,०००/- | ३७,९००/- | ४,७७,९००/- |

प्रति,
मुख्यलेखापरिक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**मार्फत :- मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांचे मार्फत.**

**विषय :- औषधी / वैद्यकीय उपकरणे व इतर खरेदीबाबत (लेखा परिक्षण) व चौकशी अहवाल.**

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधी आपण पाठवलेले पत्रक क्रं.जा.क्र./मनपा/म.ले.प./६०/२००२ दि. २१-२-२००० व त्यासोबत चौकशी अथवा लेखापरिक्षण अहवालाची प्रत मला दि. २१-२-२००२ रोजी प्राप्त झाली.लेखा परिक्षण अहवालातील मुद्दाचा खुलासा करण्यापुर्वी काही बाबी मी आपल्यासमोर उपस्थित करत आहे.त्यावर कृपया विचार व्हावा.

१)उपरोक्त हिशोबाचे लेखा परिक्षण,मुख्य लेखापरिक्षण म.न.पा.,औरंगाबाद यांनी वेळोवेळी यापुर्वीच केलेले आहे व तसा अंतीम व पुर्ण अहवाल मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या १०६ कलमानुसार अहवाल स्थायी समितीस सादर केलेला आहे.त्यावर स्थायी समितीची चर्चाही झालेली आहे.तसेच संबंधीत व्यवहाराबाबतच्या मा.महालेखापाल महाराष्ट्र राज्य नागपुर यांनीही लेखा परिक्षण केलेले आहे.

सबब अशा परिस्थितीत पुन्हा लेखा परिक्षण मुख्य लेखा परिक्षण यांनीच करणे हे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या लेखा परिक्षण तरफदीशी विसंगत आहे असा माझा समज आहे.

२)तसेच मुख्य लेखा परिक्षकांनी जो अहवाल दिनांक २०-२-२००२ रोजी स्थायी समितीसमोर चौकशी अहवाल म्हणून सादर केलेला आहे.त्याबाबत मुख्य लेखा परिक्षकांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची चौकशी करण्याचे अधिकारी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कायद्यात नाहीत.सबब हा चौकशी अहवाल संपुर्णतः बेकायदेशीर असुन मला बंधनकारक नाही.

सदर अहवाल हा म.न.पा.च्या आरोग्य विभागाचा आहे.मनपाचा आरोग्य विभाग ही स्वतंत्र संस्था नाही, म्हणून सदर अहवालाची उत्तरे मा.आयुक्त महानगरपालिका यांचेकडून व मार्फत मागवणे संयुक्तीक ठरले असते.

सदर अहवाल अंतरीम स्वरुपाचा असल्याचे आपण कळविले आहे.तथापि कुठल्याही स्वरुपाचा लेखी परिक्षण अहवाल तयार करण्यापुर्वी मनपाच्या प्रशासनास त्यासंबंधी काय

म्हणणे आहे हे लेखा स्वरुपात प्राप्त करुन घेणे.लेखा परिक्षणाच्या विहीत पध्दतीनुसार आवश्यक होते.तसे करण्यात आलेले नाही.त्यामुळे म.न.पा. प्रशासनावर अन्याय झालेला आहे व त्यांचे म्हणणे ऐकूण न घेता प्रशासनाची बदनामी झालेली आहे हे मी नम्रतापुर्वक नमुद करत आहे.

अंतरीम अहवालात समाविष्ट करण्यापुर्वी संबंधित बाबी संबंधी लेखा परिक्षकांनी खुलासा अथवा हाफ मार्जिन मागवले असते तर अहवालात नमुद करण्यात आलेले बहुतांशी मुद्दे उपस्थित झाले नसते व प्रशासनाची झालेली बदनामी टाळता आली असती.

**<u>अहवालावरील खुलासा</u>**

१) प्रस्तावना-यावर अभिप्राय निरंक

२) अहवालाचा परिच्छेद क्र. अ-अभिप्राय नाही

३) निविदाद्वारे केलेल्या खरेदीबाबत आक्षेप.

औषधी खरेदीबाबत शासनाने वेळोवेळी काढलेले आदेश हे महाराष्ट्र शासनाचे रुग्णालय अथवा राज्य विमा रुग्णालय इत्यादीसाठीच बंधनकारक असुन मनपासाठी ते बंधनकारक नाही.शासनानी त्यांच्यासाठी ठरविलेली कार्यपध्दती मनपास अवलंबिणे सहज शक्य होते हे म्हणणे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या ७३ व प्रकरण-५ संविदा या कायद्यास धरुन नाही.मनपामध्ये करावयाची खरेदी ही अधिनियम ७३ प्रमाणे बंधनकारक आहे.या कायद्यातील तरतुदी या शासकीय आदेशाच्यापेक्षा महत्वाच्या असल्याने व त्यामध्ये कुठलाही कायदा बदलला न गेल्याने त्याचे पालन करणे मनपास कायदेशीररित्या बंधनकारक आहे व त्यानुसारच जाहीर निविदा काढुन कायदेशीररीत्या खरेदी करण्यात आलेली आहे.

**ब) १)** सदर उपपरिच्छेद हा औषधी व वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी वेगवेगळे गट करुन दर मागवणी आवश्यक होते असा अभिप्राय दिला आहे.वस्तुतः अशा प्रकारचे कुठलेही नियम मनपात अस्तित्वात नाहीत.अनामत रक्कम मोठी असल्याने पुरेशा निविदा प्राप्त झाल्या नाही हे म्हणण्यास कुठल्याही नियमाचा आधार नाही.

**उपरिच्छेद ब) २) यावरुन नोंद घेण्यात आली आहे.**

**उपरिच्छेद ब) ३)**

निविदा मागवण्याची कार्यवाही करण्यासाठी जरी एप्रिलमध्ये सुरु केली तरी मनपातील कार्य पध्दतीनुसार अंतीम करण्यासाठी बराच कालावधी लागतो.दरम्यानच्या काळात मनपातील दवाखान्यातील औषधी व साहित्य खरेदी सार्वजनिक आरोग्य व जिव रक्षणासाठीचे हित लक्षात घेऊनच पुर्वीच्या स्थायी समितीने मंजुर केलेल्या दराने व योग्य त्या अधिकाऱ्याच्या मंजुरीनंतर वेळप्रसंगी करण्यात आलेली आहे.यात अत्यंत आक्षेपार्ह असे काहीच नाही.

उपपरिच्छेद ब) ४)

निविदा संबंधी वृत्तपत्रात जाहीरात देणे संबंधी संविधा या शिर्षकाखाली मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार प्रकरण-५ नियम -२ (१) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिराम देणे हे बंधनकारक आहे.त्याचे पालन केले आहे.आक्षेपात नमुद करण्यात आलेली पध्दती अवलंबवयाची असल्यास मनपाच्या मंजुरीने संबंधीत नियमात तशी तरतुद करुन घ्यावी लागेल व नंतरच ती बंधनकारक राहील.

**उपरिच्छेद (ब)-५,६ :**

औषधी साहित्य खरेदीसाठी गठीत केलेली समितीत मा.आयुक्त मुख्यलेखा अधिकारी व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जाहीरात देऊन मागविलेल्या सर्व निविदाची सर्वांगीन विचार व मुंबई प्रांतिक अधिनियमाच्या तरतुदीचा सर्वांगिन विचार केला असून प्राप्त निविदेचे

पुरवठाधारकांना समक्ष बोलावून त्यांच्यबरोबर वाटाघाटी करुन मनपाचे हित व सार्वजनिक आरोग्य व जीव रक्षणाची गरज लक्षात घेऊनच जाहीर निविदाचे कमी प्राप्त दरामध्ये १०% दर कमी करुन मा.आयुक्तांचकडे मंजुरीसाठी सादर केले.हे दर मा.आयुक्तांनी मंजुर करुन निविदा अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर वेळोवेळी सादर करुन मंजुर करुन घेतले व संबंधित पुरवठाधारका बरोबर कायद्यातून करार करण्यास मंजुरी दिली.त्यानुसार जाहीर निविदातील कमी दर व त्यात पुन्हा १०% कमी करुन दर निश्चिती करण्यात आली आहे.तसेच खरेदीच्या वेळी मा.आयुक्तांच्या मंजुरीने दर व पुरवठाधारक यांची मंजुरी घेऊनच खरेदी करण्यात आलेली आहे.आपण दर्शविलेले २% पॅकींग चार्जसची अदाई ही संबंधित पुरवठाधारकाशी केलेल्या करारनाम्याप्रमाणेच आहे.त्यामुळे मनपास आर्थिक फटका बसला म्हणजे बरोबर नाही.

**उपरिच्छेद (ब)-७:**

Tivi Flam, या गोळयाचा वापर मनपातील दवाखान्यातून मोठया प्रमाणात करावा लागतो.त्यामुळे सदर गोळयाचा स्टॉक जिव रक्षणाकरीता म्हणून करण्यात आलेला आहे व त्याचा वापरही चालु आहे.त्यामुळे यावर केलेल्या खर्चामुळे मनपाचा निधी विनाकारण अडकुन पडला असे होत नाही.लोकांच्या सार्वजनिक आरोग्यासाठी व जिव रक्षणासाठी व भविष्यात येणाऱ्या गरजे करता करणे जरुरी आहे त्यामुळे स्टॉक ठेवणे जरुरी आहे.

**उपरिच्छेद (ब)-८:**

पिण्याचे पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी क्लोरीनच्या गोळयाच्या खरेदीबाबत घेतलेल्या आक्षेपाविषयी नमुद करण्यात येते की,शहरातुन गॅस्ट्रो,काविळ इत्यादी पाण्यापासून होणारे रोग त्यांचे प्रतिबंध करण्यासाठी घरोघर पाणी निर्जंतुक करण्यासाठी क्लोरीनच्या गोळया मे.प्रिमियम असोशिएटस नागपुर यांचेकडून कायद्यातील तरतुदीनुसार जाहीर निविदा मागवून करण्यात आलेली आहे.ही खरेदी जीव रक्षणासाठी अत्यंत गरजेची असल्याने करण्यात आली.शासनाचा दर करार मनपास त्यासंबंधी मनपाने नियम केलेले नसल्याने बंधनकारक नाही.तसेच त्या दराने संबंधीत कंपनीला जर मनपास पुरवठा करण्याचा असता तर त्याने जाहीर निविदामध्ये समाविष्ट व्हायला पाहिजे होते.तसे न करता निविदा मंजुर झाल्यानंतर त्या दराने का घेतले नाही म्हणजे योग्य नाही.या गोळया जीव रक्षणासाठी नसल्याने कमी दरासाठी पुरवठा धारकाची वाट बघत बसणे योग्य नाही.तसेच शासनाने मान्य केलेल्या दरातील एका गोळीतील क्लोरीनचे प्रमाण ३३ टक्के आहे.मनपा घेतलेले टक्के ४७ टक्के आहे व त्या गोळया आ.एस.आय.मार्कच्या असुन मनपाने घेतलेल्या एका गोळी ऐवजी शासनाच्या दरपत्रकातील चार गोळया वापराव्या लागल्या असल्या त्यामुळे आर्थिक दृष्टयाही मनपाची हित व गुणवत्ता लक्षात घेऊनच ती तातडीची गरज असल्याने खरेदी करण्यात आलेली आहे.

**उपरिच्छेद (क) :**

सन २०००-२००१ , २०००-२००२ जादा खर्चा बाबतचा तपशील सदर परिच्छेदाच्या सुरवातीस आपण नमुद केले आहे की,किती जास्त खर्च झाला याबाबत अचुक तपशील मिळतो ही अवघड बाब आहे म्हटले आहे.सबब प्रथम दर्शनीच या परिच्छेदात दाखविलेली रु. ५,२८,२२३ रुपयाचे आर्थिक नुकसान हे काल्पनिक असल्याचे सिध्द होते.केवळ शासकीय दवाखाने व रुग्णालये यात वापरण्यात आलेली औषधी मनपातही वापरावयास पाहिजे होती.या म्हणण्यात काहीही तांत्रिक आधार नाही.तसेच ५,२८,२२३ ही रक्कम कशी ठरविण्यात आली या विषयीही औषधी प्रमाणे व तुलनात्मक घेतलेले दर जे की निविदामध्ये तुलनात्मक तक्त्यात नाहीत.त्याचा तपशील लेखा परिक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेला

नाही.आर्थिक नुकसान ठरवतेवेळी गृहीत धरण्यात आलेल्या किंमती मनपास कायदेशीर बंधकारक होत्या किंवा कसे त्याबाबत असल्यास त्याबाबतचा तपशील देण्यात आलेला नाही.सबब दाखवण्यात आलेले आर्थिक नुकसान हे लेखा परिक्षणास आवश्यक असलेल्या बाबींचा विचार न घेता अंदाजाने काढले आहे.सबब ते म.न.पा.स मान्य नाही.

मे. टी.व्ही.एम.फॉर्मास्युटीकल, गोवा यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या गोळया तांत्रिक दृष्टया उच्च प्रतिच्या असलेल्या संबंधित कागदपत्रावरुन व त्या गोळयाचा मनपाच्या रुग्णावर झालेल्या परिणामकारक उपायावरुन बघुन दिसुन येईल.त्या गोळया ठराविक ब्रॅन्ड नेमच्या व कॉबीनेशनच्या असल्याने व रुग्णास त्यापासुन कमी गोळयामध्ये जलद फायदा झालेला असल्यामुळे,असल्याचे वेळोवेळी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना आढळुन आलेले आहे.त्यामुळे त्यापेक्षा कमी प्रतीच्या व दुसऱ्या कॉबीनेशनचे गोळया घेतल्या असल्या तर खर्च कमी झाला असता हे म्हणणे वैद्यकीय दृष्टीने चुकीचे आहे.म.न.पा.ने जाहीर निवेदन जाहीर निवेदन काढतानांच स्पष्ट केले होते की,कुठल्याही औषधी व साहित्याचे ब्रॅन्डमध्ये Replacement अथवा Sutristitite घेण्यात येणार नाही.सदर खरेदी ही मुळ कंपनी जी गोळया करते त्यांनीच दरपत्रके भरल्यामुळे त्यांच्याप्रमाणे क्वालिटी व कमी दर इतर देऊ शकणार नाहीत म्हणून त्या गोळया कायद्यातील तरतुदीनुसार जाहीर निविदा काढुनच खरेदी करण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेने म.न.पा.च्या हद्दीतील जीव रक्षणसाठी व सार्वजनिक आरोग्यासाठी मनपाने नेहमी उच्च प्रतिची औषधे पुरवलेली आहेत.याबाबतचा दाखल रुग्ण व वैद्यकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेला आहे.सदर प्रकरणी ४,७७,९०० च्या जादा खर्च (लेखा परिक्षकाच्या दृष्टीने) हा चुकीच्या माहितीच्या आधारवर काढलेला आहे.याबाबत मनपाचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

एक्स-रे फिम्लबाबत दाखविण्यात आलेला ५९,०००/- चा खर्च हा कशाच्या आधारावर केलेला आहे.या उल्लेख नाही. केलेली खरेदी कायद्याच्या नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्थायी समितीच्या मंजुरीनुसार केलेल्या दरानुसार केलेला आहे.हा ही जादा खर्च झाला म्हणजे म.न.पा.स मान्य नाही.या अहवालाच्या शेवटच्या परिच्छेदात आरोग्य विभागाने औषधी व साहित्य खरेदीसाठी पुर्ण दक्षता व कायद्यातील तरतुदीनुसार व नियमातील सर्व मान्यता देणाऱ्या मान्यता घेवूनच खरेदी करण्यात आलेली आहे.मुख्यलेखा परिक्षकांनी "केवळ कायस" नोंद केलेली आहे.अशा प्रकारच्या केवळ कयास व आधारीत काढण्यात आलेल्या अभिप्राय देणे अयोग्य आहे.

स्वाक्षरीत /-
आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद.

जाक्र./मनपा/मुलेप/८७/२००२
कार्यालय,महानगरपालिका,औरंगाबाद.
दिनांक : ८-३-२००२.

गोपनीय
प्रति,आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**विषय :- सन २०००/०१ व २००१/२ च्या कालावधीतील औषधी खरेदी अहवालाबाबत.**
**संदर्भ :- १) या विभागाकडील पत्र क्र./मनपा/मुलेप/६०/२००२ दिनांक २१-०२-०२.**
**२) आपले जाक्र./मनपा/०२/आ.वै.दि./४४९/दि.२८-२-०२.**

उपरोक्त संदर्भ क्र. १) अन्वये विभागामार्फत करण्यात आलेल्या औषधी उपकरणे व इतर खरेदी बाबत सन २०००/०१ व सन २००१/२००२ या कालावधीचा अंतरीम लेखा परीक्षण अहवालाची प्रत आपणास पाठविण्यात येवून त्याबाबतचा खुलासा दिनांक २८-२-२००२ पर्यंत पाठविण्याबाबत सुचित केले होते.त्यानंतर आपण उपरोक्त संदर्भ क्र. २) च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा दिनांक ५-३-२००२ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला.

सदर खुलासा पत्राच्या छाननीअंती प्रत्येक मुद्दयाबाबत या कार्यालयाचे अभिप्राय व लेखा परिक्षणातील मुद्दे कायम करण्याबाबत खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक (१) :**

आपणास पाठविण्यात आलेल्या अंतरीम लेखा परिक्षण अहवाल हा आर्थिक वर्ष सन २०००/०१ व २००१/०२ या कालावधीचा आहे.सदर कालावधीचे लेखा परिक्षण यापुर्वी केलेले नाही. त्यामुळे वार्षिक लेखा परिक्षण अहवालात याबाबतचा समावेश झालेला नाही.तसेच स्थायी समितीकडे सादर केलेल्या अहवालापैकी फक्त सन १९९८-९९ पर्यंतच्या अहवालावर चर्चा झालेली आहे.या कार्यालयाच्या वार्षिक लेखा परिक्षण कार्यक्रमानुसार आपल्या विभागाच्या सन २०००/०१ या कालावधीचे लेखा परिक्षण जानेवारी २००२ मध्ये करावयाचे होते.परंतु अन्य काही विभागाचे विशेष लेखा परिक्षणाचे कामकाज सुरु असल्यामुळे सदरचे लेखा परिक्षण फेब्रुवारी २००२ या महिन्यात करावयाचे होते.तसेच स्थायी समितीने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या कलम ४७ (१) (अ) अन्वये दिलेल्या निर्देशान्वये सन २००१/०२ चे लेखा परिक्षण हाती घेण्यात आले. त्यामुळे याबाबत आपण उपस्थित केलेला मुद्दा हा गैरलागु ठरतो.महालेखापाल नागपुर यांनी केलेले लेखा परिक्षण हे स्वतंत्र आहे,असे असले तरी त्यांनी केलेले लेखा परिक्षण हे चाचणी स्वरुपाचे व सन १९९७-९८ पर्यंतच केलेले आहे.

**मुद्दा क्रमांक (२) :**

- स्थायी समितीसमोर जो अहवाल सादर केलेला आहे,तो फक्त लेखा परिक्षण अहवाल आहे,तो चौकशी अहवाल आहे असे कोठेही नमुद केलेले नाही. ही बाब पुर्णपणे अवलोकन न करताच आपण केलेले विधान चुकीचे आहे.आपणासारख्या संविधानिक पदावरील जेष्ठ अधिकाऱ्याकडून असे अपेक्षित नाही.

महानगरपालिका स्थापन झाल्यापासून करण्यात आलेले लेखापरिक्षण हे प्रत्येक विभगाचे स्वतंत्रपणे केलेले आहे व त्या त्या विभागाचा अहवाल तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवालाची उत्तरे यापुर्वी कधीही मा.आयुक्त यांचेकडून मागविलेली नाहीत.त्यामुळे आपला मुद्दा गैरलागु ठरतो.लेखा परिक्षणाबाबतचे कोणतेही नियम अद्याप

महापालिकेने तयार केलेले नाहीत.त्यामुळे लेखा परिक्षण कोणत्या पध्दतीने करावयाचे,त्याची व्याप्ती इ.बाबतचे संपुर्ण अधिकार हे मुख्य लेखा परिक्षकांना आहेत.स्थायी समितीने लेखा परिक्षण करण्यासाठी दिलेला अवधी लक्षात घेता आपणास अर्ध समासपत्र दिलेली नाहीत.मात्र अहवालातील प्रत्येक मुद्दयांवर आपणाशी समक्ष चर्चा करुनच अंतरीम अहवाल तयार केलेला आहे.तसेच सदरच्या अहवालामुळे प्रशासनाची बदनामी झाली,या मुद्दयाशी सहमत नाही.

**अहवालातील खुलासा :**

**३) निविदाद्वारे केलेल्या खरेदी बाबत आक्षेप व ब - (१)**

प्रस्तुत प्रकरणी आपण नमुद केलेले अधिनियमांचे कलम ७३ व प्रकरण - ५ संविदा या तरतुदी आपण आवर्जुन उल्लेख केलेला आहे.त्याचबरोबर आपण कृपया कलम ७४ व कलम ४५७ (४) मधील तरतुदी पहाव्यात.त्यानुसार मनपाने अद्याप असे नियम तयार केलेले नाहीत.त्यामुळे महानगरपालिका स्थापनेपासुन आजपर्यंत सर्व विभागात यासाठी शासकीय आदेश,नियम,पध्दती इ.चा वापर करण्यात येत आहे.त्यासाठी आपल्या विभागाचा अपवाद करता येणार नाही.

अहवालात नमुद करण्यात आलेला दिनांक ३१-८-१९९० च्या शासन निर्णय हा महानगरपालिकांनाही पृष्ठांकित करण्यात आलेला आहे.

**उपरिच्छेद ब -(३) :**

याबाबत आपण अधिनियमातील कलम ७२ (ब) कृपया पहावे.त्यामुळे आपला खुलासा मान्य नाही.

**उपरिच्छेद ब - (४) :**

खुलासा मान्य नाही.जोपर्यंत नियम तयार केलेले नाहीत.तोचर्यंत शासकीय आदेश,नियम इ.चा अवलंब केला जात आहे व ते अपरिहार्य आहे.

**उपरिच्छेद (ब) ५ व ६ :**

जाहीर निविदा अंतर्गत प्राप्त निविदांची छाननी,त्यातील प्राप्त दर वस्तुंचा दर्जा इ. बाबत विभाग प्रमुख म्हणून आपली संपुर्ण जबाबदारी आहे.त्यामध्ये आपण संपुर्णतः दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते.प्राप्त दरामध्येच खरेदी करावयाचे आपण प्रस्तावित केलले होते.लेखा विभागाचे वाटाघाटी करण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे.प्राप्त दर हे बाजार भावापेक्षा खुपच जास्त असल्याने त्यात १०% कमी करुनही अवाजवी दर आहेत.२% पॅकींग चार्जेस वेगळे दिले जातील असा आपल्या निविदा सुचनेत कोठेही उल्लेख नाही.पुरवठा दाराने नमुद केलेल्या अटी-शर्ती आपण सरसकट मान्य केलेल्या आहेत व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.त्यामुळे आपला खुलासा मान्य नाही.

**उपरिच्छेद (ब) ७ :**

खुलासा मान्य नाही.एकदम २ वर्षे पुरेल इतका गरज असलेला गोळयांचा पुरवठा घेतल्यामुळे महानगरपालिकेचा निधी अडकुन पडला हा मुद्दा कायम करण्यात येत आहे.

**उपरिच्छेद (ब) ८:**

खुलासा मान्य नाही.आपण खरेदी केलेल्या गोळया हया सुरवातीला ०.५ एमजी अशा दर्शविल्या आहेत.दोघांचा दर एकच मंजुर केलेला आहे.तसेच आपण नमुद केले आहे की,घेतलेल्या गोळयांत क्लोरीनचे प्रमाण ४७% व शासनाच्या दर करारातील गोळयाचे क्लोरीनचे प्रमाण ३३% आहे.आपण चाचणीसाठी पाठविलेल्या अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. त्यात क्लोरीनचे प्रमाण ३३% असल्याचा अहवाल आहे.त्यामुळे आपला खुलासा हा खोटा व बेजबाबदारपणाचा आहे.मुद्दा कायम करण्यात येत आहे.एवढेच नव्हे तर

आतापर्यंत खरेदी केलेल्या सर्व क्लोरीन गोळयांबाबतच्या जादा खर्चाची परीगणना करुन अधिनियमांचे कलम,१०६,(१) (अ) अन्वये स्थायी समितीस कळवुन आपल्याकडून वसुली करण्याबाबत व योग्य ती कारवाई करण्याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करण्यात येत आहे.

**उपरिच्छेद (क) :**

यामध्ये सन २०००-२००१ व २००१-२००२ यावर्षी खरेदी करण्यात आलेल्या औषधी, उपकरणे साहित्य यामध्ये करण्यात आलेल्या खरेदीत रु. ५,२८,२२३/- रूपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे.हा प्राथमिक स्वरुपाचा अहवाल आहे तो अंतीम आहे असे कोठेही नमुद केलेले नाही.तसेच याबाबतची तांत्रिक बाजु ही वैद्यकीयदृष्टया तपासण्याची गरज आहे असेही नमुद केलेले आहे,त्यामुळे याबाबत स्थायी समितीच्या निर्देशानुसार प्रशासनातर्फे ही बाब तपासली गेल्यास त्या निष्कर्षाच्या आधारेच सदरचा मुद्दा अंतीम करण्यात येईल.तीच बाब मे.तिविम फॉर्मास्युटीकल,गोवा यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या गोळयामध्ये झालेला रु. ४,७७,९००/- च्या जादा खर्चाबाबतचा मुद्दा अंतीम करतांना लागु राहणार आहे.

एक्स-रे फिल्मबाबत दाखविण्यात आलेला जादा खर्च रु. ५९०००/- हा शासनाचे दर करारानुसार मान्य दरपत्रक व आपण खरेदी केलेला दर यातील तफावतीचा आहे.

आपण खरेदी केलेला दर हा जवळपास तिप्पट आहे. त्यामुळे हा मुद्दा कायम करण्यात येत आहे.आपण केलेल्या खुलाशा बाबत प्रत्येक मुदयांवर अभिप्राय नमुद केलेले आहेत.त्यानुसार अहवाल अंतीम फरक स्थायी समितीस दिलेल्या मुदतीत सादर करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणाचे एकुण गांभीर्य लक्षात घेता अधिनियमाचे कलम १०६ (१) (अ) नुसार आपल्या विभागामार्फत आजपर्यंत केलेल्या औषधी,उपकरणे,साहित्य इ. खरेदीचे संपूर्ण लेखा परिक्षण करण्यात येऊन अहवाल स्थायी समितीस स्वतंत्रपणे सादर करण्याची तजवीज करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

मुख्य लेखा परिक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

प्रत
मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

जा.क्र./मनपा/ मु.ले.खा./९६/ २००२
महानगरपालिका,औरंगाबाद.
दिनांक : १३-३-२००२.

"गोपनीय"
प्रति
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

**विषय :- सन २०००-२००१ व २००१-२००२ या कालावधीतील औषधी खरेदी लेखापरिक्षणाचा अंतीम अहवाल सादर करणेबाबत.**

**संदर्भ :-या कार्यालयाचे गोपनीय पत्र क्र./मनपा/मु ले प/५१/२००२ दि. ११-२-२००२**

उपरोक्त संदर्भाच्या पत्रान्वये यापुर्वी सदरचा लेखापरिक्षण अहवाल स्थायी समितीस सादर करण्यात आला होता.तद्नंतर सदर विषयाबाबत दि. २०-२-२००२ रोजी स्थायी समितीस चर्चा होवून सदर प्रकरणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना लेखापरिक्षण अहवालाची प्रत देवून त्यांना जो काही खुलासा सादर करावयाचा असेल त्यावर विचार करुन अंतीम लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीस सादर करण्यासाठी पाठविण्यात येत आहे.

**-:"अहवाल":-**

१) यापुर्वी सादर केलेल्या अहवालातील पान क्र. १ ते ५ वरील (अ) (ब) (१ ते ८) हे सर्व मुद्दे कायम करण्यात येत आहेत.
२) पान क्र. ५ ते ७ वरील मुद्दा क्र. (क) मध्ये जादा दर्शविण्यात आलेला खर्च रु. ५,२८,२२३/- याबाबत तांत्रिकदृष्टया व वैद्यकीय दृष्टया तज्ञ अधिकाऱ्यांकडून तपासण्यात यावेत व त्यानुसार जादा खर्चाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येते.
३) तसेच मुद्दा क्र.क (३) मधील तिविम फॉर्मास्युटीकल्स म्हापसा,गोवा यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या गोळयाऐवजी तशाच गुणधर्माच्या दर करारावरील अथवा अन्य कंपनीच्या औषधी गोळया खरेदी केल्या असत्या तर होणारा एकूण खर्च हा ४,७७,९००/- इतका कमी होऊ शकला असता या मुदयाबाबत औषधी क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर अथवा अन्य शासकीय अधिकारी यांचेकडून तपासून घेण्यात येऊनच जबाबदारी अंतीम करण्यात यावी असे सुचित करण्यात येते.

स्वाक्षरीत/-
(म. ना. सोनार)
मुख्य लेखा परिक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**<u>प्रत सविनय सादर :</u>**

१)मा.सभापती,स्थायी समिती,महानगरपालिका,औरंगाबाद.
२) मा.आयुकत,महानगरपालिका,औरंगाबाद.
प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :
आरोग्य वैद्यकीय अधिकारी,महानगरपालिका,औरंगाबाद.

तो स्थगिती आदेश रद्द झालेला असून विधी सल्लागार यांनी प्रशासकीय अधिकारी यांना तसे अतिक्रमण काढण्याबाबत कळविलेले आहे.तरी सुध्दा अद्याप ते अतिक्रमण काढलेले नाही,त्यामुळे मा.आयुक्त यांना सुचना देण्यात येत आहे की,उद्याच ते अतिक्रमण काढावे नसता संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.ज्या व्यक्तिने त्यांचे नावाने बोगस पी.आर.कार्ड तयर केले होत,त्यांचेवर महानगरपालिकेने ४२० चा गुन्हा दाखल करावा व त्याची प्रत संबंधित नगरसेवकांना त्वरीत द्यावी.तसेच हर्सुल तलावातील अनधिकृतपणे टरबुजाची लागवड केलेल्या जागेचा मालमत्ता अधिकारी यांनी पंचनामा करावा.संबंधीत व्यक्तीच्या नावाने पोलीस केस दाखल करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा ताब्यात घ्यावी.

या बरोबरच "जन गण मन" राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २७-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक २७-३-२००२ रोजी मा.सभापती श्री. प्रशांत देसरडा यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.३० वाजता स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अशरफ युनुस मोतीवाला
२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
३) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
४) श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) श्री. लकडे भरत श्रीमती
७) श्री. सलीम पटेल समशेर पटेल
८) श्री. सावंत मधुकर दामोधर
९) श्री. मीर हिदायतअली मीर बसालत अली
१०) श्री. शे.इलियास किरमाणी शे.उमर
११) श्री. औताडे रावसाहेब ममतू
१२) श्री. ओक जयवंत केशवराव
१३) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
१४) डॉ. श्रीमती आशा उत्तम बिनवडे

**विषय क्र.: ८३/१**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्रीय सिमा शुल्क विभगामार्फत कर बुडविणाऱ्या कंपनी / संस्था यांचेवर धाडी टाकण्यात आल्यानंतर संबंधितांकडून दंडापोटी वसुल केल्या जाणाऱ्या रकमेपोटी १०% रक्कम ही संबंधित कार्यवाही करणाऱ्यांना बक्षीसाचे स्वरुपात देण्याची पध्दत आहे.तसेच इतर महानगरपालिकेमध्येही दंडात्मक वसुल केलेल्या रकमेच्या १०% रक्कम कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येते.

याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात विभागातील भरारी पथकामार्फत शहर हद्दीत पकडून त्यांचेकडून जकात व त्यावर दहापट दंड म्हणून वसुल करण्यात येते.दंडापोटी वसुल करण्यात आलेल्या एकूण रकमेच्या ५% रक्कम ही कार्यवाही करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व माहिती देणाऱ्या व्यक्तिस मात्र बक्षीस स्वरुपात देण्यात यावी.जेणेकरुन कर्मचाऱ्यांमध्ये काम करण्याचा उत्साह वाढीस लागेल व पर्यायाने महानगरपालिकेचे जकात उत्पन्नात देखील चांगली वाढ होण्याची शक्यता आहे.

करीता महानगरपालिका जकात कर्मचाऱ्यांनी विना जकात माल शहर हद्दीत आणणाऱ्या आयातकांना पकडून त्यांचे कडून जेवढी रक्कम दंडापोटी वसुल करण्यात येईल त्याचे ५% रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना बक्षीस स्वरुपात देण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.मीर हिदायतअली :** केंद्रीय सिमा शुल्क कर्मचाऱ्यांना १०% रक्कम दिली जाते.त्याप्रमाणे मनपाच्याही कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. जकातीचे उत्पन्न वाढेल.

**श्री.सलीम पटेल :** हेतुपुरस्सर गाडी नाक्यावरुन सोडणे व नंतर पकडून दंड वसुल करुन बक्षिस म्हणून रक्कम देणे बरोबर होणार नाही. मुद्दामहून गाडया सोडण्यात येऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

**श्री.सलीम पटेल :** हेतुपुरस्सर गाडी नाक्यावरुन सोडणे व नंतर गाडी पकडून दंड वसुल करुन बक्षीस म्हणून रक्कम देणे बरोबर होणार नाही. मुद्दामहून गाडया सोडण्यात येऊ नये. याची दक्षता घेण्यात यावी.

**मा.सभापती :** मुद्दामहून गाडी सोडून दंड वसुल करुन बक्षीस वजा रक्कम देऊ नये.मुद्दाम होवून गाडी सोडणे असे प्रकार होऊ नये यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात विभागातील कर्मचाऱ्यांनी विना जकात शहर हद्दीत माल आणणाऱ्या आयातकांना पकडून त्यांचे कडून जेवढी रक्कम दंडापोटी वसुल करण्यात येईल त्याचे ५% रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना व माहिती देणाऱ्या व्यक्तिस बक्षीस स्वरुपात देण्यात सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८४/२ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,महानगरपालिकेच्या मुख्यालय व टाऊन हॉल परिसर या दोन ठिकाणी उपहार गृहे भाडे तत्वावर देण्यासाठी दै.लोकमत समाचार,दै.विश्वमित्र,दै.लोकविजय या वर्तमानपत्रात क्र. मनपा/मा म अ/१४२०/ २००१/दि. ३१-१२-२००१ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दिनांक ०८-१-२००२ पर्यंत १४ (चौदा) निविदा विकल्या गेले व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. १०-१-२००२ पर्यंत (१२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.प्राप्त निविदामध्ये मुख्यालय परिसर करीता (७) सात व टाऊन हॉल परिसर करीता (५) पाच अशा निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

**मुख्यालय परिसरा करीता**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सुनिल शेट्टी | ३७५० प्रतिमहा |
| २) | श्री.शेख अख्तर शे.जब्बार | ३३०० प्रतिमहा |
| ३) | श्री.हरीश एन.शेट्टी | ३००० प्रतिमहा |
| ४) | श्री.सलीमोद्दीन शे.कमालोद्दीन | २७०० प्रतिमहा |
| ५) | श्री.सय्यद जमीर स.बशीर | २६५७ प्रतिमहा |
| ६) | श्री.कल्याणी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था | २००० प्रतिमहा |
| ७) | श्री.तहसीन जफर नवाब | १२०० प्रतिमहा |

**टाऊन हॉल परिसर करीता**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सय्यद जमीर सय्यद बशीर | ३२५० प्रतिमहा |
| २) | श्री.शे.सलीमोद्दीन शे.कमालोद्दीन | ३००० प्रतिमहा |
| ३) | श्री.सुधीर शेट्टी | १६०० प्रतिमहा |
| ४) | श्री.कल्याणी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था | १६०० प्रतिमहा |
| ५) | श्री.तहसीन जफर नवाब | १५०० प्रतिमहा |

याप्रमाणे प्राप्त निविदामध्ये मुख्यालय परिसरामध्ये उपहारगृह चालविणेसाठी श्री.सुनिल शेट्टी यांचे दर तुलनात्मकदृष्टया यांचे रु. ३७५०/- प्रतिमहाचे जे की सर्वात जास्त आहे.

टाऊन हॉल परिसरात उपहार गृह चालविणेसाठी श्री.सय्यद जमीर बशीर यांचे दर तुलनात्मकदृष्टया रु. ३२५०/- प्रतिमहा चे जे की,सर्वात जास्त आहेत.

करीता प्राप्त दरात सर्वात जास्त दराचे निविदा धारकाचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मुख्यालय परिसरामध्ये उपहारगृह चालविण्यासाठी श्री.सुनिल शेट्टी यांचे दर रु. ३७५० प्रतिमाह तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त असल्याने आणि टाऊन हॉल परिसरात उपहार गृह चालविण्यासाठी श्री.सय्यद जमीर सय्यद बशीर यांचे दर रु. ३२५० प्रतिमहा तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त असल्याने सदर निविदा धारकांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८५/३ :**

उपआयुक्त प्र.मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मनपा अंतर्गत सिध्दार्थ उदयान व प्राणी संग्रहालय कार्यान्वित आहे.प्रत्येक ठिकाणी नागरीकांना प्रवेश देतांना मनपाकडून प्रवेश शुल्क आकारण्यात येतो.नागरीकांना सिध्दार्थ उदयान पाहण्यासाठी व प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी दोन ठिकाणी रांगा लावाव्या लागतात,त्यामुळे नागरीक नाराज होतात.तरी प्रेक्षकांच्या सोयीसाठी फक्त सिध्दार्थ उदयान पहावयाचे आहे.त्यांना मुख्य प्रवेशद्वाराजवळ प्रचलित दरानुसार उदयानासाठी प्रवेश दयावा.परंतु ज्यांना उदयानावर प्राणी संग्रहालय पहावयाचे असल्यास अशा प्रेक्षकांना खर्चाच्या दराप्रमाणे (ब) प्रवेश शुल्क आकारण्यात यावे.जेणेकरुन मनपाचे उत्पन्न वाढण्यात मदत होईल.

| अ) | सिध्दार्थ उदयान | (प्रचलित दर) |
|---|---|---|
| १) | प्रौढांसाठी | २.०० |
| २) | मुलांसाठी | मोफत प्रवेश |

ब)

| ब) | प्राणी संग्रहालय | प्रचलित दर रुपये | प्रस्तावित दर रुपये |
|---|---|---|---|
| | | (फक्त प्राणी संग्रहालय) | (सिध्दार्थ उदयान प्रवेश प्राणी संग्रहालय ) |
| | प्रौढांसाठी | ५.०० | ६.०० |
| | मुलांसाठी | २.०० | २.०० |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :**संबंधित अधिकारी यांनी या प्रस्तावासंबंधी सभागृहात सविस्तर माहिती दयावी.

**संचालक प्राणी संग्रहालय :**प्रौढांसाठी फक्त उदयान बघण्यासाठी २.०० रु. मोफत प्रवेश होत असे व लहान मुलांसाठी मोफत प्रवेश होता.प्राणी संग्रहालय पाहण्यासाठी प्रौढांसाठी ५.०० रु. आकारणी होत असे व लहान मुलांसाठी २.०० रु. आहे.परंतु बऱ्याच वेळा येणारे पर्यटक व इतर लोक उदयान व प्राणी संग्रहालयासाठी स्वतंत्र म्हणजेच एकूण ७.०० रुपये आकारणी होत असे,परंतु जे उदयान व प्राणी संग्रहालय पाहू इच्छितात त्यांचेसाठी उदयान फीस व प्राणी संग्रहालयासाठी ६.०० रु. आकारणी करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.दोन्ही ठिकाण बघणाऱ्यांना १.०० रुपये सवलत देत आहोत त्यामुळे भेट देणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन मनपाचे उत्पन्न वाढेल.वर्षभरामध्ये १५ ऑगस्ट व २६ जानेवारी मोफत प्रवेश असतो.

**मा.सभापती :** १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे दोन दिवस सोडून प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर मंजुर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिध्दार्थ उद्यान संग्राहलयासह प्रौढांसाठी रु. ६/- व मुलांसाठी ( ३ ते १२ वर्षा वयाच्या) रु. २/- प्रस्तावित दरात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधनिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८६/४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रेयनगर,अनुपम सोसायटी,मंथन सोसायटी,उस्मानपुरा इत्यादी वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या सन २००१-२००२ वर्षाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल,तरी रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**डॉ.आशा बिनवडे :** सन २०२-२००३ च्या अर्थसंकल्पात स्लीप ओव्हरच्या कामामध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. या कामाचे अंदाज पत्रक तयार नसतांना स्पील ओव्हरमध्येच या कामाचा समावेश का करण्यात आला खुलासा दयावा.वार्डातील वर्दळ पाहता गजानन महाराज मंदिरापासूनच्या

रोडचे कित्येक दिवसापासून काम करण्याची मागणी मी पत्रद्वारे केलेली असतांना कार्यवाही केलेली नाही.जी कामे करणे गरजेचे आहे ती सोडून अंदाजपत्रक मंजुर नसतांना स्पील ओव्हरमध्ये कामाचा समावेश केला जातो.गंभीर स्वरुपाची बाब आहे. माझ्या वार्डातील काम सुध्दा अंडर प्रोसेस मध्ये होते ते का समावेश केला नाही.

**अतिरिक्त शहर अभियंता** : या कामासंबंधीची संचिका नोव्हेंबर मध्येच मंजुरीसाठी गेलेली होती बजेट हेड पडलेले होते. त्यामुळे सदर काम स्पील ओव्हरमध्ये घेतलेले आहे.संचिका कार्यवाहीस्तव होती.

**मा.सभापती :** रु. १४,१७ लक्षच्या पुर्नडांबरीकरणाचे अंदाजपत्रक आज मंजुरीसाठी सादर केले.ज्या कामाचा बजेट हेड पडले ते काम स्पील ओव्हरमध्ये काम घेऊ शकत नाही.त्या कामाचे टेंडर झाले तरी काम स्पील ओव्हरमध्ये घेऊ शकतो.

**डॉ.आशा बिनवडे :** टेंडर झालेले नसतांना प्रस्ताव बजेटमध्ये स्पील ओव्हरमध्ये घेतलेला आहे.त्याबद्दल खुलासा घ्यावा.यात अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे.हे स्पष्ट होते.सर्वसाधारण सभेसाठी जे बजेट पुस्तक दिले त्यातील पान क्र. १०६ वर या काम स्पील ओव्हरमध्ये दिले आहे. एक कामाच्या बाबतीत निदर्शनास आले.अशा किती कामाचा त्यात समावेश आहे.त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.या कामाचा एवढे महत्व का देण्यात आले.

**मा.सभापती :** संबंधित सर्व विभागप्रमुख यांना आजच ताकीद दयावी व असा प्रकार यापुढे होऊ नये याची दक्षत घेण्यात यावी.विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्रेयनगर,अनुपम सोसायटी,मंथन सोसायटी,उस्मानपुरा इत्यादी वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १४,१७,३००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८७/५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे विविध विकास कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात येतात.यामध्ये कंत्राटदाराकडून सरासरी २५ ते ३० टक्के यापेक्षा कमी दराने निविदा प्राप्त होतात.कंत्राटदाराने अत्यंत कमी दर दिल्याने कामाचा दर्जा निकृष्ट होण्याची शक्यता नकारता येत नाही. मनपामध्ये विकासाची बरीचशी कामे एकाचवेळी चालू असतात व त्यावर देखरेख ठेवण्याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने कामाचा योग्य तो दर्जा राखणे कठीण होत आहे.

सध्या अशा विकास कामाकरीता कंत्राटदाराकडून २%अनामत रक्कमा भरणा करुन घेतल्या जाते व सदरील रक्कम काम पुर्ण झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर कामाची स्थिती चांगली असेल तर त्यांना ती परत केल्या जाते.अनामत ठेवण्याचा कालावधी अत्यंत कमी असल्याने व रक्कमही कमी असल्याने कंत्राटदाराची जबाबदारी लवकर संपुष्टात येते.

तरी विकास कामे करतांना कंत्राटदाराची जबाबदारी वाढावी याकरीता संबंधित कंत्राटदाराकडून १०% अनामत रक्कम तीन वर्षाकरीता ठेवून घेतल्यास कंत्राटदाराची जबाबदारी वाढेल व निश्चितच कामाचा दर्जा दिलेल्या मापदंडाप्रमाणे (स्पेसीफिकेशन) प्रमाणे राहण्यात मदत होईल.

तरी यापुढे मनपातील विकास कामाकरीता कंत्राटदाराकडून १०% अनामत रक्कम तीन वर्षाच्या कालावधी करीता घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.मीर हिदायतअली, श्री.सलीम पटेल :** १०% अनामत रक्कम तीन वर्ष न ठेवता १ वर्ष ठेवावी.तीन वर्षाची मुदत जास्त होते.

**श्री.मधुकर सावंत :** सार्वजनिक बांधकाम खात्याचे नियम काय आहेत,त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे ३ वर्षाची मुदत असावी कामे चांगली होतील कामाचा दर्जा सुध्दा टिकून राहील.

**मा.सभापती :** तीन वर्षाऐवजी २ वर्षासाठी अनामन रक्कम १०% ऐवजी ५% ठेवण्यात यावी.विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विकास कामाकरीता मागविण्यात येणारे निविदापत्रके २५ ते ३० टक्के निविदेपक्षा कमी दराने प्राप्त होतात.कामाचा दर्जा उत्कृष्ट रहावा म्हणून यापुढे महानगरपालिकेतील विकास कामाकरीता कंत्राटदाराकडून ५% अनामत रक्कम दोन वर्षाच्या कालावधी करीता घेण्यात यावी.विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८८/६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विविध चौकांचे,बेटांचे नुतनीकरण,सौंदर्यीकरण करुन देणे बाबत विविध खाजगी संस्था / बँका /औदयोगिक संस्था यांच्यासमोर मांडण्यात आला होता. सदर विषयावर तत्कालीन महापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. तद्नंतर दोन वेळा प्रायोजकांना मा.आयुक्त यांचे दालनात पाचारण करण्यात आले होते. या विषयावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की,बेटांचे सौंदर्यीकरण व नुतनीकरण इत्यादी बाबी प्रथम प्रायोजकांनी त्यांच्या खर्चाने करावयाचे आहे.या जोपसनेकरीता व रंगरंगोटीकरीता सौंदर्यीकरण मनपाने जोपासावयाचे आहे.या जोपासनेकरीता व रंगरगोटीकरीता संबंधित प्रायोजकांकडून खाली दर्शविल्यानुसार रक्कम भरणा करुन घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | वाहतुक बेटास प्रतिवर्ष दोन वेळा रंगरंगोटीचा खर्च (परिघांचे क्षेत्रफळ) | रु. ७५/- प्रति चौ.मी. |
| ब) | जोपासना व संरक्षण करणेचा खर्च | रु. १२,०००/-प्रति वर्ष,प्रति बेट. |

वरील 'अ' व 'ब' ची रक्कम प्रायोजकांना प्रतिवर्ष महानगरपालिकेत भरावी लागेल.मनपातर्फे विदयुत पुरवठा व पाणी पुरवठा केला जाईल.सदर अटी ज्या प्रायोजकांना मान्य असतील त्यांच्या बरोबर करार करण्यात येल.(कराराचा मसुदा सोबत अवलोकनार्थ जोडलेला आहे.)

बहुतांश प्रायोजकांनी / संस्थांनी सौंदर्यीकरण,सुशोभिकरण करुन देण्याची संमती दर्शविलेली आहे.परंतु जोपासना व दुरुस्ती मनपाने करणे करीता सुचविले आहे.त्यांची सदरील मागणी मा.आयुक्तांनी मान्य न करता वरील प्रमाणे त्यांच्याकडून आवश्यक खर्च वसुल करणे करीता सुचविले आहे.बेटालगत प्रत्येक आठ फुटांच्या (८) अंतरावर (८'सेंटर ड सेंटर) असे किंवा योग्य त्या ठिकाणी १ १/२,X१ १/२, (०.४५ ) मीटर (०.१५ मीटर) आकाराचे जाहीरात फलक लावण्याची परवानगी प्रायोजकांना देण्यात येईल.सदर प्रस्तावाबाबत आकारावयाच्या दराबाबत जाहीरात फलक लावणेच्या परवानगी बाबत विचार विनिमय करुन प्रकरण निर्णयास्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** या प्रस्तावात मनपा वीज पुरवठा व पाणी देणार याचा अर्थ मनपा वीज बील भरणार का?

**श्री.जयवंत ओक :** विकसित केलेले सौंदर्यीकरण व नुतणीकरण यावर येणारा विदयुत पुरवठयाचा खर्च संबंधित एजन्सीने करावा अशी दुरुस्ती करावी.या अगोदरच वीज मंडळाची थकबाकी १८० कोटी मनपावर आहे.

**मुख्यलेखा अधिकारी :** बेटाचे सौंदर्यीकरण व नुतनीकरण प्रथम प्रायोजकांनी त्यांच्या खर्चाने करावयाचे आहे.प्रायोजकांनी सौंदर्यीकरण करून दिल्यानंतर जोपासण्याचे काम मनपा करणार,त्याचा खर्च प्रायोजकांकडून महणजेच जे दर दर्शविले त्याप्रमाणे वसुल करणार आहे.बेटालगत त्यांना प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाहीरात फलक लावण्याची परवानगी देण्यात येईल.

**मा.सभापती :** एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर दयावे.ना नफा ना तोटा या तत्वावर चालत असेल तर काहीही हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध चौकांचे / बेटांचे नुतनीकरण / सौंदर्यीकरण खाजगी संस्था / बँका / औदयोगिक संस्था यांचेकडून वाहतुक बेटास प्रतिवर्ष दोन वेळा रंगरंगोटी करणे,जोपासना व संरक्षण करणे इत्यादी प्रायोजकांकडून प्रस्तावित केलेली आकारणी करण्यास तसेच प्रस्तावित आकाराचे जाहीरात फलक लावण्याचे परवानगी देण्यास आणि ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेसाठी एक वर्षाच्या प्रायोगिक तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ८९/७:**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.मजनुहिल येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या संपुर्ण प्रकल्पासाठीच्या एकूण रु. १७२.०० लाखाच्या प्रस्तावास दि. ०४-१०-१९९७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१०२/६ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सदरील प्रकल्पाकरीता बांधण्यात आलेल्या सभागृहाची अंतर्गत सजावट करणेच्या कामाकरीता रक्कम रु. २४,२०,५००/- चे सविस्तर अंदाजपत्रक सा.बांधकाम विभागाच्या सन ९९-२००० च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून मान्यता मिळाली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण ६ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत खालील प्रमाणे एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या.त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या .

निविदाधारकांची नावे खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.डी.आर.साने | २२.२८% कमी |
| २) | श्री.धनाजी वा.मोहिते | २१.११% कमी |
| ३) | मे.वन्डर कन्स्ट्रक्शन | २०.३७८ % कमी |
| ४) | मे.एलोरा कन्स्ट्रक्शन | १८.४२% कमी |
| ५) | मे.एम.एस.एस.आय.डी.सी. | ०४.५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा २२.२८% कमी दराची असलेली निविदा श्री.डी.आर.साने यांच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मजनुहिल येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी बांधण्यात आलेल्या सभागृहाची अंतर्गत सजावट करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २२.२८% कमी दराची श्री.डी.आर.साने यांची निविदा मान्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही देण्यात येते.

**विषय क्र.: ९०/८:**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडून नविन गटार बांधणेच्या कामासाठी अं.प.रक्कम रु. ११,८४,२५९/- ला दि. ०४-०८-२००१ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान आहे.कामाची निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | हाईटेक कन्स्ट्रक्शन | ३०.९६% कमी |
| २) | मन्नान खान | २१.७८६% कमी |
| ३) | निलेश कन्स्ट्रक्शन | १८.८७% कमी |
| ४) | एस.ए.नवाब | १७.१७% कमी |
| ५) | गरुड कन्स्ट्रक्शन | १६.५३% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा ३०.९६% कमी दराची हायटेक कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्त यांनी ५% अनामत रक्कम ठेवावी व थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवावे" या अटीवर दि. १०-२-२००२ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.संजयनगर (स्लम) येथील जुनी वाहती गटार तोडून नविन गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा ३०.९६% कमी दराची हायटेक कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९१/९:**

कार्यकारी अभियंता (पापु.) मनपा यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वर्ष २००१-२००२ करीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील पाणी शुध्दीकरण आवश्यक असलेल्या तुरटी खरेदी संदर्भात रु. १५,४०,०००/- चा प्रस्ताव सादर केला होता.या प्रस्तावास स्थायी समितीचा ठराव क्र. ४९/२ दि. १३-१०-२००१ अन्वये मान्यता झालेली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६३/२००१ जी की दे.लोकमत व सकाळ (पुणे) या वर्तमानपत्रास प्रसिध्दीस देण्यात येवून 'डि'फॉर्मवर दर मागविण्यात आले.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (६) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.श्री.एन्टरप्रायजेस | २४५१/- प्रति मे.टन |
| २) | मे.एम.एस.एस.आय.डी.सी. | २४६०/- --//-- |
| ३) | मे.शिव केमिकल्स | १९५९/- --//-- |
| ४) | मे.विकास इन्टरप्रायजेस | २१६०/- --//-- |
| ५) | मे.फोनिक्स केमिकल्स | १९९९/- --//-- |
| ६) | मे.एस.व्ही.एम.केमिकल कॉर्पोरेशन | निविदा उघडण्यात आलेली नाही. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.शिव केमिकल यांचा होता, परंतु मा.आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार मे.शिव केमिकल्स यांना दराबाबत वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले.वाटाघाटीअंती मे. शिव केमिकल्स यांनी रु. १९२५/- प्रति मे. टन असा दर मान्य केला व त्यास मा.आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

तरी मे.शिव केमिकल्स यांचा वाटाघाटी अंतीचा दर रु. १९२५/- प्रति मे.टन या प्रमाणे निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वर्ष २००१-२००२ करीता जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथील पाणी शुध्दीकरण आवश्यक असलेल्या तुरटी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदेपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.शिव केमिकल्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे प्रति मे. टन रु. १९२५/- या दराने तुरटी खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९२/१०:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी रक्कम रु.२५,५०,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्व साधारण सभेचा ठराव क्र. ४८१/४ दि. २०-९-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७/२००२ जी की दै.लोकमत व सकाळ (पुणे) या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन 'डी'फॉर्मवर ब्लिचिंग पावडर उत्पादक तथा अधिकृत विक्रेते यांच्याकडून दर मागविण्यात आलेत. कोरी निविदा फॉर्म विक्रीच्या अधिकृत विक्रेते यांच्याकडून दर मागविण्यात आलेत.कोरी निविदा फॉर्म विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोरी निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.श्री.गजानन केमिकल्स इन्डस्ट्रीज | ११,९००/- प्रति मे.टन |
| २) | मे.निधी असोशिएटस | ९,३८०/- --//-- |
| ३) | मे.शिव केमिकल्स | १०,०४०/- --//-- |
| ४) | मे.बि.एस.ठाकर | १०,८०० --//-- |
| ५) | मे.श्री.रॉयलसिमा डच केसबी लि. | १०,९८० --//-- |
| ६) | मे.फोनिक्स केमिकल्स | ९,१५६ --//-- |
| ७) | मे.क्लोरोफेम इन्डस्ट्रीज | ९,२७० --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे.फोनिक्स केमिकल्स यांचा आहे.म्हणजेच रु. ९,१५६/- प्र.मे.टन असा दर दिलेला आहे.मा.आयुक्तांनी पुरवठाधारक मे. फोनिक्स केमिकल्स यांच्या सोबत दराबाबत वाटाघाटी केल्या. ब्लिचिंग पावडर ही ग्रासीम कंपनी उत्पादीत राहील व त्यास रु. ९,१५०/- प्र.मे.टन असा दर निश्चित करण्यात आला आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर रु. ९,१५०/- प्र.मे.टन या दराने मे.फोनिक्स केमिकल यांची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**डॉ.आशा बिनवडे :** विषय क्र. १० व ११ ब्लिचिंग पावडर खरेदी संदर्भात आहे. दोन्ही प्रस्ताव सर्वसाधारण सभेचा दिनांक २०-९-२००१ च्या सभेत मंजुर झालेले आहेत. एकाच दिवशी वेगवेगळे टेंडर मागविण्यात आले. दोन वेगवेगळे टेंडर का? यात एकूण ५० ते ६० लक्ष रुपये किंमतीचे ब्लिचिंग पावडर खरेदी करणार आहे. एकत्र का नाही काढले?

**कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा :** फारोळा येथे होणारे ब्लिचिंग पावडरसाठी जकात आकारली जाणार नाही. त्यासाठी वेगळे भांडार आहे. हर्सुलसाठी लागणारे ब्लिचिंग पावडर जकात आकारली जाते. तसेच ट्रान्सपोर्ट खर्च सुध्दा वाढ होऊ शकते.

**डॉ.आशा बिनवडे :** एकत्र टेंडर केले असते तर स्पर्धा झाली असती व त्यात मनपाचा फायदा झाला असता.

**श्री.सलीम पटेल :** दोन्ही प्रस्ताव रद्द करुन पुन्हा एकत्र टेंडर मागविण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता :** दोन्ही प्रस्तावात ब्लिचिंग पावडर खरेदीचे दर जवळपास सारखेच आलेले आहे. हर्सुलसाठी जे ब्लिचिंग पावडर येणार त्यात फक्त जकात आकारणी करुन समावेश झालेला आहे.

**मा.सभापती :** पुढील वेळेस असे प्रस्ताव ठेवतांना सर्व अटी शर्ती सादर करून ठेवावे विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फोनिक्स केमिकल यांचेशी झालेल्या वाटाघाटीस ठरल्यानुसार त्यांचेकडून ग्रासीम कंपनी उत्पादित ब्लिचिंग पावडर प्रति मे. टन रु. ९,१५०/- या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९३/११:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणरी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी रक्कम रु. २६,७७,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यात सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४८०/३ दि. २०-९-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ४८०/३ दि. २०-९-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७/२००२ जी की दै.लोकमत,दे.सकाळ (पुणे),महाराष्ट्र टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देण्यास येवून 'डि'फॉर्मवर ब्लिचिंग पावडरचे उत्पादक अथवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून दर मागविण्यात आले. कोरी निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) कोरी निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस व वेळेपर्यंत एकूण सहा (६) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.शिव केमिकल्स | १०,३२०/- प्रति मे.टन |
| २) | मे.फोनिक्स केमिकल्स | ९,४३०/- --//-- |
| ३) | मे.श्री. रॉयल सिमा डच केसबी लि. | ११,६५६/- --//-- |
| ४) | मे.निधी असोशिएटस | ९,५८०/- --//-- |
| ५) | मे.क्लोरोकेम इन्डस्ट्रीज | ९५२५/- --//-- |
| ६) | मे.श्री.गजानन केमिकल इन्डस्ट्रीज | निविदा उघडण्यात आली नाही. |

वरील प्रमाणेचा तुलनात्मक तक्ता पाहता मे फोनिक्स केमिकल यांचा दर कमी आहे.म्हणजेच रु. ९४३०/- प्र.मे.टन असा दर आहे.

मा.आयुक्तांनी पुरवठाधारक मे.फोनिक्स केमिकल यांच्या सोबत दराबाबत वाटाघाटी केल्या त्यामुळे ब्लिचिंग पावडर ही ग्रासीम कंपनी उत्पादीत राहील व त्यास रु. ९,१५०/- जकात कर असा दर निश्चित करण्यात आला आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा दर रु. ९,१५०/- जकात कर (प्र.मे.टन) या दराने मे.फोनिक्स केमिकल यांची निविदा स्विकृतीसह व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणरी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारक मे.फोनिक्स केमिकल यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून ग्रासीम कंपनी उत्पादित ब्लिचिंग पावडर प्रति मे.टन रु. ९,१५०/-जकात कर या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९४/१२:**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की,औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता चंपा मस्जीद ते दमडी महल या रस्त्याने बाधीत मिळकत न.भू.क्र. १०८७१/८ ही अंशतः बाधीत असून बाधीत क्षेत्र १२१.१० चौ.मी.असून बाधीत क्षेत्र प्रत्यक्ष रस्त्यासाठी महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. करीता मिळकत धारकाने बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळण्यासाठी अर्ज केला आहे.करीता मिळकत धारकाने बाधित क्षेत्राचा मोबदला मिळण्यासाठी अर्ज केला आहे व त्यानुसार मिळकत धारकास शिघ्र गणक दरानुसार आणि वजावटी करुन रु. ४,०८,८३४/- मोबदला निश्चित होता.प्रकरणात मिळकतधारकास तुर्त ५०% मोबदला देणेबाबत मा.आयुक्तांनी तत्वतः देवून उर्वरीत ५०% माहे एप्रिल २००२ मध्ये दयावे व जागेचे नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेणेस मान्यता झाली आहे.नोंदणीकृत दस्तऐवजसाठी एकूण रु. ६०,५५०/- खर्च येईल.त्यापैकी ५०% खर्च मिळकतधारक व ५०% खर्च महानगरपालिका करणार आहे.

मिळकतधारकास एकूण मोबदला (रु. ४,०८,८३४) हेखरेदीखत खर्च ५०% वजा जाता निश्चित केली आहे. तुर्त मोबदल्याचा ५०% म्हणजे रु. २,०४,४१७/- (रुपये दोन,चार हजार सतरा फक्त) देणे आणि उर्वरीत ५०% मोबदला रक्कम माहे एप्रिल २००२ मध्ये देणेस व खरेदी खतासाठी अग्रीम रक्कम रु. ६०,५५०/- (रुपये साठ हजार पाचशे पन्नास फक्त) श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना देणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** श्री.डी.डी. कालेले यांनी या अगोदर ही अग्रीम रक्कम घेतलेली आहे.ती जमा केलेली नाही.ऑर्डरमध्ये तसा रिमार्क आलेला आहे.त्या संबंधाचा खुलासा करावा.

**प्र.स.स.नगररचना :** श्री.डी.डी.कालेले यांचे नावे असलेली रक्कम त्यांनी अदा केलेली आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** यासंबंधीची संचिका कार्यवाहीस्तव आहे.सर्व बिल त्यांनी समाविष्ट केलेले आहे.

**मा.सभापती :** विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता चंपा मस्जीद ते दमडी महल या रस्त्याने बाधीत मिळकत न.भू.क्र. १०८७१/८ ही अंशत: बाधीत असून बाधीत क्षेत्र १२१.१० चौ.मी.क्षेत्राचा शिघ्र सिध्द गणक दरानुसार खरेदी खतासाठी लागणाऱ्या एकूण खर्चाच्या ५०% रक्कम वजा जाता निश्चित करण्यात आलेला मोबदला रक्कम रक्कम रु. ४,०८,८३४/- पैकी तुर्त ५०% रक्कम रु. २,०४,४१७/- (दोन लाख चार हजार चारशे सतरा रुपये ) मिळकत धारकास देण्यास आणि उर्वरित ५०% मोबदला रक्कम आहे.एप्रिल २००२ मध्ये देण्यास व खरेदीखतासाठी लागणारी रक्कम रु. ६०,५५०/-अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.: ९५/१३:**

उपआयुक्त महसुल यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कराधीन नियमातील मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इ.बाबत नियम क्र. ८ नुसार रितसर नोटीस देणे आवश्यक आहे व अशा नोटीस सोबत कलम-२ मधील पोट कलम ३ प्रमाणे स्थायी समिती नोटीस स्विकारण्यासाठी वेळोवेळी विहित करील अशी फिस भरणे बंधनकारक आहे.

सन १९८९-९० पासून ते अजतागायात जागेच्या हस्तांतरणाबाबत (नामांतराबाबत) कोणत्याही करयोग्य मुल्याच्या मिळकतीस रु. १००/- (अक्षरी शंभर रुपये फक्त) असे शुल्क आकारण्यात येते.तथापि सदरील बाब ही योग्य नसून मुल्यांकनाच्या दृष्टीने ज्या व्यक्तीचे करयोग्य मुल्य जास्त आहे.त्या मिळकतींना कर आकारण्याची हस्तांतरण करतांना तुलनात्मकदृष्टीने वाढीस शुल्क आकारणे आवश्यक आहे.ज्याप्रमाणे करयोग्य मुल्याच्या वाढीनुसार सामान्य कराची टक्केवारी वाढविण्यात आली आहे.त्याच धर्तीवर मालमत्ता कर आकारण्याचे हस्तांतरण शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे.त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे असावे.

| अ.क्र. | ज्या मिळकतीचे हस्तांतरण करावयाचे आहे,त्यांचे करयोग्य मुल्य | प्रस्तापित हस्तांतरण शुल्क/नामांतरण शुल्क. |
|---|---|---|
| १) | १ ते १०,००० | ५०० रुपये |
| २) | १०,००१ ते २०,००० | १००० रुपये |
| ३) | २०,००१ ते ५०,००० | १५,०० रुपये |
| ४) | ५०,००१ ते १,००,००० | २५०० रुपये |
| ५) | १,००,००० ते पुढे | ५००० रुपये |

वरील प्रमाणे नामांतर शुल्काचे दर आकारण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील कराधीन नियमातील मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या

जागांचे हस्तांतरण इ.बाबत नियम क्र. ८ नुसार रितसर नोटीस देणे आवश्यक आहे व अशा नोटीस सोबत कलम-२ मधील पोट कलम ३ प्रमाणे स्थायी समितीस फीस आकारणी करण्याचे तरतुदीस अधिन राहुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित हस्तांतरण शुल्क/ नामांतर शुल्क आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | ज्या मिळकतीचे हस्तांतरण करावयाचे आहे,त्यांचे करयोग्य मुल्य | प्रस्तापित हस्तांतरण शुल्क/नामांतरण शुल्क. |
|---|---|---|
| १) | १ ते १०,००० | ५०० रुपये |
| २) | १०,००१ ते २०,००० | १००० रुपये |
| ३) | २०,००१ ते ५०,००० | १५०० रुपये |
| ४) | ५०,००१ ते १,००,००० | २५०० रुपये |
| ५) | १,००,००० ते पुढे | ५००० रुपये |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९६/१४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि. १५-९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ३९/३ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता की,श्री.एम.ए.साजेद,निलंबीत जकात लिपीक यांचे खाते चौकशी प्रकरणात त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २(६) नुसार पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे श्री.एम.ए.साजेद कनिष्ठ लिपीक (निलंबीत) यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

परंतु सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.एम.ए.साजेद,जकात लिपीक (निलंबीत) यांचे खाते चौकशी मधील आरोप क्र. २ बाबत मुख्यलेखापरिक्षकांकडून लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असा मा.स्थायी समितीने ठराव पारित केलेला होता.

करीता जा.क्र./मनपा/आस्था-१/२००१/२६०९ दि. १५-९-२००१ च्या पत्रान्वये मा.मुख्यलेखापरिक्षक यांना श्री.साजेद यांनी रु. २२९२९/- कमी भरणा करुन तेवढया रकमेचा अपहार केला, या आक्षेपासंबंधी चौकशी अधिकाऱ्यांसमोर संबंधित अभिलेख उपलब्ध झाल्याने निर्णय घेता न आल्यामुळे त्या आदेशाबाबत सविस्तर अहवाल पाठविण्यासाठी कळविण्यात आले.

मुख्यलेखापरिक्षक यांनी त्यांचे कडील जा.क्र./मनपा/मुलेप/१८१/२००१ दि. २९-९-२००१ नुसार या लेखा परिक्षण आक्षेपासंबंधाने त्यांचा अहवाल सादर केला.त्यांनी सादर केलेल्या अहवालावरुन असे निदर्शनास आलेले होते की, श्री.साजेद यांनी रु. २२२९२९/- इतक्या रकमेचा निश्चितपणे अपहार केलेला आहे.

त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/आस्था-१/ २००१/२७६७ दि. ८-१०-२००१ च्या पत्रासोबत मुख्यलेखापरिक्षक यांचे कडील २९-९-२००१ च्या लेखा परिक्षणाची प्रत श्री. एम.ए.साजेद यांना पाठवून रक्कम रु. २२२९२९/- चा २४ तासात मनपा फंडात जमा करण्यासाठी कळविण्यात आले.

श्री.एम.एम.साजेद यांनी त्यांच्या दि. १०-१०-२००१ च्या पत्रान्वये सदरील रक्कम त्यांनी दि. १७-१-९४ रोजी जिन्सवार क्र. ४६०, पान क्र. ४५९२७ व ४५९६३ द्वारे मध्यवर्ती जकात नाका येथे जमा केलेली असल्याचे कळविले व रक्कम जमा झाली असल्यामुळे रक्कम भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याचे त्यांनी कळविले.

श्री.साजेद यांनी सादर केलेला उत्तरावरुन मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता, त्यांनी त्या संदर्भाने त्यांचे अभिप्राय सादर केले की,श्री.साजेद यांच्या खुलाशाची छाननी केली असता त्याच्या पुष्ट्यर्थ जोडलेल्या कागदपत्राची सत्यता पडताळून पाहण्यासाठी जकात विभागातील मुळ कागदपत्राची आवश्यकता आहे.मात्र सदर कागदपत्र वेळोवेळी व तोंडी तसेच लेखी मागणी करुनही उपलब्ध झालेले नाही,ते उपलब्ध होताच प्रकरणात अंतिक अहवाल देण्यात येईल असेही त्यांनी नमुद केले व तोपर्यंत दि. २९-९-२००१ मधील अहवालातील मुद्दे कायम असल्याचे कळविले.या संदर्भाने मुख्यलेखा परिक्षक महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचेकडील जा.क्र./मनपा/मुलेप/२६८/२००१ दि. २१-१२-२००१ नुसार पुन्हा अहवाल पाठविला की,श्री.साजेद यांनी त्यांचे खुलाशासोबत तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक यांचेकडील जा.क्र./मनपा/मुलेप/२२३/९५ दि. १७-१०-९५ च्या पत्राची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.सदर पत्र त्यांचे कार्यालयाचे रेकॉर्डला उपलब्ध नाही. तसेच त्यासंबंधीचे आवक जावक रजिस्टरवर त्यावेळच्या काम करणाऱ्या अतिरिक्त अन्य कर्मचाऱ्यांने नोंदी केलेल्या आढळून आल्या.करीता त्यापत्राच्या वैधतेबाबत शंका घेण्यास जागा आहे.

तसेच श्री.साजेद यांच्या खुलासा पत्रासोबतच्या जिन्सवार क्र. ४६० मधील पान क्र. ०४५९२७ मध्ये पुस्तक क्र. २९९५ पा.क्र.२९९४०१ ही रु. १२७९७५/- ची नोंद करण्यात आलेली आहे.ती मुळ नोंदणीनंतर केल्याचे दिसून येते.तसेच जिन्सवार पुस्तकातील पान क्र. ०४५९६३ वरील पा.क्र.२९९४०२ ते २९९४०४ या ३ पावत्यांची नोंदही नंतर केल्याचे दिसून येते.त्यातील पावत्यांची एकूण रक्कम ९४४४८/- एवढी आहे. यातील पा.क्र. १,२,३ या चेकच्या रकमांच्या आहेत.सदरचे चेक लेखा विभागाकडे जमा आहेत.मात्र रोख स्वरुपात जमा झालेली रक्कम भरण्याबाबत संदिग्धता दिसून येत असल्याचेही त्यांनी नमुद केलेले आहेत.शिवाय याबाबत मुळ रेकॉर्ड उपलब्ध झाल्याशिवाय सदरच्या प्रकरणी अंतिम निष्कर्ष देता येणे शक्य होणार नाही,त्यामुळे सदरचे मुळ रेकॉर्ड उपलब्ध करण्याकामी जकात अधिक्षक यांना सक्त सूचना देवून अथवा अन्य उपायांचा अवलंब करुन रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे वा तोपर्यंत दि. २९-९-२००१ रोजी दिलेल्या अहवालामार्फत मुद्दा कायम समजण्यात यावा असेही त्यांनी नमुद केलेले होते.

जकात विभागाकडून उपलब्ध न होऊ शकलेला रेकॉर्ड व पावत्या पुस्तकाबाबत पोलीसस्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याची कार्यवाही करण्यासाठी जकात अधिक्षक यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

तथापि दि. १५-९-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र. ३९/३ नुसार श्री. एम.ए.साजेद, जकात लिपीक (निलंबित) यांच्या खाते चौकशी मधील आरोप क्र. २ बाबत मुख्य लेखापरिक्षकांकडून लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा असा मा.स्थायी समितीने जो ठराव पारित केलेला होता. त्यानुसार मुख्यलेखा परिक्षक यांनी त्यांचा अहवाल सादर केला असून त्या अहवालानुसार श्री.साजेद यांनी रु. २,२२,९२९/- इतक्या रकमेचा निश्चितपणे अपहार असल्याचे त्यांनी नमुद केलेले आहे.

करीता मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री.साजेद यांनी रु. २,२२,९२९/- इतक्या रकमेचा अपहार केलेला असल्यामुळे दि. १५-०९-२००१ रोजी

मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार श्री.एम.ए.साजेद,निलंबित जकात लिपीक यांच्या खाते चौकशी प्रकरणात त्यांचे वरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याचेही सिध्द झाल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २(६) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे श्री.एम.ए.साजेद निलंबित नाका लिपीक यांस औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**श्री.मधुकर सावंत :** मागील बैठकीत हा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता आता मंजुर करायचा किंवा काय याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय व्हावा.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** दि. १५-९-२००१ रोजी या सभागृहात श्री.एम.ए.साजेद,निलंबन प्रकरणा विषयी मी काही मुद्दे उपस्थित केले होते. श्री.एम.ए.साजेद यांना निलंबन भत्ता का देण्यात आला नाही? त्यांना मागील आठ वर्षापासून निलंबन भत्ता या नावाने फक्त ९००/- रुपये देण्यात येते असे का? महानगरपालिका प्रशासनामध्ये बरेच कर्मचारी निलंबित होतात व सध्याही आहे.परंतु मनपा प्रशासनाने लाच घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना व खुनाच्या गुन्हयामध्ये अटक झालेल्या ७५% निलंबन भत्ता म्हणून पगार देण्यात येतो.परंतु श्री.एम.ए.साजेद यांच्या बाबतीत न्यायालयाचे आदेश असतांना मनपा प्रशासनाने ज्या नियमानुसार निलंबीत केले होते त्याचप्रमाणे निलंबन भत्ता आजपर्यंत अदा केला नाही.याप्रकरणी श्री.एम.ए.साजेद यांच्या बडतर्फीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (६) नुसार स्थायी समिती समोर सादर करण्यात आले.याच नियमात दर्शविलेल्या (ब) प्रमाणे मनपा प्रशासनाने श्री.एम.ए.साजेद यांचे निलंबन बाबत सर्वसाधारण सभेची परवानगी घेतली नाही. नियमाप्रमाणे त्यांचे निलंबन ६ महिन्यानंतर संपुष्टात आले आहे.त्यांना निलंबन करुन ८ वर्षे होत आहे.म्हणून सदरचा प्रस्ताव पुर्णत: रद्द करुन त्यांना त्वरीत कामावर रुजू करुन घ्यावे व नियमानुसार पुर्ण वेतन देण्यात यावे.

श्री.एम.ए.साजेद निलंबन प्रकरणात तत्कालीन आयुक्त श्री.डी.एन.वैदय यांना न्यायालय अटक वॉरंट निघाला होता.त्यांना आरोपी होऊन जामीन घ्यावा लागला या रागामुळे आयुक्त वैदय यांनी श्री.एम.ए.साजेद यांच्या फाईलवर १९९७ साली बडतर्फ करावे असा शेरा लिहून त्यांची फाईल ७ वर्ष दाबून ठेवता त्यांना १०००/- रु. दंडही झाला.

महानगरपालिका प्रशासनाने सहा महिन्यानंतर श्री.एम.ए.साजेद यांचे निलंबन प्रकरणात निलंबन चालू ठेवण्यासाठी सर्वसाधारण सभेची परवानगी आवश्यक होती.परंतु आयुक्त व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले.ज्या नियमानुसार त्यांना निलंबीत करण्यात आले. म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमाप्रमाणे त्यांना निलंबीत भत्ता देण्यात आलेला नाही त्या नियमाप्रमाणे मनपा प्रशासनाने महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांची परवानगी घेतली नाही व तत्कालीन आयुक्त यांनी त्यांची संचिका ७ वर्षापासून दाबून ठेवलेली होती. आज प्रस्ताव सादर होतो एवढा वेळ का

लागलेला आहे.महानगरपालिकेत बरेच कर्मचारी भ्रष्टाचार करतात. बऱ्याच कर्मचाऱ्यांचे निलंबन होवून ३ महिन्याच्या आत कामावर घेतलेले आहे. याच प्रकरणात का उशीर झालेला आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** मागील एका बैठकीत रगडे नावाचे कर्मचारी यांना अशाच प्रकरणातून कामावर घेण्याबाबत निर्णय घेतला त्याप्रमाणे यांना सुध्दा कामावर घेण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

**श्री.सलीम पटेल :** श्री.साजेद यांचे प्रकरण न्यायालयात चालू आहे. न्यायालयाच्या निकालास अधिन राहून त्यांना कामावर घेण्यात यावे.

**डॉ.आशा बिनवडे :** दि. १८-३-२००३ रोजी या कर्मचाऱ्याच्या संदर्भात औदयोगिक न्यायालयात निकाल आलेला आहे. खुलासा दयावा. प्रकरण कोणत्या स्टेजला आहे. त्यांना बडतर्फ करावे असे म्हटले आहे का?

**श्री.सलीम पटेल :** रेकॉर्ड मिळत नाही असे प्रस्तावात दिलेले आहे. तर अशा कर्मचाऱ्यांना बडतर्फ करता येईल का? ७-८ वर्ष निलंबीत ठेवून आता बडतर्फ करणे बरोबर नाही त्यांना न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. न्यायालयाच्या निकालात अधिन राहून त्यांना कामावर घ्यावे. निकाल त्यांच्या विरोधात आल्यास पुढील कार्यवाही व्हावी.

**उपआयुक्त (म.) :** न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे.

**विधी सल्लागार :** या प्रकरणी औदयोगिक न्यायालय कामानुसार न्यायालयात प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. वकिलपत्र दाखल करण्यात आले होते व वेळ मागितला होता.३१-८-२००१ ला चौकशी पुर्ण झाली. त्यानंतर सेवेवतून बडतर्फ करण्याचे आदेश झाले. त्यानंतर औदयोगिक न्यायालयात आव्हान दिले. त्यांची तक्रार फेटाळली रिव्हयु पिटीशन रिजेक्ट झाले. प्रकरण ३/२००१ पेंडीग आहे.३१-८-२००१ च्या आदेशावर अंतिम आदेश घेऊ नये म्हणून स्थगिती आहे. एका वेळेस रु. १०००/- फास्ट लावण्यात आलेली आहे. स्थायी समितीचा निर्णय घेता येईल.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** इतर कर्मचाऱ्यांना निलंबीत झाल्यानंतर न्यायालयात निर्णयाच्या अधिन राहून कामावर घेतलेले सर्वांना सारख्याच पध्दतीने न्याया मिळावा. श्री.साजेद यांना सुध्दा कामावर घेण्यात यावे. न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करता येईल. माणुसकीच्या नाते सर्वांना घेणे परंपरा चालू राहील.

**श्री.मीर हिदायत अली :** मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून कामावर घेण्यात यावे.

**नगरसचिव :** प्रशासनाकडून सुधारीत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तो सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात येत आहे.

**दुरुस्ती प्रस्ताव :**

मा.स्थायी समिती सभा कार्यक्रम पत्रिका क्र. १६ मधील विषय क्र. १४ नुसार श्री.एम.ए.साजेद ,निलंबित नाका लिपीक यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विषय पत्रिकेतील पृष्ठ क्र. ८ ते १० वर विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात आलेला आहे.

या प्रस्तावानुसार उक्त विषयात दुरुस्ती प्रस्ताव सादर करण्यात येत असून विषय क्र. १४ मधील पृष्ठ क्र. १० वरील परिच्छेद १ व २ ऐवजी खालील प्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

तथापि दि. १५-९-२००१ रोजी संपन्न झालेला ठराव क्र. ३९-३ नुसार,श्री.एम.ए.साजेद,जकात लिपीक (निलंबित) यांच्या खाते चौकशी मधील आरोप क्र. २ बाबत मुख्यलेखापरिक्षकांकडून लवकरात लवकर चौकशी करुन घ्यावी व तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असा मा.स्थायी समितीने जो ठराव पारीत केलेला होता,त्यानुसार मुख्यलेखापरिक्षक यांनी त्यांचा अहवाल सादर केला असून त्या अहवालानुसार सदर प्रकरणात मुळ रेकॉर्ड उपलब्ध करण्याकामी जकात अधिक्षक यांना सक्त सुचना देवून अथवा अन्य उपायांचा अवलंब करुन रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे अहवालात नमुद करण्यात आलेले आहे व तोपर्यंत त्यांनी २९-९-२००१ अन्वये सादर केलेल्या अहवालातील मुद्दा कायम समजण्यात यावा असेही नमुद केलेले आहे.

करीता मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार प्रकरणातील मुळ रेकॉर्ड उपलब्ध होईपर्यंत श्री.साजेद यांनी रु. २,२२,९२९/- इतक्या रकमेचा अपहार केलेला असल्याने प्रथमदर्शनी दिसून आल्यावरुन दि. १५-९-२००१ रोजी मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार श्री.एम.ए.साजेद निलंबित जकात लिपीक यांच्या खाते चौकशी प्रकरणात त्यांचेवरील दोषारोप सिध्द झालेले असल्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (६) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल असा प्रकारे श्री.एम.ए.साजेद,निलंबित नाका लिपीक यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेवतुन बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव पुन्हा सादर करण्यात येत आहे.

**मा.सभापती :** मागील बैठकीत दि. १५-९-२००१ च्या सभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता व सविस्तर रेकॉर्ड तपासणी करुन सविस्तर प्रस्ताव ठेवावा असे ठरले होते व आज पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे.मागील वेळेस चर्चेमध्ये असा प्रश्न उपस्थित झाला की,जकात विभागाचे रेकॉर्ड का सापडत नाही आणि जे रेकॉर्ड तपासूनच पुन्हा तो मुद्दा उपस्थित केला की,जकात विभागाचे रेकॉर्ड सापडत नाही.प्रस्ताव स्थगित केल्यापासुन प्रशासनाने रेकॉर्ड शोधण्याचे काम केले नाही का? काय प्रयत्न केले याचा खुलासा व्हावा.दि. १७-१०-९५ रोजी महानगरपालिकेतर्फे पैशाचा भरणा केला आहे असे पत्राद्वारे सांगण्यात आलेले आहे.खुलासा व्हावा.

**श्री.जयवंत ओक :** प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर नियमाने कार्यवाही करण्या यावी.

**मुख्यलेखा परिक्षक :** मुळ अहवाल तत्कालीन मुख्यलेखापरिक्षक श्री.भोसले यांनी ९४-९५ ला सादर केलेला होता. वेगवेगळया रकमा दाखल होत्या. ही रक्कम भरली आहे असे पत्र श्री.साजेद यांना दिले. चौकशी अहवाल वैयक्तिक कर्मचाऱ्यांना देत नाही. दि. १७-१०-९५ चे पत्र रेकॉर्डला नाही. श्री.साजेद यांना रक्कम रु. २,२२,९२९/-भरण्याबाबत दि. ८-१०-२००१ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे.त्यावर त्यांनी १०-१०-२००१ रोजी पत्र देवून जिन्सवार क्र. ४६० पावती क्र. ०४५९२७ व ०४५९६३ द्वारे मध्यवर्ती जकात नाका येथे जमा केलेली असल्याचे कळविले आहे. परंतु ही रककम भरलेली आहे काय यासंबंधीचे रेकॉर्ड मिळत नाही. पावत्या मिळत नाही. मुळ रेकॉर्ड जिन्सवार उपलब्ध होत नाही.रेकॉर्ड जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत अंतिम अहवाल देणे शक्य होणार नाही. पावत्याची झेरॉक्स आहेत. बेरीज टॅली करण्याचा प्रयत्न केला बरीच जास्त भरणा कमी एकूण २,२२,९२९/- रु. अपहार हा रेकॉर्ड मिळण्याच्या अधिन आहे.

**श्री.पटेल समशेर :** मुळ रेकॉर्ड मिळाले नाही जर बडतर्फ करण्याची कार्यवाही बरोबर नाही.रेकॉर्ड का सापडत नाही. तेवढी रक्कम दाखवण्यात यावी. तेवढी भरणा केलेली आहे.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** रेकॉर्ड उपलब्ध होत नाही. सी.आय.डी.सी.बी.आय.चौकशी करावी तोपर्यंत संबंधीत कर्मचारी यांना कामावर घ्यावे.

**डॉ.आशा बिनवडे :** खरे तर प्रशासनाचे या ठिकाणी मनापासून अभिनंदन करावे. योग्य ती चौकशी करुन अहवाल सभागृहात सादर केलेला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या सभागृहाने पाठीशी घालणे योग्य होणार नाही सबंधीत कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याप्रकरणी खाते निहाय चौकशी अहवाल लेखापरिक्षणाचा अंतिम अहवाल हा कायम करणे योग्य आहे व या प्रकरणाची चौकशी होत असतांना संबंधित कर्मचाऱ्याने दिलेले लेखी अभिप्राय यावरुन निदर्शनास येते की,संबंधीत कर्मचाऱ्यावर चार आरोप सिध्द झालेले आहे.पहिला आरोप असा की, संबंधित कर्मचारी यांनी रु. १,९६,३२२/- च्या रोखीने वसुल केले खोटे धनादेश मनपा फंडात जमा केले हे कागदोपत्री अहवाल नोंद झालेले आहे. ही गोष्ट नाकारता येणार नाही.

दुसरा आरोप असा की, २ (ड) मधील रु. ३६,९६३/- कमी भरणा करुन अफरातफर केली व उशिरा १५ महिन्यांनी रक्कम मनपाकडे जमा केली.तसेच आरोप क्र. २ (ब) मध्येसुध्दा संबंधित कर्मचारी यांनी १८,०००/- रुपयांचा कमी भरणा करणेचा आरोप स्पष्ट आहे. वेळेवेळी कोर्टात उत्तरे सादर करतांना त्यांचेवर जो आरोप लागलेला होता तो कोर्टात बाजु प्लीड करता आली नाही.आरोप क्र. २ (अ) मध्ये रु. २२,९२९/- कमी भरणा केले. याबाबतीचा अहवाल पुर्वीच्या अधिकाऱ्यांनी दिलेला होता. त्या अहवालाचा अर्थ वेगळा धरण्याचे कारण नाही. आरोप गुंतागुंतीचा संभ्रम निर्माण करणारा आहे.तर संबंधित कर्मचाऱ्यांनी १३-०१-९४ रोजी केलेली नोंदी ते पान गहाळ असेल. नंतर चिटकविलेले असेच या गोष्टी संभ्रमित करणाऱ्या होत्या हे विसरुन चालता येणार नाही.म्हणून संबंधित मुख्यलेखापरिक्षक यांना झालेल्या नोंदी हया संभ्रमित करणाऱ्या आहे.याचा अर्थ वेगळा काढणे बरोबर नाही,म्हणून संबंधीत कर्मचाऱ्यांनी काहीच केले नाही.त्यांना निर्दोष ठरवून रेकॉर्ड का उपलब्ध होत नाही.ज्या पध्दतीने चौकशी करायची होती त्या पध्दतीने चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे काम योग्य प्रकारे केलेले आहे.या सर्व बाबी वरुन असे निदर्शनास येते की, संबंधित कर्मचाऱ्यांनी पैशाची अफरातफर निश्चितपणे केलेली आहे. चौकशीच्या वेळी गैरहजर राहून कधी कामगार न्यायालयात तर कधी औदयोगिक न्यायालय तर कधी उच्च न्यायालयात जाणे, अपील करणे व चौकशीच्या वेळी मनपामध्ये गैरहजर राहणे. यासर्व गोष्टी वेळ काढूपणाच्या आहे. याच दरम्यान न्यायालयात जायचे व पुन्हा माझी केस कोर्टात चालू आहे.निर्णय घेता येत नाही.असे बोलणे योग्य नाही व एकूण या प्रकरणाचा अभ्यास ही गोष्ट लक्षात येते की, एखादया कर्मचाऱ्यांनी पैशाची अफरातफर केल्यास ही गंभीर स्वरुपाची बाब आहे व अशा कर्मचाऱ्यांना या सभागृहाने पाठीशी घालणे योग्य नसून सभागृहात मान सन्मान मिळून देणारी नाही. आज कोर्टाने सुध्दा या सभागृहासमोर अंतिम निर्णयासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे.याचा अर्थ असा नाही की, आपण चुकीचा काहीही निर्णय घ्यावा म्हणून

अशा दोषी कर्मचारी / अधिकारी यांच्याबाबत योग्य निर्णय घेतला नाही तर जे कर्मचारी अशा पध्दतीने भ्रष्टाचार करतात त्यांचे मनोधैर्य वाढेल व जे चांगले काम करतात नक्कीच मनोधैर्य खचेल यात शंका नाही.मधून संबंधित कर्मचारी यांनी बडतर्फ करण्याचा जो प्रस्ताव सादर झालेला आहे तो मान्य करावा अशी मी विनंती करतो.

**श्री.शे.इलियास किरमाणी :** यालगत पुर्वीच्या स्थायी समिती सभेत री.रगडे व लिपीक यांचा बडतर्फीचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर झाला होता.त्यांचेकडून पैसे भरणा करुन घेणे बाकी होते.त्यावेळी शिल्लक असलेले पैसे भरुन माणुसकी दाखविण्यात आली.तशीच माणुसकी यांना पण दाखविण्यात यावी. आठ वर्षे निलंबित का ठेवले?सर्वसाधारण सभेची मंजुरी देखील घेतली नाही.मा.मुख्यसचिव,महाराष्ट्र शासन यांची देखील मंजुरी घेतली नाही.तत्कालीन आयुक्त श्री.वैद्य या प्रकरणात अटक वॉरंट निघाले होते व एक हजार रुपये दंड झाला होता.त्यांच्याशी सुडाची भावना ठेवण्यात आली.दुसऱ्यांना पैसे भरुन कामावर घ्यावे व त्यांनी पैसे भरलेले आहेत,त्यामुळे त्यांचेशी देखील माणुसकीची भावना ठेवण्यात यावी व त्यांना कामावर घेण्यात यावे.

**मा.सभापती :** आरोप क्र. २ बाबत मुख्यलेखापरिक्षकाकडून चौकशी करुन घ्यावी या कारणास्तव प्रस्ताव स्थगित ठेवला होता.आरोप क्र. २ सिध्द झाल्यानंतर कार्यवाही अपेक्षित होती.सुधारीत प्रस्तावात देखील मुळ रेकॉर्ड उपलब्ध झाल्याशिवाय अंतिम निष्कर्ष देणे शक्य होणार नाही व रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.मा.उच्च न्यायालयाचया प्रकरण चालू आहे.मा.उच्च न्यायालयात प्रशासन काय बाजू मांडेल हे माहीत नाही.दुसरी बाजू मांडली गेली तर स्थायी समिती दोषी ठरेल.महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक श्री. भोसले साहेबांनी दिलेले पत्रांचे पुरावे सत्य ठरले तर स्थायी समितीवर ताशेरे ओढले जातील. न्यायालयात लवकर निकाल लागत नाही.या प्रकरणात महानगरपालिका पॅनलवरील सध्या काम पाहत असलेले वकील बदलून चांगला वकील लावावा.तत्कालीन आयुक्तांना या प्रकरणात दंडही झालेला आहे. वॉरंटही निघालेले होते.मा.उच्च न्यायालयात कागदपत्रांची मागणी होईल. श्री.भोसले तत्कालीन मुख्यलेखापरिक्षक यांच्या अहवालावर त्यांचीच सही आहे का व त्यासाठी सही पडताळणी विभागाकडे पत्र पाठवावयास पाहिजे होते.तसे पत्र पाठवले नाही.ती सही बरोबर आहे की,नाही जे तपासावे.श्री.आय.टी.गायकवाड व श्री.भोसले यांचे अहवालावरील सही तपासून घ्यावी. मा.औदयोगिक न्यायालय व मा.उच्च न्यायालयाच्या किंवा सक्षम न्यायालयाचा जो अंतिम निर्णय होईल तो सर्वांवर स्थायी समितीवरही बंधनकारक राहील.तोपर्यंत त्यांना कामावर घेण्यात यावे.

मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून त्यांना कामावर घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री.मधुकर सावंत, डॉ.आशा बिनवडे :** संबंधित कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला असतांना ही बाब समोर आली असतांना अशा कर्मचाऱ्यांना कामावर घेणे योग्य होणार नाही.आपला निर्णय मागे घ्यावा त्यांना बडतर्फ करावे. न्यायालयाचा निर्णय येईल तेव्हा कामावर घ्यावे.

**मा.सभापती :** प्रस्तावामध्ये वरील परिच्छेद मध्ये रेकॉर्ड उपलब्ध नाही व खालील परिच्छेद मध्ये दिले बडतर्फ करावे.अशा दोन प्रकारच्या भुमीका सादर केलेल्या आहेत,म्हणून न्यायालय जो निर्णय देईल तो प्रशासनाला तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना बंधनकारक राहील.स्थायी समितीकडे न्यायालयाने ताशेरे ओढू नये म्हणून वरील प्रमाणे निर्णय घ्यावा लागलेला आहे.

**श्री.मधुकर सावंत:** न्यायालयातील कमेटी स्थायी समितीवर ताशेरे ओढेल त्यांना कामावर घेऊ नये यास माझा विरोध आहे.

**डॉ.आशा बिनवडे :** कामावर घेण्याबाबत निर्णय घेत असेल तर माझा त्यास विरोध आहे.संबंधित कर्मचारी यांना त्वरीत बडतर्फ करण्याचा निर्णय व्हावा.या मताशी मी आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.एम.ए.साजेद जकात लिपीक (निलंबीत) यांचे खाते चौकशीत मुळ अभिलेख मिळाले शिवाय निष्कर्ष देणे शक्य नाही असेही नमुद केलेले असल्याने व विविध न्यायालयात प्रकरण चालु असल्यामुळे मा.न्यायालयाचे अंतिम निर्णय स्थायी समितीसह सर्वांवर बंधनकारक राहील.मा.न्यायालयात सदरील प्रकरण लवकर निकाली काढण्याचे दृष्टीने मनपातर्फे दुसऱ्या जेष्ठ विधिज्ञांची नियुक्ती करण्यात यावी.मा.न्यायालयाचे अंतिम निर्णयास अधिन राहून श्री. एम.ए.साजेद,जकात लिपीक (निलंबीत) यांना कामावर घेण्यास बहुमताने स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९७/१५:**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदांतनगर ते पदमपुरा पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर,पदमपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे.त्यासाठी रक्कम रु. २८,२५,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५५३/२ दि. २०-१२-२००१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६६/२००२ जी की,दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या.कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण १२ (१२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण ४ (चार) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.व्ही.आर.महाजन | ४.४४% जास्त दराने |
| २) | श्री.मौला अलीयार खान | ४.८६% जास्त दराने |
| ३) | श्री.जी.आर.घोडेले | ६% जास्त दराने |
| ४) | श्री.मन्नानखान | १% जास्त दराने |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री.मन्नानखान यांचा आहे.म्हणजेच अं.प.दरापेक्षा १% कमी असा दर दिलेला आहे. मा.आयुक्त यांच्या तजवीज नुसार ठेकेदार री. मन्नान खान यांना दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी पाचारण करण्यात आले.वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी असा दर ठरला.त्यास ठेकेदार श्री.मन्नानखान यांनी सम्मती दिली.

तरी वाटाघाटीअंतीचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने श्री. मन्नान खान यांची निविदा स्विकृतीसह व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वेदांतनगर ते पदमपुरा पर्यंत ३०० मी.मी.व्यासाची ए.सी. व बन्सीलालनगर,पदमपुरा भागात १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वांत कमी व वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने श्री. मन्नानखान यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९८/१६:**

मा.कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी. गटारी (बसविणे) बांधणे बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.११,७१,७०२/- रु. स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे.त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकूण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेचा एकूण पाच (०५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.संजय टोनगावकर | अं.प.दरापेक्षा २७.१७% कमी दराने |
| २) | श्री.राणा कन्स्ट्रक्शन | --//--- २३.५५% --//-- |
| ३) | श्री.मे.एस.एच.असोशिएटस | --//-- २१.२१% --//-- |
| ४) | श्री.अमरीश प्रयागजी | --//-- २% --//-- |
| ५) | श्री.एस.एम.मंडोरे | --//-- १४.९०% --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. संजय टोनगावकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची आहे.

तरी श्री.संजय टोनगांवकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची निविदा स्विकृतीसह प्रस्ताव सादर.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथे ३०० व ४५० मी.मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाकरीता प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.१७% कमी दराची श्री.संजय टोनगांवकर यांची निविदा सर्वानुमते मान्य करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: ९९/१७:**

कार्यकारी अभियंता (जलनिःसारण व विदयुत) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मार्फत राज्यात केंद्र व राज्य शासनाच्या

मदतीने अपारंपारीक उर्जा स्त्रोत साधने सौर उर्जा,पवन उर्जा,बायोगॅस उर्जा इत्यादीचे प्रकार व प्रचार कार्यक्रम राबवण्यिात येतात.

सदरील उर्जा स्त्रोत मंत्रालय,केंद्र शासन नवी दिल्ली यांच्या आर्थिक मदतीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक उर्जा उदयान प्रकल्प प्रस्तापित करण्याची योजना आहे.योजनेतील सर्व उर्जास्त्रोत साधने उभारण्यात केंद्र शासनामार्फत १००% अनुदान उपलब्ध होते.

सदर प्रकल्पाचा उद्देश प्रचार,प्रसार तसेच या साधनाचा वापराविषयी सर्व सामान्यांना माहिती देणे असा आहे.

या उर्जा उदयानासाठी लोकांची गर्दी असलेली ठिकाणे,गार्डन,पर्यटन स्थळे अशी जागा लागेल. या प्रकल्पासाठी उर्जा साधने अस्थापित करण्यासाठी आवश्यक असणारी जागा मोफत उपलब्ध करुन देणे उर्जा साधनाची देखभाल व व्यवस्थापना करण्याची सुरक्षिततेची हमी संबंधित संस्थेचे घेणे आवश्यक आहे. तसेच उर्जा प्रकल्प मंजुर झाल्यानंतर रु. ५०००/- महाऊर्जास भरावे लागतील.

यामध्ये या वर्षाची सर्वसामान्यांना माहिती होईल. सिध्दार्थ उदयानाची पाहणी करुन स्विमींग पुलाच्या दक्षिण,पुर्वेची जागा निश्चित केली आहे. यात खालील साधने लावण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सोलार वॉटर हिटींग सिस्टीम | १ नग |
| २) | सोलार कुकर | २ नग |
| ३) | सोलार स्टील | २ नग |
| ४) | एसपीव्ही स्ट्रीट लाईट | ५ नग |
| ५) | गार्डन लाईट | ५नग |
| ६) | घरघुती  लाईट | २ नग |
| ७) | कंदील | ४ नग |
| ८) | पंप (१ एच.पी.) | १ नग |
| ९) | सुधारीत चुल | २ नग |
| १०) | ऐरो जनरेटर (१ की वॅट) | १ नग |
| ११) | वाहतुक संकेतांक (छोटा) | २ नग |

वरील सर्व कामासाठी रु. १०.०० लक्ष (१००% अनुदान) केंद्र शासनाकडून मिळणार आहे.योजना मंजुर झाल्यास एमईडीए तर्फे काम करण्यात येईल. तसेच या उर्जा उदयानाची देखभाल व सुरक्षा म.न.पा.ने करावयाची आहे. तसेच योजना मंजुर झाल्यानंतर रु. ५०००/- हाताळणी शुल्क एमईडीए,पुणे यांना भरणा करावे लागतील. तसेच सदरील प्रस्ताव मान्य झाल्या केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मेडा पुणे यांना पत्र व पुरक माहिती दयावी लागेल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा.सभापती :** विद्युत विभागाचे दोन ऐनवेळचे प्रस्ताव सादर झालेले आहे. उर्जा उड्डान प्रकल्प असा एक ठराव केंद्र शासनाकडे पाठवायचा आहे. या १० लक्ष रु. केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. महाराष्ट्र शासनाची जी मेडा संस्था आहे. त्यांचे अंतर्गत हे प्रपोजल पाठवायचे आहे.ऐनवेळचे प्रस्ताव आपण घेत नाही.

परंतु हे प्रपोजल मनपाच्या फायदयाचे असुन अनुदान १००% मिळते. म्हणून हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या मदतीने एक उर्जा उदयान उभारणीसाठी सिध्दार्थ उदयानालगत प्रस्तावित केलेल्या जागेत वर दर्शविल्याप्रमाणे ०१ ते ११ साधने लावल्यास आणि योजना मंजुर झाल्यावर रु. ५०००/-आकारणी शुल्क मेडा,पुणे यांना भरणा करण्यास आणि सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी मेडा,पुणे यांना पत्र व पुरक माहिती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: १००/१८:**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण व विदयुत) यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) यासंस्थेमार्फत उर्जास्त्रोत व साधनांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.यामध्ये प्रामुख्याने पवन उर्जा,बायोगॅस,सौरउर्जा,इ.वर आधारीत असलेली सयंत्रे अस्थापित करण्यात येतात.यामध्ये केंद्र शासनामार्फत तसेच राज्य शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

केंद्र शासनामार्फत पवन-सौर संकरीत वीज निर्मिती करण्याची योजना जाहीर झालेली असून २००१-२००२ या वित्तवर्षासाठी ही योजना लागु आहे.याकरीता ८०% अनुदान उपलब्ध होते.अशा पध्दतीच्या वीजेच्या कार्यालयातील संगणक,दिवे,पंखे वगैरे गोष्टीकरीता वापर होऊ शकतो.अशा प्रकारच्या सयंत्राची क्षमता जास्तीत जास्त १० किलोवॅट पर्यंत ठेवता येते व केंद्र शासनाकडून १० किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या प्रस्तावना अनुदान उपलब्ध होवू शकते.

पवन उर्जेवरील छोटया क्षमतेच्या जनित्रातून सिच सोलर फोटो व्होल्टाईक पॅनेल मार्फत वीज निर्माण करण्यात येते व ती वीज बॅटरीमध्ये साठविण्यात येते व साठविलेली वीज कार्यालयातील उपकरणे चालविण्यासाठी वापरता येते. अशा पध्दतीचे सयंत्रासाठी अंदाजे रु. ३,५०,०००/- प्रति किलोवॅट इतका खर्च येतो व त्यावर केंद्र शासनाकडून रु. २,००,०००/- प्रति किलो वॅट इतके अनुदान उपलब्ध होते. सदरील सयंत्र उभारणीस्तव संस्थेस जागा उपलब्ध करुन दयावी लागते व या जागेभोवती १०० मीटरचे आत कोणत्याही प्रकारची उंच इमारत अथवा भाडे असु नयेत व वाऱ्याचा वेग किमान ३ ते ४ मीटर प्रति सेकंद इतका असावा लागतो.

उपरोक्त सयंत्र बसविणेसाठी तयार कराव्या लागणाऱ्या प्रस्तावाबाबत महाउर्जा कार्यालयाकडून पुर्णपणे तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येणार असून यासाठी प्रतिकिलोवॅट रु. २०००/- नुसार हाताळणी शुल्क (नॉन रिफंडेबल प्रोसेसिंग फि) महाउर्जा कार्यालयास दयावी लागेल.यासोबत केंद्रशासनाचे अनुदान प्राप्त साठी रू. २०००/- प्रति किलो वॅट नुसार बांधिलकी शुल्क (कमिटमेंट चार्जेस) महाउर्जाकडे सादर करावे लागतात.सयंत्र कार्यान्वीत झाल्यानंतर सदर बांधीलकी शुल्क संस्थेस परत मिळते,परंतु अनुदान मंजुर होऊनही लाभार्थी संस्थेने सयंत्र न बसविल्यास बांधिलकी शुल्क परत करण्यात येत नाही.

वरील प्रमाणे उपलब्ध होणाऱ्या अनुदानाचा उपयोग करुन औरंगाबाद महानगरपालिके करीता अपेक्षित असलेली वीज व १० किलोवॅट पर्यंतच्या सयंत्रासाठी मिळणारे अनुदान विचारात घेता महापालिकेच्या नव्या / जुन्या प्रशासकीय इमारतीवर प्रत्येकी एक प्रमाणे ५ किलोवॅटचे सयंत्र अस्थापित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यामुळे वीज वापरावर परिणाम होऊन वीज बिलातही फरक पडु शकेल.

करीता हाताळणी शुल्क बांधिलकी शुल्क व सयंत्राच्या किमतीपैकी मनपाचा वाटा असे एकूण सुमारे १५.५० लाख रु. १० किलोवॅटच्या सयंत्रासाठी खर्च येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर वर प्रस्तावित सयंत्रे अस्थापित करण्याचा प्रस्ताव तयार करुन अनुदान प्राप्ती करीता केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी 'महाउर्जा' स पत्र देवून कळविण्यात येईल व हाताळणी शुल्क जमा करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा.सभापती** : महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमध्ये स्वर उर्जा यंत्र बसविण्याबाबतचा प्रस्ताव आहे.त्यामुळे मनपास विदयुत बील येणार नाही.या बाबतीत शासनाकडे मागणी करुन ७०% ते ८०% अनुदान मिळते.त्यामुळे कमी खर्चात वीज उपलब्ध होईल व मनपास वीजेचा खर्च येणार नाही,म्हणून हा सुध्दा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या जुन्या व नविन प्रशासकीय इमारतीवर केंद्र शासनामार्फत पवन सौर संकरीत वीज निर्मिती करण्याच्या योजने अंतर्गत १० किलो वॅट पर्यंतचे सयंत्र अस्थापीत करण्याचे करीता आवश्यक असलेले हाताळणी शुल्क व बांधीलकी शुल्क संबंधिताकडे जमा करण्यास प्रस्ताव तयार करुन अनुदान प्राप्त करीता केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी महाउर्जांस कळविण्यास व हाताळणी शुल्क जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: १०१/१९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मील कॉलनी स.न.१७ न.भु.क्र.१८७७८ जागेचा वाद न्याय प्रविष्ट होता.दावा क्रमांक १०४८/९६ सिल्क मिल कॉलनी एज्युकेशन सोसायटी विरुध्द जिल्हाधिकारी व मनपा असे होते. दि.२९-११-९६ रोजी मनपा व सिल्क मिल कॉलनी एज्युकेशन सोसायटी तर्फे मा.आयुक्त यांच्या दालनात बैठक होवून मनपास ३९८३.५८ चौ.मीटर जागा देण्याबाबत चर्चा झाली त्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे व त्याचा उल्लेख सुध्दा दाव्यामध्ये आहे.या संबंधाने मा.आयुक्त यांच्या दालनात झ ालेल्या तडजोडी नुसार मनपास दिलेला जागेचा नकाशा ज्यांचे क्षेत्रफळ ३९८३.५८ चो.मी. असुन दोन्ही बाजूने स्वाक्षरीत असुन मनपा तर्फे विधी सल्लगार यांची स्वाक्षरी आहे.

आता सदरील जागेमध्ये एक आरोग्य केंद्र ,मंगल कार्यालय व पाण्याची टाकी या सर्व वास्तु तयार आहेत. मनपाने या सर्व वास्तुंवर पुष्कळ खर्च केला आहे.या सर्व वास्तुंच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करता सदरील जागेत संरक्षक भिंत बांधण्याबाबतचे अंदाजपत्रक मंजुर असून सदरील भिंतीचे काम पुर्ण बाजुने प्रगती पथावर आहे.मात्र सदरील मनपास दिलेल्या जागेस पुर्व,पश्चिम व उत्तर बाजुस नगरीकांची घरे असुन त्या सर्व घरांची ड्रेनेज लाईन टाकलेली आहेत.ड्रेनेज देखभालीसाठी सदरील उपलब्ध जागेमध्ये संरक्षक भिंत बांधण्यापुर्वी तिन्ही बाजूस १.५ मीटर जागा सोडणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त महोदय यांचे आदेशान्वये शहर अभियंता व कार्यकारी अभियंता (जलनि:सारण ) यांची संयुक्तीक पाहणी दि. ७-३-२००२ रोजी झालेली आहे व कार्यकारी अभियंता (जलनि:सारण) यांनी सदरील जागेच्या तिन्ही बाजुने ड्रेनेज देखभालीसाठी कमीत कमी १.५ मीटर रुंदीची जागा सोडून प्रस्तावित संरक्षक भिंत बांधण्याबाबत अहवाल दिला आहे.

तरी मनपाच्या दृष्टीने शहर अभियंता यांनी सादर केलेला प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्क मिल कॉलनी सन न. १७ न.भु.क्र.१८७७८ मधील मनपास मिळालेल्या ३९८३.५८ चौ.मी. जागेतील विविध वास्तुंच्या संरक्षणाचे दृष्टीने व कार्यकारी अभियंता (ज.नि.) यांचे अहवालानुसार सदरील जागेच्या तिन्ही बाजुने ड्रेनेज देखभालीसाठी कमीत कमी १.५ मीटर रुंदीची जागा सोडून प्रस्तावित संरक्षक भिंत बांधण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे दोन अपील आलेले आहेत ते नगरसचिव वाचुन दाखवतील.

**नगरसचिव :** (अपील वाचून दाखवितात.)

**विषय क्र.: १०२/२०:**

मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. एस.डी. झनझन यांची मारुती जिप्सी क्र. एम.एस.२० ए ३३३३ साठी रेडीयम टायर खरेदीच्या प्रकरणात गोठविलेली वेतनवाढ करण्यासंदर्भात अपील.

**संवाद :**

**मा.सभापती :** प्रशासनामार्फत खुलासा व्हावा.

**उपआयुक्त (म.) :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे बंद केलेली वेतनवाढ बाबत त्यांना झ ालेली शिक्षा या संदर्भात अपील समितीपुढे ठेवलेला आहे.कुठल्या परिस्थितीत वेतनवाढ बंद करण्यात आलेली होती त्याची सविस्तर माहिती घेऊन पुढील बैठकीमध्ये अभिप्राय देण्यात येईल.ही माहिती २-३ विभागाशी संबंधित आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी अपील सादर केलेले यावर प्रशासनाने मत काय आहे.यावरून एक सविस्तर टिप्पणी पुढील बैठकीत प्रशासनाने सादर करावी. पुढील बैठकीत यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. एस.बी.झनझन यांची मारुती जिप्सी क्र. एम.एच.२० ए.३३३३ साठी रेडीयम टायर खरेदी प्रकरणात गोठविण्यात आलेली एक वेतनवाढ संदर्भात दाखल झालेल्या अपिलावर प्रशासनाने पुढील बैठकीत सविस्तर अभिप्रायासह माहिती देणे बाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: १०३/२१:**

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे वैदयकीय  खर्चाची प्रतिकृती करणे बाबत.

त्या अपीलावर सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि ते अधिकारी ज्या विभागात काम करीत आहे,त्या विभागाचे काम म्हणजे सर्व नागरीकांसाठी व तुमच्या आमच्यासाठी ज्वलंत अशा प्रश्नाशी निगडीत आहे.आरोग्य विभागामार्फत आजारासाठी

आर्थिक मदतीची कार्यवाही होते.शासनाने नेमुन दिलेल्या किंवा मनपाने नेमुन दिलेल्या आजारामध्ये हा आजार त्यात नमुद नसेल तरी त्या आजाराचा ज्यात समावेश करण्यात यावा असे स्थायी समितीतर्फे निर्णय घेण्यात येत आहे व त्यानुसार संबंधित अग्निशमन अधिकारी यांचे मेडीकल बील मंजुर करण्याबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी.जे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे ते अर्ज दिले तेच अपील ग्राहय धरुन आज निर्णय देण्यात येत आहे.

**संवाद :**

**मा.सभापती :** मुख्य अग्निशमन अधिकारी यांना मेडीकल बील मिळालेले नाही त्यांनी तसे अपील केलेले आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** म्हैसमाळ येथे गेल्या वर्षी घटना घडलेली होती,तेथे या विभागातील काही कर्मचारी व मी स्वतः खोल पाण्यात राहून काम केले ज्यामुळे माझ्या शरीराला इजा झाली व ऑपरेशन करावे लागले.यासंबंधीचे मेडीकल बील सादर केले असता नियमात येत नाही असे म्हटले बील मिळत नसेल तर पुढील वेळेस अशा घटनावर मात करणे अडचणीचे होईल.

**श्री.जयवंत ओक :** म्हैसमाळ येथे गेल्या वेळेस त्यांनी चांगले काम केलेले आहे.एका व्यक्तीचा मृतदेह काढलेला आहे.यासंबंधीत अधिकारी हे चांगल्या प्रकारे काम करतात त्यामुळेच त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. त्यांची भावना जाणून घेऊन त्यांना औषधोपचारासाठीची आर्थिक मदत देण्यात यावी.या कर्मचाऱ्यांना मृत्यूला सामोरे जावे लागते अशा कर्मचाऱ्यांना मदत दिलीच पाहिजे.

**श्री.मधुकर सावंत :** स्थायी समितीचा अधिकार असेल तर त्यांचे अपील मंजुर करावे जेवढा खर्च झाला त्या नियमाने त्यांना आर्थिक मदत करावी.त्यांची भावना लक्षात घ्यावी.

**मा.सभापती :** घटनेच्या किती दिवसानंतर बील दाखल होते विहित मुदतीत प्रशासनाकडे बील सादर केले होते का?

**मुख्य अग्निशमन अधिकारी :** घटनेच्या आत संचिका डॉ.देशपांडे यांचेकडे गेलेली होती.

**श्री. भरत लकडे :** मेडीकल बील थांबवून ठेवू नये.नसत्या त्यामुळे कर्मचाऱ्यांची काम करण्याची उत्सुकता राहणार नाही.

**श्री.जयवंत ओक :** विशेष बाब म्हणून मंजुर करण्यात यावे.

**श्री.मधुकर सावंत :** अधिकाऱ्याचे मनोधैर्य वाढत असेल तर अपील म्हणून मंजूर करण्यास हरकत नसावी कुणावर अन्याय होवू नये.

**श्री.मीर हिदायत अली :**या विभागातील कर्मचारी जीव धोक्यात घालून कामे करतात.औषधोपचाराची मदत देण्यात मंजुरी दयावी.

**मा.सभापती :** आरोग्य अधिकारी यांचे मत घेऊन निर्णय घेता येईल.

**डॉ.बिनवडे आशा :** का,मेडीकल बील देता येत नाही,त्याचे उत्तर देण्यासाठी सबंधित अधिकारी उपस्थित नाही व ते नेहमीच सभागृहात गैरहजर राहतात हे योग्य नसून माझ्या माहिती प्रमाणे १५ आजारावर औषधोपराचासाठी खर्च दिला जातो.इतर कर्मचारी अधिकारी यांचे डॉ.देशपांडे यांच्या बद्दल तक्रारी आहे.कोणत्या आजारासाठी आर्थिक मदत करु शकतो हे न बघता कर्मचाऱ्यांना तोंडी किंवा संचिकेवर एका ओळीत शेरा देऊन टाकतात यात बदल नाही हे चुकीचे धोरण आहे.काय येते काय येत नाही हे कळत

नाही,इएनडी,मेंदुचा आजार ,हे डॉक्टरांना कळत नाही,मेडीकलचे बील योग्य आहे.उत्तराची वाट न बघता मंजुर करावे.

**मा.सभापती :** स्थायी समितीसमोर अपील सादर झालेले होते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.एस.बी.झनझन यांचे दाखल केलेल्या वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्तीसाठी दाखल केलेले क्लेम त्यांनी ज्या आजारासाठी दाखल केले विशेष बाब म्हणून त्या आजाराच्या मेडीकल परतावासाठी नमुद केलेल्या आजारात समावेश करुन व त्यांनी दाखल केलेले देयक अपील म्हणून मान्य करुन वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास विशेष बाब म्हणून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री. भरत लकडे :** मागील बैठकीत चर्चा झालेली होती.रामविहार सोसायटीचे अतिक्रमणे काढण्याचे आदेश दिले होते.काढले नाही तर संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करणार होती. त्याबाबत खुलासा दयावा. २२ तारखेपासून आतापर्यंत का कार्यवाही झालेली नाही.

**श्री.नंदकुमार फुलारी :** स.स. श्री. लकडे यांनी या इमारती बऱ्याच वेळा सभागृहात मुद्दा उपस्थित केला.त्यावर अंतिम निर्णय व्हावा.

**मा.सभापती :** रामविहार हौसिंग सोसायटी बाबत बऱ्याच वेळा सभागृहात स.स.श्री. लकडे यांनी प्रश्न उपस्थित केलेला होता,त्या संदर्भात संबंधित विभागाचे अधिकारी यांनी वेळोवेळी सुचना केलेल्या आहे आणि न्यायालयात सुध्दा या केस बाबत अडचण नसुन आजच दुपारी ४.०० वाजेपर्यंत संबंधीत विभागाचे कर्मचारी घेऊन संबंधित अधिकारी यांनी अतिक्रमण पाडावे असे उपआयुक्त (म.) यांना सुचना करण्यात येत आहे.वेळ पडल्यास हे सभागृह सुध्दा जागेवर प्रत्यक्ष पाहणी करेल.आजच्या आज अतिक्रमण न काढल्यास हे संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

**श्री.जयवंत ओक :** दोन-तीन दिवसांपासून पाण्याची टंचाई आहे.वृत्तपत्रात बातम्या येत आहे. जनतेला पाणी दयावे.एका मुलाचा नुकताच टँकरखाली मृत्यू झाला.
(याचवेळी जनतेला पाणी देण्याची मागणी करत स.स.श्री. जयवंत ओक,नंदकुमार फुलारी,श्री.भरत लकडे,श्री. जगदीश सिध्द इ.सदस्य मा.सभापती यांचे डायस समोर खाली बसतात.)

**मा.सभापती :** सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.पाण्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा करता येईल,तसेच परवा मिसारवाडी येथे एका लहान बालकाचा टँकरखाली येऊन निधन झाले.फार वाईट प्रसंग घडलेला आहे. त्या संदर्भात ही चर्चा करण्यात येईल.सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.सविस्तर चर्चा करण्यात येईल.हे प्रकरण कशामुळे घडले.त्याचवेळी सर्व सदस्य आपल्या आपल्या जागेवर जाऊन बसतात.) याबाबत काही रिपोर्ट आलेला आहे का?

**श्री.नंदकुमार फुलारी :** पाणी पुरवठा अधिकारी सभागृहात नाही.पाण्याचा प्रश्न उपस्थित झ ाला आहे.

**श्री.जयवंत ओक :** ज्या मुलांना पाण्यासाठी टँकर खाली येवून मृत्यू झाला त्यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत दयावी.नागरीकांचे जीव धोक्यात येत आहे. मनपा नागरीकांना पाणी देऊ शकत नाही.वार्ड वाईज पाणी दिले पाहिजे.जनता पाणी येत नाही म्हणून नगरसेवकांकडे येतात याची जाणीव प्रशासनाला नाही.अधिकारी सुध्दा सभागृहात नाही.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी मला विचारुन गेलेले आहे.त्यांना झोन मध्ये काम होते.जो मुद्दा उपस्थित झाला संबंधित ज्या मुलाचे टँकरखाली मृत्यू झाला त्याचे कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत माझी सम्मती आहे व याबाबत संबंधित कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.जयवंत ओक :** सभागृहात चर्चा होवू दयावी.ज्या ज्या भागात पाणी नाही अशा भागात प्रशासन काय उपाय योजना राबविणार आहे.सिडको-हडको भागात सध्या १ दिवसाआड पाणी दिले जाते ते सुध्दा पुरेसे नाही.पुढील काळात आणखी परिस्थिती भीषण झाल्यास अशा भागात टँकरद्वारे पाणी देणार का?जायकवाडी जलाशयामध्ये पाणी साठा पुरेपुर आहे का हर्सुल तलावाची परिस्थिती काय आहे?पावसाळा येईपर्यंत येत्या दोन-तीन महिने काय उपाय योजना करणार आहे.वार्डातील विहीरी,हातपंप साफसफाई करणार काय?खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी सभागृहात नाही.अधिकाऱ्यांना सुचना देऊन पाणी प्रश्नावर उप-महापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याचे सुचविण्यात येईल.

**उपआयुक्त (म.) :** पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता (पापु) यांना आराखडा तयार करण्याचे बाबतीत सुचना देण्यात आलेल्या आहे.या आठवडयातच आणि पुढील तीन महिन्यांसाठी प्रति आराखडा तयार करण्यासाठी मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांचे समवेत पुढील आठवडयात बैठक आयोजित करणार आहोत.

**मा.सभापती :** एक आठवडा कालावधी जास्त होतो.आजच उप-महापौर यांच्या दालनामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांना बोलाविण्यात यावे.संबंधित अधिकारी सुध्दा राहतील.छावणी परिषदेच्या संदर्भात आज बैठक घेणार आहोत,त्यानंतर लगेच पाणी प्रश्नाच्या बाबतीत चर्चा करण्यात येईल.संचालक प्राणी संग्रहालय यांचे विभागाचे ऐनवेळचे प्रस्ताव आहेत.संबंधित अधिकारी खुलासा करतील त्यानंतर हे प्रस्ताव घ्यायचे कि नाही हे ठरविला येईल.

**संचालक प्राणी संग्रहालय :** प्राणी संग्रहालयातील प्राण्यासाठी बिफ (मटन),लसुन,घास,ब्रेड आणि पशुखादय हे चार अॅटम खरेदी करावयाचे आहे. निविदा मागविल्या आहे.ते त्या संबंधीचे दर आपल्या समोर ठेवलेले आहे.मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी कमी आहे ते मंजुर केल्यास योग्य होईल.

**मा.सभापती :** प्रस्तावामध्ये बीफ (मटन) दर ९.९० रु. आलेले आहे.मागील वर्षी किती होते.

**संचालक प्राणी संग्रहालय :** मागील वर्षी २३/- रु.किलोने घेतलेले होते.या वर्षी ९.९० रु. दर आलेले आहे.

**श्री.जयवंत ओक :** संबंधित अधिकारी त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न करतात तुर्त प्राण्यांना अन्न नसेल तर मंजुर करावे.

**डॉ.बिनवडे आशा :** ऐनवेळी असे प्रस्ताव घेऊ नये.यापुर्वीच प्रस्ताव का सादर झालेला नाही.

**संचालक प्राणी संग्रहालय :** आज सकाळीच मंजुरी मिळालेली आहे.नविन दर १ एप्रिल पासून लागु राहतील ३१ मार्चपर्यंत जुनेच दराने खरेदी होईल.२३/- रु. ऐवजी ९/- किलोने बिफ मिळत आहे.घेण्यास हरकत नसावी.

**श्री.नंदकुमार फुलारी श्री.भरत लकडे,श्री.जगदीश सिध्द :** मनपाचा यात फायदा असेल तर प्रस्ताव मंजुर करावा.खराब बिफ येणार नाही,याची दक्षता घेण्यात यावी.नसता प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होवू नये.

**संचालक प्राणी संग्रहालय :** जुन्या व नविन दराने १३/- रु. प्रति किलो मागे फरक येत आहे.दोन क्विंटल (बिफ) मटन लागते याचा अर्थ २६००/- रु. प्रत्येक दिवसाला फायदा होणार आहे.बिफ खराब देऊ शकणार नाही,त्याची तपासणी होऊनच प्राण्यांना दिले जाते.या निविदामध्ये स्पर्धा झालेल्या आहे.त्यामुळे दर कमी आलेले आहे.एकुण १५ लाखाची खरेदी आहे.

**मा.सभापती :** नविन दराने १५ लाख ऐवजी ९ लाखाची खरेदी होईल असे असेल तर असे प्रस्ताव स्थायी समिती समोर येण्याची गरज नाही.

**डॉ.बिनवडे आशा :** प्राण्यांना तुत्र अन्नाची आवश्यकता आहे हे अधिकाऱ्यांना माहिती असतांना यापुर्वीच प्रस्ताव का सादर केला नाही.यात दोष अधिकाऱ्यांचा आहे.उशिरा सादर करुन आताच मंजुरी झाली असे उत्तर देणे बरोबर नाही.

**श्री.मधुकर सावंत :** महानगरपालिकेचा यात फायदा होणार होता हे अधिकाऱ्यांना माहित असतांना यापुर्वीच का प्रस्ताव दिलेला नाही.आपले अधिकारी रस्त्यावरील बकरे ओढून आणून किंवा कत्तल केलेले बकऱ्यांचे मांस आणले जाते ते मांस खाल्ले जाते अशी चर्चा आहे.हा प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्याची आवश्यकता नाही.अधिकारी नेहमीच प्रस्ताव ऐनवेळी सादर करुन मंजुरी घेतात हे बरोबर नाही.मंजुर करु नये.

**संचालक प्राणी संग्रहालय :** जे मांस जप्त केले जाते ते पोलिसांच्या समक्ष होते ते आपण नारेगावला पुरतो.

**मा.सभापती :** पुढील स्थायी समिती पुढे हा विषय ठेवण्यात यावा.
(दिनांक १३-११-२००१ च्या स्थायी समिती सभेमध्ये स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव विषय क्र. ५२ / ५)

**विषय क्र.: १०४/२२:**

मा.स्थायी समितीने दि. ८-१-९९ रोजी संपन्न झालेल्या विषय क्र. ४५७/२४ अन्वये मंजुर केलेला ठराव रद्द करणे बाबत.

मो.उस्मानपुरा येथील सर्व्हे क्र. ६ मधील रहिवाशी वापरासाठीचे रेखांकन सन १९६६ मध्ये तत्कालीन औरंगाबाद नगरपालिकेने मंजुर केले होते.हया मंजुर रेखांकनात २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र दर्शविण्यात आले होते.सदर २४ मी.विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र दर्शविण्यात आले होते.

सदर २४ मी.विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मावेजा जमीन मालकास अदयाप देण्यात आलेला नाही.सदर मावेजा धन स्वरुपात देण्याऐवजी रेखांकनातील खुल्या जागेतून मोबल्याच्या रकमेच्या मुल्यांकनाचा भुखंड रेखांकनास सोडलेल्या खुल्या जागेतून देण्यासंबंधीचा प्रस्ताव अर्जदाराचे विनंतीवरुन मनपा प्रशासनापुढे आला असता प्रशासनाने त्यावर विचार करुन रेखांकनातील १०% खुल्या जागेतील भुखंड मोबदल्याचे स्वरुपात अर्जदारास देण्यात यावा,असा निर्णय तत्कालीन आयुक्त यांनी दि. २१-९-९८ रोजी घेतला.हया निर्णयानंतर सदर विषय मा.स्थायी समितीच्या सभेपुढे दिनांक ८-१-९९ रोजी

विचारार्थ ठेवण्यात आल्या असता स्थायी समितीने २४ मी.विकास योजना रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्राचे मोबदल्यापोटी रेखांकनातील १०% खुल्या जागेपैकी २५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड मुळ जमीन मालकास निवासी वापरासाठी देण्यात यावा असा ठराव पारीत केला.

मा.स्थायी समिती सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने करारनामा व इतर अटी शर्ती हया संबंधाने पुढील कार्यवाही प्रशासनाने पुर्ण करुन मालकासोबत दिनांक १५-५-१९९९ रोजी करारनामा करण्यात आला.हया करारनाम्यात २५० चौ.मी.क्षेत्राचा भुखंड रेखांकनातील १०% खुल्या जागेच्या क्षेत्रातून अर्जदारास देण्यासंबंधी उल्लेख करण्यात आलेला आहे.दराबाबतच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेता यांनी त्यांचे पत्र क्र. २९ / ९९ दिनांक २-१-९९ अन्वये स्थायी समितीच्या ठरावास व रेखांकनातील खुल्या जागेपैकी क्षेत्रातून रहिवाशी वापराचा भुखंड देण्याच्या प्रस्तावास आक्षेप घेतला आणि सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा व तोपर्यंत प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करुन नये अशी मागणी केली.करारनाम्यानुसार रेखांकनातील खुल्या जागेपैकी २५० चौ.मी. चा भुखंड मुळ जमीन मालकास देण्याबाबत स्थायी समितीचा ठराव झालेला असतांना संबंधित जमिन मालकाने शहर भुमापन कार्यालयापासून ३९२.७५ चौ.मी. क्षेत्राचे भुखंडाचे पी.आर.कार्ड प्राप्त करुन घेतले.जे करारनाम्यानुसार नाही व स्थायी समितीच्या ठरावाची पायमल्ली करणारे आहे.

मंजुर रेखांकनातील किमान १०% किंवा त्यापेक्षा जास्त सोडण्यात आलेल्या सार्वजनिक खुल्या जागेत रहिवाशी भुखंड देण्याची व खुल्या जागेचे आवश्यक क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीनुसार न सोडता ते कमी करण्याची कार्यवाही कायदयाच्या व नियमाच्या धरुन नाही.स्थायी समितीच्या उक्त ठरावाद्वारे रेखांकनातील खुल्या जागेत मुळ जमीन मालकास रहिवाशी भुखंड दिल्यास खुल्या जागेचे क्षेत्र रेखांकनातील एकूण क्षेत्राच्या ८.५४% एवढे राहते,ते कायदयात न बसणारे व नियमाचा भंग करणारे ठरते.प्रशासनाने सदर प्रकरणातील झालेल्या कार्यवाहीचा,स्थायी समितीच्या ठरावाचा संपूर्ण अभ्यास केला असता स्थायी समितीच्या ठरावाची अंमल बजावणी करणे कायदा व नियम सोडून होईल.हया निष्कर्षाप्रत प्रशासन आलेले आहे.रेखांकनातील खुल्या जागेत रहिवाशी भुखंड नियमानुसार देता येत नसल्यामुळे २४ मी. विकास योजना रस्त्याने बाधीत चटई क्षेत्र निर्देशंकाद्वारे मुळ जमीन मालकास देणे हे कायदयाला व नियमाला धरुन होईल असे प्रशासनाचे मत आहे.तरी सदर प्रस्तावात झालेली कार्यवाही व मुळ जमीन मालकाने प्राप्त करुन घेतलेला बेकायदेशीर पी.आर.कार्डचा पुर्नविचार करुन मा.स्थायी समितीने ठराव क्र. ४५७/२४ दिनांक ०८-०१-१९९९ रद्द करावा व कायदेशीर प्रकिया पुनःस्थापित करावी असा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यात येतो.

**संवाद :**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मो.उस्मानपुरा सर्व्हे क्र. ६ मधील एका गरीब व्यक्तिची जागा मनपाने भुसंपादन केली. सतत ३ वर्षापासून हा प्रश्न स्थायी समिती समोर येत आहे.रस्ता रुंदीकरणासाठी जागा भुसंपादन केली व ओपन स्पेस मधील जागा संबंधित मालकास दिलेली आहे व तसा ठराव दि. ८-१-९९ रोजी संमत करण्यात आलेला आहे.तो ठराव रद्द करण्यासंदर्भात मागील १३-११-२००१ रोजीच्या बैठकीत तसा प्रस्ताव सादर झालेला होता.स्थायी समितीने घेतलेला निर्णय हा कायम करण्यात आला पाहिजे.राजाबाजार येथील अशा एक प्रकरणात न्यायालयाने निर्देश होते, त्यानुसारच्या प्रस्तावाच्या बाबतीत मा.आयुक्तांची सविस्तर टिप्पणी आलेली आहे. सभापती या नात्याने योग्य

निर्णय घ्यावा. प्रशासनाच्या जागेची गरज नसेल तर संबंधित व्यक्तिला जागा दयावी नसता मोबदला दयावा.

**मा.सभापती :** संबंधीत व्यक्ती सन ९९ पासून जागेची डिमांड करीत आहे. जेवढी जागा अलॉट केलेली आहे, तेवढी दयावी नसता संबंधित व्यक्तिला पैशाच्या स्वरुपात मोबदला दयावा.

**श्री.जगदीश सिध्द :** मनपाने जागा घेतली.संबंधित व्यक्तिला जेवढी जागा दयायची तेवढी दिली नाही व जागा लागत नसेल तर जागा दयावी किंवा जागेचा मोबदला दयावा.ऐनवेळी प्रशासकीय ठरावाची गरज नाही.पुर्वीचा जो ठराव झालेला आहे त्याचीच अंमलबजावणी करावी.

**मा.सभापती :** जेवढी प्रशासनाला मान्य असेल तेवढीच जागा संबंधीत मिळकत धारकाला देण्यात यावी.जर जागा घेण्यास कबुल नसेल तर मोबदला देण्यात यावा.

**श्री.जयवंत ओक :** तीन पिढयांपासून संबंधित व्यक्तिची जागा होती, त्यांनी मनपास मदत केलेली आहे. स्थायी समितीने संबंधित व्यक्तिला २५० चौ.मी.जागा दयावी, म्हणून प्रस्ताव मंजुर केला. तो निर्णय योग्य आहे.

**मा.सभापती :** प्रशासनाने संबंधित व्यक्तिकडून जागा घेण्यासाठी जी कार्यवाही केली होती ती कार्यवाही जशीच्या तशी ठेवून संबंधित मिळकत धारकांना त्यांची जागा देण्यात यावी, त्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मो.उस्मानपुरा येथील सर्व्हे नं.६ मध्ये रेखांकनातील खुल्या जागेत २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे मोबदल्यास जितकी जागा प्रदान करण्यात आलेली आहे, तेवढीच जागा देण्यात यावी. संबंधीत व्यक्ति जागा घेण्यास तयार नसेल तर पैशाच्या स्वरुपात संपादित जमीनीचा मोबदला देण्यात यावा. प्रशासनाने संबंधित व्यक्तिकडून जागा घेण्यासाठी जी कार्यवाही केली ती जशीच्या तशी ठेवून प्रदान केलेली जागा त्यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**डॉ.बिनवडे आशा :** मागील बैठकीत डॉ.देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा या सभागृहाने निर्णय घेतलेला होता. त्या संबंधीची कार्यवाही केलेली आहे का खुलासा दयावा. रेकॉर्ड सली करण्याचे आदेश केले होते ती सुध्दा कार्यवाही झालेली आहे किंवा नाही याचा खुलासा दयावा.

**उप-आयुक्त (म.) :** प्रोसीर्डीग प्राप्त झाली आहे. कार्यवाही अंतर्गत आहे. प्रोसेल चालू आहे.

**डॉ.बिनवडे आशा :** संबंधित अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यास विलंब होत आहे.त्याप्रमाणे जे रेकॉर्ड अंतिम चौकशीसाठी आहे, त्यास सील करण्याचे आदेश करून कार्यवाही झालेली नाही. विलंब झाल्यास त्या रेकॉर्डमध्ये फेरबदल होऊ शकतो. यास कोण जबाबदार राहणार आहे. त्यासाठी तात्काळ ज्या चौकशीच्या संचिका आहे, त्यास सील करावे. तसेच संबंधित मेडीसीन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर सुध्दा गुन्हे दाखल करण्याचे आदेश झालेले होते. त्यानुसार काय कार्यवाही केलेली आहे.

**उप-आयुक्त (म.) :** सर्व कायदेशीर बाबी तपासुन योग्य ती ॲक्शन घेण्यात येईल. उपसंचालक आरोग्य विभाग यांचेकडून रिपोर्ट मागविलेला आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** संचिका सील करण्यास उशीर का होतो. संचिका सील करण्यास अहवालाची गरज नाही. तात्काळ संबंधित सर्व रेकॉर्ड सील करावे.

**श्री.मीर हिदायत अली :** मंजील नगर येथे एका संस्थेने भाडे तत्वावर मनपाची जागा घेतली अदयाप मनपास भाडे भरणा केले नाही.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित मालकाने रक्कम भरणा केली.

**मा.सभापती :** संबंधित संस्थेने रक्कम देत नाही. सदरील जागा १०% प्रमाणे ओपन स्पेस मधील आहे ती नागरीकांच्या मागणीनुसार खुली करण्यात यावी व लवकरात लवकर विकसित करावी.

**श्री.कावडे :** मा.सभापती नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र. १ सौ.मंगला प्रकाश पारख यांनी स्थायी समितीकडे दुकान क्र. ०१ च्या पाठीमागे असलेली जागा भाडे तत्वावर मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. यावर प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे.

**मा.सभापती :** सदरील महिलेने स्थायी समितीकडे अर्ज केलेला आहे. नाथ सुपर मार्केट दु.क्र. ०१ च्या पाठीमागील जागा सौ.मंगला प्रकाश पारख यांनी स्थायी समितीकडे दुकान क्र.०१ च्या पाठीमागे असलेली जागा भाडे तत्वावर मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. यावर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

**मा.सभापती :** सदरील महिलेने स्थायी समितीकडे अर्ज केलेला आहे. नाथ सुपर मार्केट दु.क्र. ०१ च्या पाठीमागील जागा सौ.मंगला प्रकाश पारख यांना दुकानाच्या पाठीमागील जागा सौ.मंगला प्रकाश पारख यांना दुकानाच्या पाठीमागील जागा त्यांच्या मागणीनुसार भाडे तत्वावर देण्यात यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सर्व्हे नं.५३/२,५४/१ गारखेडा येथे मनपाची ३ एक खुली जागा असुन मनपाने विकास करण्यासाठी विकत घेतलेली आहे. त्या जागेवर एका बिल्डरने तेथे पक्के बांधकाम केले, त्यास मनपातील अधिकाऱ्यांची सुध्दा बांधकामास मंजुरी दिली. यात मनपाच्या मालमत्तेचे नुकसान झालेले असुन संबंधीत बिल्डर व बांधकामास परवानगी देणारे अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्यवाही व्हावी. १० लक्ष रु. देऊन जागा खरेदी केलेली आहे.

**श्री.मीर हिदायत अली :** मनपाच्या जागेवर कुणी अतिक्रमण करीत असेल तर तात्काळ संबंधितांवर पोलीस गुन्हा दाखल झाला पाहिजे.

**प्र.उपसंचालक नगररचना :** मनपाच्या मालकीची जागा आहे, परंतु पुर्ण तपासणी करुनच पुढील कार्यवाही करता येईल.

**मा.सभापती :** गारखेडा परिसरातील ३ एकर जागा मनपाने विकास कामासाठी विकत घेतली व त्या जागेवर एक बिल्डर बांधकाम करीत आहे असे स.सदस्य श्री.तुळशीबागवाले यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले त्याबद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. ओपन स्पेसवर अतिक्रमण झाले होते,परंतु ती जागा मनपाने विकत घेतली त्या जागेवर अतिक्रमण होत असेल तर योग्य नाही. खेदाची बाब आहे. उप-आयुक्त (म.) श्री. गुट्टे साहेब यांना सुचना देण्यात येतात की, आजच्या आज या जागेवर नगररचना विभागाचे अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी घेऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी

करुन अतिक्रमण झालेले काढून टाकावे व किती जागेवर अतिक्रमण झाले वगैरे व काय कार्यवाही केली याचा अहवाल पुढील स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा.

यानंतर "जन गण मन" राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |